# भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज


**संकलन :**

**डॉ. अनंत कळसे,**

**प्रधान सचिव,**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व

सचिव राष्ट्रकुल संसदीय मंडळ,

महाराष्ट्र शाखा, मुंबई.



**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई

# भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज


**संकलन :**

**डॉ. अनंत कळसे,**

प्रधान सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व

सचिव, राष्ट्रकुल संसदीय मंडळ,

महाराष्ट्र शाखा, मुंबई.



एचबी २४२५–१

**प्रस्तावना**

संसदीय लोकशाही सुदृढ करून विधिमंडळातील कामकाजाची माहिती समाजातील सर्व घटकांना म्हणजे, लोकप्रतिनिधी, प्रशासनिक अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना खऱ्या अर्थाने होण्यासाठी अशाप्रकारच्या पुस्तिकांचा निश्चितच चांगला उपयोग होत आहे.

नुकताच विधिमंडळाचा अमृत महोत्सव साजरा झालेला आहे. राज्याच्या विकासात विधिमंडळाचे बहुमूल्य योगदान आहे. विविध संसदीय आयुधे, कायदे, अर्थसंकल्पीय प्रक्रिया व समिती पद्धतीच्या माध्यमातून विधिमंडळाने शासनाच्या धोरणांना वेळोवेळी दिशा दिलेली आहे. संसदीय लोकशाहीमध्ये विधिमंडळाचे योगदान सर्वच क्षेत्रात वाखाणण्यासारखे असून राज्याच्या विविध समस्यांवर उपाययोजना शोधून काढण्याचे व विविध लोककल्याणकारी कायदे व धोरण निश्चित करण्याचे ऐतिहासिक कार्य विधिमंडळाने केलेले आहे. भारतीय संविधानाच्या माध्यमातून विधिमंडळाचे कामकाज, विधिमंडळाने केलेल्या कार्याचा व राज्याच्या विकासात दिलेल्या योगदानाचा ही पुस्तिका म्हणजे अल्पसा आढावा घेण्याचा प्रयत्न आहे. अशाप्रकारचे चर्चासत्र आणि व्याख्यानांमुळे प्रशासनाकडून सामाजिक बांधिलकी जपण्याबाबतच्या प्रयत्नांना तसेच भारतीय संविधानातील मूल्ये जपण्यासाठी निश्चितच गती मिळत आहे.

महाराष्ट्र विधानपरिषेदेचे मा. सभापती, श्री. शिवाजीराव देशमुख व महाराष्ट्र विधानसभेचे मा.अध्यक्ष, श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी वेळोवेळी अशा प्रकारच्या प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी मला या कार्यात प्रोत्साहन दिलेले आहे याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

या पुस्तिकेच्या निर्मिती प्रक्रियेसंदर्भात विधिमंडळातील अधिकारी, श्री. शिवदर्शन साठ्ये, उप सचिव, श्री.जितेंद्र भोळे, उप सचिव, श्री.नंदलाल काले, उप सचिव (विधि), ग्रंथपाल, श्री. बा. बा. वाघमारे, श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव, श्री.संतोष पराडकर, अवर सचिव, श्री.निलेश मदाने, जनसंपर्क अधिकारी, श्री.सुनिल झोरे, कक्ष अधिकारी यांनी मला मोलाचे सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या पुस्तिकेचा सर्व मा. सदस्यांना एक संदर्भसाहित्य म्हणून निश्चितच उपयोग होईल असा मला विश्वास वाटतो.

या पुस्तिकेसंदर्भात विधायक सूचना, सुधारणा यांचे निश्चितच स्वागत केले जाईल.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व
सचिव, राष्ट्रकुल संसदीय मंडळ,
महाराष्ट्र शाखा, मुंबई.

**विधान भवन :**
मुंबई,
९ फेब्रुवारी २०१५.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | (तीन) |
| १ | संसदीय लोकशाही व विधिमंडळाचे कामकाज | १ |
| २ | महाराष्ट्र विधानमंडळाचा थोडक्यात इतिहास | ९ |
| ३ | विविध संसदीय आयुधे | १५ |
| ४ | विधिविधान (Legislation) | ३४ |
| ५ | महाराष्ट्र विधानमंडळाने विविध विषयांवरील संमत केलेली महत्त्वाची विधेयके. | ३६ |
| ६ | वित्तीय कामकाज | ५९ |
| ७ | विशेषाधिकारांचा उगम व इतिहास | ७७ |
| ८ | विशेषाधिकारभंगाची काही प्रकरणे | १०४ |
| ९ | विधानमंडळाची समिती पद्धती | ११६ |
| १० | काही महत्त्वाच्या संसदीय आयुधांची उदाहरणे | १२३ |
| ११ | सदस्यांचे निलंबन व कारणे | १७३ |
| १२ | अर्थसंकल्पविषयक संक्षिप्त माहिती | १८९ |
| १३ | संदर्भसूची | १९२ |

## १. संसदीय लोकशाही व विधिमंडळाचे कामकाज

भारताने स्वातंत्र्यानंतर संसदीय कामकाज पद्धतीचा स्वीकार केला. या संसदीय कामकाज पद्धतीमध्ये संसद व विधिमंडळाचे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. संसद आणि विधिमंडळ या दोन्ही संस्था जनतेच्या आशा, आकांक्षाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महत्त्वाच्या लोकशाही संस्था आहेत. या संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून देशाने व राज्याने सर्वच क्षेत्रात भरीव अशी प्रगती केलेली आहे. या प्रगतीमध्ये संसद आणि विधिमंडळ यांची भूमिका अत्यंत निर्णायक अशी असते. कारण या सार्वभौम सभागृहात विविध प्रश्नांवर /धोरणांवर साधक बाधक चर्चा होऊन निर्णय घेतले जातात व या निर्णयाची अंमलबजावणी शासनामार्फत केली जाते. या शासन पद्धतीचे 3 भाग असून विधिमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्या माध्यमातून ही सर्व लोकशाही प्रक्रिया राबवली जाते. विधिमंडळाचे महत्त्वाचे कार्य धोरण ठरविणे व कायदे तयार करणे हे असून कार्यकारी प्रशासनावर सखोल व प्रभावी असे नियंत्रण ठेवणे हे आहे. हा संसदीय लोकशाहीचा गाभाच आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेत जनता ही सार्वभौम असते. जनतेच्या मताचे प्रतिबिंब लोकनियुक्त विधानमंडळात पडते. त्यामुळे सार्वभौम अशा जनतेच्या आशा आकांक्षा फलद्रूप करण्याच्या उद्देशाने व प्रशासन चालवण्यासाठी जनकल्याणार्थ कायदे करण्याचे काम विंधिमंडळाकडे सोपवले आहे. कायद्याची म्हणजेच अधिनियमांची अंमलबजावणी कार्यकारी मंडळ करते व त्याचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायमंडळाकडे सोपवली आहे. शासनाच्या या तीन अंगापैकी विधिमंडळाचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. शासनाच्या ध्येयधोरणासंबंधी तसेच जनकल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसबंधीचे सर्व निर्णय विधिमंडळात घेतले जातात. विधिमंडळ हे विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून शासनाला दिशा देण्याचे व प्रशासन गतिमान करण्याचे काम अव्याहतपणे करीत आलेले आहे.

भारतीय राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आल्यानंतर संसदीय कामकाज पद्धतीला खऱ्या अर्थाने भारतात सुरुवात झाली. संसदीय कार्य पद्धतीचा मूळ गाभा म्हणजे **जनतेचे सार्वभौमत्व** हा आहे. जनतेचे सार्वभौमत्व हे भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेमध्ये (Preamble) दृगोचर झालेले आहे.

संसदीय कामकाज पद्धतीच्या अभ्यासकाला राज्यघटनेची प्रस्तावना एका दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. राज्यघटनेची प्रस्तावना खालीलप्रमाणे असून संपूर्ण घटनेचे सार त्यात अंतर्भूत आहे :—

"आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी बंधूता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत."

स्वातंत्र्य, समता, बंधूता व दर्जाची समानता ही चतु:सूत्री हा संसदीय लोकशाहीचा गाभा आहे. संविधानातील प्रत्येक तरतुदीचा बारकाईने अभ्यास केल्यास या मूल्यांवर आधुनिक भारतीय समाज रचनेचे जडणघडण झालेले दिसते.

संसदीय लोकशाही कार्यपद्धती आपल्या देशाला नवीन नाही. पुरातन काळात सभा, परिषदा, गणराज्ये अस्तित्वात होतीच. मोर्य, गुप्ता यांच्या साम्राज्यातदेखील याचा उगम आपल्याला पहावयास मिळतो.

समाजातील विविध समस्या, तंटे यांचे निवारण गावाच्या चावडीवर पंचाच्या माध्यमातून होत होते. 'पाचामुखी परमेश्वर' हा त्या काळाचा परवलीचा शब्द होता. मात्र 'कायद्याचे राज्य' (Rule of Law) ही संकल्पना आपण ब्रिटीशांकडून घेतली आहे. प्राध्यापक ए. वी. डायसी या तत्त्ववेत्याने १८८५ साली ही संकल्पना खऱ्या अर्थाने विकसित केली. कायद्याची सर्वोच्चता, कायद्यापुढे समानता व घटनाधिष्ठित मूल्यांचे पालन (Supremacy of Law, Equality before Law and Predominance of Legal Spirit ) ही त्याची तत्त्वे जगमान्य आहे. ही तत्त्वे आपल्या राज्यघटनेच्या विविध तरतुदींमध्ये प्रकर्षाने आढळून येतात. किंबहुना, कायद्यापुढे समानता व कायद्याचे राज्य ही संसदीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत.

ब्रिटीश संसदेला लोकशाहीची जननी (Mother of Democracy) म्हटले जाते. संसदीय लोकशाहीचा उगम याचा अभ्यास करावयाचा झाल्यास ब्रिटीश प्रथा, परंपरा, राजेशाही, संसदेने राजाविरुद्ध केलेला अधिकारासाठीचा संघर्ष, मॅग्नाकार्टा, वेगवेगळे कायदे याचा तौलानिक अभ्यास करणे गरजेचे आहे.

ब्रिटीश लोकशाहीला फार मोठा इतिहास आहे. ब्रिटीश राज्यघटना अलिखित स्वरूपाची आहे. तथापि, लोकशाहीची पाळेमुळे ब्रिटनमध्ये घट्ट रुजलेली आहेत. ब्रिटनमध्ये सुद्धा लोकशाही खऱ्या अर्थाने विकसित होण्यासाठी कित्येक शतके उजाडावी लागली. मॅग्नाकार्टा-१२१५, हेबिअस कार्पूस कायदा-१६७९, बील ऑफ राईट १६८९, सेटलमेंट कायदा-१७०१, रिफार्म कायदा-१८३२, १८६७, १८८४, म्युनिसिपल कॉर्पोरेशन कायदा-१८७२, ज्युडिकेचर कायदा-१८७३, १८७६, स्थानिक स्वराज्य कायदा-१८८८, १९२९, १९७४ रिप्रेझेंटेशन ऑफ पिपल ॲक्ट-१९१८, समान मतदानाचा १९२८ चा कायदा, स्टॅट्यूट ऑफ वेस्ट मिनिस्टर कायदा-१९३१ इ. महत्त्वाच्या कायद्यांच्या माध्यमातून ब्रिटीश संसदीय पद्धती विकसित झाली.

ब्रिटीश घटनेचे गाढे अभ्यासक प्राध्यापक डब्ल्यू.बी.मुन्रो यांनी असे विधान केले आहे की, "The British Constitution is a complex amalgam of institutions, principles and practices. It is a composite of Charters and statutes, of judicial decisions, of common law, of prudence usages and traditions. It is not one document but

hundreds of them. It is not derived from one source bent from several..... It is a child of wisdom and chance."

भारतीय संसदीय प्रणाली ही ब्रिटीश संसदीय पद्धतीवरून घेतलेली आहे. ब्रिटीश संसदेचा थोडक्यात मागोवा घेतल्यास असे दिसून येते की, सुमारे १३ व्या शतकात पार्लमेंटला प्रारंभ झाला. तत्पूर्वी राजाला अनियंत्रित व अमर्याद सत्ता होती व राज्याऐवजी राजा सार्वभौम आहे असे प्रतिपादन करण्यात येत होते. राजाच्या अनिर्बंध अधिकारांविरुद्ध उठाव करण्यात आला आणि सन १२१५ मध्ये मॅग्नाकार्टा - ज्याला स्वातंत्र्याचा जाहिरनामा असे संबोधले जाते - त्यावर जॉन राजाने सही केली. जनतेने हक्क प्राप्तीसाठी राजाकडे अर्ज केला होता. मॅग्नाकार्टा व इतर पाच करार असे मिळून ब्रिटीशांना स्वातंत्र्याची सनद मिळाली. या करारामुळे इंग्लंडमध्ये लोकप्रतिनिधीचा कारभार सुरू झाला नाही, पण राजाच्या सत्तेला थोडाफार आळा बसला. पार्लमेंटचे पहिले अधिवेशन १२६५ मध्ये भरले व मर्यादित स्वरूपात का होईना पण लोकप्रतिनिधीचा कारभार सुरू झाला. पहिले अधिवेशन भरविण्याचे कामी सायमन डी. मॉटफर्ड यांनी पुढाकार घेतला होता. सरदार, जहागिरदार व शहरांचे प्रतिनिधी यांची बैठक बोलाविण्याचा सल्ला त्यानेच राजाला दिला होता व राजालाही खर्चासाठी मंजुरी घेण्यासाठी या लोकांची अनुमती हवी होती. या पहिल्या अधिवेशनात सर्वसाधारण लोकांचे प्रतिनिधी नव्हते, त्यांना १४ व्या शतकामध्ये पार्लमेंटमध्ये प्रथमतः स्थान मिळाले.

पार्लमेंटचे क्षेत्र सुरुवातीस मर्यादित होते. पण राजसत्तेशी लढा देऊन पार्लमेंटने आपले अधिकार वाढवून घेतले. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात पार्लमेंटला सार्वभौम स्वरूप प्राप्त झाले. या लढ्यात पार्लमेंट, राजाकडून एकेक अधिकार मिळवित होते तर दुसरीकडे लोकांचे मताधिकार वाढवून पाया अधिक व्यापक करीत होते. ब्रिटीश पार्लमेंटला ८०० वर्षाची प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. आधुनिक विधिमंडळाची जननी म्हणून हे पार्लमेंट मानले जात आहे व सर्व लोकशाही देशांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरत आहे.

ब्रिटीश कॅबिनेट पद्धती ही सुद्धा जगातील एक आगळीवेगळी पद्धती असून, संसदीय लोकशाही या कॅबिनेट पद्धतीचा गाभा आहे. ही पद्धती विकसित करण्यास १८ वे शतक उजाडावे लागले. हॅनोवर राजाच्या कारकिर्दीमध्ये या कॅबिनेट पद्धतीचा उगम झालेला आढळून येतो. सर रॉबर्ट वालपोल, रॉबर्ट पिल, पामर्स स्टोन आणि ग्लॅड स्टोन या ब्रिटीश पंतप्रधानांचे याबाबत फार मोठे योगदान आहे.

घटना समितीमध्ये स्वतंत्र भारतासाठी कोणती राज्य पद्धती स्वीकारावी यावर घटनाकारांनी साधक-बाधक चर्चा करून, सखोल विचारमंथन केले. त्यांनी विविध लोकशाही देशांचा व राज्य पद्धतीचा सखोल अभ्यास केला. अमेरीका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड, जर्मनी, फ्रान्स इ. देशांच्या राज्य पद्धतीचे सूक्ष्म अवलोकन केले. अमेरिकेमधील संघराज्यात्मक व अध्यक्षीय लोकशाही पद्धत, ब्रिटनमधील संसदीय लोकशाही यांचा तौलानिक अभ्यास करून भारताला कोणती पद्धती अधिक योग्य राहील याचा ऊहापोह केला.

अमेरिकन अध्यक्षीय पद्धतीमध्ये अध्यक्ष हा थेट जनतेद्वारे निवडला जातो व तो अमेरिकन संस्थेला जबाबदार नसतो. अमेरिकन संसद निवडून आलेल्या अध्यक्षाला अविश्वास प्रस्तावाच्या माध्यमातून काढू शकत नाही. सत्ता विभाजनाचा सिद्धांत व संघराज्यात्मक कार्यपद्धती ही अमेरिकन राज्यघटनेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. संसद, कार्यकारी प्रशासन व न्याय मंडळे ही स्वतंत्र असून स्थिर शासनाच्या संकल्पनेवर अमेरिकन घटना आधारित आहे.

मात्र घटनाकारांनी भारतासाठी या अध्यक्षीय शासन पद्धतीऐवजी संसदीय शासन पद्धती सुयोग्य मानली. या पद्धतीला जबाबदार शासन पद्धती असे म्हणता येईल. अमेरीकेमध्ये अध्यक्ष कार्यकारी असून भारतात हे अधिकार संसदेला आहेत. या पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यकारी प्रशासन हे संसद/ विधिमंडळाला जबाबदार आहे. संसदेप्रति कार्यकारी प्रशासनाचे उत्तरदायित्व हा संसदीय कार्यपद्धतीचा गाभा आहे. या संबंधीच्या विवक्षित तरतुदी संविधानामध्ये केलेल्या आहेत. लोकनियुक्त शासनाला त्याच्या सर्व धोरणांबाबत संसदेला जाब द्यावा लागतो. एकप्रकारे संसद व विधिमंडळे ही लोकनियुक्त सभागृहे कार्यकारी प्रशासनावर नियंत्रण ठेवतात. म्हणूनच जोपर्यंत मंत्रिमंडळाला संसद वा विधिमंडळात बहुमत असते तोपर्यंतच मंत्रिमंडळ सत्तेवर राहू शकते, अन्यथा मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वावर मंत्रिमंडळ काम करते.

असे जरी असले तरी भारतीय राज्यघटना ही अमेरिकन संघराज्यात्मक पद्धती व ब्रिटीश संसदीय पद्धती यांचे उत्तम मिश्रण आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, संसदीय शासन प्रणाली, संघराज्यात्मक पद्धती, सत्ता विभाजनाचा सिद्धांत, कायद्याचे-राज्य इत्यादी तत्वांचा समावेश केलेला असून ही सर्व तत्त्वे ब्रिटीश संसदीय पद्धती, अमेरिकन संघराज्यात्मक पद्धती, आयरीश राज्यघटना, कॅनडा व ऑस्ट्रेलियन राज्यघटना यांवरून घेतलेली आहे. शिवाय १९३५ चा भारत सरकारचा कायदा हा भारतीय राज्यघटनेचा आधार आहे, कारण या कायद्याप्रमाणे ब्रिटीशांनी प्रथमच संघराज्यात्मक पद्धती भारतात अवलंबिली होती. या कायद्याचा उगम बघणे यासंदर्भात महत्त्वाचे आहे.

**१९३५ च्या कायद्याचा जनक :-** चर्चिल, ईडन व मॅकमिलन यांनी पंतप्रधानपद सोडल्यावर तिन्ही वेळा ब्रिटीश हुजूर पक्षीय नेते लॉर्ड बटलर यांचे नाव त्या पदासाठी होते, पण तिन्ही वेळा त्यांची संधी हुकली. तशी ती हुकल्यानंतर जे पंतप्रधान झाले त्यांच्या मंत्रिमंडळात बटलर होते. आपली वैयक्तिक महत्त्वाकांक्षा व्यक्तिगत वैमनस्य वाढविण्यासाठी वा पक्षात फूट पाडण्यासाठी वापरू नये असे त्यांचे मत होते. लहानपणीच त्यांना शारीरिक दुखापत झाली होती व म्हणून पहिल्या महायुद्धाच्या वेळी त्यांना सैन्यात दाखल होता आले नाही. यामुळे कशासाठीही प्राणपणाने लढण्याची त्यांची वृत्तीच हरपली होती असे इनॉक पॉवेल यांनी त्यांच्या बद्दलच्या मृत्यु लेखात म्हटले आहे. एक पंतप्रधान पद सोडले तर बटलर यांनी परराष्ट्र, अर्थ, गृह व शिक्षण अशी सर्व महत्त्वाची खाती अतिशय कौशल्याने हाताळली. किंबहुना १९४४ साली त्यांनी संयुक्त मंत्रिमंडळात असतांना जे शिक्षणविषयक विधेयक मांडले त्यामुळे ब्रिटनच्या शैक्षणिक जीवनात क्रांती झाली. त्यांच्या या कामगिरीचा गौरव, मजूर व लिबरल दोन्ही विरोधी पक्ष करीत आले आहेत. ते जवळ-जवळ २७ वर्षे निरनिराळ्या मंत्री पदांवर होते. गृहमंत्री या नात्यांने त्यांनी पोलीस दलात सुधारणा घडून आणल्या. शिक्षण मंत्री त्यांनी केलेल्या कामगीरीचा गौरव विल्सन यांचे मजूरपक्षीय मंत्रिमंडळ आले तेव्हा १९६४ साली केम्ब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी महाविद्यालयाचे मास्टर हे पद देऊन करण्यात आला. ही मुदत संपल्यानंतर महाविद्यालयाचे प्राध्यापक, पदवीधर यांनीच प्रचंड मतांनी त्यांना पुन्हा निवडून दिले. तथापि, भारतीयांना बटलर यांची ओळख राहील ते १९३५ च्या कायद्याचे जनक म्हणून, हे जनकत्व कायदेशीररित्या बोलावयाचे झाले तर त्यांच्याकडे पूर्णतः जाणार नाही. पण व्यवहारतः ते जाते. त्यावेळी भारतमंत्री होते सर सॅम्युअल होअर व बटलर त्यांचे दुय्यम मंत्री होते. बटलर यांचा जन्म हिंदुस्थानात अटक येथे झाला होता. त्यांचे वडील पूर्वीच्या मध्य प्रांताचे गव्हर्नर होते व दुसरे नातेवाईक हरकोर्ट बटलर हे उत्तर प्रदेश (तेव्हाचा संयुक्त प्रांत) याचे गव्हर्नर होते. म्हणून भारतातील परिस्थिती बटलर यांना चांगली माहिती होती. गोलमेज परिषदेनंतर ब्रिटीश सरकारने

श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली व विधेयक चिकित्सा समितीकडे धाडण्याचे ठरविले. चर्चिल यांनी तेथपासूनच विरोध सुरू केला. पार्लमेन्ट व बाहेर हुजूर पक्षाचे व्यासपीठ या दोन्ही ठिकाणी चर्चिल यांनी जितकी अडवणूक करता येईल तितकी केली. मजूर पक्ष नाराज होता. कारण ३५ च्या विधेयकाने वसाहतीचे स्वराज्य दिले नव्हते. हे विधेयक फार मोठे होते. त्याची कलमे ४७३ व परिशिष्टे १६. त्यावर चर्चाही प्रदीर्घ झाली. कॉमन्सच्या इतिवृत्ताची (हॅन्सार्ड) चार हजार पृष्ठे भरली. एकूण दीड कोटी शब्द या इतिवृत्तात आहेत. भारत मंत्र्यांना ६०० भाषणे द्यावी लागली व १५ हजार प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. श्वेतपत्रिका, चिकित्सा समितीचा अहवाल व विधेयक यावर चर्चा करण्यात कॉमन्सची अडीच वर्षे गेली. सरकारच्या वतीने बटलर या प्रत्येक पातळीवर आघाडीवर होते. चर्चिल यांच्या हालचालींना तोंड देण्यात त्यांचा पुढाकार होता. म्हणून सॅम्युअल होअर हे भारतमंत्री असले तरी ३५ च्या कायद्याचे जनकत्व बटलर यांच्याकडे जाते. इतक्या दीर्घकालीन चर्चेवरून त्यांच्या चिकाटीची कल्पना येऊ शकते. ३५ चा कायदा यशस्वी झाला असे नव्हे. पण प्रांतिक स्वायत्तेचा नवा प्रयोग सुरू झाला. या कायद्यात संघराज्याची योजना अभिप्रेत होती. ती अंमलात येण्यापूर्वी दुसरे महायुद्ध सुरू झाले व ही योजना बारगळली. तथापि, ३५ च्या कायद्याचे वैशिष्ट्य हे की, १९४७ साली स्वातंत्र्याचे विधेयक तयार करतांना त्याचा आधार घेतला गेलाच; पण स्वतंत्र भारताच्या घटनेने या कायद्यातील अनेक महत्त्वाच्या तरतुदी स्वीकारल्या. त्यांनी आपल्या आत्मचरित्रास 'आर्ट ऑफ द पॉसिबल' असे नाव दिले आहे. राजकारण हे शक्यतेच्या कलेत ते मोडीत. हुजूर पक्षातील उदारमतवादी प्रवृत्तीचे ते प्रतिनिधी होते. अत्युच्च अधिकारपद हुकले पण त्यांनी जे करून दाखविले ते विसरण्याजोगे नाही.

संसदीय कार्यपद्धतीमध्ये विधिमंडळाला सरकार बनविणे, सरकारला योग्यप्रकारे दिशादर्शन करणे, प्रसंगी स्थानभ्रष्ट करणे, सरकारी कामकाजावर देखरेख करणे, सरकारी कारभारात अनियमितता इ. बाबी आढळल्यास त्या बाबत जाब विचारणे इ. प्रमुख कामे करावी लागतात. या कामाची विभागणी तीन प्रकारांत करता येईल व ते प्रकार म्हणजे वैधानिक, आर्थिक व टीकात्मक हे होत. विधिमंडळाचे प्रमुख कार्य म्हणजे कायदे तयार करणे व धोरण आखणे होय. कारण विधिमंडळे हे जनतेच्या इच्छेचे प्रातिनिधीक स्वरूप असतात.

विधिमंडळाच्या किंवा संसदेच्या कामकाजाची विभागणी पुढीलप्रमाणे करण्यात येते.

**(१) आर्थिक नियंत्रण,**

**(२) टीकात्मक कामकाज (संसदीय आयुधाच्या माध्यमातून),**

**(३) कायदे तयार करणे,**

**(४) विशेषाधिकार.**

थोर विचारवंत व संत साहित्याचे गाढे अभ्यासक व महाराष्ट्र विधानसभेचे प्रदीर्घ काळ अध्यक्ष राहिलेले माननीय बाळासाहेब भारदे यांनी विधिमंडळाच्या कामकाजाचे अत्यंत सुंदर शब्दात विवेचन केले आहे.

**संसदीय लोकशाही :**

लोकांनी आपले प्रतिनिधी निवडावेत आणि या प्रतिनिधींनी लोकांच्या आकांक्षांशी समरस होऊन कारभार करावा आणि मधून मधून म्हणजे काही विशिष्ट मुदतीने लोकांना प्रतिनिधीबाबत कौल देण्याची संधी द्यावी असा पर्यायच निघू शकतो. याला प्रतिनिधिक लोकशाही वा संसदीय

लोकशाही असे म्हणतात. लोकांचा कारभार नसला तरी कारभारी तरी लोकांचे असावेत, लोकांना प्रत्यक्ष कारभारची जबाबदारी घेता येत नसली तरी कारभारी मात्र लोकांना जबाबदारी असावेत आणि लोकमताचा दबाव आणि प्रतिनिधींचा प्रभाव यामध्ये अनुसंधान राहावे हा संसदीय लोकशाहीचा गाभा आहे. दर पाच वर्षांनी निवडणूक व्हावी, त्यात प्रतिनिधींची निवड व्हावी, त्या प्रतिनिधींचे मंडळ वा सभा असावी,त्यात राज्यासंबंधीचे कायदे, अर्थसंकल्प, निती, निर्णय इ. लोकांचे भवितव्य ठरविणारे निर्णय व्हावेत, त्यांची अंमलबजावणी त्या मंडळाला जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळाकडून व्हावी, त्यावर अंकुश ठेवण्यासाठी वा विधायक दबावासाठी दुसऱ्या मताला व विरोधी पक्षांनाही पूर्ण विचार - उच्चार संघटना-स्वातंत्र्य असावे, या विचार संघर्षातून लोकजागृतीचे कार्य सातत्याने चालावे, त्या जागृतीच्या आधारेच यथायोग्य निवड करण्याची जनमनाची पात्रता वाढावी आणि अशारितीने लोकमताशी संवादी असेच विधानमंडळ वा लोकसभा राहील हे जागरुकतेने प्रतिनिधींनी व लोकांनी पहावे. या गोष्टी संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या गोष्टी विधानमंडळातून प्रतिनिधींना योग्य रीतीने करता याव्यात यासाठी काही कामकाजाचे नियम व संकेत आवश्यक आहेत.

**लोकशाहीचे महामंदिर :**

विधानसभा हे लोकशाहीचे महामंदिर आहे. जनताजनार्दन हीच त्याची स्वयंभू सार्वभौम देवता! प्रतिनिधी हे त्या देवतेचे उपासक, त्या उपासकांचे सेवासाधनेचे संवाद म्हणजे विधानमंडळातील चर्चा. सत्ता आणि सेवा, विरोध आणि विनोद, शक्ती आणि युक्ती, वाद आणि संवाद, कर्तृत्व आणि वक्तृत्व, मान आणि इमान, नय आणि विनय, निष्ठा आणि प्रतिष्ठा, सवाल आणि जबाब, आवेश आणि आर्जव इत्यादी गोष्टींचा पावनसंगम या विधानसभेत अनुभवावयास मिळतो. तोल सांभाळून बोल कसा लावावा, वैर सोडून वार कसा करावा, नर्म होऊन वर्म कसे भेदावे, दुजाभाव असून बंधुभाव कसा ठेवावा, अल्पमताने बहुमताला व बहुमताने लोकमताला कसा साद-प्रतिसाद द्यावा आणि ही सर्व संधाने बांधण्यात लोकसेवेचे अनुसंधान कसे सुटू नये या सर्व गोष्टींचे दक्षतापूर्वक परिपालन म्हणजे वैधानिक कार्य, विधानसभा म्हणजे शिळोप्याच्या गप्पांचे ठिकाण नसून नवमहाभारताचे व्यासपीठ आहे या जाणिवेने लोकप्रतिनिधी काम करतील याच अपेक्षेने लोक त्यांना नियुक्त करीत असतात.

संसदीय शासन प्रणालीमध्ये कार्यकारी प्रशासन म्हणजेच मंत्रिमंडळ हे विधिमंडळास जबाबदार असते व ते संयुक्त जबाबदारीच्या तत्वाने कार्य करते. यासाठी विधिमंडळाला कार्यकारी प्रशासनाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवावे लागते. अशाप्रकारचे नियंत्रण वैधानिक, आर्थिक व टिकात्मक या माध्यमातून ठेवले जाते. अर्थसंकल्पाला मंजुरी देणे, शासनाच्या धोरणांना मंजुरी देणे, कायदे तयार करणे, विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून संपूर्ण प्रशासन व्यवस्थेतील त्रुटी शोधून काढून योजनांच्या अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्याची कार्ये विधिमंडळाला करावी लागतात.

**संसदीय लोकशाही प्रणालीमुळे देशाचा झालेला विकास व या प्रणालीचे देशाच्या विकासात असलेले योगदान :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि संविधानाचा अंगीकार केल्यानंतर एक रक्तविहीन राजकीय क्रांती पूर्ण झाली. परंतु ती एक नव्या सामाजिक व आर्थिक क्रांतीची व त्याद्वारे नवीन मूल्यांवर आधारित एक नवराष्ट्र निर्माण करण्याची नांदी होती. भारतीय संविधानाद्वारे प्रस्थापित संसदीय लोकशाहीवर आधारित शासन व्यवस्थेद्वारे गेल्या ६०-६५ वर्षांच्या कालावधीत राबविलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांचे सिंहावलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दारिद्र्य

निर्मूलन, कृषी व औद्योगिक विकास यांवर प्रामुख्याने भर देण्यात आलेला आहे. विकासाच्या रूढ मोजपट्टया लावून महाराष्ट्राच्या १९६० सालच्या व वर्तमान आर्थिक स्थितीची तुलना करता महाराष्ट्र आज अधिक विकसित अवस्थेत आहे हे प्रकर्षाने जाणवते. समाजाचे शेतीवरील अवलंबित्व कमी झाले आहे व शेती क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेतील वाटा कमी झाला असून, उत्पादक व सेवा क्षेत्रांचा विकास झाला आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न वाढले आहे. रस्ते, दळणवळणाच्या सोयी-सुविधांतही वाढ झाली असून, शिक्षण व सहकाराचा कौतुकास्पद विकास झाला आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. १९६० ते २०१२ हा कालखंड पाहता महाराष्ट्र सर्वच क्षेत्रांत अग्रेसर राहिलेला आहे.

राजकीयदृष्ट्या पाहता जग आज अशा एका वळणावर उभे आहे की जिथे मागील दोन दशकांमधील प्रभावी राजकीय आकृतिबंधापेक्षा वेगळ्या ठरू शकणाऱ्या राजकीय प्रक्रियेतील बदलांची निश्चित दिशा कोणालाही ठामपणे वर्तविता येत नाही. जागतिक पातळीवरील आर्थिक मंदी, देशाची अंतर्गत सुरक्षा व अखंडतेबाबत वाढती चिंता या पार्श्वभूमीवर भारतातील संसदीय लोकशाही पद्धतीमुळे आज निर्विवादपणे राजकीय स्थैर्य असल्यामुळेच धर्मनिरपेक्ष, कार्यक्षम, स्वच्छ व पारदर्शक शासन प्रणालीद्वारे आपण देशापुढील वाढत्या अंतर्गत आणि बाह्य आव्हानांचा मुकाबला समर्थपणे करीत आहोत.

महाराष्ट्र शासनाने महिला धोरण, सांस्कृतिक धोरण, औद्योगिक धोरण, वस्त्रोद्योग धोरण, युवा धोरण, क्रीडा धोरण व गृहनिर्माण धोरण, सहकार धोरण, माहिती व तंत्रज्ञान धोरण, शैक्षणिक धोरण, सामाजिक न्यायाची संकल्पना इ. पुरोगामी धोरणे जाहीर करून राज्याच्या विकासाला एक निश्चित दिशा दिली आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्याचा सर्वांगिण विकास डोळ्यासमोर ठेवून समन्यायी व लोकाभिमुखता हे तत्त्व रुजविण्याचा यशस्वीरित्या प्रयत्न केल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्य हे प्रशासकीय क्षमता आणि नवनवीन कल्पना अंमलात आणण्यात आघाडीवर आहे. शासकीय कामकाजात ई-गव्हर्नन्स प्रणालीचा वापर करण्याचा शासनाचा मानस निश्चितच आधुनिकतेकडे वाटचाल करणारा तसेच जलद गतीने पारदर्शक राज्यकारभार करण्यावर भर देणारा आहे.

राजकारण म्हणजे काही तरी भयंकर या मानसिकतेतून आता बाहेर येण्याची आवश्यकता असून राजकीय पक्ष, मतदान, अधिवेशन, सरकारची निवड, धोरणांची अंमलबजावणी, टीका, प्रति टीका, विचारमंथन, देशाचा विकास ही साखळी आपण समजावून घेतली पाहिजे. भारत हा वेगाने आर्थिक महासत्ता या संसदीय कार्यपद्धतीच्या माध्यमातून बनत असल्याची कबुली दुसऱ्या-तिसऱ्या कोणी नव्हे तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनीच दिलेली आहे. परकीय गुंतवणुकदारांना सर्वात विश्वासाचे ठिकाण वाटणारा तसेच माहिती व तंत्रज्ञानसंपन्न देश, परमावधीची आर्थिक प्रगती साधणारा अशी किर्ती आज जागतिक पातळीवर भारताने मिळविलेली आहे. योग्य ते राजकीय, आर्थिक ध्येय धोरणाशिवाय व कालानुरुप कायदे संसदेने, विधिमंडळाने संमत केल्याशिवाय हे परिवर्तन निश्चितच घडू शकले नसते. या संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून व्यापक जनहिताच्या योजना सातत्याने सुरूच असून याद्वारे आज सर्वच क्षेत्रांत देशाची चौफेर घोडदौड सुरू आहे. आपण या दृष्टीने कार्यतत्पर बनून नवसमाज निर्मितीचे व आधुनिकतेचे स्वप्न उराशी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. स्वप्नातूनच विचारांना आकार प्राप्त होतो आणि या विचारांनी आपल्याला योग्य त्या

कृतीसाठी, धोरणासाठी बळ प्राप्त होते. Vision without action is day dreaming and action without vision is a nightmare.

आपणासारख्या विद्वतजनांच्या माध्यमातून आगामी काळात आणखी सशक्त, आणखी प्रगल्भ, आणखी सामर्थ्यशाली अशा संसदीय लोकशाहीचे स्वप्न पूर्ण करणे व संसदीय लोकशाही दृढमूल करणे हेच सर्वांचे ध्येय असले पाहिजे. या स्वप्नांना मात्र विचार आणि कृतीची जोड देणे आवश्यक आहे.

आज देशाला संसदीय लोकशाहीशिवाय उत्तम असा पर्याय नाही. त्यामुळे आज या क्षणी 'संसदीय लोकशाही' हाच परवलीचा शब्द झाला पाहिजे व या माध्यमातूनच देशाची, राज्याची, व्यक्ती व व्यक्तीसमूहाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रगती शक्य होईल.

## २. महाराष्ट्र विधानमंडळाचा थोडक्यात इतिहास

**पार्श्वभूमी :**

महाराष्ट्र विधिमंडळाला देशात आगळी-वेगळी अशी प्रतिष्ठा लाभली आहे. अनेकविध क्षेत्रांत देशपातळीवर नेतृत्व देणारे नेते या विधानमंडळाने राष्ट्राला दिले आहेत. या नेत्यांनी संसदीय लोकशाही आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणाद्वारा सबळ प्रशासनाचा वस्तुपाठ इतरांना घालून दिला आहे आणि त्यायोगे अनेक उत्तम परंपरा, संकेत व आदर्श निर्माण केले आहेत.

भूतपूर्व मंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची पहिली बैठक दिनांक २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भरली होती. मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर सर जॉर्ज रसेल क्लार्क हे त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

१८६२ ते १९३७ या पंच्याहत्तर वर्षाच्या विधानमंडळाच्या प्रदीर्घ वाटचालीत सर्वश्री जगन्नाथ शंकर शेठ, जमशेटजी जीजीभॉय, सर माधवराव विंचुरकर, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, सर फिरोजशाह मेहता, लोकमान्य बाळ गंगाधर ठिळक, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर असे दिग्गज सन्माननीय सदस्य म्हणून लाभले, ज्यांनी आपल्या महान कर्तृत्वाने आणि सर्वकष कामगिरीने या विधानमंडळाला उच्चस्तर व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

भारताच्या घटनात्मक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा (Govt. of India Act, १९३५) अस्तित्वात आला, ज्यात संघराज्यात्मक शासन पद्धती (Federal form of Govt.) स्वीकारण्यात आली होती. तसेच, प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली होती. **या कायद्यान्वये विधानसभा व विधानपरिषद असे नामाभिधान देऊन दोन सभागृहे मुंबई प्रांतात १९३७ मध्ये अस्तित्वात आली.**

### (अ) महाराष्ट्र विधानपरिषद

**विधानपरिषदेचे पहिले अधिवेशन :-**

१९३५ च्या कायद्यानुसार जुलै, १९३७ मध्ये विधानपरिषद राज्यात अस्तित्त्वात आली आणि सदुसष्ठ वर्षांपूर्वी, २० जुलै १९३७ रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये दुपारी दोन वाजता विधानपरिषदेची (Legislative Council) पहिली बैठक झाली. गेल्या सदुसष्ठ वर्षांत परिषदेची १७९ अधिवेशने झाली. त्यातील चौदा अधिवेशने पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये, ४२ अधिवेशने नागपूरच्या कौन्सिल हॉलमध्ये आणि १२३ अधिवेशने मुंबई येथे झाली. मुंबईतील १२३ अधिवेशनांपैकी ७२ अधिवेशने जुन्या विधान भवनात आणि ५१ अधिवेशने नव्या विधान भवनात झाली. १९५५ पर्यंत परिषदेचे पावसाळी अधिवेशन पुणे येथे भरत होते. नंतर ते खंडित झाले. त्यानंतर नागपूर करारामध्ये नमूद केल्यानुसार १९६० पासून सामान्यत: ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये हिवाळी अधिवेशन दरवर्षी नागपूर येथे भरू लागले.

१९३५ चा कायदा अंमलात आल्यानंतर १९३९ ते १९४६ पर्यंत विधानपरिषदेचे कार्य निलंबित करण्यात आले होते. तेव्हा राज्यपाल राजवट अंमलात होती, तसेच १९८० मध्येही सहा महिने राष्ट्रपती राजवट असल्याने विधानपरिषदेचे काम निलंबित करण्यात आले होते.

गेल्या सदुसष्ठ वर्षांत विधानपरिषदेचे एकूण ६६२ सदस्य झाले. त्यातील २५ सदस्यांना शपथक्रियेत बदल झाल्यामुळे, दोनदा शपथ घ्यावी लागली. पहिली निवडणूक होण्यापूर्वी १३६ सदस्यांचे आणि निवडणुकीनंतर भारतीय घटनेनुसार ५२६ सदस्यांनी शपथ घेतली. विधानपरिषदेच्या

किंवा कायदे कौन्सिलच्या सदस्यांमध्ये महापौर, माजी महापौर,उप महापौर, नामवंत प्राध्यापक, डॉक्टर, अभियंते, लेखक, कवी, संगीत दिग्दर्शक, सहकार, कृषि इत्यादी क्षेत्रातील नामवंताचा समावेश होता. तसेच, राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविलेल्या सहा मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषदेचे सदस्य म्हणून योगदान दिले आहे.

आतापर्यंत परिषदेत ८ सभापती झाले व ११ उप सभापती झाले, त्यात श्रीमती जेठी सिपाहिमलानी या महिला उप सभापतींचाही समावेश आहे.

विधानपरिषदेच्या स्थापनेच्या वेळी, १९३७ मध्ये विधानपरिषदेच्या सदस्यांची संख्या २९ होती नंतर ती १९५७ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्यात १०८ झाली आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा १९६० मध्ये ७८ झाली. विद्यमान विधानपरिषदेची सदस्य संख्या ७८ आहे.

**विधानपरिषद सुवर्ण महोत्सव**

विधानपरिषदेला १९८७ मध्ये ५० वर्षे पूर्ण झाली. या महत्त्वाच्या घटनेचे औचित्य साधून परिषदेचा सुवर्णमहोत्सव विविध उपक्रम आयोजित करून मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. विधानपरिषदेच्या सुवर्ण महोत्सवाच्या पहिल्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन तत्कालीन उप राष्ट्रपती व राज्यसभेचे सभापती मा. डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या शुभहस्ते दिनांक १८ जानेवारी १९८८ रोजी झाले. या समारंभास लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. बलराम जाखड, इंग्लडमधील हाऊस ऑफ लॉर्डस्‌चे माजी सदस्य लॉर्ड टेलर आणि विधानपरिषदेच्या सभापतीपदी दीर्घकाळ राहिलेले श्री. वि. स. पागे, उपस्थित होते. त्यांच्या प्रदीर्घ संसदीय सेवेचा या वेळी सन्मान करण्यात आला.

विधानपरिषदेच्या सुवर्ण महोत्सवी कारकिर्दीची स्मृती म्हणून स्मरणिका (पूर्वार्ध) काढण्यात आली होती. त्यामध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी, राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, राज्यपाल, लोकसभेचे अध्यक्ष, मुख्यमंत्री, राज्यसभेचे उप सभापती, उत्तर प्रदेश, बिहार व कर्नाटक विधानपरिषदेचे सभापती यांचे संदेश समाविष्ट केले होते.

विधानमंडळाचे तत्कालीन सचिव श्री. व्ही. एम. सुब्रह्मण्यम् यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने लिहिलेले "फिफ्टी इयर्स ऑफ लेजिस्लेटिव्ह कौन्सिल इन महाराष्ट्र" या पुस्तिकेचे प्रकाशन या समारंभात करण्यात आले. या पुस्तिकेमध्ये विधानपरिषदेमध्ये वेळोवेळी झालेल्या कार्यवाहीचे काही संदर्भ दिले असून, त्यामुळे ही गोष्ट सिद्ध होते की, या सभागृहाचे सदस्य हे पक्षीय वा अन्य कोणताही अभिनिवेश न ठेवता न्यायबुद्धी व उदारमतवादाच्या दृष्टीकोनातून सर्व बाबींचा विचार करतात.

सुवर्ण महोत्सव कार्यक्रमाचा दुसरा टप्पा पुणे येथे विधान भवनात दिनांक १६ मे १९८८ रोजी संपन्न झाला. "लोकशाहीमध्ये विधानमंडळाचे स्थान" या विषयावर तत्कालीन केंद्रीय मंत्री श्री. शिवराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादामध्ये श्री. वि.स.पागे जे सतत २४ वर्षे विधानपरिषदेचे सदस्य व त्यातील सलग १८ वर्षे सभापती राहिले तसेच, माजी जेष्ठ सदस्य दत्ता ताम्हाणे,माजी विधानपरिषद विरोधी पक्षनेते श्री. ग. प्र. प्रधान, माजी जेष्ठ मंत्री श्री. नरेंद्र तिडके यांनी भाग घेतला. या परिसंवादाची चर्चा अत्यंत उद्‌बोधक व विचाराला चालना देणारी अशी ठरली.

सुवर्ण महोत्सवाच्या तिसऱ्या टप्प्याचा कार्यक्रम दिनांक १६ ऑगस्ट १९८८ रोजी औरंगाबाद येथे संपन्न झाला त्यावेळी "विधिमंडळाचे विशेष हक्क" या विषयावर परिसंवाद ठेवण्यात आला होता. त्या कार्यक्रमासाठी उत्तर प्रदेश विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती श्री. जगदीश दीक्षित हे अध्यक्ष म्हणून

तर मुख्य वक्ते माजी विधानसभा अध्यक्ष श्री. शरद दिघे हे होते. राज्याचे तत्कालीन कृषी मंत्री श्री. विलासराव देशमुख व अन्य मान्यवरांनी या परिसंवादात भाग घेतला.

सुवर्ण महोत्सवाच्या कार्यक्रमाचा अंतिम टप्पा दिनांक १६ डिसेंबर १९८८ रोजी नागपूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. वसंतराव साठे, माजी केंद्रिय ऊर्जा मंत्री हजर होते. तसेच, बिहार विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती उमेश्वरप्रसाद वर्मा, राज्यपाल श्री. के. ब्रह्मानंद रेड्डी, तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरदरावजी पवार व अन्य मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी विधानसभेचे माजी अध्यक्ष व खासदार श्री. शरद दिघे यांनी लिहिलेल्या "लॉ ऑफ पार्लमेंटरी प्रिव्हीलेजेस" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. मा. मुख्यमंत्र्याच्या हस्ते स्मरणिकेच्या उत्तरार्धाचे प्रकाशन करण्यात आले.

**काही नाविन्यपूर्ण घटना:-**

- विधानपरिषदेच्या इतिहासात काही नाविन्यपूर्ण घटना झालेल्या दिसून येतात. त्यामध्ये विधानपरिषदेचे सभापती व उप सभापती ही दोन्हीही पदे एकाच वेळी रिक्त असल्याची स्थिती निर्माण झाल्याने दि. १३ जून १९७८ रोजी राज्यपालांनी विधानपरिषदेचे तत्कालीन सदस्य श्री. राम मेघे यांना सभापतींची निवड होईपर्यंत **'कार्यकारी सभापती'** म्हणून नियुक्त केले होते. १४ जून १९७८ पर्यंत कार्यकारी सभापती म्हणून त्यांनी काम पाहिले.

- १९९८ मध्येही सभापती व उप सभापती ही दोन्हीही पदे रिक्त असल्याने तत्कालीन विधानपरिषदेतील जेष्ठ सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांची २० जुलै १९९८ रोजी राज्यपालांनी **'हंगामी सभापती'** म्हणून नियुक्ती केली होती. २४ जुलै १९९८ पर्यंत त्यांनी हंगामी सभापती म्हणून काम पाहिले.

- २००४ मध्येही अशीच स्थिती निर्माण झाल्याने राज्यपालांनी विधानपरिषदेचे सदस्य व माजी उप सभापती श्री. वसंत डावखरे यांची दिनांक ९ जुलै २००४ रोजी हंगामी सभापती म्हणून नियुक्ती केली. त्यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २००४ पर्यंत हंगामी सभापती म्हणून काम पाहिले.

- विधानपरिषदेच्या इतिहासातील आणखी उल्लेखनीय घटना म्हणजे २००४-२००५ या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेवटच्या दिवशी १०/०४/२००३ रोजी विधानसभेने मंजूर केलेले विनियोजन विधेयक विधानपरिषदेने त्याच दिवशी मंजूर न करता शिफारशींसह विधानसभेकडे पाठविण्याचा निर्णय घेतल्याने व त्या वेळी विधानसभेच्या सभागृहाची बैठक संपल्याने अधिवेशनही समाप्त झाल्याचे घोषित झाले होते. त्यामुळे सदर विधेयकास विधानसभेची पुनर्मंजुरी आवश्यक असल्यामुळे विधानसभेचे एक दिवसाचे विशेष अधिवेशन दिनांक ८ मे २००३ रोजी घेण्यात आले व विनियोजन विधेयक विधानपरिषदेने शिफारशींसह मंजूर केले.

- तसेच, ३ जून २००४ रोजी २००४-०५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करताना संविधानाच्या अनुच्छेद २०२ (१) अन्वये वार्षिक वित्तीय विवरणपत्र सादर करण्यासंदर्भात निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी राज्याचे महा-अधिवक्ता (Advocate General) यांना घटनात्मक मत जाणून घेण्यासाठी सभागृहामध्ये रितसर पाचारण करून मत जाणून घेण्यात आले.

## (ब) महाराष्ट्र विधानसभा

**विधानसभेचे पहिले अधिवेशन :-**

१९३५ च्या कायद्यानुसार जुलै, १९३७ मध्ये १७५ सदस्य असलेली विधानसभा प्रथमतः अस्तित्वात आली आणि त्या विधानसभेचे पहिले अधिवेशन १९ जुलै, १९३७ रोजी पुणे येथील

कौन्सिल हॉलमध्ये भरले होते. या महत्त्वाच्या घटनेचे औचित्य साधून १९८८ साली विधानसभेचा सुवर्ण महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.

भारतीय राज्यघटना २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आल्यानंतर घटनेतील तरतुदीप्रमाणे विधानसभा अस्तित्वात आली. घटनेच्या अनुच्छेद १७० मध्ये विधानसभेच्या रचनेसंबंधी तरतुदी आहेत. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तत्कालीन मुंबई राज्य विधानसभा, राज्य पुनर्रचनेनंतर १९५७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तत्कालीन मुंबई राज्य द्विभाषिक विधानसभा व मुंबई राज्य पुनर्रचनेनंतर १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतरची महाराष्ट्र राज्य पहिली विधानसभा अस्तित्वात आली. त्यानंतर १९६२, १९६७, १९७२, १९७८, १९८०, १९८५, १९९०, १९९५, १९९९ व २००४ मध्ये अकरावी महाराष्ट्र विधानसभा अस्तित्वात आली आहे. (१७ फेब्रुवारी, १९८० ते ९ जून, १९८० या कालावधीमध्ये राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती.)

**विधानसभा सुवर्ण महोत्सव**

महाराष्ट्र विधानसभेने आपल्या कार्याची उज्वल परंपरा उत्तरोत्तर दृढमूल केली आहे. महाराष्ट्र विधानसभेला १९८७ साली ५० वर्षे पूर्ण झाली. विधानसभेचा सुवर्ण महोत्सव समारोह १९८८ साली साजरा करण्यात आला. सुवर्ण महोत्सवानिमित्त "महाराष्ट्र विधानसभा सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ" भाग १ व २ तसेच, शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून "लोकराज्य" या पाक्षिकाचा दिनांक १६ डिसेंबर, १९८८ चा अंक मराठी व इंग्रजी भाषांतून "विधिमंडळ सुवर्ण महोत्सव विशेषांक" म्हणून प्रसिद्ध करण्यात आला आहे. या सर्व प्रकाशनांद्वारे विधानसभेच्या गौरवशाली इतिहासाची व कर्तृत्वशाली परंपरेची माहिती जनतेसमोर सादर केली आहे.

विधानसभा सुवर्ण महोत्सव समारोहाचे उद्‌घाटन दिनांक ३ सप्टेंबर, १९८८ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान दिवंगत श्री. राजीव गांधी यांच्या हस्ते झाले. या समारंभासाठी भारताच्या सर्व राज्यातील अनेक विधानसभांचे अध्यक्ष अथवा प्रतिनिधी तसेच, केंद्रीय मंत्री, लोकसभेचे अध्यक्ष इ. मान्यवर व संसदपटू आवर्जून उपस्थित होते आणि निमित्ताने संसदीय विषयांवर चर्चा, परिसंवाद इ. आयोजित करण्यात आले होते.

**महाराष्ट्र विधानमंडळाचा अमृत महोत्सव:-**

महाराष्ट्र विधानमंडळाचा अमृत महोत्सव कार्यक्रम सन २०११ मध्ये भव्य प्रमाणात विधान भवन, मुंबई येथे साजरा करण्यात आला. मा.राष्ट्रपती महोदया श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी या भव्यदिव्य कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. या कार्यक्रमाला मा.पीठासीन अधिकारी मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.विरोधी पक्ष नेते व मंत्री महोदय, विद्यमान व माजी सदस्य, विविध संसदपटू आवर्जून उपस्थित होते. या निमित्ताने विविध विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त चर्चासत्र आणि परिसंवादासारखे विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमही राबविण्यात आले.

## महाराष्ट्राची विधान भवने

### पुणे येथील विधान भवन

१९३५ च्या कायद्यान्वये निर्माण झालेल्या विधानसभेचे पहिले अधिवेशन दिनांक १९ जुलै, १९३७ रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये भरले होते व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे पहिले अधिवेशन दिनांक १० सप्टेंबर, १९४७ रोजी पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्येच भरले होते. भारताची राज्यघटना अंमलात आल्यावर जानेवारी, १९५२ मध्ये विधानसभेच्या ३१६ जागांसाठी प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या. या नवीन विधानसभेचे अधिवेशन मात्र दिनांक ३ मे, १९५२ रोजी सुरू झाले. पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये १९५५ पर्यंत विधानसभेची एकूण १३ अधिवेशने झाली. त्यानंतर नागपूर करारातील तरतुदीनुसार नागपूर येथील विधान भवनात १९६० पासून दरवर्षी हिवाळी अधिवेशन घेतले जाते व १९६२-६३ चा अपवाद वगळता ते अव्याहतपणे सुरू आहे.

### मुंबई येथील जुने विधान भवन

मुंबई येथील जुन्या विधान भवनाची इमारत १८७६ साली दर्यावर्दी लोकांच्या उपयोगासाठी "खलाशीगृह" म्हणून बांधण्यात आली होती. जून १९२८ मध्ये शासनाने हे खलाशीगृह ताब्यात घेतले व त्याचे विधान भवनात रुपांतर केले. दिनांक १८ फेब्रुवारी, १९२९ रोजी तत्कालीन राज्यपाल मेजर जनरल सर फेड्रिक साईक यांच्या हस्ते या इमारतीचे उद्‌घाटन झाले. दिनांक १९ जुलै, १९३७ ते २५ एप्रिल, १९८१ पर्यंत जुन्या विधान भवनात विधानसभेची ७१ अधिवेशने झाली. दिनांक २५ एप्रिल, १९८१ पासून नवीन विधान भवनामध्ये अधिवेशने भरविण्यात येऊ लागली.

### मुंबई येथील नवीन विधान भवन

तत्कालिन पंतप्रधान दिवंगत श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते दिनांक १९ एप्रिल, १९८१ रोजी या नवीन विधान भवनाच्या इमारतीचे उद्‌घाटन झाले. ही वास्तू म्हणजे वास्तुशिल्पाचे एक मनोहारी रुप आहे. दिनांक २ मार्च १९८१ रोजी जुन्या विधान भवनामध्ये सुरू झालेले विधानसभेचे अधिवेशन दिनांक २५ एप्रिल, १९८१ पासून नवीन विधान भवनच्या नवीन इमारतीमध्ये सुरू झाले. या नवीन वास्तुमधील विधानसभेची ती पहिली बैठक.

### नागपूर येथील विधान भवन

१९६० पासून महाराष्ट्र विधानमंडळाची अधिवेशने नागपूर येथे भरु लागली. तत्पूर्वी विदर्भ भाग १९५६ पर्यंत मध्यप्रदेश राज्यात समाविष्ट होता व नागपूर हे मध्यप्रदेश राज्याचे राजधानीचे ठिकाण होते. नागपूर येथील कौन्सिल हॉल इमारतीमध्ये तत्कालीन मध्यप्रदेश विधानसभेची अधिवेशने भरत असत. ही इमारत १९१४ मध्ये बांधून पूर्ण करण्यात आली. महाराष्ट्र विधानसभेचे पहिले नागपूर अधिवेशन दिनांक १० नोव्हेंबर ते १६ डिसेंबर, १९६० या काळात संपन्न झाले होते.

केवळ १२० सदस्य बसण्याची क्षमता असलेले पूर्वीचे नागपूर येथील विधानसभा सभागृह व तात्पुरती बसण्याची सोय असलेले विधानपरिषद सभागृह यामुळे सदस्यांना अडचणी, असुविधा व गैरसोईंना तोंड द्यावे लागले तरीही, १९६० सालापासून केवळ १९६२-६३ सालचा अपवाद वगळता (चीन व पाकिस्तान यांनी देशावर आक्रमण केल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती) सातत्याने नागपूर येथे प्रतिवर्षी हिवाळी अधिवेशन घेतले जात आहे. १९९३ मध्ये नागपूर येथील विधान भवनाच्या विस्तारीत इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. ११ डिसेंबर, १९९३ रोजी तत्कालिन राष्ट्रपती दिवंगत डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते या विस्तारीत इमारतीतील नवीन सभागृहाचे उद्‌घाटन झाले व तेथे विधानसभेच्या बैठका भरु लागल्या व पूर्वीच्या विधानसभा सभागृहात विधानपरिषदेच्या बैठका घेण्यात येऊ लागल्या.

नागपूरमध्ये सदस्यांच्या निवासाकरिता बांधलेल्या प्रशस्त आमदार निवासामुळे सदस्यांची व त्याच बरोबर अन्य अभ्यागतांचीही सोय होऊ शकते. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेमार्फत राज्यातील विद्यापीठांच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयांच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांकरिता अभ्यासवर्ग दरवर्षी नागपूर येथील अधिवेशन काळात घेतला जातो.

## ३. विविध संसदीय आयुधे

प्रश्न (तारांकित, अतारांकित व अल्प सूचना प्रश्न ), प्रस्ताव, ठराव, स्थगन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धा-तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव, विश्वासदर्शक प्रस्ताव इ. संसदीय आयुधांच्या माध्यमातून विधिमंडळे कार्यकारी प्रशासनावर नियंत्रण ठेवतात.

लोकप्रतिनिधी या नात्याने कर्तव्य बजावण्यासाठी तसेच शासनाच्या प्रशासनिक कामकाजावर संसद/विधिमंडळाचे प्रभावी नियंत्रण असण्याच्या दृष्टीने प्रशासनिक कामकाजासंबंधी माहिती घेणे, शासनाला दिशा देणे, प्रशासनातील त्रुटी, गैरव्यवहार शोधून काढून योग्य त्या उपाययोजना सुचविणे, शासनाला धोरणात्मक मार्गदर्शन करणे हा संसद व विधिमंडळाचा घटनादत्त अधिकार आहे.

**१. प्रश्नोत्तरे**

कार्यकारी प्रशासन यंत्रणेवर (Executive Administration) देखरेख ठेवण्यासाठी (Surveillance) जगातील प्रातिनिधीक संसदीय लोकशाही पद्धत अस्तित्वात असणाऱ्या (Representative Parliamentary Democracy) देशात "प्रश्न" या संसदीय आयुधाचा प्रभावीपणे वापर करण्याचे तंत्र विकसीत झाले आहे.

लोकप्रतिनिधी या नात्याने कर्तव्य बजावण्यासाठी तसेच शासनाच्या प्रशासनिक कामकाजावर संसदे/विधानमंडळाचे प्रभावी नियंत्रण असण्याच्या दृष्टीने प्रशासनिक कामकाजासंबंधी माहिती घेणे (to seek information) हा संसद/विधानमंडळ सदस्यांच्या अधिष्ठीत (Inherent) व अनिर्बंध (unfeettered) स्वरुपाचा अधिकार आहे.

विधानसभेच्या बैठकीची सुरुवात प्रश्नोत्तरांच्या तासाने होते. ह्याबाबतची पद्धती विधानसभा नियमावलीतील नियम क्रमांक ६८ ते ९३ ह्यात विस्ताराने दिली आहे. राज्यातील जनतेच्या सार्वजनिक हिताच्या संदर्भात सदस्यांच्या निदर्शनास येणाऱ्या विविध तक्रारी, अडचणी, समस्या सोडविण्याच्या दृष्टीने तसेच राज्याच्या शासन यंत्रणेद्वारे होत असलेल्या प्रशासनातील उणिवा दूर करून घेण्यासाठी किंवा या उणिवा शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी तथा शासनाची भूमिका समजावून घेण्यासाठी प्रश्नोत्तर पद्धतीचा उपयोग होतो. पर्यायाने या प्रश्नोत्तरामुळे शासनालाही प्रशासन यंत्रणेच्या कारभाराबाबत वा कार्यवाहीबाबत तसेच त्यातील उणिवा दूर करण्याच्या दृष्टीने माहिती मिळते असे म्हणणे अप्रस्तुत होणार नाही.

विधानमंडळात जे प्रश्न विचारले जातात त्यांचे तीन प्रकार असतात :-

अ) तारांकित प्रश्न.

ब) अल्पसूचना प्रश्न.

क) अतारांकित प्रश्न.

२. **तारांकित प्रश्न---** ज्या प्रश्नांना सभागृहात तोंडी उत्तर दिले जाते, अशा प्रश्नांना तारांकित प्रश्न असे म्हणतात [नियम ७२ (१)]. सदस्यांना अधिवेशनात तारांकित प्रश्न वेळेवर देता यावेत या दृष्टीने त्यांच्याकडे विधानमंडळ सचिवालयामार्फत तारांकित प्रश्नांचा "चक्रानुक्रम" (रोटेशन ऑर्डर) विधानसभा पत्रक भाग दोनद्वारे माहितीसाठी पाठविण्यात येतो. मंत्र्यांना त्यांच्या विभागाशी संबंधित

प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी सोयीचे व्हावे या दृष्टीने चक्रानुक्रमात मंत्र्यांची गटवार विभागणी केली जाते. त्यात निरनिराळ्या मंत्र्यांकडे असलेल्या खात्यासंबंधीचे तारांकित प्रश्न तोंडी उत्तराकरिता ज्या तारखांना घेण्यात येतील त्या तारखा दिलेल्या असतात. चक्रानुक्रमात (१) गट क्रमांक, (२) गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री, (३) प्रश्नाच्या उत्तराचा दिनांक, (४) प्रश्नांची सूचना विधानमंडळ सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक, तसेच मंत्र्यांचे नाव व त्याच्या अधीन असलेले विभाग यासंबंधीचे विवरण इत्यादी गोष्टी दाखविलेल्या असतात. अधिवेशनाच्या काळात दर आठवड्याला सोमवारपासून शुक्रवारपर्यंत ज्या दिवशी विधानसभेच्या बैठकी असतात त्या प्रत्येक दिवशी सुरुवातीचा एक तास तारांकित प्रश्नोत्तरासाठी उपलब्ध असतो (नियम १७). उपरोक्त एका एका गटातील मंत्र्यांच्या विभागासंबंधीच्या प्रश्नाची यादी प्रश्नोत्तरांच्या वेळी सभागृहात देण्यात येते. याप्रमाणे पाच दिवसांसाठी पाच गट तयार केलेले असतात. एखाद्या आठवड्यात एखादे दिवशी सभागृहाची बैठक रद्द झाली तर त्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तराची यादी दुसऱ्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येते.

तारांकित प्रश्नांच्या उत्तरावर अध्यक्षांच्या परवानगीने सदस्यांना पुरवणी प्रश्न विचारुन अधिक खुलासा वा स्पष्टीकरणही घेता येते. कोणत्याही सदस्याला एका दिवशी फक्त तीनच तारांकित स्वीकृत प्रश्न विचारता येतात. सभागृहात आपल्या तारांकित प्रश्नांची उत्तरे कोणत्या क्रमाने हवीत तो क्रमही तारांकित प्रश्नांची सूचना देताना सदस्यांना त्यात नमूद करता येतो. असा क्रम नमूद केला नसेल तर त्या दिवसाकरिता त्या सदस्यांचे प्रश्न ज्या क्रमाने विधानमंडळ सचिवालयाकडे आलेले असतील त्याच क्रमाने त्या दिवसाच्या प्रश्नाच्या यादीत दाखविण्यात येतात [नियम ७७(३)] अध्यक्षांना योग्य वाटल्यास तारांकित प्रश्नांची सूचना देणाऱ्या सदस्यास प्रश्नाला तोंडी उत्तरच का हवे ह्याची कारणे थोडक्यात नमूद करण्यास सांगता येते आणि त्या कारणांचा विचार केल्यानंतर त्या प्रश्नांचा समावेश तारांकित किंवा अतारांकित प्रश्नांच्या यादीत करण्याचा निदेश अध्यक्ष देऊ शकतात (नियम ७३) तारांकित प्रश्नाचे उत्तर ज्या तारखेला हवे असेल त्याच्या ३० दिवस आधी अशा प्रश्नाची सूचना विधानमंडळ सचिवालयात मिळणे आवश्यक आहे (नियम ७४) तसेच सदर प्रश्न देताना सदस्यांनी कोणत्या मंत्र्याला उद्देशून प्रश्न विचारला आहे, हे देखिल त्या सूचनेत नमूद करणे आवश्यक आहे.

**३. अल्पसूचना प्रश्न ---** सदस्यास एखाद्या तातडीच्या प्रश्नाचे उत्तर ताबडतोब हवे असेल तर त्याची सूचना अधिवेशनाच्या प्रारंभापूर्वी सात दिवसापेक्षा जास्त अगोदर देता येत नाही [नियम ८६(१)]. अल्पसूचना प्रश्नावर तारांकित प्रश्नाप्रमाणे पुरवणी प्रश्न विचारता येतो. हे प्रश्न तातडीने उपस्थित झालेल्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर असले पाहिजेत. अल्पसूचना प्रश्नाची सूचना देताना तो अल्पसूचना प्रश्न म्हणून का देण्यात येत आहे, याचे स्पष्टीकरणही सूचनेमध्ये नमूद करणे आवश्यक असते व त्यानंतर ज्या विषयावर प्रश्न विचारावयाचा आहे तो थोडक्यात व मुद्देसूदपणे विचारावा लागतो. बृहन्मुंबईच्या हद्दीतील माहितीसंबंधी प्रश्न असल्यास शासनाने प्रश्न मिळाल्याच्या तारखेपासून सात दिवसांचे आत व ती माहिती बृहन्मुंबईच्या बाहेरील असल्यास १४ दिवसांच्या आत उत्तर देणे अपेक्षित असते [म.वि.स.नियम ८६(४)]. असा प्रश्न मा. अध्यक्षांनी स्वीकृत केल्यानंतर संबंधीत मंत्री उत्तर देण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत या सचिवालयाकडून विचारणा केली जाते. संबंधित मंत्री तयार असल्यास त्यांना सोईस्कर असेल अशा कोणत्याही दिवशी सदरहू अल्पसूचना प्रश्न त्या दिवशीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येतो. असा प्रश्न त्या दिवशीच्या कामकाजामध्ये तारांकित प्रश्नोत्तराच्या आधी घेण्यात येतो व त्यावर तारांकित प्रश्नाप्रमाणेच अनुपूरक प्रश्नोत्तरे होतात.

**४. अतारांकित प्रश्न---**जेव्हा सदस्यांना प्रश्नाचे केवळ लेखी उत्तर हवे असते अशा वेळी सदस्य अतारांकित प्रश्नांची सूचना देतात असे प्रश्न आणि त्यांची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. अशा प्रश्नांची सूचना सदस्यांनी देण्यासाठी कोणतीही मुदत नसते. अशा प्रश्नाचे उत्तर स्वीकृत प्रश्न शासनाला प्राप्त झाल्यापासून १ महिन्यांचे आत द्यावयाचे असते. ज्या प्रश्नात खास तक्रार नाही केवळ माहिती हवी असते किंवा सांख्यिकीय माहिती विचारली असेल असे प्रश्नही सामान्यतः अतारांकित प्रश्न म्हणून स्वीकृत केले जातात.

जे प्रश्न तोंडी उत्तरासाठी तारांकित प्रश्नांच्या यादीत समाविष्ट होऊनही प्रश्नोत्तरांचा तास समाप्त झाल्यामुळे उत्तरीत होऊ शकत नाहीत असे प्रश्न अतारांकित समजले जातात व त्यांची उत्तरे त्या दिवसाच्या कार्यवाहीत छापली जातात (नियम ८०).

**कोणते प्रश्न स्वीकृत होतात ?**

चक्रानुक्रम सदस्यांना पाठविण्यात आल्यानंतर तारांकित प्रश्नांची सूचना विधानमंडळ सचिवालयाकडे सदस्य पाठवीत असतात. तारांकित प्रश्न स्वीकृत होण्यासाठी जो प्रश्न विचारला जातो त्या प्रश्नातील विषयाबाबत राज्य शासन प्रामुख्याने जबाबदार असणे, प्रश्नाधीन विषय हा सार्वजनिक महत्त्वाचा असणे, प्रश्नाधीन विषय संबंधित मंत्र्याच्या अधिकारकक्षेतील असणे व प्रश्नाला, वस्तुस्थितीचा आधार असणे आवश्यक आहे.

राज्य शासनाची जबाबदारी, विविध अधिनियम व नियमांद्वारे राज्य शासनास प्राप्त होणाऱ्या अधिकाराच्या व मर्यादेच्या अनुषंगाने अजमावली जाते.

विद्यापीठे, स्वायत्त संस्था यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या बाबीसंबंधी, तसेच राज्य परिवहन महामंडळ, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यासारख्या संस्थांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या विषयासंबंधीचे प्रश्न स्वीकृतीचे वेळी तत्संबंधी करण्यात आलेल्या कायद्यातील तरतुदी शासनाचे नियंत्रण वा जबाबदारी व संबंध ह्यांचा परामर्श घेऊन सार्वजनिक महत्वही लक्षात घेतले जाते.

राज्य शेती महामंडळ, राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, खादी ग्रामोद्योग मंडळ यासारख्या स्वतंत्र, स्वायत्त व वैधानिक संस्था तथा उच्च न्यायालय व धर्मदाय आयुक्त यासंबंधीच्या प्रश्नांच्या स्वीकृतीचे वेळी त्या त्या बाबतीतील शासनाचे नियंत्रण, जबाबदारी व संबंध आदी बाबी विचारात घेतल्या जातात.

केंद्र शासनपुरस्कृत काही योजना राज्य शासनाकडे राबविण्यासाठी दिल्या असतील तर त्याबाबतचे प्रश्न (उदा. राज्य कामगार विमा योजना) ज्या विषयाबाबत राज्य शासनाची त्या बाबतीत असलेली जबाबदारी आणि नियंत्रण याचा विचार करून स्वीकृत अगर अस्वीकृत केले जातात.

सर्वसाधारणतः व्यक्तिगत तक्रारीच्या स्वरुपाचे प्रश्न अस्वीकार्य ठरतात. परंतु व्यक्तिगत स्वरुपाच्या प्रश्नास सार्वजनिक महत्व असेल किंवा एखादे तत्व किंवा धोरण त्यात समाविष्ट असेल तर प्रश्न स्वीकारतेवेळी अध्यक्षांकडून वेगळा विचार केला जाऊ शकतो.

काही प्रश्न सभागृहापुढे येण्याच्या दृष्टीने गौण सार्वजनिक महत्त्वाचे असतात. अशा प्रश्नांच्या बाबतीत अध्यक्षांनी प्रश्नाधीन बाब गौण सार्वजनिक महत्त्वाची म्हणून सदस्यांनी प्रथम संबंधित मंत्री महोदयांकडे जाऊन दाद मागावी असे आदेश दिले असतील तर अशा प्रश्नांच्या बाबतीत प्रथम सदस्यांनी मंत्र्याकडे जाऊन त्याबाबत दाद मागावी लागते. याबाबत सदस्यांना माहिती देण्यासंबंधी शासनाद्वारे विविध विभागांना सूचनाही दिल्या गेलेल्या आहेत. सदस्यांनी अध्यक्षांच्या

आदेशानुसार मंत्र्यांकडे सदर प्रकरण नेल्यावरही दाद लागली नाही तर अशा प्रश्नावर अध्यक्षांना स्वीकृतीबाबत फेरविचार करता येतो.

एखाद्या अधिवेशनासाठी स्वीकृत झालेले तारांकित वा अल्पसूचना प्रश्न तसेच इतर सूचना अधिवेशनाच्या समाप्तीनंतर रद्द (लॅप्स) होतात (नियम २०) पुढच्या अधिवेशनासाठी वाटल्यास अशा प्रश्नांची सदस्य फेरसूचना देऊ शकतात.

**खाजगी सदस्यास उद्देशून प्रश्न.**

एखाद्या सदस्याने विधेयकाची किंवा प्रस्तावाची सूचना दिलेली असल्यास त्यासंबंधी माहिती मिळविण्याकरिता अशा सदस्यास उद्देशून प्रश्न विचारण्यासाठी सूचना देता येते.

[नियम ९३ (१)] अशा प्रश्नोत्तराची पद्धती अध्यक्ष ठरवितात.

काही महत्त्वाचे प्रश्न—(परिशिष्ट-अ) कृपया पहावे.

**५. प्रस्ताव --- (म.वि.स. नियम २३ अन्वये) :---**

सभागृहामध्ये त्रिस्तरीय कामकाज चालते. वैधानिक (विधिविधान), आर्थिक (अंदाजपत्रक, पुरवणी मागण्या इ.) व सर्वसाधारण टीकात्मक (प्रस्ताव, ठराव इ.) त्यादृष्टीने विविध विषयांवर विचारविनिमय (Deliberation) करणे हे विधानसभेचे महत्त्वाचे कार्य आहे. किंबहुना विचारविनिमयातून निष्कर्ष काढणे (Decision through Deliberation) हा संसदीय लोकशाहीचा गाभा आहे. या दृष्टीने सभागृहात विविध विषयांवर चर्चा करणे/विचार करणे या बाबीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सभागृहात प्रतिनिधीत्व करणारे सदस्य निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या विचारप्रणालीचे तसेच समाजातील विविधस्तराचे प्रतिनिधीत्व करतात. तथापि प्रत्येक सदस्यांचे मत घेऊन त्याआधारे सभागृहाचे एकत्रित मत घेणे कठीण असते. एखाद्या विषयावर सभागृहाचे मत अजमावण्यासाठी तसेच त्याबाबत निर्णय जाणून घेण्यासाठी सदस्यांमार्फत त्यांचे मत व अपेक्षा प्रदर्शित करणारा प्रस्ताव सभागृहासमोर विचारार्थ आणला जातो. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन वा अन्यथा सभागृहाने तो स्वीकारल्यास, तो प्रस्ताव सभागृहाचे मत वा इच्छा म्हणून धरला जातो. सभागृहाचे मत अजमाविण्यासाठी कोणताही विषय सभागृहासमोर प्रस्तावाच्या माध्यमातून येणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक हिताच्या बाबीसंबंधी चर्चा, अध्यक्षांच्या संमतीने आणलेल्या प्रस्तावाव्यतिरिक्त करता कामा नये अशी स्पष्ट तरतूद नियमात आहे.

**प्रस्तावावरील चर्चेचे सर्वसाधारणपणे चार भाग पडतात :---**

(१) प्रस्ताव मांडणे (Moving the Motion)

(२) प्रश्न मा. अध्यक्षांनी सभागृहासमोर ठेवणे (Processing the Question)

(३) चर्चा (Discussion)

(४) मतदान व सभागृहाचा निर्णय (Voting and decision of House)

**सर्वसाधारणपणे प्रस्तावाचे तीन भाग पडतात :-**

(१) मूळ प्रस्ताव (Substantive motion)

(२) बदली प्रस्ताव (Substitute motion)

(३) अंगभूत प्रस्ताव (Subsidiary motion)

महाराष्ट्र विधानसभा नियमात अंतर्भूत केल्याप्रमाणे सभागृहात विविध प्रस्तावांद्वारे वेगवेगळे विषय हाताळले जातात. या प्रस्तावांचे नियम व निकष हे वेगवेगळे विषय आहेत.

**उदा.**

(१) अध्यक्षांना पदावरून दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव (म.वि.स. नियम ११ अन्वये)

(२) अभिनंदनपर किंवा शोक प्रस्ताव (म.वि.स. नियम १४ अन्वये)

(३) अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये)

(४) मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (म.वि.स. नियम ९५ अन्वये)

(५) स्थगन प्रस्ताव (म.वि.स. नियम ९७ अन्वये)

(६) विश्वासदर्शक प्रस्ताव (म.वि.स. नियम २३ अन्वये)

(७) अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये)

(८) समिती नियुक्त करण्यासंबंधातील प्रस्ताव (म.वि.स. नियम १९४ अन्वये)

(९) संविधिक प्रस्ताव (म.वि.स. नियम २९० अन्वये)

(१०) अंतिम आठवडा प्रस्ताव (म.वि.स. नियम २९२ अन्वये

(११) सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा (म.वि.स. नियम २९३ अन्वये)

(१२) अनियत-दिन प्रस्ताव (म.वि.स. नियम २९५ अन्वये)

**६. स्थगन प्रस्ताव (Adjournment Motion) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)/(नियम ९३ सूचना विधान परिषद) :-**

सर्वसाधारणपणे सभागृहाचे कामकाज, कामकाजपत्रिकेवर ठरवून दिलेल्या बाबींप्रमाणे चालते. परंतू बऱ्याचवेळा अशा काही गंभीर व तातडीची परिस्थिती निर्माण होते की, त्याबाबतची तातडीने दखल घेणे, प्रश्न, ठराव, प्रस्ताव वा इतर संसदीय आयुधांच्या माध्यमातून नियमातील बरीच अगोदर पूर्वसूचना देण्यासंबंधी असलेल्या तरतुदीमुळे शक्य होत नाही. आकस्मिकरित्या उद्‌भवणाऱ्या परिस्थितीमुळे अशा बाबी तातडीने चर्चेला सभागृहात येणे अतिशय आवश्यक असते. कारण राज्यात जनतेच्या हिताच्या दृष्टीने तातडीने उद्‌भवलेल्या घटनेचे पडसाद लोकनियुक्त सभागृहात उमटणे हे लोकशाही राज्यव्यवस्थेत अपरिहार्य आहे. उदा.राज्यात अचानक झालेला भूकंप व त्यात मोठ्या प्रमाणात मृत्यू पावलेल्यांची संख्या, एखादा मोठा बस अपघात होऊन त्यात शेकडो माणसे मृत्युमूखी पडणे, पोलीस कोठडीत झालेला मृत्यू, पोलीस गोळीबारात मृत्यू, बॉम्बस्फोट या सर्व तातडीने घडलेल्या बाबींचे प्रतिबिंब त्याच दिवशी सभागृहात उमटणे आवश्यक असते व त्यासाठी सभागृहासमोरील कामकाज बाजूला सारुन अशा विषयांवर चर्चा घेण्यासाठी स्थगन प्रस्ताव या संसदीय आयुधाचा वापर केला जातो. या आयुधाचा मुख्य उद्देश अतिशय तातडीच्या व नुकत्याच घडलेल्या बाबींकडे सभागृहासमोरील नियमित कामकाज बाजूला सारुन सभागृहाचे लक्ष वेधणे हा आहे. संसदीय कार्यपद्धतीमध्ये या आयुधाचे स्वरूप शासनाच्या कारभारावर ठपका ठेवणारे (Censure Motion) निंदाव्यंजक अशा स्वरूपाचे असल्याचे मानले जाते. त्यामुळे या आयुधाचा वापर अतिशय काटेकोरपणे व गांभीर्याने करण्याची निकड आहे. तसेच अतिशय असाधारण तातडीची व गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याखेरीज व शासनाचे अपयश असल्याखेरीज या आयुधाचा वापर करणे योग्य होणार नाही. हे मुद्दाम सदस्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

नियम ९७ अन्वये यासंबंधातील तरतुदी केलेल्या आहेत. तातडीच्या म्हणजे नुकत्याच घडलेल्या सार्वजनिक महत्त्वाच्या एखाद्या विशिष्ट विषयावर सभागृहासमोर असलेले विहित कामकाज बाजूला करून चर्चा करण्यासाठी जो प्रस्ताव मांडावयाचा असतो त्याला स्थगन प्रस्ताव म्हणतात. सभागृहाची बैठक सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर सदस्याने प्रस्तावाच्या सूचनेच्या तीन प्रती विधानसभेचे मा. अध्यक्ष, सचिव तसेच संबंधित मंत्र्यांकडे लेखी द्यावयास पाहिजे. ह्या वेळेनंतर आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही.

सभागृहात हा प्रस्ताव मांडण्यापूर्वी अध्यक्षांची त्यास अनुमती मिळणे आवश्यक आहे. ज्या प्रस्तावांना अध्यक्ष अनुमती नाकारतात अशा प्रस्तावांबाबत अध्यक्षांना आवश्यक वाटल्यास त्या प्रस्तावांच्या सूचना सभागृहात वाचून निर्णय देतात. एखाद्या सूचनेमध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती सुस्पष्ट होत नसेल तर त्या संबंधातील अधिक माहिती त्वरित मिळविण्यासाठी मा. अध्यक्ष त्यावरील निर्णय राखून ठेवतात व अधिक माहिती प्राप्त झाल्यावर त्यावर निर्णय देतात. तसेच ज्या सूचना स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसत नाही परंतु तातडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या असतात. त्याबाबत सभागृहात निवेदन करण्याचे निदेश देखील मा. अध्यक्ष संबंधित मंत्र्यांना देऊ शकतात. ज्या सदस्याच्या प्रस्तावाला संमती देण्यात येते त्या सदस्याने सभागृहाच्या अनुमतीसाठी प्रस्ताव मांडल्यानंतर २९ किंवा जादा सदस्य उभे राहिल्यास "सभागृहाची अनुमती आहे" किंवा २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिल्यास "सभागृहाची अनुमती नाही" असे मा. अध्यक्ष जाहीर करतात.

तद्‌नंतर त्या सभागृहाच्या बैठकीचे शेवटचे दोन तास उपलब्ध असताना सभागृहासमोर असलेले विहित कामकाज बाजूला सारुन त्या स्थगन प्रस्तावावर चर्चा सुरू होते. त्यावेळी प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्याने भाषण केल्यानंतर अध्यक्ष प्रस्ताव प्रस्तुत करतात.

इतर सदस्यांच्या भाषणानंतर संबंधित मंत्री चर्चेला उत्तर देतात. प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांने उत्तर दिल्यावर चर्चा समाप्त होते. अध्यक्षांनी परवानगी दिल्यास प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्याने उत्तर दिल्यानंतर मंत्री पुन्हा भाषण करु शकतात. अशा वेळी मंत्र्यांनी भाषण केल्यास त्यानंतर चर्चा समाप्त होते. त्यानंतर मा. अध्यक्ष प्रस्ताव मतास टाकतात. प्रस्तावावरील चर्चा व मतदान ठराविक दोन तासाच्या मुदतीत समाप्त झाले नाही तर त्यानंतर त्या प्रस्तावाच्या संबंधित मतदान घेता येत नाही. प्रस्तावावरील चर्चा संपल्यावर त्या दिवसाचे उरलेले इतर कामकाज करता येते.

यासंबंधात अलिकडील काही वर्षात <u>विधानसभेमध्ये मान्य झालेले काही महत्त्वाचे स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे आहेत</u> :-

(१) सिद्धार्थ नगर (चेंबूर) येथे झालेली दंगल, पोलीस गोळीबारात तीन ठार - दिनांक १६ ऑक्टोबर, १९८९ रोजी चर्चा झाली.

(२) ओशिवरा (मुंबई) पोलीस ठाण्यात मारहाणीमुळे तरुणाचा मृत्यू - दिनांक ९ जुलै, १९९० रोजी चर्चा झाली.

(३) मुसळधार पावसामुळे मोवाड (जि.नागपूर) गावी पुराचा तडाखा बसून ६०० लोक ठार - दिनांक २ ऑगस्ट, १९९१ रोजी चर्चा झाली.

(४) अकोला जिल्ह्यातील भांडणाच्या वेळी जमलेल्या नागरिकांवर पोलिसांनी केलेला गोळीबार, ४ जण ठार - दिनांक ३ जुलै, १९९२ रोजी चर्चा झाली.

(५) विदर्भातील गोवारी समाजातील लोकांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेला गोळीबार - दिनांक २४ नोव्हेंबर, १९९४ रोजी चर्चा झाली.

(६) आवनखेड गावानजिक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाची बस पुलावरून कोसळून ६८ व्यक्तींचा झालेला मृत्यू - दिनांक १५ मार्च, १९९४ रोजी चर्चा झाली.

(७) घाटकोपर, चेंबूर येथील बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना, पोलिसांनी केलेला गोळीबार - दिनांक ११ जुलै, १९९७ रोजी चर्चा झाली.

(८) कापसाला २,५०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा या मागणीसाठी शेतकरी संघटनेने राज्यात सुरू केलेले रास्ता रोको आंदोलन, अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे जवळील रांजण तसेच बोरगांव (धांदे) येथे आंदोलकांवर पोलीस गोळीबार - दिनांक १५ डिसेंबर, १९९७ रोजी चर्चा झाली.

(९) दिनांक १३ मार्च, २००३ रोजी मुलूंड रेल्वे स्थानकात झालेला बॉम्बस्फोट - दिनांक १९ मार्च, २००३ रोजी चर्चा झाली.

(१०) नवी मुंबई येथील घनसोली भागात दिनांक १५ मार्च, २००६ रोजी एका युवतीला ग्रामस्थांनी रंग लावण्याचा प्रयत्न केल्यावरून माथाडी व ग्रामस्थांमध्ये झालेली मारामारी, पुन्हा दिनांक १६ मार्च, २००६ रोजी दोन्ही गटात मोठया प्रमाणात झालेली दंगल, यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न- दिनांक १७ मार्च, २००६ रोजी चर्चा झाली.

(११) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील निजामपूर भागातील कोटरगेट मशिद परिसरात पोलीस ठाणे न उभारता कब्रस्तान होऊ द्यावी अशी मागणी करणाऱ्या जमावाने दिनांक ५ जुलै, २००६ रोजी पोलीस ठाण्यावर हल्ला करून पोलीस ठाण्याचे व वाहनांचे मोठ्याप्रमाणावर केलेले नुकसान- दिनांक ६ जुलै, २००६ रोजी चर्चा झाली.

(१२) दिनांक ११ जुलै, २००६ रोजी मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या प्रथमश्रेणी डब्यांमधून झालेल्या सलग सात भीषण बॉम्बस्फोटात एकूण १७८ जण मृत्यूमुखी पडणे व ४०० हून अधिक प्रवासी गंभीररीत्या जखमी होणे- दिनांक १२ जुलै, २००६ रोजी पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान दुसरा व शेवटचा दिवस (गिलोटीन) चर्चारोध असतानाही मा. अध्यक्षांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन अपवादात्मक बाब म्हणून सूचनेस अनुमती दिली व त्यावर चर्चा झाली.

(१३) भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी येथे दिनांक २९ सप्टेंबर, २००६ रोजी भोतमांगे या दलित कुटूंबातील ४ व्यक्तींची झालेली निर्घृण हत्या- दिनांक ४ डिसेंबर, २००६ रोजी चर्चा झाली.

(१४) राज्यातील बहुसंख्य भागात व विशेषतः विदर्भ व मराठवाड्यात नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून हजारो शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या- दिनांक ७ डिसेंबर, २००६ रोजी चर्चा झाली.

(१५) यवतमाळ जिल्ह्यातील वनी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात समितीचे कर्मचारी व शेतकरी यांच्यामध्ये वाद निर्माण होणे, त्याचे पर्यावसन, घोषणा, निदर्शने,

तोडफोड व मारहाण यात होणे, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी हवेत गोळीबार करणे, अश्रुधूराचा वापर करणे त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी पोलिसांवर हल्ला करून दगडफेक करणे यात कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न- दिनांक ११ डिसेंबर, २००६ रोजी चर्चा झाली.

(१६) दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मुंबई शहरात ठिकठिकाणी अतिरेक्यांनी केलेला हल्ला दिनांक १६ डिसेंबर, २००८ रोजी चर्चा झाली.

तसेच उपोषण, सत्याग्रह, अन्य राज्यात घडलेल्या घटना, मोर्चे, धरणे, लाठीमार, बंद, संप, न्यायप्रविष्ठ बाबी, आंदोलने, आत्महत्या हे स्थगन प्रस्तावाचे विषय होऊ शकत नाही. तसेच राज्यपालांच्या अभिभाषणाच्या दिवशी, विभागांच्या मागण्यांवर चर्चारोध असलेल्या दिवशी किंवा ज्या दिवशी अविश्वासदर्शक प्रस्तावावर सभागृहात चर्चा असेल त्या दिवशी स्थगन प्रस्ताव घेता येत नाही.

**७. लक्षवेधी सूचना (Calling Attention) (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

१९५८ साली "लक्षवेधी सूचने" संबंधीची तरतूद नियमात करण्यात आली. त्या अगोदर एखादी महत्त्वाची व तातडीची बाब सभागृहासमोर उपस्थित करण्यासाठी स्थगन प्रस्तावाचे आयुध उपलब्ध होते. तथापि, या आयुधाचे एकंदर स्वरूप हे एक प्रकारे शासनाच्या कारभारावर ठपका ठेवणारे (Censure Motion) असे होते. त्यामुळे तातडीच्या आकस्मिक कारणासाठी स्थगन प्रस्तावाव्यतिरिक्त एखाद्या स्वतंत्र आयुधाची निकड ध्यानात घेऊन लक्षवेधी सूचनेचा नियमात समावेश करण्यात आला.

आधुनिक संसदीय कामकाज पद्धतीमध्ये "लक्षवेधी सूचने" च्या सभागृहाच्या कामकाज पद्धतीमधील समावेश ही संपूर्णपणे भारतीय संकल्पना (Purely an Indian Innovation) आहे.

या आयुधाच्या माध्यमातून प्रशासनातील उणीवा शासनाच्या लक्षात आणून देणे, त्याबाबत शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कारवाई ही देखील सभागृहापुढे निवेदनाद्वारे आणून देणे व या माध्यमातून शासनावर अंकुश ठेवणे, इत्यादी उद्दिष्ट साध्य करता येतात. (परिशिष्ट .........)

वरीलप्रमाणे कार्यक्रमपत्रिकेवरील तीनही लक्षवेधी सूचनांवर कार्यवाही होते. अधिवेशन समाप्त होण्याच्या दिवशी अशा कोणत्याही बाबी अनिर्णित राहिल्यास संबंधित मंत्री त्या संबंधात त्यांनी करावयाची निवेदने विधानसभेच्या पटलावर ठेवतात.

**८. अर्धा-तास चर्चा (Half an hour discussion) (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

संसदीय आयुधांपैकी "अर्धा-तास चर्चा" हे लोकसभा/राज्यसभा व विविध विधानमंडळामध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे संसदीय आयुध आहे. विधानसभा नियमांमध्ये १९७० पूर्वी फक्त प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेची तरतूद होती.

तद्‌नंतर सन १९७०-७१ साली नियमांत बदल करून या चर्चेची व्याप्ती वाढविण्यात आली. त्यामुळे प्रश्नाव्यतिरिक्त इतर सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावरसुद्धा चर्चा उपस्थित करणे सुलभ झाले.

प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या तसेच इतर सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर उपस्थित करावयाच्या अर्धा-तास चर्चेसंबंधीच्या तरतुदी "म.वि.स. नियम ९४" मध्ये करण्यात आल्या आहेत. अर्धा-तास चर्चेची सूचना देताना खालील गोष्टींकडे सदस्यांनी लक्ष पुरविणे आवश्यक आहे :-

(१) अर्धा-तास चर्चेची सूचना प्रश्नोत्तरातून उद्‌भवलेली असेल तर ती अलिकडच्या प्रश्नोत्तरातून उद्‌भवलेल्या बाबींवर असली पाहिजे.

(२) ती सार्वजनिक महत्त्वाची असली पाहिजे.

(३) प्रश्नाधीन बाबीसंबंधात राज्य शासनाची जबाबदारी असली पाहिजे.

(४) अर्धा-तास चर्चेची सूचना देताना कोणत्या मुद्यांवर चर्चा उपस्थित करावयाची आहे, ते मुद्दे सुस्पष्टपणे पण थोडक्यात देण्यात यावेत. तसेच ते मुद्दे कसे उद्‌भवतात यासंबंधी स्पष्टीकरणात्मक टिप्पणी देणे आवश्यक आहे. तसेच सूचनेस अन्य किमान दोन सदस्यांच्या अनुमोदक म्हणून सह्या असणे गरजेचे आहे. (परिशिष्ट .........)

**९. अल्पकालीन चर्चा (Short Duration Discussion) (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक महत्त्वाचे आयुध सदस्यांना उपलब्ध आहे. १९५८ साली या चर्चेची तरतूद नियमांत करण्यात आली. त्यापूर्वी निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करण्यासाठी स्थगन प्रस्तावाव्यतिरिक्त दुसरा मार्ग उपलब्ध नव्हता. तथापि, स्थगन प्रस्तावाला निंदा-व्यंजक (Censure Motion) प्रस्तावाचे स्वरूप असल्यामुळे तसेच अशा प्रस्तावाला अगदी अपवादात्मक परिस्थितीतच मान्यता मिळत असल्यामुळे हा मार्ग सदस्यांना उपलब्ध होऊ शकत नव्हता. अल्पकालीन चर्चेची उपयुक्तता तातडीच्या बाबी उपस्थित करण्यासाठी फार मोठी आहे. या चर्चेला जास्तीत-जास्त अडीच तास वेळ असल्यामुळे तातडीने सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी सदस्यांना विशेषत: विरोधी पक्षाच्या सदस्यांना एक जादा संधी मिळते. या चर्चेच्या वेळी सभागृहासमोर औपचारिक प्रस्ताव नसल्यामुळे यावर मतदान होत नाही. त्यामुळे चर्चेला संमती देताना शासनालासुद्धा फारसे अडचणीचे होत नाही. परिणामी अल्पकालीन चर्चेचे आयुध सदस्यांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त व समाधानकारक असे सिद्ध झाले आहे. (परिशिष्ट .........)

**१०. अंतिम आठवडा प्रस्ताव (Last Week Motion) (म.वि.स. नियम २९२ अन्वये) :-**

१९७१ साली या नियमामध्ये या प्रस्तावासंबंधीच्या तरतुदींचा समावेश करण्यात आला. सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी सदस्यांना ही एक अतिरिक्त संधी उपलब्ध आहे. या प्रस्तावाची तुलना (Analogous) ब्रिटीश संसदेच्या शेवटच्या आठवड्यातील प्रस्ताव किंवा सुट्टीचे स्थगन प्रस्ताव (Holiday Adjournment Motion) यांच्याशी करण्यात येते. या प्रस्तावाचा उद्देश म्हणजे सभागृह स्थगित होण्यापूर्वीच्या निकटच्या कालावधीतील अडचणी, समस्या/प्रश्न सभागृहासमोर (Grievances before adjournment) आणणे हा आहे.

या प्रस्तावाद्वारे राज्याच्या हिताच्या दृष्टीने व्यापक सार्वजनिक महत्त्वाचे विषय म्हणजे राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महागाई, पिण्याच्या पाण्याची राज्यव्यापी समस्या, अवर्षण, टंचाई इत्यादी विषय सभागृहासमोर मांडता येतात.

अध्यक्ष, सभागृहाच्या नेत्याशी विचारविनिमय करून, अशा पुरेशा सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा घडवून आणण्यासाठी अधिवेशनातील शेवटच्या आठवड्यातील एक दिवस नेमून देतात. त्यासाठी तीन दिवस अगोदर प्रस्तावाची लेखी सूचना देता येईल. सूचना स्वीकारण्यापूर्वी अध्यक्ष ज्या विभागाशी तो प्रस्ताव संबंधित असेल त्या विभागाच्या मंत्र्यांचे विचार समजावून घेतात. संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या संमतीने अध्यक्षांना त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही प्रकरणी सूचनेचा कालावधी कमी करता येतो किंवा सूचना अनावश्यक असल्याचे ठरविता येते.

मा. अध्यक्ष कोणत्याही दिवशी चार पेक्षा अधिक नसतील इतक्या बाबी चर्चेसाठी ठेऊ शकतात. चर्चेसाठी कोणते प्रस्ताव घ्यावयाचे याकरीता हे प्रस्ताव कामकाज सल्लागार समितीपुढे ठेवण्यात येतात. चर्चेच्या वेळी प्रस्ताव देणारे सदस्य प्रथम भाषण करतात व तद्नंतर इतर सदस्यांनाही अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेत भाग घेता येतो. त्यानंतर संबंधित मंत्री त्यास उत्तरे देतात. या प्रस्तावावर मतदान होत नाही. (परिशिष्ट .........)

**११. मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (No Confidence Motion) (म.वि.स. नियम ९५ अन्वये) :-**

संसदीय शासन व्यवस्थेमध्ये लोकसभा किंवा विधानसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळ सत्तेवर राहू शकते. मंत्रिमंडळ सामुहिकरित्या विधानसभेला जबाबदार असते. ज्याक्षणी विधानसभेने मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त केला. त्याचक्षणी मंत्रिमंडळाला राजीनामा देणे भाग पडते. (The Council of Minister remains in office as long as it enjoys the confidence of Lok Sabha/Legislative Assembly. The moment it expresses a lack of confidence in the Council of Ministers, the Government is constitutionally bound to resign.) मंत्रिमंडळावर विधानसभेचा विश्वास आहे किंवा नाही हे ठरविणे या प्रस्तावाचे उद्दिष्ट आहे.

मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणाऱ्या किंवा एखाद्या विशिष्ट बाबतीतील मंत्रिमंडळाच्या कामाविषयी नापसंती व्यक्त करणाऱ्या प्रस्तावाची लेखी सूचना देणे आवश्यक असते.

विधानसभेचे अधिवेशन चालू असताना असा प्रस्ताव अध्यक्षांनी स्वीकृत (Admitted) करून घेतल्यास स्वीकृत केल्यापासून दोन दिवसांहून उशिरा नाही अशा अध्यक्ष नेमतील त्या दिवशी प्रश्नोत्तरानंतर व त्या दिवसाच्या यादीतील कामकाजास सुरुवात होण्यापूर्वी प्रस्ताव मांडण्याची परवानगी मागता येते. मात्र विधानसभेचे अधिवेशन चालू नसताना असा प्रस्ताव दिल्यास तो मांडण्याची परवानगी अधिवेशन सुरू झाल्यापासून दोन दिवसांहून उशिरा नाही अशा अध्यक्ष नेमतील त्या दिवशी मागणे जरूर असते.

सदस्यांनी प्रस्ताव मांडण्यास अनुमती मागितल्यानंतर अध्यक्ष तो प्रस्ताव वाचून दाखवितात व २९ किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य उभे राहिल्यास सदर प्रस्ताव मांडण्यास परवानगी आहे असे सांगून व त्या दिवसापासून तीन दिवसाहून आधीचा नाही व सात दिवसाहून उशिरा नाही अशा अध्यक्ष नेमून देतील त्या दिवशी तो विचारात घेण्यात येईल असे अध्यक्ष जाहीर करतात. २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिल्यास प्रस्ताव मांडण्यास विधानसभेची परवानगी नाही असे मा.अध्यक्ष जाहीर करतात. प्रस्तावावर चर्चा होऊन मुख्यमंत्र्यांचे उत्तर होते. तद्नंतर मतदानाद्वारे या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येतो.

अलिकडील काळात खालील अविश्वास प्रस्तावावर चर्चा झाली -

(१) "ही विधानसभा मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करीत आहे." - प्रस्ताव दिनांक ४ ऑगस्ट १९८९ रोजी मांडण्यासाठी अनुमती मागितली व दिनांक १० ऑगस्ट १९८९ रोजी चर्चा झाली.

(२) "ही विधानसभा मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करीत आहे."-प्रस्ताव दिनांक २८ नोव्हेंबर १९९४ रोजी मांडण्यासाठी अनुमती मागितली व त्याच दिवशी चर्चा झाली.

(३) मंत्रिमंडळावर अविश्वासदर्शक प्रस्ताव श्री.रामदास कदम व इतर वि.स.स. यांनी दि. २० जुलै २००६ रोजी दिला होता. दि. २१ जुलै २००६ रोजी सदरहू

अविश्वासदर्शक प्रस्तावावर सभागृहात निर्णय होणे अगोदरच मा. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात थेट विश्वासदर्शक प्रस्ताव मांडून तो अनुकूल १५३ व प्रतिकूल ० असा मान्य झाला. परिणामी म.वि.स. नियम ४५ (प्रस्तावाची पुनरावृत्ती) अन्वये मंत्रिमंडळावर अविश्वासदर्शक प्रस्तावाची सूचना व्यपगत करण्यात आली. सूचना व्यपगत झाल्यामुळे याबाबत कुठलाही पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही.

(४) दिनांक ६ डिसेंबर २००६ रोजी श्री रामदास कदम व इतर वि.स.स. यानी म.वि.स नियम ९५ अन्वये "मंत्रिमंडळावर अविश्वासदर्शक प्रस्ताव" दिला होता. त्यानंतर दिनांक ७ डिसेंबर २००६ रोजीच्या पत्रान्वये सदरहू प्रस्ताव सभागृहात मागे घेण्यात आल्यामुळे पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

**१२. मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (विश्वासदर्शक प्रस्ताव) - (Confidence Motion) (म.वि.स. नियम २३ अन्वये) :-**

संसदीय शासन व्यवस्थेमध्ये लोकसभा किंवा विधानसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळ सत्तेवर राहू शकते. मंत्रिमंडळ सामुहिकरित्या विधानसभेस जबाबदार असते. विधानसभेमध्ये मुख्यमंत्र्यांना बहुमत सिद्ध करता यावे हे या प्रस्तावाचे उद्दिष्ट आहे. विश्वासदर्शक प्रस्तावासंबंधी नियमात विशिष्ट अशी तरतूद नाही. त्यासाठी नियम २३ या प्रस्ताव विषयक नियमातील खालील तरतुदींचा वापर करण्यात येतो.

"ज्या बाबतीत विधानसभेच्या निर्णयाची आवश्यकता असेल अशा बाबींचा निर्णय मा. अध्यक्ष सदस्यांनी मांडलेला प्रस्ताव मतास टाकून करतील."

मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करण्यासाठी प्रस्तावाची लेखी सूचना देणे आवश्यक असते. प्रस्ताव महाराष्ट्र विधानसभा नियम २३ (२) प्रमाणे ज्या कसोट्या नियमात नमूद करण्यात आल्या आहेत त्या सर्व कसोट्यांची पूर्तता करणारा असावा लागतो. प्रस्तावाची सूचना अध्यक्षांनी स्वीकृत केल्यानंतर या प्रस्तावावर चर्चा केव्हा घ्यावयाची व चर्चेला किती वेळ द्यावा याबाबतचा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात येतो. प्रस्तावावर चर्चा होऊन मुख्यमंत्र्यांचे आभार प्रदर्शक भाषण होते व नंतर मतदानाद्वारे या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येतो.

अलिकडील काळात खालील प्रस्तावावर चर्चा झाली :-

(१) मुख्यमंत्री, श्री.मनोहर जोशी यांच्या मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक ७ डिसेंबर १९९५रोजी प्रस्ताव बहुमताने संमत झाला.

(२) मुख्यमंत्री, श्री.नारायण राणे यांच्या मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक १७ फेब्रुवारी १९९९ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(३) मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक १३ जून २००२ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(४) मुख्यमंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे यांच्या मंत्री मंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक २२ जानेवारी २००३ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(५) मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक १६ जुलै २००६ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**१३. अध्यक्षांना/उपाध्यक्षांना पदावरून दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव (Removal of Speaker/Dy.Speaker Motion) (संविधानाचे अनुच्छेद १७९ तसेच म.वि.स. नियम ११ अन्वये) :-**

संविधानाच्या अनुच्छेद १७९ अन्वये अध्यक्षांना वा उपाध्यक्षांना त्यांच्या पदावरून दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याकरिता १४ दिवसांची सूचना द्यावी लागते. सूचनेची मुदत संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर असा प्रस्ताव अध्यक्ष विधानसभेला वाचून दाखवितात व जे सदस्य प्रस्ताव मांडण्याची परवानगी देण्यास अनुकूल असतील त्यांना आपापल्या जागेवर उभे राहण्याची विनंती करतात. २९ किंवा त्यापेक्षा अधिक सदस्य उभे राहिल्यास प्रस्ताव मांडण्यास अनुमती दिली आहे व अनुमती दिल्यापासून ७ दिवसांहून उशिरा नाही अशा अध्यक्ष ठरवतील त्या दिवशी प्रस्ताव विचारात घेतला जाईल असे अध्यक्ष जाहीर करतील. जर २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिले तर उक्त प्रस्ताव मांडण्यास विधानसभेची अनुमती नाही असे अध्यक्ष जाहीर करतात.

**अध्यक्षांना पदावरून दूर करण्याबाबतचे काही महत्त्वाचे प्रस्ताव -**

(१) दिनांक १० एप्रिल १९८७ रोजी (अर्थसंकल्पिय अधिवेशन) श्री.निहाल अहमद यांनी तत्कालीन अध्यक्ष (श्री.शंकरराव जगताप) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्ताव दिला होता व तो माहे जून, १९८७ च्या अधिवेशनात दिनांक २५ जून १९८७ रोजी अनुमतीसाठी व त्याच दिवशी एका दिवसाच्या चर्चेसाठी ठेवण्यात आला व त्यावर चर्चा व मतदान होऊन प्रस्ताव अनुकूल ५४ व प्रतिकूल ११५ असा असंमत झाला.

(२) दिनांक २८ जुलै १९९८ रोजी श्री.रोहिदास पाटील व इतर सदस्यांनी तत्कालीन अध्यक्ष (श्री. दत्ताजी नलावडे) यांच्याविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्ताव दिला होता. परंतु विधानसभा बरखास्तीपर्यंत सदर प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही.

(३) सन १९९९ च्या चौथ्या अधिवेशनात मा. विरोधी पक्ष नेता श्री. नारायण राणे यांनी दिनांक १५ डिसेंबर १९९९ रोजी नियम ११ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. परंतु ती मागे घेण्यात आल्यामुळे त्यावर कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) श्री. नारायण राणे व इतर सदस्यांनी दिनांक २० एप्रिल २००० रोजी मा.अध्यक्ष (श्री. अरुण गुजराथी) यांचेविरुद्ध अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी नियम ११ अन्वये प्रस्ताव दिला होता. त्यानंतर तो दिनांक २८ जुलै २००० रोजी सभागृहात अनुमतीसाठी मांडण्यात आला परंतु प्रस्तावाच्या बाजूने एकही सदस्य उभा न राहिल्यामुळे प्रस्ताव बारगळला होता.

(५) श्री. नारायण राणे व इतर सदस्य दिनांक १० ऑगस्ट २००० रोजी नियम ११ अन्वये मा. अध्यक्ष (श्री. अरुण गुजराथी) यांचेविरुद्ध प्रस्ताव दिला होता. परंतु दिनांक ११ डिसेंबर २००० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव मागे घेण्यात आला.

(६) सन २००१ च्या पहिल्या अधिवेशनात श्री. नारायण राणे व इतर सदस्यांनी दि. १६ मार्च २००१ रोजी प्रस्तावाची सूचना दिली होती. परंतु यासंदर्भात सभागृहाचे नेते आणि विरोधी पक्षनेते यांच्याबरोबर मा. अध्यक्षांच्या दालनात चर्चा होऊन सदरहू प्रस्तावासंबधी पुढे कोणत्याही प्रकारचा आग्रह नाही असे विरोधी पक्षनेत्यानी सांगितल्यामुळे अविश्वासाचा प्रस्ताव बारगळला.

(७) नि:सत्र कालावधीत म्हणजे दिनांक ८ जून २००२ रोजी श्री. नारायण राणे व इतर सदस्यांनी नियम ११ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती परंतु दिनांक २९ जुलै २००२ रोजी सूचना मागे घेत असल्याचे पत्र मा. अध्यक्षांना दिल्यामुळे प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(८) दिनांक ६ डिसेंबर २००६ रोजी (सन २००६ चे तृतीय अधिवेशन) श्री. रामदास कदम व इतर सदस्यांनी नियम ११ अन्वये मा. अध्यक्ष (श्री. बाबासाहेब कुपेकर) यांचेविरुद्ध प्रस्ताव

दिला होता परंतु, दिनांक ७ डिसेंबर २००६ रोजी सूचना मागे घेत असल्याचे पत्र (सभागृहात प्रधान सचिवांकडे) दिल्यामुळे प्रस्तावावर पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

**उपाध्यक्षांना पदावरून दूर करण्याबाबतचे काही महत्त्वाचे प्रस्ताव**

(१) श्री.गुलाबराव पाटील व इतर सदस्यांनी दिनांक ३० नोव्हेंबर १९७८ रोजी मा.उपाध्यक्षांना (श्री. गरुड) पदावरून दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. उक्त प्रस्तावावर दिनांक ५ एप्रिल १९७९ रोजी सभागृहात चर्चा व मतदान झाले व प्रस्ताव अनुकूल १८३ व प्रतिकूल ० असा संमत झाला.

(२) श्री. नारायण राणे व इतर सदस्यांनी दिनांक १० नोव्हेंबर २००० रोजी मा.उपाध्यक्षांना (श्री. प्रमोद शेंड) पदावरून दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. परंतु उक्त प्रस्ताव दिनांक ११ डिसेंबर २००० च्या पत्रान्वये मागे घेण्यात आला होता.

(३) श्री. बाळा नांदगांवकर व इतर सदस्यांनी दि.१ जुलै २००२ रोजी मा.उपाध्यक्षांना (श्री. प्रमोद शेंडे) पदावरून दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. उक्त प्रस्ताव दि. २९ जुलै २००२ च्या पत्राद्वारे मागे घेण्यात आला होता.

(४) श्री. गोपीनाथ मुंडे, वि.स.स. व इतर सन्माननीय सदस्यांनी दि. १४ डिसेंबर २००५ रोजी मा. उपाध्यक्षांना (श्री. प्रमोद शेंडे) पदावरून दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला असता तो स्वीकृत करण्यात आला होता. दि. १३ मार्च २००६ रोजी सदरहू प्रस्ताव सभागृहात मागे घेण्यात आला होता.

(५) श्री. रामदास कदम व इतर सदस्यांनी दि. २० जुलै २००६ रोजी मा.उपाध्यक्षांना (श्री. प्रमोद शेंडे) पदावरून दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला आहे. सदरहू प्रस्ताव विधानसभा कामकाज सल्लागार समितीपुढे ठेवण्याबाबत निदेश झालेले होते. त्यानंतर दिनांक ७ डिसेंबर २००६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव मागे घेण्यात आला.

(६) श्री. रामदास कदम व इतर सदस्यांनी दिनांक ३ एप्रिल २००८ रोजी मा. उपाध्यक्षांना (श्री. प्रमोद शेंडे) पदावरून दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. उक्त प्रस्ताव दिनांक २४ एप्रिल २००८ रोजीच्या पत्रान्वये मागे घेण्यात आला. (या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.)

**१४. ठराव (Resolution) :---**

ठराव हे महत्त्वाचे संसदीय आयुध आहे. सार्वजनिक हिताच्या बाबींवर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक उपयुक्त माध्यम सदस्यांना उपलब्ध आहे. सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर सभागृहाचे मत जाणून घेणे, अथवा शिफारस करणे या उद्देशाने सदस्यांना सभागृहात ठरावाच्या स्वरुपात प्रस्ताव मांडून शासनाच्या एखाद्या कृतीविषयी, ध्येय धोरणाविषयी मत व्यक्त करता येते तसेच लक्ष वेधता येते. ठराव हा एक मूळ प्रस्तावच (Substantive Motion) आहे. ठराव सार्वजनिक महत्त्वाच्या गोष्टीची चर्चा करण्याच्या कारणासाठी अभिप्राय जाहीर करण्याच्या किंवा शिफारशीच्या स्वरुपात असेल, किंवा सरकारचे एखादे कृत्य किंवा धोरण यासंबंधी सभागृहाने पसंती किंवा नापसंती नमूद करण्याच्या किंवा संदेश पोहोचविण्याच्या किंवा उपाययोजना करण्याबद्दल

शिफारस किंवा आग्रह किंवा विनंती करण्याच्या स्वरुपात असेल, किंवा सरकारने विचारात ध्यावयाच्या एखाद्या गोष्टीकडे किंवा परिस्थितीकडे लक्ष वेधण्याच्या स्वरुपात असेल, किंवा अध्यक्षास उचित वाटेल अशा वैधानिक प्रस्तावाव्यतिरिक्त इतर स्वरुपात असेल. ठरावाचे खालील भाग पडतात :---

(१) अशासकीय ठराव (Non-Official Resolution)

(२) शासकीय ठराव (Govt. Resolution)

(३) वैधानिक ठराव (Statutory Resolution)

**१५. अशासकीय ठराव (Non-Official Resolution) (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :---**

विधानसभा नियम १२ अन्वये शुक्रवारच्या बैठकीचे शेवटचे अडीच तास अशासकीय कामकाजासाठी नेमून देण्यात येतात. अशासकीय कामकाजाचे दोन प्रकार आहेत. (अ) अशासकीय विधेयक आणि (ब) अशासकीय ठराव. यामुळे एका शुक्रवारी ठराव तर दुसऱ्या शुक्रवारी विधेयके याप्रमाणे या दोन्ही प्रकारांसाठी आळीपाळीने वेळ दिला जातो.

जर एखाद्या शुक्रवारी सभागृहाची बैठक भरणार नसेल तर अध्यक्ष त्या आठवड्यातील इतर कोणत्याही दिवशी अशासकीय कामकाजासाठी अडीच तासांचा वेळ देऊ शकतात.

जी तारीख अशासकीय ठरावांच्या चर्चेसाठी नेमून दिलेली असेल त्या तारखेपूर्वी १५ दिवस आधी ठराव मांडू इच्छिणाऱ्या सदस्यांनी त्यांच्या ठरावांची सूचना द्यावयाची असते. कोणत्याही सदस्याला एका अधिवेशनासाठी जास्तीत-जास्त पाच ठराव देता येतात. परंतु त्यांनी दिलेल्या ठरावांपैकी काही ठराव अध्यक्षांनी अमान्य केल्यास त्याऐवजी ते दुसरे ठराव देऊ शकतात. (परिशिष्ट .........)

**१६. शासकीय ठराव (Govt. Resolution) (म.वि.स. नियम ११० अन्वये) :---**

नियम ११० अन्वये ज्या ठरावाची सूचना मंत्री किंवा महाअधिवक्ता (Advocate General) यांनी दिलेली असेल त्याला शासकीय ठराव म्हणतात. या ठरावाला नियम १०६ चे उपबंध लागू असणार नाही. अशा ठरावाच्या बाबतीत सात दिवसांची सूचना द्यावी लागते.

(१) सन २००२ चे चतुर्थ अधिवेशनात मा.श्री.दिग्विजय खानविलकर, सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी दिनांक <u>२७ नोव्हेंबर २००२ रोजी मानवी अवयव</u> प्रतिरोपण अधिनियम, १९९४ (११९४ चा ४२) <u>यामध्ये सुधारणा करण्याचा अधिकार संसदेला बहाल</u> करण्याबाबत शासकीय ठरावाची सूचना दिलेली होती. म.वि.स. नियम ११० अन्वये शासकीय ठराव सभागृहात मांडावयाचा असल्यास नोटीसचा ७ दिवसांचा कालावधी पूर्ण होणे आवश्यक आहे. त्या अन्वये दिनांक २८ नोव्हेंबर २००२ रोजी सूचना प्राप्त झाली असल्यामुळे नोटीसची मुदत दिनांक ४ डिसेंबर २००२ रोजी पुर्ण होत होती. त्यानुसार ठराव दिनांक १३ डिसेंबर २००२ रोजी कामकाज सल्लागार समितीपुढे ठेवण्यात आला व त्यावर दिनांक १७ डिसेंबर २००२ रोजी सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(२) सन २००५ च्या तृतीय <u>अधिवेशनात मा. वित्त व नियोजन मंत्री</u> श्री जयंत पाटील यांनी दिनांक १५ डिसेंबर २००५ रोजी "दिनांक १३ मार्च १९८९ रोजी कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याविषयी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव मंजूर करून तो केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्याचा पाठपुरावा करण्यात आला आहे. तथापि, केंद्र

शासनाने आता दिनांक ५ ऑक्टोबर २००५ च्या पत्रान्वये मानव विकास अहवाल-२००२ व महाराष्ट्र विकास अहवाल यातील माहिती विधानमंडळ सभागृहाच्या निदर्शनास आणून याबाबत पुन्हा एकदा मत आजमाविण्याबाबत सुचित केले आहे. याबाबत दोन्ही सभागृहांची कोकण विभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी शीघ्र गतीने विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ आवश्यक असल्याची खात्री झाल्याने हा ठराव पुन्हा एकदा एकमताने मंजूर करण्यात येत आहे. त्यादृष्टीने अनुच्छेद ३७१(२) मध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना केंद्र शासनाने करावी व अशी सुधारणा संसदेच्या दोन्ही सदनांच्या माननीय सदस्यांनी मंजूर करावी अशी विनंती ही विधानसभा करीत आहे".असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(३) सन २००६ च्या प्रथम अधिवेशनात मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी दिनांक १७ एप्रिल २००६ रोजी "महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबीत असलेल्या याचीकेसंदर्भात केंद्र शासनाने त्यांचे म्हणने ऑगस्ट, २००६ पूर्वी सर्वोच्च न्यायालयात मांडावे, अशी शिफारस केंद्र शासनाकडे करण्यात यावी, असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(४) सन २००६ च्या द्वितीय अधिवेशनात मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी दिनांक ४ जुलै २००६ रोजी " राज्यातील विधानसभेतून तसेच स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून राज्यातील विधानपरिषदेवर सभासद पाठविताना खुले मतदान (ओपन बॅलट) पद्धती स्वीकारण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ मध्ये योग्य ती सुधारणा करण्यात यावी, अशी शिफारस केंद्र शासनाला करण्यात यावी" असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(५) सन २००६ च्या द्वितीय अधिवेशनात मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, यांनी दिनांक १३ जुलै २००६ रोजी "उत्तर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) (अ) मध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना केंद्र शासनाने करावी व अशी सुधारणा संसदेच्या दोन्ही सदनांच्या मा. सदस्यांनी मंजूर करावी, अशी विनंती ही विधानसभा करीत आहे" असा ठराव मांडला त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(६) सन २००७ च्या प्रथम अधिवेशनात मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी दिनांक १६ एप्रिल २००७ रोजी "संसदेने मंजूर केलेला नागरी जमीन (कमाल मयार्दा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ या राज्यासाठी अंगिकृत करण्यात यावा", असा ठराव मांडला व त्यावर सन २००७ च्या द्वितीय व तृतीय अधिवेशनात चर्चा होऊन दिनांक २९ नोव्हेंबर २००७ रोजी ठराव बहुमताने संमत झाला.

**१७. सांविधीक प्रस्ताव (म.वि.स. नियम २९० अन्वये) (Statutory Motion) :---**

या प्रस्तावाला सांविधिक प्रस्ताव म्हणतात. कारण संविधान व अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने हा प्रस्ताव मांडला जातो. (Motion tabled in pursuance of a provision in the Constitution or Act of Legislature) हा प्रस्ताव मंत्री अथवा अशासकीय सदस्य यांना मांडता येतो. अध्यादेश नापसंतीचा प्रस्ताव, मा.अध्यक्ष, उपाध्यक्षांना पदावरून दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव ही या प्रस्तावाची उदाहरणे आहेत. या संदर्भात म.वि.स. नियम २९० मधील तरतुद पुढीलप्रमाणे आहे :---

ज्या कोणत्याही सदस्याची सांविधिक प्रस्ताव मांडण्याची इच्छा असेल, तो ज्या अन्वये सदरहू प्रस्ताव केला जात असेल तो परिनियम किंवा अधिनियमिती यात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त किंवा संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या मताविषयी खात्री करून घेऊन अध्यक्ष अन्यथा निदेश देतील त्याव्यतिरिक्त, पूर्ण दहा दिवसांची नोटीस देईल व त्या नोटिशीबरोबर नियोजित प्रस्तावाची प्रत सादर करील.

**१८. मंत्र्यांचे निवेदन (म.वि.स. नियम ४७ अन्वये) :---**

एखाद्या मंत्र्यास अध्यक्षांची परवानगी घेऊन सार्वजनिक दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बाबींवर सभागृहात निवेदन करता येते. अशा निवेदनावर कोणतीही चर्चा करण्याची परवानगी देता येत नाही. परंतु उक्त निवेदनाच्या संबंधात आणखी माहिती घेण्याच्या दृष्टीने प्रश्न विचारण्याची सदस्यांना परवानगी देता येते.

**१९. अभिनंदनपर प्रस्ताव - (Congratulatory Motion) (नियम १४) :**

सर्वसाधारणपणे सभागृहाचे कामकाज, कामकाज पत्रिकेवर ठरवून दिलेल्या बाबीप्रमाणे चालते. सभागृहाच्या बैठकीस प्रारंभ होण्यापूर्वी अध्यक्षांची परवानगी घेऊन अभिनंदनपर प्रस्ताव प्रश्नोत्तराच्या वेळेनंतर कोणत्याही वेळी मांडता येतो. अभिनंदन प्रस्ताव मान्य होण्यासंबंधी पुढीलप्रमाणे निकष आहेत :---

१) विवक्षित बाबीशी शासनाचा संबंध असला पाहिजे. २) बाब केवळ औपचारिक स्वरुपाची असावी व ३) बाब वादातीत असली पाहिजे. प्रस्ताव मान्य होण्यासाठी प्रस्तावाधीन विषयाबाबत सभागृहातील सर्व गटामध्ये एकवाक्यता होणे आवश्यक असते. एकवाक्यता असल्यासच अभिनंदनाचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येतो. अलिकडील काळात खालील अभिनंदनपर प्रस्ताव संमत करण्यांत आले.

१) परमपुज्य पांडुरंग शास्त्री आठवले यांना १९९६ चा या वर्षाचा मॅगसेस पुरस्कार प्राप्त झाल्याबाबतचा -दिनांक १९ जुलै १९९६.

२) ॲटलांटा येथील शतक महोत्सवी ऑलिंपिक स्पर्धेत टेनिसचे वैयक्तीक ब्राँझ पदक भारताला मिळवून दिल्याबद्दल टेनीसपट्टू लिॲन्डर पेस यांचे अभिनंदन करणेबाबत--दिनांक ५ ऑगस्ट १९९६.

३) परमपुज्य पांडुरंग शास्त्री आठवले यांना १९९७ या वर्षीचा विश्वातील सर्वात मोठा प्रतिष्ठान टेम्पलटन पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल --दिनांक १७ मार्च १९९७ .

४) जगदविख्यात भारतीय अर्थशास्त्रज्ञ प्राध्यापक अमर्त्य सेन यांना अर्थ शास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळाल्याबद्दल १४ डिसेंबर १९९८ रोजी अभिनंदन प्रस्ताव संमत केला.

५) केंद्र शासनाने राजस्थान येथील पोखरण येथे यशस्वीरित्या अणुचाचणी परीक्षा घेऊन भारताचे नाव जगात अणवस्त्रधारी महासत्तेच्या यादीत यशस्वीरित्या आणले याबद्दल केंद्र शासनाच्या अभिनंदनाचा ठराव सर्व पक्ष नेत्यांच्या संमतीने आलेला नसल्याने प्रथेनुसार अमान्य करण्यात आला.

६) श्री. गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर यांना राष्ट्रीय स्तरावरील साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचा मानला जाणारा " ज्ञानपीठ " पुरस्कार मिळाल्याबद्दल दिनांक १३ मार्च २००६ रोजी अभिनदंन प्रस्ताव संमत केला.

(७) मेलबर्न येथील अठराव्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताला दोन सुवर्ण पदके प्राप्त करून दिल्याबद्दल कुमारी तेजस्विनी सावंत यांचे अभिनंदन करण्याबाबत दिनांक ५ एप्रिल, २००६ रोजी अभिनंदन प्रस्ताव संमत केला.

(८) महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची भारताच्या राष्ट्रपती पदावर निवड झाल्याबद्दल दिनांक २३ जुलै, २००७ रोजी अभिनंदन प्रस्ताव संमत करण्यात आला.

(९) स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांना "भारतरत्न" हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळाल्याबद्दल दिनांक १७ मार्च, २००९ रोजी अभिनंदन प्रस्ताव संमत करण्यात आला.

१०) पंधराव्या लोकसभेच्या अध्यक्षपदी श्रीमती मीरा कुमार यांची निवड झाल्याबद्दल दिनांक ४ जून, २००९ रोजी अभिनंदन प्रस्ताव संमत करण्यात आला.

**२०. विनंती अर्ज :**

सदस्यांना सर्वसाधारणपणे लोकहिताचा बाब असलेला विनंती-अर्ज सभागृहाला सादर करता येतो. तथापि, यात नियम २६६ मध्ये नमूद केलेल्या बाबींचा समावेश नसावा. सदरहू अर्ज सभागृहाला सादर झाल्यानंतर विनंती-अर्ज समितीकडे (नियम२७२) विचारार्थ पाठविण्यात येतो. समिती त्यावर विचार करून सभागृहास अहवाल सादर करीत असते.

**२१. अशासकीय विधेयके**

दर शुक्रवारी सभागृहाच्या बैठकीचे शेवटचे अडीच तास अशासकीय कामकाजासाठी नेमून दिले जातात. हा वेळ आळीपाळीने अशासकीय ठराव आणि अशासकीय विधेयके यांना देण्यात येतो. सभागृहाच्या नेत्यांच्या संमतीने शुक्रवार व्यतिरिक्त अन्य दिवस अशासकीय कामकाजासाठी नेमून देण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे तसेच ज्या शुक्रवारी बैठक नसेल त्या आठवड्यातील इतर कोणत्याही दिवशी अशासकीय कामकाज घेण्याचा निदेश अध्यक्ष देऊ शकतात.

म.वि.स. नियम १११ अन्वये अशासकीय विधेयकाची सूचना खाजगी सदस्यांकडून देण्यात येते. अशासकीय विधेयकासाठी १५ दिवसांची सूचना आवश्यक असते. अशासकीय विधयकाचा मसुदा तयार करण्याच्या बाबतीत विधानमंडळ सचिवालयाच्या संबंधीत कक्षाद्वारे आवश्यक ते मार्गदर्शन केले जाते. मात्र, सदस्याने विधेयकाची सूचना देताना विधेयकाच्या प्रारुपासोबत उद्देश व कारणे यांचे निवेदन संक्षिप्त स्वरुपात दिले पाहिजे. तसेच, त्यात प्रक्षोभक, अप्रस्तुत व बदनामीकारक मजकूर असता कामा नये.

सदस्यांनी दिलेल्या विधेयकाचा मसुदा उद्देश व कारणे यांचे निवेदन यात वर्णरचनेतील आणि अशासारख्या इतर चुकांच्या दुरुस्तीव्यतिरिक्त खालील बाबतीत विधेयकाची छाननी केली जाते.

(१) विधेयकाच्या माध्यमातून सदस्यांना एखाद्या अधिनियमात सुधारणा अभिप्रेत असल्यास ती सुधारणा मूळ अधिनियमांतर्गत तरतुदीस बाधक आहे का ?

(२) विधेयकाला भारताच्या संविधानाच्या ३०४ (ख) खालील तरतुदीनुसार राष्ट्रपतींच्या पूर्वमंजूरीची आवश्यकता आहे काय ?

(३) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ (१) व (३) खालील तरतूदीनुसार राज्यपालांच्या शिफारशींची आवश्यकता आहे काय ?

याबाबतीत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन विधेयकाचे प्रारुप उद्देश व

कारणे यांच्या निवेदनासह स्वीकृतीसाठी मा. अध्यक्षांपुढे ठेवण्यात येते व अशाप्रकारे स्वीकृत केलेले विधेयक संबंधीत सदस्य विधानसभेत पुरःस्थापित करतात. पुरःस्थापित विधेयके राज्य शासन राजपत्रात प्रसिद्ध केली जातात. यानंतर अशी विधेयके बॅलटनुसार विचारार्थ सभागृहापुढे ठेवली जातात.

म.वि.स. नियम १५६ (१) मधील तरतूदीनुसार एखादे विधेयक संमत होण्यापूर्वी जर त्या विधेयकासंबंधात एका वर्षाच्या कालावधीत कोणताही प्रस्ताव आणण्यात आला नाही तर असे विधेयक व्यपगत होते तथापि, सदरहू तरतूद अशासकीय विधेयकास लागू नाही.

**२२. हरकतीचा मुद्दा (नियम-५०)**

सभागृहात विशिष्ट वेळी चालू असलेल्या कामकाजाच्या संदर्भात सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येतो. मात्र तो सभागृहाच्या नियमाचा अर्थ वा त्यांची अंमलबजावणी यांच्याशी किंवा सभागृहाच्या कामाकाजासंबंधी संविधानाच्या तरतुदींशी संबंधित असला पाहिजे तसेच अध्यक्षांनी त्यांची दखल घेण्यायोग्य तो असला पाहिजे. हरकतीचा मुद्दा निकषात बसतो किंवा कसे हे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार मा.अध्यक्षांना आहे. त्यावर अध्यक्षांना वाटल्यास ते संबंधित सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आपला निर्णय देतात. अध्यक्षांचा याबाबतचा निर्णय अंतिम असतो व त्यावर चर्चा करता येत नाही. हरकतीचा मुद्दा मान्य होऊन त्यावर बोलणे म्हणजे एक प्रकारे सभागृहासमोरील संपूर्ण कामकाज स्थगित करणे होय. (The Point of Order when raised has the effect of suspending the proceeding before the House.) त्यामुळे या हक्काचा वापर करतांना सदस्यांनी अत्यंत काळजीपूर्वक राहिजे पाहिजे.

**२३. मानहानीकारक वा अपमानास्पद विधान (म.वि.स.नियम ३५ अन्वये)**

ज्या सदस्यास एखाद्या व्यक्तीवर मानहानीकारक किंवा अपराधारोपाच्या स्वरुपाचे कोणतेही अभिकथन ज्या दिवशी करावयाचे असेल त्या दिवशीच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी त्या सदस्याने सायंकाळी ५ वाजेपर्यंत अध्यक्षास व तसेच चौकशी करून उत्तर देण्याच्या प्रयोजनासाठी संबंधित मंत्र्यास आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी पूर्वसूचना दिल्याशिवाय त्या सदस्यास कोणत्याही व्यक्तीविरुद्ध मानहानीकारक किंवा अपराधारोपात्मक स्वरुपाचे कोणतेही अभिकथन करता येणार नाही.

मात्र असे विधान सभागृहाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणारे किंवा त्यामुळे सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून काहीही साध्य होणार नाही असे अध्यक्षांना वाटल्यास सदस्यांना असे विधान करण्यास अनुमती मा.अध्यक्षांकडून दिली जात नाही. सदस्यांना सभागृहात घटनादत्त अधिकाराप्रमाणे भाषण स्वातंत्र्याचा (Freedom of Speech) अधिकार आहे. हा सदस्यांचा विशेषाधिकार आहे. तथापि, हा अधिकार नियम/संविधानातील तरतुदीच्या अधीन राहून वापरावयाचा आहे. सभागृहात या आधारे टीका व आरोप करावयाचे असल्यास सदस्यांनी अत्यंत काळजीपूर्वक राहिले पाहिजे. ज्या वस्तुस्थितीच्या/कागदपत्राच्या आधारावर आरोप करावयाचे आहेत त्याचा तपशील, त्या प्रित्यर्थ पुरावे व त्याच्या सत्यतेसंबंधी सदस्यांनी खात्री करून घेतली पाहिजे. याची संपूर्ण जबाबदारी सदस्यांची असते. सदस्यांनी अशा आरोपासंबंधी संपूर्ण चौकशी करणे अभिप्रेत आहे. (A member has to be careful while making an allegation. He has to satisfy himself that the source is reliable and the allegation is based on Facts. In effect he is required to make prima facie investigation into the matter before he writes to the Speaker or the Minister and more so, before the speaks in the House.)

मा.अध्यक्ष/मंत्रीमहोदय यांना पूर्वसूचना देऊनच या नियमान्वये आरोप करता येतात व पूर्वसूचना देण्याची संपूर्ण जबाबदारी सदस्यांची आहे.

**उदा.**(१) मा.विरोधी पक्ष नेता श्री.नारायण राणे यांनी दिनांक ५ ऑगस्ट, २००२ रोजीच्या दोन पत्रांद्वारे म.वि.स.नियम ३५ अन्वये राज्यमंत्री श्री.नवाब मलिक तसेच श्री.विजयकुमार गावित यांचेवर अपराधारोपाच्या स्वरुपाचे अभिकथन करण्यासंबंधी अनुमती मागितली होती. परंतू नियमान्वये सूचना आदल्या कामकाजाच्या दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत देणे गरजेचे असताना देखील उपरोक्त दोन्ही सूचना आदल्या दिवशी रात्रौ ८.४५ वाजता कार्यालयात प्राप्त झाल्या. तसेच सूचनेसोबत आवश्यक ती कागदपत्रेही जोडलेली नव्हती. त्यामुळे आरोपासंबंधी तपासणी किंवा शहानिशा करण्यास वाव नव्हता. तसेच हा नियम अंतर्भूत करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे ज्या सदस्यांवर आरोप करावयाचा असतो त्याला त्या संबंधात संपूर्ण माहिती, कागदपत्रे, अभिलेख उपलब्ध करून देणे हा होय. अन्यथा त्याच्यावर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. (Denial of natural justice) ही वस्तुस्थिती लक्षात घेता सदरहू दोन्ही सूचना नियमांची पूर्तता करीत नसल्यामुळे अस्वीकृत करण्यात आल्या.

**२४. वैयक्तिक स्पष्टीकरण (म.वि.स. नियम ४८ अन्वये) :-**

सदस्यांस एखाद्या विषयाबाबत सभागृहात वैयक्तिक स्पष्टीकरण करावयाचे असल्यास मा.अध्यक्षांच्या परवानगीने तसे करता येते. मात्र वैयक्तिक स्पष्टीकरणाद्वारे त्यांना कोणताही वादग्रस्त मुद्दा उपस्थित करता येत नाही. तसेच अशा स्पष्टीकरणावर कोणतीही चर्चा होत नाही.

## ४. विधिविधान (Legislation)

कायदे तयार करणे हे विधिमंडळाचे प्रमुख काम आहे. म्हणूनच विधिमंडळाला 'कायदे मंडळ' म्हणतात. प्रत्येक कायद्याला संसद/विधिमंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे. कारण फक्त याच संस्था लोकशाही व्यवस्थेमध्ये जनमताचे प्रतिनिधीत्व करतात. संविधानाच्या अनुच्छेद २४६ अन्वये संसद किंवा राज्य विधिमंडळाने संमत करावयाच्या अधिनियमाच्या विषयाबाबत परिसीमा स्पष्ट केलेल्या आहेत. संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची-१ (संघ सूची) मधील विषयासंबंधी फक्त संसद अधिनियम करु शकते. सूची-२ (राज्य सूची) मधील विषयासंबंधी राज्य विधानमंडळ अधिनियम करु शकते. तर सूची-३ (समवर्ती सूची) मधील विषयासंबंधी संसद व राज्य विधानमंडळे अधिनियम करु शकतात. मात्र संसदेचा अधिनियम व राज्याचा अधिनियम यात वाद झाल्यास संसदेचा अधिनियम श्रेष्ठ समजला जातो. महाराष्ट्र विधिमंडळाने कित्येक लोकोपयोगी कायदे करून राज्याच्या विकासात मोलाची भूमिका बजावली आहे.

**लोकहिताचे अनेक पथदर्शी कायदे :-**

जनता जनार्दनाच्या हितासाठी परिणामकारक कायदे केले जाणे अपेक्षित आहे. कायदे करणे हे विधानमंडळाचे मुख्य काम आहे. जनभावना, जनआकांक्षा विचारात घेऊनच त्यांना कायद्याचे मूर्त रुप प्राप्त व्हावे. या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करणे हे मात्र शासनाचे काम आहे. ही अंमलबजावणी जर परिणामकारक होत नसेल तर त्या संदर्भातील पडसाद विधानमंडळात उमटले पाहिजेत. परिणामकारक लोकशाहीसाठी विधानमंडळ सभागृहाच्या माध्यमातून अशाप्रकारे जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक होणे आवश्यक आहे.

**(अ.) शासकीय विधेयके**

प्रत्येक कायद्याला यथास्थिती संसद/विधानमंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे कारण, फक्त या संस्थाच लोकशाही व्यवस्थेमध्ये जनमताचे प्रतिनिधीत्व करतात.

विधानमंडळाच्या कामकाजापैकी विधीविषयक कामकाज हे प्रमुख काम समजले जाते. कोणताही कायदा अंमलात येण्यापूर्वी तो विधेयकाच्या स्वरुपात सभागृहात येणे जरुरीचे असते. विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केल्यानंतरच त्यावर आवश्यकतेनुसार संविधानांतर्गत तरतुदींन्वये राज्यपाल किंवा राष्ट्रपती शिक्कामोर्तब करतात व त्याचे कायद्यात रुपांतर होते. संविधानाच्या अनुच्छेद २४६ अन्वये संसद किंवा राज्य विधानमंडळाने संमत करावयाच्या अधिनियमाच्या विषयाबाबत परिसीमा स्पष्ट केलेल्या आहेत. संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची-१ (संघ सूची) मधील विषयांसंबंधी फक्त संसद कायदा करु शकते, सूची-२ (राज्य सूची) मधील विषयांसंबंधी राज्य विधानमंडळ कायदा करु शकते, तर सूची-३ (समवर्ती सूची) मधील विषयांबाबत संसद व राज्य विधानमंडळे कायदे करु शकतात.

विधेयकाचे शासकीय व अशासकीय असे दोन प्रकार असतात. शासनातर्फे पुरस्कृत केलेले ते शासकीय व दुसऱ्या कोणत्याही सदस्याने मंत्र्यांव्यतिरिक्त पुरस्कृत केलेले ते अशासकीय विधेयक होय.

विधेयकाचे -- (१) सर्वसाधारण विधेयक, (२) धन विषयक विधेयक (Money Bill), (३) वित्तविषयक विधेयक (Financial Bill) असे प्रकार असतात.

ज्या विधेयकांना भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ (१) व (३) च्या तरतुदी लागू होतात त्यांच्याबाबतीत राज्यपालांची शिफारस आवश्यक असते. ज्या विधेयकांना भारताच्या संविधानाच्या

अनुच्छेद ३०४ (ख) च्या तरतुदी लागू होतात त्यांच्या बाबतीत राष्ट्रपतींच्या पूर्वमंजूरीची आवश्यकता असते.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १९९ मध्ये धन विधेयकाची व्याख्या दिलेली आहे. एखादे विधेयक धन विधेयक असल्याबाबत मा. अध्यक्षांनी प्रमाणित केल्यास असे विधेयक केवळ विधानसभेमध्ये प्रस्तुत करता येते. विधानसभेने धन विधेयक संमत केल्यानंतर ते विधानपरिषदेकडे तिच्या शिफारशीकरिता पाठविले जाते. अशा प्रकारे विधानपरिषदेकडे शिफारशीकरिता पाठविलेले धन विधेयक १४ दिवसांच्या कालावधीत विधानसभेकडे परत पाठविण्यात आले नाही तर उक्त कालावधी संपल्यानंतर ते विधेयक विधानसभेत संमत केले होते त्याच स्वरुपात दोन्ही सभागृहांनी संमत केले असल्याचे मानण्यात येते. (संविधानाच्या अनुच्छेद १९८ (५) धन-विषयक विधेयकात संविधानाच्या १९९ (१) अन्वये कर लादण्याची किंवा कर कमी करण्याची तरतूद असेल किंवा एखादे कर्ज काढण्याबद्दल हमी घेण्याची तरतूद असेल किंवा भारित (Charged) खर्च घोषित करावयाचा असेल तर अशा प्रकारे त्या अनुच्छेदातील फक्त (अ) ते (ग) संबंधीची तरतूद अशा विधेयकात असते. मात्र वित्तविषयक विधेयकात उपरोल्लेखित (अ) ते (फ) संबंधीच्या तरतुदीशिवाय आणखी काही तरतुदी असतात. ही दोन्ही विधेयके प्रथम विधानसभेत मांडणे जरुर असते, फरक एवढाच की, धनविषयक विधेयक विधानपरिषदेच्या फक्त शिफारशीकरिता पाठविले जाते तर वित्तविषयक विधेयकात विधानपरिषद सुधारणा सूचवू शकते.

विधेयक मांडल्यानंतर ते उद्देश व कारणे यांच्या निवेदनासह राजपत्रात त्वरित प्रसिद्ध केले जाते. त्यानंतर किमान ४ दिवसांनी ते चर्चेसाठी सभागृहात येऊ शकते. नियमान्वये विधेयक विचारात घेण्यात यावे, प्रवर समितीकडे अथवा संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवावे तसेच अभिप्राय मागविण्यासाठी प्रसृत करावे असे विविध प्रस्ताव मांडता येतात (म.वि.स. नियम १२३) विधेयकावरील सर्वसाधारण चर्चेनंतर त्यावर तपशीलवार खंडशः चर्चा होते. यावेळी सदस्यांना एका दिवसाच्या मुदतीची सूचना देऊन सुधारणा सूचविता येतात. म.वि.स. नियम १३४ अन्वये त्याकरिता विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक असते. विधेयकासंबंधी कार्यपद्धतीची तपशिलवार माहिती म.वि.स. नियम १११ ते १५८ मध्ये दिलेली आहे.

सुधारणा निकालात काढून विधेयकाचे खंडशः वाचन पूर्ण झाल्यानंतर विधेयक संमत करण्याच्या अवस्थेत येते. त्यालाच विधेयकाचे तिसरे वाचन म्हणतात. त्यावेळी विधेयक सुधारणेसह किंवा मूळ स्वरूपात संमत करावे असा प्रस्ताव मांडण्यात येतो व तो संमत झाल्यानंतर विधेयक संमत झाले असे समजण्यात येते.

विधानसभेने विधेयक संमत केल्यानंतर ते विधानपरिषदेकडे पाठविण्यात येते. जर विधानपरिषदेने ते फेटाळले किंवा तीन महिन्यांच्या आत परत केले नाही तर विधानसभा ते पुन्हा संमत करू शकते. अशा प्रकारे दुसऱ्यांदा संमत केलेले विधेयक विधानपरिषदेने फेटाळले किंवा सुधारणेसह संमत केले परंतु, सदरहू सुधारणा विधानसभेत असंमत केल्या किंवा ते विधेयक विधानपरिषदेसमोर ठेवल्याच्या दिनांकापासून ते विधानपरिषदेत संमत न होता एक महिन्याहून अधिक काळ लोटला तर ते विधेयक विधानसभेने दुसऱ्यांदा संमत केले त्या प्रारुपात ते राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केले असल्याचे मानण्यात येते (म.वि.स. नियम १४६).

विधेयक मांडल्यानंतर तत्संबंधातील कोणताही प्रस्ताव एक वर्षाच्या आत न मांडल्यास ते विधेयक व्यपगत (Laps) होते (म.वि.स. नियम १५६ (१)).

विधानसभेने एखादे विधेयक चर्चेअंती फेटाळल्यानंतर त्याच विषयासंबंधीचे दुसरे विधेयक सहा महिन्यांच्या आत सभागृहात पुन्हा मांडता येत नाही (म.वि.स. नियम १५७).

## ५. राज्य विधानमंडळाने संमत केलेले महत्त्वाचे अधिनियम.

| | |
|---|---|
| १. | मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६. |
| २. | मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७. |
| ३. | मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह नियंत्रण अधिनियम, १९४७. |
| ४. | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८. |
| ५. | मुंबईचा मुलांबाबत अधिनियम, १९४८. |
| ६. | मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०. |
| ७. | मुंबई परागणा व कुलकर्णी वेतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०. |
| ८. | मुंबई पोलीस अधिनियम, १९५१. |
| ९. | महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९. |
| १०. | मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध अधिनियम, १९५९. |
| ११. | महाराष्ट्र जिल्हापरिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१. |
| १२. | महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१. |
| १३. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१. |
| १४. | महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ अधिनियम, १९६५. |
| १५. | महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६. |
| १६. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६. |
| १७. | महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७. |
| १८. | महाराष्ट्र विधानमंडळ कामकाज (प्रकाशनांना संरक्षण) अधिनियम, १९६९. |
| १९. | महाराष्ट्र कामगार संघाना मान्यता देण्याबाबत व अनुचित प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१. |
| २०. | महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधारणा अधिनियम, १९७१. |
| २१. | महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७५. |
| २२. | महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७५. |

| | |
|---|---|
| २३. | महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम, १९७६. |
| २४. | मुंबईचा भिक मागण्यास प्रतिबंध आणि मुंबई पोलीस (सुधारणा) अधिनियम,१९७६. |
| २५. | महाराष्ट्र नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६. |
| २६. | महाराष्ट्र खार जमीन सुधारणा अधिनियम, १९७९. |
| २७. | महाराष्ट्र सागरी मच्छिमारी नियमन अधिनियम, १९८१. |
| २८. | महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८१. |
| २९. | महाराष्ट्र जलप्रदूषण प्रतिबंध अधिनियम, १९८१. |
| ३०. | महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१. |
| ३१. | महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३. |
| ३२. | महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले व औषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार यांच्या घातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८८. |
| ३३. | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्याबाबत प्रतिबंध) अधिनियम, १९८८. |
| ३४. | महाराष्ट्र प्रसव-पूर्व निदान तंत्राच्या वापराचे विनियमन करण्याबाबत अधिनियम, १९८८. |
| ३५. | महाराष्ट्र भुजल (पिण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, १९९१. |
| ३६. | महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३. |
| ३७. | महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४. |
| ३८. | महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९४. |
| ३९. | मराठवाडा विद्यापीठ डॉ.बाबासाहेब आंबेडकर नामांतर अधिनियम, १९९४. |
| ४०. | हिंदु उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९४. |
| ४१. | महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमन (सुधारणा) अधिनियम, १९९५. |
| ४२. | मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, १९९५. |

| | |
|---|---|
| ४३. | महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५. |
| ४४. | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६. |
| ४५. | महाराष्ट्र "बॉम्बे" हे नाव पूर्ववत "मुंबई" असे करण्याबाबत अधिनियम, १९९६. |
| ४६. | महाराष्ट्र सागरी मंडळ अधिनियम, १९९६. |
| ४७. | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७. |
| ४८. | कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) अधिनियम,१९९७. |
| ४९. | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७. |
| ५०. | महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९८. |
| ५१. | महाराष्ट्र पशू आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८. |
| ५२. | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८. |
| ५३. | महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८. |
| ५४. | महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८. |
| ५५. | महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई करणे अधिनियम, १९९९. |
| ५६. | महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, १९९९. |
| ५७. | महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९. |
| ५८. | श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४. |
| ५९. | राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग अधिनियम, २००४. |
| ६०. | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४. |
| ६१. | महाराष्ट्र देवदासी प्रथा नाहिशी करणे अधिनियम, २००५. |
| ६२. | महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५. |
| ६३. | महाराष्ट्र राजकोषिय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन अधिनियम, २००५. |
| ६४. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५. |

| | |
|---|---|
| ६५. | मुंबई पोलीस (सुधारणा) अधिनियम, २००५. |
| ६६. | महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००६. |
| ६७. | महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २००६. |
| ६८. | उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अधिनियम, २००६. |
| ६९. | महाराष्ट्र लॉटऱ्यावरील कर अधिनियम, २००६. |
| ७०. | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६. |
| ७१. | महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६. |
| ७२. | मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००६. |
| ७३. | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००६. |
| ७४. | मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २००६. |
| ७५. | महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) अधिनियम, २००६. |
| ७६. | संघटित गुन्हेगारी नियंत्रण (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००७. |
| ७७. | महाराष्ट्र मुल्यवर्धित कर (सुधारणा) अधिनियम, २००७. |
| ७८. | पंढरपूर विकास प्राधिकरण अधिनियम, २००८. |
| ७९. | तुळजापूर विकास प्राधिकरण अधिनियम, २००८. |
| ८०. | मुंबई पोलिस (सुधारणा) अधिनियम, २००८. |
| ८१. | महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम, २००८. |
| ८२. | मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २००८. |
| ८३. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, महाराष्ट्र विद्यापीठ व कवी कुलगुरू कालीदास संस्कृत विश्वविद्यालय विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २००९. |
| ८४. | महाराष्ट्र कापूस बी-बीयाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९. |
| ८५. | महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) अधिनियम, २००९. |

| | |
|---|---|
| ८६. | महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९. |
| ८७. | महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ विधेयक, २०१०. |
| ८८. | महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१०. |
| ८९. | महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता (सुधारणा) अधिनियम, २०१०. |
| ९०. | मुंबई ग्रामपंचायत व महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१०. |
| ९१. | मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०१०. |
| ९२. | महाराष्ट्र वेतन प्रदान व किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१०. |
| ९३. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०१०. |
| ९४. | मुंबई मोटर वाहन कर (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१०. |
| ९५. | मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) अधिनियम, २०११. |
| ९६. | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम २०११. |
| ९७. | महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०११. |
| ९८. | महाराष्ट्र (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावात बदल करण्याबाबत) अधिनियम, २०११. |
| ९९. | महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०११. |
| १००. | महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०११. |
| १०१. | मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०११. |
| १०२. | महाराष्ट्र करविषयक कायदे (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०११. |
| १०३. | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) अधिनियम, २०११. |
| १०४. | मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०११. |
| १०५. | मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०११. |

| | |
|---|---|
| १०६. | महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२. |
| १०७. | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) अधिनियम, २०१२. |
| १०८. | महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम, २०१२. |
| १०९. | महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) अधिनियम २०१३. |
| ११०. | महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३. |
| १११. | महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३. |
| ११२. | महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१३. |
| ११३. | महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम, २०१३. |
| ११४. | मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम, २०१३. |
| ११५. | महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४. |
| ११६. | महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४. |
| ११७. | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा) निर्मूलन आणि पुनर्विकास (सुधारणा) अधिनियम, २०१४. |
| ११८. | महाराष्ट्र पोलीस (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१४. |
| ११९. | महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (सुधारणा) अधिनियम, २०१४. |
| १२०. | महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, २०१४. |
| १२१. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४. |
| १२२. | महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१४. |

### (क.) संविधान सुधारणेला संमती देणे

एखाद्या संविधान सुधारणेसाठी राज्य विधानमंडळाची संमती घेणे संविधानातील तरतुदीनुसार आवश्यक असल्यास संसदेकडून आलेला तशा आशयाचा संदेश सभागृहापुढे मांडण्यात येतो. त्यानंतर तीन दिवसांची नोटीस देऊन त्या सुधारणेस संमती देणारा ठराव मांडता येतो. त्यावरील चर्चेसाठी अध्यक्ष वेळ ठरवितात, त्या ठरावास सुधारणा देता येत नाहीत. अशा प्रकारचे ठराव संमत झाल्यास किंवा असंमत झाल्यास संसदेच्या सभागृहास तसा संदेश पाठविला जातो.

## IMPORTANT ACTS PASSED BY
## THE MAHARASHTRA LEGISTATURE

| | |
|---|---|
| (1) | The Bombay Industrial Relations Act, 1946. |
| (2) | The Bombay Agriculture Debtors Relief Act, 1947. |
| (3) | The Bombay Rents, Hotels and Lodging Houses Rates Control Act, 1947. |
| (4) | The Bombay Tenancy and Agricultural Land Act, 1948. |
| (5) | The Bombay Children Act, 1948. |
| (6) | The Bombay Public Trust Act, 1950. |
| (7) | The Bombay Pargana and Kulkarni Vetan Abolition Act, 1950. |
| (8) | The Bombay Police Act, 1951. |
| (9) | The Maharashtra Village Panchayat Act, 1959. |
| (10) | The Bombay Prevention of Begging Act, 1959. |
| (11) | The Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961. |
| (12) | The Maharashtra Agricultural Lands (Ceiling on holdings) Act, 1961. |
| (13) | The Maharashtra Co-operative Societies Act, 1961. |
| (14) | The Maharashtra Secondary and Higher Secondary Board Act, 1965. |
| (15) | The Maharashtra Land Revenue Code, 1966. |
| (16) | The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. |
| (17) | The Maharashtra Public Libraries Act, 1967. |
| (18) | The State Legislature Proceedings (Protection and Publication Act), 1969. |
| (19) | The Maharashtra Recognition of Trade Unions and Prevention of unfair Labour practices Act, 1971. |
| (20) | The Maharashtra Slum Areas Improvement Act, 1971. |
| (21) | The Maharashtra Employment Guarantee Act, 1975. |
| (22) | The Maharashtra Irrigation Act, 1975. |

| | |
|---|---|
| (23) | The Maharashtra Housing Act, 1976. |
| (24) | The Bombay Prevention of Begging and Bombay Police (Amendment) Act, 1976. |
| (25) | The Maharashtra Urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976. |
| (26) | The Maharashtra Khar Lands Development Act, 1979. |
| (27) | The Maharashtra Marine Fishing Regulation Act, 1981. |
| (28) | The Maharashtra Prevention of Communal, Anti-Social and Other Dangerous Activities Act, 1981. |
| (29) | The Maharashtra Prevention of Water Pollution Act, 1981. |
| (30) | The Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare) Act, 1981. |
| (31) | The Maharashtra Agricultural Universities (*Krishi Vidyapeeths*) Act, 1983. |
| (32) | The Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slum Lords, Bootleggers, Drug offenders Act, 1988. |
| (33) | The Maharashtra Educational Institutions (Prohibition of Capitation Fee) Act, 1988. |
| (34) | The Maharashtra Regulation use of Pre-natal Diagnostic Techniques Act, 1988. |
| (35) | The Maharashtra Groundwater (Regulation for Drinking Water Purpose) Act, 1991. |
| (36) | The Maharashtra State Commission for Women Act, 1993. |
| (37) | The Maharashtra Universities Act, 1994. |
| (38) | The Maharashtra Rent Control Act, 1994. |
| (39) | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Act, 1994. |
| (40) | The Hindu Succession (Maharashtra Amendment) Act, 1994. |
| (41) | The Maharashtra Employees of Privates Schools (Conditions of Service) Regulation (Amendment) Act, 1995. |
| (42) | The Bombay Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayats Samitis (Amendment) Act, 1995. |
| (43) | The Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships (Second Amendment) Act, 1995. |

| | |
|---|---|
| (44) | The Maharshtra Krishna-Valley Development Corporation Act, 1996. |
| (45) | The Maharashtra Restoration of name "Mumbai" for "Bombay" Act, 1996. |
| (46) | The Maharashtra Marine Board Act, 1996. |
| (47) | The Maharashtra State Technical Education Board Act, 1997. |
| (48) | The Maharashtra Kavi Kulguru Kalidas Sanskrit Visvavidyalaya (University) Act, 1997. |
| (49) | The Vidarbha Irrigation Development Corporation Act, 1997. |
| (50) | The Maharashtra Rehabilitation of Project Affected Persons Act, 1998. |
| (51) | The Maharashtra Animals and Fisheries Science University Act, 1998. |
| (52) | The Maharashtra Health Science University Act, 1998. |
| (53) | The Maharashtra Godavari Marathwada Irrigation Development Corporation Act, 1998. |
| (54) | The Maharashtra Regulation of Marriage Bureaus and Registration of Marriages Act, 1998. |
| (55) | The Maharashtra Prohibition of Ragging Act, 1999. |
| (56) | The Maharashtra Essential Services Maintenance Act, 1999. |
| (57) | The Maharashtra control of Organised Crime Act, 1999. |
| (58) | Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004. |
| (59) | Rajiv Gandhi Science and Technology Commission Act, 2004. |
| (60) | The Maharashtra State Minorities Commission Act, 2004. |
| (61) | The Maharashtra *Devdasi* System (Abolition) Act, 2005. |
| (62) | The Maharashtra Management Irrigation System by Farmers Act, 2005. |
| (63) | The Maharashtra Fiscal Responsibility and Budgetary Management Act, 2005. |
| (64) | The Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005. |
| (65) | The Mumbai Police (Amendment) Act, 2005. |

| | |
|---|---|
| (66) | The Maharashtra State Backward Class Commission Act, 2006. |
| (67) | The Maharashtra Agricultural Produce Marketing (Development & Regulation) (Amendment) Act, 2006. |
| (68) | The Regularisation of Unauthorised Development in the city of Ulhasnagar Act, 2006. |
| (69) | The Maharashtra Taxes on Lotteries Act, 2006. |
| (70) | The Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act, 2006. |
| (71) | The Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006. |
| (72) | The Mumbai Municipal Corporation (Third Amendment) Act, 2006. |
| (73) | The Maharashtra Government Servants Regulation of Transfers and Prevention of Delay in Discharge of Official Duties (Amendment) Act, 2006. |
| (74) | The Bombay Stamp (Amendment) Act, 2006. |
| (75) | The Maharashtra Local Authority Members Disqualification (Amendment) Act, 2006. |
| (76) | The Criminal Procedure Code (Maharashtra Amendment) Act, 2007. |
| (77) | The Maharashtra Value Added Tax (Amendment) Act, 2007. |
| (78) | The Pandharpur Development Authority Act, 2008. |
| (79) | The Tuljapur Development Authority Act, 2008. |
| (80) | The Mumbai Police (Amendment) Act, 2008. |
| (81) | The Maharashtra Domestic Workers Welfare Board Act, 2008. |
| (82) | The Bombay Village Panchayat and the Maharashtra Zilla Parishads and Panchayats Samitis (Amendment) Act, 2008. |
| (83) | The Yashwantrao Chavan Maharashtra Open University, the Dr.Babasaheb Ambedkar Technological University, 2009. |
| (84) | The Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Act, 2009. |
| (85) | The Maharashtra Project Affected Persons Rehabilitation (Amendment) Act, 2009. |

| | |
|---|---|
| (86) | The Maharashtra Goundwater (Development and Management) Act, 2009. |
| (87) | The Maharashtra State Security Corporation Act, 2010. |
| (88) | The Mahrashtra Medicare Service Persons and Medicare Service Institutions (Prevention of Violence and Damage or Loss to Property) Act, 2010. |
| (89) | The Maharashtra Workmen's Minimum House-rent Allowance (Amendment) Act, 2010. |
| (90) | The Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2010. |
| (91) | The Mumbai Entertainment Duty (Amendment) Act, 2010. |
| (92) | The Minimum Wages (Maharashtra Amendment) Act, 2010. |
| (93) | The Maharashtra Regional and Town Planing (Amendment and Validation) Act, 2010. |
| (94) | The Bombay Motor Vehicles Tax (Second Amendment) Act, 2010. |
| (95) | The Bombay Primary Education and the Maharashtra Employees of Private Schools (Conditions of Service) Regulation (Amendment) Act, 2011. |
| (96) | The Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) (Amendment) Act, 2011. |
| (97) | The Maharashtra Essential Services Maintenance Act, 2011. |
| (98) | The Maharashtra (Change of Short Titles of certain Bombay Acts) Act, 2011. |
| (99) | The Maharashtra Municipal Corporations (Amendment) Act, 2011. |
| (100) | The Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Second Amendment) Act, 2011. |

| | |
|---|---|
| (101) | The Bombay Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2011. |
| (102) | The Maharashtra Tax Law (Levy Amendment and Validation) Act, 2011. |
| (103) | The Bombay Provincial Municipal Corporations, the City of Nagpur Corporation and the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships (Amendment) Act, 2011. |
| (104) | The Bombay Tenancy and Agricultural Lands, the Hyderabad Tenancy and Agricultural Lands and the Bombay Tenancy and Agricultural Lands (Vidarbha Region) (Amendment) Act, 2011. |
| (105) | The Bombay Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Act, 2011. |
| (106) | The Maharashtra Self Financed School (Establishment and Regulation) Act, 2012. |
| (107) | The Bombay Tenancy and Agricultural Lands, the Hyderabad Tenancy and Agricultural Lands and the Bombay Tenancy and Agricultural Lands (Vidarbha Region) (Amendment) Act, 2012. |
| (108) | The Maharashtra Housing (Regulation and Development) Act, 2012. |
| (109) | The Maharashtra Project Affected Persons Rehabilitation (Amendment) Act, 2013. |
| (110) | The Maharashtra Unauthorized Institutions and Unauthorized Courses of Study in Agriculture, Animal and Fishery Sciences, Health Sciences, Higher, Technical and Vocational Education (Prohibition) Act, 2013. |
| (111) | The Maharashtra Prevention and Eradication of Human Sacrifice and other Inhuman, Evil and *Aghori* Practices and Black Magic Act, 2013. |
| (112) | The Maharashtra Co-operative societies (Amendment) Act, 2013. |

| | |
|---|---|
| (113) | The Maharashtra Regulation of Sugarcane Price (Supplied to Factories) Act, 2013. |
| (114) | The City of Mumbai Primary Education, the Maharashtra Primary Education, the Hyderabad Compulsory Primary Education and the Madhya Pradesh Primary Educatuion (Repeal) Act, 2013. |
| (115) | The Maharashtra National Law University Act, 2014. |
| (116) | The Maharashtra Money-Lending (Regulation) Act, 2014. |
| (117) | The Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) (Amendment) Act, 2014. |
| (118) | The Maharashtra Police (Second Amendment) Act, 2014. |
| (119) | The Maharashtra Homoeopathic Practitioner and the Maharashtra Medical Council (Amendment) Act, 2014. |
| (120) | The Maharashtra Medical Practitioners (Amendment) Act, 2014. |
| (121) | Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act, 2014. |
| (122) | The Maharashtra Forest Produce (Regulation of Trade) Act, 2014. |

## Maharashtra Legislative Assembly

### Government Bills referred to the Joint Committee of Both the Houses

| अ.क्र. | विधेयकाचे नाव | विधेयक संयुक्त समितीकडे पाठविल्याचा दिनांक |
|---|---|---|
| (1) | सन 1975 वि.स.वि. क्रमांक 20 - महाराष्ट्र नागरी क्षेत्रातील रिकाम्या जमीनीबाबत (अन्य संक्रमणास प्रतिबंध) विधेयक, 1975. | 26 एप्रिल, 1975 |
| | L.A. Bill No. XX of 1975 -The Maharashtra Vacant Lands in Urban Areas (Prohibition of Alienation) Bill, 1975. | 26 April, 1975 |
| (2) | सन 1975 चे वि.स.वि. क्रमांक 46 - महाराष्ट्र प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन विधेयक, 1975. | 26 एप्रिल, 1975 |
| | L.A. Bill No. XLVI of 1975 - The Maharashtra Rehabilitation of Project Affected Persons Bill, 1975. | 26 April, 1975 |
| (3) | सन 1977 चे वि.स.वि. क्रमांक 28 - महाराष्ट्र रोजगार हमी विधेयक, 1977. | 14 जुलै, 1977 |
| | L.A. Bill No. XXVIII of 1977 - The Maharashtra Employment Guarantee Bill, 1977. | 14 July, 1977 |
| (4) | सन 1978 चे वि.स.वि. क्रमांक 47 - महाराष्ट्र विक्रीकर विधेयक, 1978. | 8 डिसेंबर, 1978 |
| | L.A. Bill No. XLVII of 1978 - The Maharashtra Sales Tax Bill, 1978. | 8 December, 1978 |

| | | |
|---|---|---|
| (5) | सन 1981 चे वि.स.वि. क्रमांक 101 - महाराष्ट्र कृषी विद्यापीठ विधेयक, 1981. | 18 डिसेंबर, 1981 |
| | L.A. Bill No. CI of 1981 - The Maharashtra Agriculture Universities Bill, 1981. | 18 December, 1981 |
| (6) | सन 1983 चे वि.स.वि. क्रमांक 52 - महाराष्ट्र विद्यापीठे (दुसरी सुधारणा) विधेयक, 1983. | 14 डिसेंबर, 1983 |
| | L.A. Bill No. LII of 1983 - The Maharashtra Universities (Second Amendment) Bill, 1983. | 14 December, 1983 |
| (7) | सन 1984 चे वि.स.वि. क्रमांक 32 - महाराष्ट्र विद्यापीठे विधेयक, 1984. | 27 जुलै, 1984 |
| | L.A. Bill No. XXXII of 1984 - The Maharashtra Universities Bill, 1984. | 27 July, 1984 |
| (8) | सन 1985 चे वि.स.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण विधेयक, 1985. | 2 जुलै, 1985 |
| | L.A. Bill No. VI of 1985 - The Maharashtra Urban Area Improvement Authority Bill, 1985. | 2 July, 1985 |
| (9) | सन 1985 चे वि.स.वि. क्रमांक 28 - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, 1985. | 6 ऑगस्ट, 1985 |
| | L.A. Bill No. XXVIII of 1985 - The Maharashtra Co-operative Societies (Second Amendment) Bill, 1985. | 6 August, 1985 |
| (10) | सन 1987 चे वि.स.वि. क्रमांक 22 - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्याबाबत प्रतिबंध) विधेयक, 1987. | 10 एप्रिल, 1987 |

| | | |
|---|---|---|
| | L.A. Bill No. XXII of 1987 - The Maharashtra Educational Institutions (Prohibition of Capitation Fee) Bill, 1987. | 10 April, 1987 |
| (11) | सन 1992 चे वि.स.वि. क्रमांक 36 - महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, 1992. | 14 जुलै, 1992 |
| | L.A. Bill No. XXXVI of 1992 - The Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Third Amendment) Bill, 1992. | 14 July, 1992 |
| (12) | सन 1992 चे वि.स.वि. क्रमांक 48 - महाराष्ट्र विद्यापीठ विधेयक, 1992. | 7 डिसेंबर, 1992 |
| | L.A. Bill No.XLVIII of 1992 - The Maharashtra Universities Bill, 1992. | 7 December, 1992 |
| (13) | सन 1993 चे वि.स.वि. क्रमांक 12 - कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) विधेयक, 1993. | 28 एप्रिल, 1993 |
| | L.A. Bill No. XII of 1993 - The Maharashtra Kavi Kulguru Kalidas Sanskrit Visvavidyalaya (University) Bill, 1993. | 28 April, 1993 |
| (14) | सन 1994 चे वि.स.वि. क्रमांक 25 - महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक, 1994. | 30 जुलै, 1994 |
| | L.A. Bill No. XXV of 1994 -The Maharashtra Municipal Corporations and Nagar Parishads (Amendment) Bill, 1994. | 30 July, 1994 |

| | | |
|---|---|---|
| (15) | सन 1996 चे वि.स.वि. क्रमांक 50 - महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) विधेयक, 1996. | 23 एप्रिल, 1997 |
| | L.A. Bill No. L of 1996 - The Maharashtra District Planning Committees (Constitution and Functions) Bill, 1996. | 23 April, 1997 |
| (16) | सन 1997 चे वि.स.वि. क्रमांक 8 - महाराष्ट्र औद्योगिक संबंध विधेयक, 1997. | 27 एप्रिल, 1997 |
| | L.A. Bill No. VIII of 1997 - The Maharashtra Industrial Relations Bill, 1997. | 27 April, 1997 |
| (17) | सन 2000 चे वि.स.वि. क्रमांक 47 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2000. | 24 जुलै, 2000 |
| | L.A. Bill No. XLVII of 2000 - The Maharashtra Nagar Parishads, Nagar Panchayats and Industrial Townships (Amendment) Bill, 2000. | 24 July, 2000 |
| (18) | सन 2000 चे वि.स.वि. क्रमांक 20 - महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2000. | 23 जुलै, 2001 |
| | L.A. Bill No. XX of 2000 - The Maharashtra Municipal Corporations and Nagar Parishads, Nagar Panchayats and Industrial Townships (Amendment) Bill, 2000. | 23 July, 2001 |
| (19) | सन 2000 चे वि.स.वि. क्रमांक 83 - महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) विधेयक, 2000. | 12 डिसेंबर, 2001 |

| | | |
|---|---|---|
| | L.A. Bill No. LXXXIII of 2000 - The Maharashtra State Enterprises (Restructuring and Other Special Provisions) Bill, 2000. | 12 December, 2001 |
| (20) | सन 2002 चे वि.स.वि. क्रमांक 31 - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2002. | 30 एप्रिल, 2002 |
| | L.A. Bill No. XXXI of 2002 - The Bombay Village Panchayat (Amendment) Bill, 2002. | 30 April, 2002 |
| (21) | सन 2004 चे वि.स.वि. क्रमांक 43 - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेत जमीन कायदे (सुधारणा) विधेयक, 2004. | 6 डिसेंबर, 2004 |
| | L.A. Bill No. XLIII of 2004 - The Maharashtra Tenancy and Agricultural Land Laws (Amendment) Bill, 2004. | 6 December, 2004 |
| (22) | सन 2004 चे वि.स.वि. क्रमांक 46 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2004. | 7 डिसेंबर, 2004 |
| | L.A. Bill No. XLVI of 2004 -The Maharashtra Land Revenue Code (Amendment) Bill, 2004. | 7 December, 2004 |
| (23) | सन 2004 चे वि.स.वि. क्रमांक 54 - महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन विधेयक, 2004. | 17 डिसेंबर, 2004 |
| | L.A. Bill No. LIV of 2004 -The Maharashtra Management of Irrigation Systems by Farmers Bill, 2004. | 17 December, 2004 |
| (24) | सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 68 - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2005. | 23 जुलै, 2005 |

| | | |
|---|---|---|
| | L.A. Bill No. LXVIII of 2005 - The Maharashtra Agriculture Produce Marketing (Regulation) (Amendment) Bill, 2005. | 23 July, 2005 |
| (25) | सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 78 - महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2005. | 16 डिसेंबर, 2005 |
| | L.A. Bill No. LXXVIII of 2005 - The Maharashtra Recognition of Trade Unions and Prevention of Unfair Labour Practices (Amendment) Bill, 2005. | 16 December, 2005 |
| (26) | सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 54 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2007. | 29 नोव्हेंबर, 2007 |
| | L.A. Bill No. LIV of 2007 - The Maharashtra Co-operative Societies (Amendment) Bill, 2007. | 29 November, 2007 |
| (27) | सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 42 - महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक, 2009. | 21 एप्रिल, 2009 |
| | L.A. Bill No. XLII of 2009 - The Maharashtra Ground Water (Development and Management) Bill, 2009. | 21 April, 2009 |
| (28) | सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 91 - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, 2010. | 21 एप्रिल, 2010 |
| | L.A. Bill No. XCI of 2010 -The Maharashtra Co-operative Societies (Second Amendment) Bill, 2010. | 21 April, 2010 |

| | | |
|---|---|---|
| (29) | सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 24 - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (फी वसूलीचे विनियमन) विधेयक, 2011. | 21 एप्रिल, 2011 |
| | L.A. Bill No. XXIV of 2011 - The Maharashtra Educational Institutions (Regulation of Collection of Fee) (Second Amendment) Bill, 2011. | 21 April, 2011 |
| (30) | सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक 15 - महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक, 2012. | 19 एप्रिल, 2012 |
| | L.A. Bill No. XV of 2012 -The Maharashtra Housing (Regulation and Development) Bill, 2012. | 19 April, 2012 |

## Maharashtra Legislative Council

### Government Bills referred to the Joint Committee of Both the Houses.

| अ.क्र. | विधेयकाचे नाव | विधेयक संयुक्त समितीकडे पाठविल्याचा दिनांक |
|---|---|---|
| (1) | सन 1986 चे वि.प.वि. क्रमांक 18 - महाराष्ट्र सुरक्षा दल विधेयक, 1986. | 31 जुलै, 1986 |
| | L.C. Bill No. XVIII of 1986 - The Maharashtra Suraksha Dal Bill, 1986. | 31 July, 1986 |
| (2) | सन 1986 चे वि.प.वि. क्रमांक 31 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा आणि विधीग्राहयीकरण)विधेयक, 1986. | 24 जुलै, 1987 |
| | L.C. Bill No. XXXI of 1986 - The Bombay Provincial Municipal Corporations (Amendment and Validation) Bill, 1986. | 24 July, 1987 |
| (3) | सन 1988 चे वि.प.वि. क्रमांक 11 - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 1988. | 29 जुलै, 1988 |
| | L.C. Bill No. XI of 1988 - The Bombay Municipal Corporations (Amendment) Bill, 1988. | 29 July, 1988 |
| (4) | सन 1988 चे वि.प.वि. क्रमांक 13 - महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) (सुधारणा) विधेयक, 1988. | 15 मार्च, 1989 |

| | | |
|---|---|---|
| | L.C. Bill No. XIII of 1988 - The Maharashtra Felling of Trees (Regulation) (Amendment) Bill, 1988. | 15 March, 1989 |
| (5) | सन 1991 चे वि.प.वि. क्रमांक 13 - महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) विधेयक, 1991. | 18 डिसेंबर, 1991 |
| | L.C. Bill No. XIII of 1991 - The Maharashtra Ground Water (Regulation for Drinking Water Purposes) Bill, 1991. | 18 December, 1991 |
| (6) | सन 1993 चे वि.प.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र भाडे नियंत्रण विधेयक, 1993. | 30 जुलै, 1993 |
| | L.C. Bill No. VI of 1993 -The Maharashtra Rent Control Bill, 1993. | 30 July, 1993 |
| (7) | सन 1994 चे वि.प.वि. क्रमांक 19 - महाराष्ट्र जिल्हा नियोजन व महानगर नियोजन समिती (रचना व कामे) विधेयक, 1994. | 30 जुलै, 1994 |
| | L.C. Bill No. XIX of 1994 - The Maharashtra District Planning and Metropolitan Planning Committees (Constitutions and Functions) Bill, 1994. | 30 July, 1994 |
| (8) | सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 20 - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, 2004. | 17 डिसेंबर, 2004 |
| | L.C. Bill No. XX of 2004 - The Maharashtra Self-financed Universities (Establishment and Regulation) Bill, 2004. | 17 December, 2004 |

| | | |
|---|---|---|
| (9) | सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7 - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक, 2012. | 18 एप्रिल, 2012 |
| | L.C. Bill No. VII of 2012 - The Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Bill, 2012. | 18 April, 2012 |
| (10) | सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 2 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2013. | 17 एप्रिल, 2013 |
| | L.C. Bill No. II of 2013 - The Maharashtra Co-operative Societies (Amendment) Bill, 2013. | 17 April, 2013 |

## ६. वित्तीय कामकाज

### १. अर्थसंकल्पीय प्रक्रिया

भारताने स्वातंत्र्यानंतर संसदीय लोकशाही व्यवस्थेच्या माध्यमातून देशाच्या सर्वांगिण विकासाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कल्याणकारी राज्य संकल्पनेचा अंगिकार केला. पूर्वी शासनाचे कामकाज कायदा व सुव्यवस्था राखणे आणि देशाचे रक्षण करणे, यापुरतेच मर्यादित होते. परंतु त्यानंतर कल्याणकारी राज्याची संकल्पना (Concept of Welfare State) दृढमूल होऊ लागली. संसदीय लोकशाही राज्य व्यवस्थेमध्ये जनता ही सार्वभौम असते व तिच्या कल्याणासाठी शासनाने कार्य करावयाचे असते, अशा या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये शासनाच्या कामकाज पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल होऊन, स्वातंत्र्यानंतर जनकल्याणाच्या वेगवेगळया योजना राबविल्या जाऊ लागल्या. किंबहुना योजनाबद्ध विकासाचा पाया (Planned Development of nation) एकप्रकारे घातला गेला. कोणतीही योजना राबवावयाची असल्यास निधीची उपलब्धता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे राज्य चालविण्यासाठी निधीची उपलब्धता करुन घेणे व त्याचा विनियोग योग्य प्रकारे व जनकल्याणासाठी करणे हे कल्याणकारी राज्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरले, विविध मार्गाद्वारे विकासासाठी साधनसामग्री (Resources) उभी करणे हे राज्य शासनाला क्रमप्राप्त ठरले. अशा महत्प्रयासाने मिळविलेल्या उत्पनाचा विनियोग अत्यंत योग्य प्रकारे कार्यक्षमरित्या करणे व त्यामधून कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य झाले किंवा कसे यावर काटेकोरपणे नियंत्रण ठेवणे, ही राज्य प्रशासनाची प्रमुख जबाबदारी ठरली व त्यातच या संकल्पनेला स्वातंत्र्यानंतर नियोजनबद्व विकास कार्यक्रमाची जोड मिळाली. नियोजनबद्व विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध पंचवार्षिक योजना आखल्या जाऊ लागल्या आणि जनकल्याणाची कामे योजनेत समाविष्ट करण्यात आली. अशा निधीचा विनियोग काटकसरीने करणे व ज्या प्रयोजनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला ते उद्दिष्ट/प्रयोजन साध्य झाले किंवा कसे याची तपासणी करण्याच्या निकडीमधून "प्रशासनावर वित्तीय नियंत्रण" ही संकल्पना पुढे आली (Financial Control of Legislature on Executive) या संकल्पनेची प्रामुख्याने खालील उद्दिष्टे आहेत :-

(१) उपलब्ध साधनसामग्री वाया जाऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी. (That no wastage of resources occurs.)

(२) जनतेच्या पैशांचे अपयोजन टाळणे (Public money is not misapplied).

(३) निधीच्या विनियोगामधून अपेक्षित असलेले परिणाम मिळतात किंवा कसे याबाबत काटेकोरपणे सनियंत्रण ठेवणे (That for the money spend adequate results are obtained).

सध्या अस्तित्वात असलेल्या राज्य पद्धतीमध्ये लोकशाही राज्यपद्धती ही अत्यंत खर्चिक अशी राज्य पद्धती म्हणून ओळखली जाते. लोकनियुक्त विधिमंडळाचे सार्वजनिक खर्चावरील नियंत्रण हे या राज्यपद्धतीचे प्रमुख वैशिष्टय आहे. लोकांना त्यांनी शासनास प्रदान केलेल्या कराचा पुरेपूर मोबदला मिळणे व त्यांचे कल्याण साधणे हा मुलभूत विचार या मागे आहे.

प्रशासनावर विधी मंडळाचे वित्तीय नियंत्रण हे खालील चार मुलभूत संकल्पनांमधून स्पष्ट होईल :-

(१) संसद अथवा विधिमंडळाचे करावर (Taxation) नियंत्रण -

कोणताही कर विधीमंडळ अथवा संसदेच्या अधिकाराशिवाय लादता येणार नाही.

(Parliamentary or Legislative control over taxation; no tax can be, imposed except with the authority of the legislature.)

(२) खर्चावर संसद अथवा विधीमंडळाचे नियंत्रण -

प्रशासनाला कोणताही खर्च विधीमंडळाच्या अनुमतीशिवाय करता येणार नाही. (Parliamentary or Legislative control over expenditure; no expenditure can be incurred except with the sanction of the legislature.)

(३) कार्यकारी प्रशासनाने वित्तीय बाबींमध्ये घ्यावयाचा पुढाकार -

कोणताही कर लादणे किंवा खर्च मंजूर करणे हे कार्यकारी प्रशासनाला, आवश्यकता असल्याशिवाय करता येणार नाही.

(Financial initiative of the executive Government; no tax can be imposed or expenditure sanctioned unless asked for by the executive.)

(४) सर्व खर्चासाठी प्रती वर्षी मंजूरी घेण्याची आवश्यकता -

(Principal of annuality; all expenditure except that specifically charged by any enactment requires to be sanctioned on an annual basis)

वरील सर्व मुलभूत संकल्पनांमधूनच अर्थसंकल्प, रचना व कार्य पद्धतीचा उगम झाला. प्रशासनाच्या खर्चावर आर्थिक नियंत्रण ठेवणे हे अर्थसंकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**२. अर्थसंकल्प म्हणजे काय ? -** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २६६ अन्वये राज्य शासनाला मिळालेला सर्व महसूल व कर्जे यांचा मिळून राज्याचा "एकत्रित निधी" (Consolidated Fund) तयार होतो. अनुच्छेद २६६ (३) मध्ये असे निर्धारित केले आहे की, कायद्यान्वये आणि संविधानात ज्यासाठी आणि ज्या रीतीने तरतूद केली असेल तर त्याखेरीज करुन इतर कोणत्याही प्रयोजनासाठी आणि इतर कोणत्याही रीतीने, राज्याच्या एकत्रित निधीतील कोणतीही रक्कम खर्च करता येणार नाही. याप्रमाणे राज्य विधानमंडळाकडून विनियोजन अधिनियमांच्या स्वरुपात मिळणाऱ्या अधिकृत मंजूरीशिवाय एकत्रित निधीतून कोणतीही रक्कम काढता व खर्च करता येत नाही. ही संविधात्मक स्थिती असल्याने, शासनाने केलेल्या खर्चाच्या सर्व रकमांसाठी विधानमंडळाची मान्यता घ्यावी लागते. म्हणून प्रत्येक वर्षी वित्त विभागाला वर्षातील अंदाजित जमेच्या व खर्चाच्या रकमांचे विवरणपत्र तयार करुन ते संविधानाच्या अनुच्छेद २०२ (१) अनुसार विधानमंडळास मान्यतेसाठी सादर करावे लागते.

विधानमंडळाने मान्यता दिल्याशिवाय शासनाला एक पैसाही खर्च करता येत नाही. या तत्वानुसार आगामी "आर्थिक वर्षात" शासनाला सर्व मार्गांनी आणि साधनांद्वारे उपलब्ध होणारे उत्पन्न, तसेच हे उत्पन्न शासन कोणकोणत्या बाबींवर खर्च करणार आहे, याचे एक विवरण शासन दरवर्षी तयार करते आणि शासनाच्या विविध खात्यांनी केलेल्या पैशांच्या मागण्यांना विधानमंडळाची मान्यता मिळावी यासाठी ते विधानमंडळासमोर सादर करीत असते म.वि.स. नियम २४५ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०२ (१) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे या विवरणास "अंदाजपत्रक", "वार्षिक आर्थिक विवरण" किंवा "अर्थसंकल्प" असे म्हटले जाते. एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून दुसऱ्या वर्षाच्या मार्च महिन्याच्या एकतीस तारखेपर्यंतचा कालावधी "आर्थिक वर्ष" म्हणून ठरविण्यात आला आहे. एका "आर्थिक वर्षात" होणार असलेला खर्च, त्याच्या आधीचे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी, पूर्णपणे किंवा अंशतः विधानमंडळाकडून मंजूर करुन घ्यावा लागतो याचाच अर्थ असा की, आगामी आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी लागणाऱ्या रकमा, त्याच्यामागील वर्षाच्या मार्च महिन्याच्या एकतीस तारखेपूर्वी मंजूर करुन घ्याव्या लागतात व याच दृष्टीने एकतीस मार्चपूर्वी राज्याचा "अर्थसंकल्प" आणि "विनियोजन विधेयक " (Appropriation Bill) यांना विधानमंडळाची मान्यता मिळणे अत्यावश्यक आहे.

**३. अर्थसंकल्पाची रचना - (एकत्रित निधी, आकस्मिकता निधी व लोकलेखा**)-भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५० अन्वये, भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी राष्ट्रपतींच्या संमतीने विहित केलेल्या नमुन्यात केंद्र शासन व राज्य शासन याचे लेखे ठेवावे लागतात. अशा रीतीने विहित केलेला लेखाविषयक नमुना हा अर्थसंकल्प तयार करण्यास आधारभूत होतो. १९७३-७४ च्या अखेरपर्यंत अंमलात असलेले वर्गीकरण हे पूर्वी शासनाकडून पार पाडल्या जाणाऱ्या मर्यादित स्वरुपाच्या कामांसाठी पुरेसे असल्याचे समजले जात असे. तथापि, विविध क्षेत्रांतील शासनाच्या विकासविषयक कार्यामध्ये फार मोठया प्रमाणावर वाढ झाल्यामुळे शासनाच्या कामात मोठया प्रमाणावर विविधता आलेली आहे आणि आता केवळ खर्चाच्या उद्दिष्टांनुसार खर्चाचे हिशेब ठेवणे व खर्चाचे नियंत्रण ठेवणे याऐवजी कार्यक्रम व कार्य यांचे संनियंत्रण व वर्गीकरण यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी विभागांमध्ये वित्तीय व्यवस्थापन व नियंत्रण असावे यासाठी आणि शासनाच्या कार्याचे योग्यरित्या पृथ:क्करण व्हावे यासाठी शासकीय लेख्यांचे यथोचित वर्गीकरण करणे आवश्यक आहे. या गोष्टी विचारात घेऊन भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्याशी विचारविनिमय करुन भारत सरकारने सन १९७४-७५ पासून अर्थसंकल्प व लेखे यांच्या रचनेमध्ये काही सुधारणा केलेल्या आहेत. शासनाची कार्ये, कार्यक्रम आणि योजना यांच्या संदर्भात झालेल्या शासकीय व्यवहारांचे स्वरूप स्पष्ट करणे आणि लेखांकन वर्गीकरण व विकासविषयक योजना शीर्षे यांच्यामध्ये अनुरुपता आणणे या दोन उद्देशांनी हे व्यवहारोपयोगी वर्गीकरण तयार करण्यात आले होते. कार्यात्मक दृष्टीकोन ही बाब आता स्थायी स्वरुपाची झालेली असली तरी, मुख्यत्वेकरुन सामाजिक बाबींना द्यावयाचे अग्रक्रम व तंत्रज्ञानातील प्रगती यामध्ये बदल झालेला असल्यामुळेच, केवळ योजनेसंबंधीचे वर्गीकरण आणि लेखांकन वर्गीकरण यामधील विसंगती वर्षानुवर्षे वाढत गेली आहे. तत्कालीन लेखांकन वर्गीकरण पद्धतीचा आढावा घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार भारत सरकारने लेखा महानियंत्रक, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक आणि नियोजन आयोग यांच्याशी विचारविनिमय करुन लेखांकन वर्गीकरणाची नवी पद्धती आणि प्रधान व गौण लेखाशीर्षाची यादी विहीत केली व ती १ एप्रिल, १९८७ पासून लागू करण्यात आली.

शासनाचे हिशेब खाली दिलेल्या तीन प्रमुख भागात ठेवले जातात -(अनुच्छेद-२६६ व २६७)

(१) भाग एक - राज्याचा एकत्रित निधी (Consolidated Fund),

(२) भाग दोन - राज्याचा आकस्मिकता निधी (Contengency Fund) आणि

(३) भाग तीन - राज्याचा लोक लेखा (Public Account)

**एकत्रित निधी (Consolidated Fund) :-** राज्याचा एकत्रित निधी हा महसुली जमा, राज्य शासनाने उभारलेली कर्जे व शासनाने दिलेल्या कर्जाची व आगाऊ रकमांची वसुली या सर्वांचा मिळून बनतो व त्यातून शासनाच्या विविध कार्यावर होणारा खर्च भागवला जातो. त्याकरिता, वित्तीय वर्षाच्या प्रारंभापूर्वी विधानमंडळापुढे आवश्यक त्या अनुदानांसाठी मागण्या प्रस्तुत केल्या जातात आणि वित्तीय वर्षाच्या कालावधीत वेळोवेळी पूरक मागण्याही सादर केल्या जातात. विधानमंडळाने अशा रीतीने संमत केलेली अनुदाने, विनियोजन अधिनियमात किंवा पूरक विनियोजन अधिनियमात अंतर्भूत करून त्याद्वारे एकत्रित निधीतून खर्चासाठी आवश्यक ती विनियोजने प्राधिकृत करण्यात येतात. ही अनुदाने मंत्रालयाच्या संबंधित प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रत्येक प्रधान लेखाशीर्षाच्या संबंधात विभागवार देण्यात येतात. मात्र इमारतींची बांधकामे, जनजाति क्षेत्र उपयोजन यांवरील खर्च आणि प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी असलेल्या योजनांतर्गत तरतुदी यांसाठी मंत्रालयाच्या संबंधित विभागांखाली संयुक्त मागणीची रक्कम मिळविणे शक्य नसेल त्याबाबतीत आवश्यक त्या तरतूदी संबंधीत कार्यात्मक प्रधानशीर्षाखाली स्वतंत्रपणे दाखविण्यात येतात. "एकत्रित

निधी" वर विधानमंडळाचे संपूर्ण नियंत्रण असते. या निधीची महसुली (Revenue), भांडवली(Capital) व ऋण (Debt) अशा आणखी तीन भागांत विभागणी केलेली असते.

(अ) महसुली विभागाच्या जमेच्या बाजूमध्ये कर व शुल्क, विविध प्रकारच्या सेवा फीद्वारे मिळालेल्या जमा रकमा व केंद्र सरकारकडून मिळालेली अनुदाने यांचा अंतर्भाव होतो. महसुली विभागाच्या खर्चाच्या बाजूमध्ये करवसुलीचा खर्च, प्रशासकीय सेवांवरील खर्च, संस्थाची देखभाल करण्याबाबतचा खर्च, शासनाने कर्जाऊ घेतलेल्या रकमेवरील व्याज इत्यादींचा अंतर्भाव असतो. महसुली जमा व महसुली खर्च यांमधील फरक, महसुली शिल्लक ( Revenue Surplus) किंवा महसुली तूट ( Revenue Deficit) दर्शवितो.

(ब) भांडवली विभागामध्ये भांडवली स्वरुपाच्या खर्चाचा व जमेच्या रकमांचा अंतर्भाव होतो. महत्त्वाच्या आणि कायम स्वरुपाच्या मालमत्ता निर्माण करण्याच्या किंवा त्यात भरीव वाढ करण्याच्या उद्देशाने केलेला खर्च अशी भांडवली खर्चाची सर्वसाधारण व्याख्या करण्यात आली आहे.

(क) ऋण भागामध्ये शासनाने उभारलेली कर्जे आणि शासनाने वितरीत केलेली कर्जे व दिलेल्या आगाऊ रकमा यांचा अंतर्भाव होतो.

**भारित (Charged) व दत्तमत (Voted) खर्च -** एकत्रित निधीतून होणाऱ्या खर्चाचे दत्तमत्त किंवा भारित खर्च म्हणून वर्गीकरण करण्यात येते. विधानमंडळाची मतदानाद्वारे अनुमती घेऊन करण्यात येणाऱ्या खर्चास दत्तमत म्हणतात. भारित खर्च म्हणजे अशा अनुमतीची आवश्यकता नसलेला व राज्याच्या एकत्रित निधीवर आकारावयाचा म्हणून भारतीय संविधानाचे अनुच्छेद २०२ (३) व ३२२ अन्वये घोषित केलेला खर्च. या अनुच्छेदान्वये खर्चाच्या खालील बाबी **"भारित"** म्हणून समजण्यात आल्या आहेत :-

(१) राज्यपालांचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेला इतर खर्च;

(२) विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच विधानपरिषदेचे सभापती व उप सभापती यांचे वेतन व भत्ते;

(३) व्याज, कर्जनिवारण निधी आणि ऋणविमोचन भार यासह ज्याकरिता राज्य जबाबदार ठरत असेल असा ऋण भार आणि कर्जे उभारणे आणि ऋण सेवा व ऋण विमोचन यांच्याशी संबंधित असा इतर खर्च;

(४) उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे वेतन व भत्ते;

(५) कोणत्याही न्यायालयाच्या किंवा लवाद न्यायाधिकरणाचा निर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा यांनुसार द्यावयाच्या रकमा;

(६) संविधानाने किंवा राज्य विधानमंडळाने कायद्यान्वये भारित म्हणून घोषित केलेला कोणताही इतर खर्च;

(७) राज्य लोकसेवा आयोगाचा खर्च यांमध्ये आयोगाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतने यांचाही समावेश होतो.

राज्य विधानमंडळाने संमत केलेल्या निरनिराळ्या कायद्यान्वये महसुलातील काही विहित केलेल्या रकमा ह्या रोजगार हमी निधी यांसारख्या राखीव निधीकडे हस्तांतरीत करण्यात येतात. अशा रकमा भारित म्हणून समजण्यात येतात. भारित खर्चाच्या बाबींवर जरी विधानमंडळ मतदान करीत नसले तरी त्यावर सभागृहात चर्चा होऊ शकते. विधानमंडळाकडून मागण्या संमत झाल्यानंतर दत्तमत

खर्चाच्या मागण्या आणि भारित खर्चाची विनियोजने (Appropriations) विनियोजन विधेयकात (Appropriation Bill) समाविष्ट करण्यात येतात व ते विधेयक विधानमंडळास सादर केले जाते.

**आकस्मिकता निधी (Contengency Fund) -** विधानमंडळाचे अधिवेशन संबंध वर्षभर चालू नसते व अर्थसंकल्पामध्ये पूर्वकल्पित नसलेल्या खर्चाच्या अनपेक्षित बाबींवर शासनाला खर्च करण्याचे प्रसंग येतात. वर्षभरामध्ये काही वेळा खर्चाच्या विवक्षित बाबींकरिता केलेली तरतूद अपुरी असल्याचे आढळून येते किंवा अर्थसंकल्पात ज्यासाठी तरतूद करण्यात आलेली नसेल अशा काही तातडीच्या आणि निकडीच्या बाबींवर खर्च करावा लागतो. अशा प्रसंगी, त्याच अनुदानातील इतर बाबींखाली बचत उपलब्ध असल्यास, त्या बचतीचे पुनर्विनियोजन करून खर्चाच्या मान्यताप्राप्त बाबींच्या संबंधातील अतिरिक्त खर्च भागविण्याचे अधिकार शासनाला प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा बचतीच्या रकमा उपलब्ध नसतील किंवा विधानमंडळाची मान्यता मिळण्याच्या अपेक्षेने खर्चाच्या एखाद्या नवीन बाबीसाठी वित्तव्यवस्था करावयाची असेल त्या बाबतीत, संविधानाच्या अनुच्छेद २६७ (२) अन्वये स्थापण्यात आलेल्या आकस्मिकता निधीतून खर्च प्रथमतः भागविला जातो. (आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा रुपये १५० कोटी आहे) विधानमंडळाची मान्यता मिळण्याच्या अपेक्षेने करण्यात आलेल्या खर्चाच्या सर्व तपशिलांसह, पूरक मागण्या विधानमंडळाला सादर करून, आकस्मिकता निधीतून काढलेल्या रकमांची निधीत भरपाई केली जाते. या निधीतून आगाऊ रकमा घेऊन करण्यात आलेल्या खर्चाची भरपाई विधान मंडळाला पूरक मागण्या सादर करुन करावयाची असते.

**लोक लेखा (Public Account) -** यामध्ये, एकत्रित निधीमध्ये अंतर्भूत केलेल्या रकमा वगळून शासनाला किंवा शासनाच्या वतीने मिळालेल्या इतर सर्व रकमा जमा करण्यात येतात. यातील व्यवहार बँकिंग व समायोजनाच्या स्वरुपाचे असल्याने यातून खर्च करण्यासाठी विधानमंडळाच्या मंजुरीची आवश्यकता नसते. शासकीय लेख्यांचा या तिसऱ्या भागात, म्हणजे लोक लेख्यात सरकारी पैशांसंबंधी वर नमूद केलेल्या व्यवहारांव्यतिरिक्त इतर व्यवहारांची नोंद केली जाते. हे व्यवहार राज्य मार्ग निधी, विद्युत निधी, शिक्षण उपकर निधी, आरोग्य व पोषण निधी, रोजगार हमी निधी इत्यादींसारख्या शासनाने उभारलेल्या राखीव निधीसंबंधीचे असतात. तसेच, शासनाशी व्यवहार करताना लोकांनी तात्पुरत्या ठेवी म्हणून ठेवलेल्या रकमा, स्थानिक संस्थांच्या ठेवी यांसारख्या बँक व्यवसायाच्या स्वरुपाच्या व्यवहारांची आणि निरनिराळी शासने किंवा राज्य शासनाची विविध कोषागारे यांच्यामधील वित्तप्रेषणाच्या व्यवहारांची नोंद देखील लोक लेख्यात केली जाते. राज्याच्या अतिरिक्त रोख शिलकीची गुंतवणूकही याच लेख्यातून केली जाते.

**४. लेखानुदान -** सन १९८१-८२ या वर्षापासून केंद्र सरकारचा अर्थसंकल्प संसदेला सादर झाल्यानंतर, राज्य शासनाचा अर्थसंकल्प मार्च महिन्यात राज्य विधानमंडळाला सादर केला जाण्याची प्रथा आहे. साधारणपणे संपूर्ण वर्षाचा अर्थसंकल्प नवीन बाबींवरील तरतुदींसह मार्च महिन्यात सादर केल्यानंतर त्यावर चर्चा व मतदान होऊन दिनांक ३१, मार्च पूर्वी विधानमंडळ त्यास आपली मान्यता देते. मागण्यांवर चर्चा करण्याची व त्या संमत करण्याची प्रक्रिया वित्तीय वर्ष उलटून गेल्यावर पार पडते म्हणून एक किंवा दोन महिन्यांच्या कालावधीसाठी "लेखानुदान" घेणे आवश्यक ठरते. परंतु ज्यावेळी निवडणुका वगैरेसारख्या काही अपरिहार्य कारणास्तव मार्च महिन्यात संपूर्ण अर्थसंकल्प सादर करणे अशक्य असते त्यावेळी कायमस्वरुपाच्या खर्चासाठी व विद्यमान खर्चाच्या पातळीवर साधारण वाढ गृहीत धरुन अगोदरच कार्यान्वित असलेल्या योजनांसाठी यांवरील अर्थसंकल्प मार्चमध्ये सादर केला जातो त्यावेळी काही महिन्यांच्या खर्चासाठी लेखानुदान (Vote on Account) (म्हणजेच अंतरिम अर्थसंकल्प सादर केला जातो) घेण्यात येते. नंतर पुढे नवीन योजनांसाठी व सध्या

कार्यवाहीत असलेल्या योजनांच्या विस्तारावरील अतिरिक्त तरतुदीसाठी विधानमंडळाच्या पुढील अधिवेशनात अतिरिक्त अर्थसंकल्पाद्वारे तरतुदी करण्यात येतात. नवीन बाबींसह अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा व मतदान होते.

**५. अर्थसंकल्पीय भाषण -** शासनाची आर्थिक स्थिती आपल्या भाषणामधून स्थूलमानाने स्पष्ट करुन वित्त मंत्री वार्षिक अर्थसंकल्प म्हणजेच वित्तविषयक विवरणपत्र सादर करतात.

आपल्या भाषणामध्ये वित्त मंत्री पुढील गोष्टी विधानमंडळाच्या निदर्शनास आणतात-

(१) शासनाने पूर्वी हाती घेतलेल्या महत्त्वाच्या योजनांसंबंधात पार पाडलेली कामे;

(२) आगामी वर्षात हाती घ्यावयाची महत्त्वाची कामे;

(३) शासनाचे धोरणविषयक महत्त्वाचे निर्णय, कर बसविण्यासंबंधी काही प्रस्ताव असल्यास त्याचाही भाषणामध्ये उल्लेख करण्यात येतो.

**६. अर्थसंकल्पीय प्रकाशने -** वित्त मंत्र्यांच्या भाषणाशिवाय विधानमंडळाच्या सदस्यांना वित्त विभागाकडून खालील अर्थसंकल्पीय प्रकाशने एकत्रितरित्या सूटकेसमधून देण्यात येतात :-

१. संक्षिप्त अर्थसंकल्प (मराठी)

२. संक्षिप्त अर्थसंकल्प (इंग्रजी)

३. अर्थसंकल्पीय अंदाज :- भाग एक - महसूल व जमा

४. अर्थसंकल्पीय अंदाज :- भाग दोन -
खर्च-प्रधानशीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोक लेखा

५. अर्थसंकल्पीय अंदाज :- भाग दोन - खर्च-विभागवार प्रकाशने

यामध्ये सर्वसाधारणत: ३० पुस्तके असतात व या प्रकाशनांमध्ये राज्य पंचवार्षिक योजनांचा तपशीलवार अंदाजाचाही समावेश असतो.

६. भाग तीन -परिशिष्ट-अ -(जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना अनुदाने व कर्जे देय आहेत अशा, बदली केलेला कर्मचारीवर्ग, योजना व बांधकामे यांवरील खर्चाचा तपशिल)

७. भाग तीन - परिशिष्ट- ब (१) बांधकामे - रस्ते व पूल

८. भाग तीन - परिशिष्ट- ब (२) बांधकामे - इमारती

९. भाग तीन - परिशिष्ट - क - पाटबंधारे विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या "बांधकामां" संबंधिच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशिल.

१०. भाग तीन - परिशिष्ट- ड- आदिवासी विकास विभागाच्या बांधकामांसंबंधीच्या तरतुदींचा तपशील.

११. वित्तविषयक विवरणपत्र अथवा ग्रीन बुक

१२. नवीन वर्षाकरिता प्रस्तावित केलेल्या विनियोजनांची अनुसूची

१३. अर्थसंकल्पविषयक निवेदन खंड-१ निळे पुस्तक (यामध्ये महसूलाच्या व खर्चाच्या प्रत्येक प्रधानशीर्षाखालील आकडयांसंबंधीचे स्पष्टीकरणात्मक निवेदन असते.)

१४. अर्थसंकल्पविषयक निवेदन खंड-२- (मराठी) -निळे पुस्तक (यामध्ये योजनांतर्गत व योजनेत्तर नवीन बाबींचा समावेश असतो.)

१५. अर्थसंकल्पविषयक निवेदन खंड-२- (इंग्रजी) - निळे पुस्तक

१६. विभागनिहाय व विकासनिहाय योजनेतर विकास खर्च

१७. वाणिज्यिक किंवा अर्धवाणिज्यिक स्वरुपाचा व्यवहार करणाऱ्या महत्त्वाच्या शासकीय योजनांचे आर्थिक अंदाज दर्शविणारे विवरणपत्र.

**खालील अर्थसंकल्पीय प्रकाशने संबंधित विभागांकडून सदस्यांना वितरीत करण्यात येतात :-**

१८. वार्षिक योजना - भाग एक (यामध्ये वार्षिक योजनेची रुपरेषा, केंद्रिय सहाय्य, वित्तीय संस्थांकडून होणारा वित्तीय पुरवठा, वैधानिक विकास मंडळे, विशेष घटक योजना तसेच शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध योजनासंबंधीची माहिती)

वार्षिक योजना - भाग दोन (यामध्ये आगामी वर्षासाठीचा नियतव्यय व उद्दिष्टे दर्शविणारी विवरणपत्रे असतात.)

वार्षिक योजना - भाग तीन (यामध्ये योजनानिहाय व विकासमंडळनिहाय नियतव्यय दर्शविण्यात येतो.)

१९. वार्षिक आदिवासी उपयोजना

२०. मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व त्यासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी.

२१. राज्य सार्वजनिक उपक्रमांचे कार्य.

२२. कार्यक्रम अंदाजपत्रक.

**तथापि, ज्यावर्षी लोकसभेची अथवा /आणि विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक घेण्यात येते त्यावर्षी अंतरिम अर्थसंकल्प (लेखानुदान - Vote on Account) सादर करण्यात येतो. संपूर्ण अर्थसंकल्प सादर करण्यात येत नाही त्यामुळे साधारणपणे वित्त मंत्र्यांच्या भाषणाशिवाय फक्त खालील प्रकाशने देण्यात येतात.**

१. अर्थसंकल्पीय अंदाज - भाग एक - महसूल व जमा

२. अर्थसंकल्पीय अंदाज - भाग दोन - खर्च - प्रधानशीर्षवार - नि - विभागवार सारांश व लोकलेखा

३. अर्थसंकल्पीय अंदाज - भाग दोन - खर्च - विभागवार प्रकाशने (यामध्ये सर्वसाधारणतः ३० पुस्तके असतात)
(या प्रकाशनांमध्ये राज्य पंचवार्षिक योजनांचा तपशीलवार अंदाजाचाही समावेश असतो.)

४. परिशिष्ट - अ -(जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना अनुदाने व कर्जे देय आहेत अशा, बदली केलेला कर्मचारीवर्ग, योजना व बांधकामे यांवरील खर्चाचा तपशिल)

५. परिशिष्ट - ब (१) बांधकामे - रस्ते व पूल

६. परिशिष्ट - ब (२) बांधकामे - इमारती

७. परिशिष्ट - क - पाटबंधारे विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या "बांधकामां" संबंधिच्या निरनिराळया तरतुदींचा तपशिल.

८. परिशिष्ट - ड - आदिवासी विकास विभागाच्या बांधकामांसंबंधीच्या तरतुदींचा तपशील.

९. वित्तविषयक विवरणपत्र अथवा ग्रीन बुक

१०. नवीन वर्षाकरिता प्रस्तावित केलेल्या विनियोजनांची अनुसूची

**अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केल्यानंतर वित्त मंत्र्यांच्या भाषणाशिवाय सदस्यांना खालील प्रकाशने देण्यात येतात.**

१. अर्थसंकल्पविषयक निवेदन खंड-१ निळे पुस्तक (यामध्ये महसूलाच्या व खर्चाच्या प्रत्येक प्रधानशीर्षाखालील आकडयांसंबंधीचे स्पष्टीकरणात्मक निवेदन असते.)

२. अतिरिक्त अर्थसंकल्पीय अंदाज - (मराठी) (यामध्ये त्या वर्षाकरिता प्रस्तावित केलेल्या अतिरिक्त तरतुदींच्या वर्गीकरणाची अनुसूची, योजनेतर नवीन बाबी - भाग एक तसेच त्या वर्षाच्या अतिरिक्त अर्थसंकल्पात थेट समाविष्ट करण्यात आलेल्या योजनेतर योजनांची सूची इत्यादींचा समावेश असतो.)

३. अतिरिक्त अर्थसंकल्पीय अंदाज - (इंग्रजी)

४. अर्थसंकल्पीय अंदाज - विभागनिहाय व विकास मंडळनिहाय योजनेतर विकास खर्च

५. अतिरिक्त अर्थसंकल्पीय अंदाज - अतिरिक्त खर्चाचा सारांश आणि विनियोजन अनुसूची.

६. संक्षिप्त अर्थसंकल्प (मराठी)

७. संक्षिप्त अर्थसंकल्प (इंग्रजी)

**महत्त्वाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-**

**(१) वित्तविषयक विवरणपत्र -** सर्वसाधारणपणे "ग्रीन बुक" या नावाने ओळखण्यात येणाऱ्या वित्तविषयक विवरणपत्रात चार भाग असतात. ग्रीन बुकाच्या पहिल्या भागात मागील वर्षाची, चालू वर्षाची तसेच आगामी वर्षाची राज्याची एकंदर वित्तीय स्थिती स्पष्ट करणारी प्रास्ताविक टीप असते. यात मागील वर्षाच्या ज्या जमा व खर्चाच्या मुख्य शीर्षाखालील अर्थसंकल्पीय अंदाज आणि सुधारित अंदाज यातील तफावत फार मोठी आहे अशा काही प्रमुख लेखा शीर्षाखालील तफावतीचे स्पष्टीकरण देण्यात येते. ग्रीन बुकात मागील वर्षाचे सुधारित अंदाज व या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज यामधील महत्त्वाच्या तफावती आणि चालू वर्षातील जमा व खर्च यांच्या अंदाजासंबंधीच्या महत्त्वाच्या बाबी यांचे स्पष्टीकरण दिले जाते. ग्रीन बुकातील दुसऱ्या भागात मागील वर्षाचे लेख्यासंबंधीचे प्रधान शीर्षवार आकडे, चालू वर्षाचा अर्थसंकल्प व सुधारित अंदाज आणि आगामी वर्षाचा अर्थसंकल्प यांचा समावेश असतो. तिसऱ्या भागात विधानमंडळाच्या मतास टाकावयाच्या एकूण स्थूल मागण्या सादर करण्यासंबंधीच्या कार्यपद्धतीबद्दलची एक टिप्पणी समाविष्ट करण्यात येते. चौथ्या भागात, आगामी वर्षाच्या प्रस्तावित खर्चासाठी दत्तमत्त अनुदाने व भारित विनियोजने यासंबंधीच्या मागण्यांसंबंधीची अनुसूची अंतर्भूत असते.

**(२) अर्थसंकल्पीय अंदाज -** "व्हाईट बुक" या नावाने ओळखण्यात येणाऱ्या "अर्थसंकल्पीय अंदाजात" जमा रकमा व संवितरित रकमा यासंबंधीचे तपशीलवार अंदाज अंतर्भूत असतात. वर्गीकरणाच्या सुधारित रचनेमुळे योजनेतील स्वीकृत लेखा शीर्षे व विकास शीर्षे यांमध्ये निकट संबंध स्थापन करणे शक्य झाल्याने १९७४-७५ पासून योजनेतर व योजनांतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी, या दोहोंचा एकत्रित तपशील दर्शविणारे एकच प्रकाशन तयार करण्यात येते.

१९७५-७६ या वर्षापासून अर्थसंकल्पीय अंदाज हे तीन भागात छापण्यात येत आहेत. अर्थसंकल्पीय अंदाजाच्या पहिल्या भागात महसूल व जमा यांचे मागील वर्षाचे जमा रकमांचे लेखे, चालू वर्षाचे अर्थसंकल्पीय व सुधारित अंदाज आणि आगामी वर्षासंबंधीचे अर्थसंकल्पीय अंदाज

दर्शविण्यात येतात. उदाहरणार्थ, "२०४०, विक्रीकर" या प्रधान शीर्षाखाली सदर वर्षाच्या विक्रीकराच्या जमा रकमा दाखविल्या जातात. त्याचप्रमाणे "२०४५, विक्रेय वस्तूंवरील व सेवांवरील इतर कर व शुल्क" या शीर्षाखाली करमणूक करापासून मिळालेल्या जमा रकमा दाखविल्या जातात. "६००३, राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण" या प्रमुख शीर्षाखाली आणि "६००४, केंद्र सरकारकडून कर्जे व आगाऊ रकमा" या लेखा शीर्षाखाली केंद्र सरकारकडून मिळालेली अनुदाने व कर्जे दाखविली जातात. व्हाईट बुकाच्या दुसऱ्या भागात मंत्रालयाच्या प्रत्येक प्रशासनिक विभागानुसार योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचा तपशील, प्रधान शीर्षे, गौण शीर्षे व उप-शीर्षे आणि तपशीलवार उद्दिष्टे याप्रमाणे दिला जातो. (खर्चाची प्रमाण उद्दिष्ट्ये साधारणपणे ३० ते ३२ आहेत.)

शासनाचे वेगवेगळे विभाग व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे एकत्रित निधीतून खर्च करण्यास योग्य अशा खर्चाचे अंदाज प्रत्येक विभागाकरिता स्वतंत्रपणे छापले जातात. यामुळे इमारती व बांधकामे यावरील खर्चाव्यतिरिक्त, विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व योजनांवरील खर्चाची तरतूद एकाच ठिकाणी पहावयास मिळते. अशा खर्चाचा सारांश प्रत्येक पुस्तिकेच्या सुरुवातीला देण्यात येतो व तपशील त्यानंतरच्या पृष्ठांवर देण्यात येतो.

मंत्रालयीन विभागाशी संबंधित असणाऱ्या खर्चाच्या प्रत्येक प्रधान शीर्षाच्या बाबतीत अंदाजित खर्चाचा गौण शीर्षवार सारांश व त्यानंतर गौण शीर्षे, उप-शीर्षे आणि खर्चाची तपशीलवार उद्दिष्टे यांनुसार खर्चाचे तपशील देण्यात येतात. प्रत्येक प्रधान शीर्षाच्या सारांशाच्या शिरोभागी खर्च ज्याच्याशी संबंधित असेल तो मागणी क्रमांक, दत्तमत्त व भारित असा दोन्ही प्रकारचा स्थूल खर्च व वसुलीची एकूण रक्कम कोणतीही असल्यास, वेगवेगळी दर्शविण्यात येते. ग्रीन बुकामध्ये अंतर्भूत केलेल्या मागण्यांच्या अनुसूचीत, दत्तमत व भारित असे स्थूल खर्चाचे दोन्ही आकडे समाविष्ट करण्यात येतात. खर्चातील वजाती म्हणून लेख्यांमध्ये ज्या रकमा समायोजित करण्यात आल्या असतील अशा वसुलीच्या रकमांचा तपशील हा शेवटी स्वतंत्रपणे देण्यात येतो.

लेख्यांच्या महसुली व भांडवली अशा दोन्ही लेखा शीर्षाखाली, (१) प्रशासकीय व विवक्षित कार्यासाठी बांधावयाच्या (Functional) इमारती आणि (२) निवासी इमारती, यांची दोन वेगवेगळया मागण्यांद्वारे तरतूद करण्यात येते. रस्त्यांच्या बांधकामासाठी केलेल्या महसुली व भांडवली लेख्यांखालील तरतुदी दोन वेगवेगळया मागण्यांखाली दाखविण्यात येतात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ती बांधकामे पार पाडण्यात येत असल्यामुळे हया सर्व तरतुदी त्या विभागाखाली दर्शविण्यात येतात.

कामांचा अंदाजित खर्च, मागील वर्षापर्यंत झालेला खर्च, आगामी वर्षाकरिता केलेली तरतूद इत्यादींसारखा तपशील व्हाईट बुकाच्या तिसऱ्या भागात संबंधित विभागांखाली दाखविण्यात येतो. या भागात याशिवाय जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या योजना व कामे यांचा योजनानिहाय खर्चाचा तपशीलही दाखविण्यात येतो.

अर्थसंकल्पीय अंदाजाच्या (व्हाईट बुक) पहिल्या भागात व दुसऱ्या भागात लोक लेख्याखालील विविध प्रधान शीर्षे व गौण शीर्षे यांखालील अनुक्रमे जमा रकमा व खर्च दाखविण्यात येतो.

विभागवार अर्थसंकल्प तयार करण्याच्या पद्धतीमुळे व्हाईट बुकात एका प्रधान शीर्षाखालील खर्च, त्या खर्चाशी संबंधित असणाऱ्या निरनिराळया विभागांखाली दाखविण्यात येतो. तथापि, खर्चाच्या प्रधान लेखाशीर्षावार-नि-विभागवार सारांश व्हाईट बुकात भाग दोनमध्ये देण्यात येतो. उत्पन्न व खर्च यांवर आधारलेली राज्याची सर्वसाधारण वित्तीय स्थिती फक्त ग्रीन बुकाच्या भाग एक मध्ये देण्यात येते.

**(३) अर्थसंकल्प विषयक निवेदन - अर्थसंकल्पविषयक निवेदन किंवा "ब्ल्यू बुक (खंड एक)"** - यामध्ये चालू वर्षाचा अर्थसंकल्प व सुधारलेले अंदाज आणि आगामी वित्तीय वर्षाकरिता प्रस्तावित केलेला अर्थसंकल्प यांच्या आकडयातील तफावतीची तपशीलवार स्पष्टीकरणे जमा रकमा व खर्च यांसाठी स्वतंत्रपणे दिलेली असतात. ही स्पष्टीकरणे शक्यतोवर गौण शिर्षानुसार दिली जातात. ही खर्चाची स्पष्टीकरणे विभागवार असतात. विमा व निवृत्तिवेतन निधी, रोजगार हमी निधी, राज्य मार्ग निधी इत्यांदीसारखे राज्य शासनाकडून ठेवण्यांत येणारे निरनिराळे राखीव निधी हे आवश्यक त्या स्पष्टीकरणासह लोक लेखा विभागामध्ये दर्शविण्यात येतात.

**(४) अर्थसंकल्पविषयक निवेदन किंवा ब्ल्यू बुक (खंड दोन)** - यामध्ये विधानमंडळाने संमत केल्यानंतर आगामी वित्तीय वर्षात कार्यान्वित करावयाच्या सर्व योजनांतर्गत तसेच योजनेतर खर्चाच्या "नवीन बाबींची" माहिती दिलेली असते. या सर्व नवीन बाबी विभागानुसार व प्रधान लेखाशीर्षावार दिलेल्या असतात. संबंधित भागाच्या प्रारंभी या "नवीन बाबी" ची अनुक्रमणिका दिलेली असते.

जेव्हा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात येतो तेव्हा अर्थसंकल्पविषयक निवेदनाचा खंड १ फक्त सादर केला जातो. कारण नवीन बाबी अतिरिक्त अर्थसंकल्पाच्या स्वरुपात असतात.

**(५) वार्षिक योजना (भाग एक, दोन व तीन) -** आगामी वित्तीय वर्षात राबवावयाच्या प्रस्तावित विकास कार्यक्रमांची तपशीलवार माहिती या प्रकाशनामधून मिळते. हया प्रकाशनाद्वारे वार्षिक योजनेत समाविष्ट केलेल्या प्रत्येक योजनेचे चालू व मागील वर्षात झालेले कार्य व वित्तीय तरतुदी यांच्या अनुरोधाने कार्यक्रमातील प्रमुख वैशिष्टये समजू शकतात. अर्थसंकल्पात ज्यासाठी तरतूदी करण्यात आल्या आहेत, त्या योजनांसंबंधीचाच, तपशील अर्थसंकल्पीय अंदाजात देण्यात येतो, तर "वार्षिक योजना" या प्रकाशनात वर्षभरात हाती घ्यावयाच्या सर्व योजनांसंबंधीचा तपशील देण्यात येतो.

**(६) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (आर्थिक समालोचन) -** सदर प्रकाशन नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून वितरीत करण्यात येते. राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची ठळक वैशिष्ठये या प्रकाशनात नमूद केलेली असतात. राज्याच्या सामाजिक नि आर्थिक विकासाची गती दाखविणारी आकडेवारी आणि इतर राज्यांशी विकासाबाबत सुलभरित्या तुलना करता यावी म्हणून इतर राज्यांचे विवक्षित सामाजिक-नि-आर्थिक स्थितीदर्शक निर्देशांक (Socio-economic indicators) सुद्धा यात दिलेले असतात.

या प्रकाशनाच्या पहिल्या भागात राज्याचे उत्पन्न, शेती, उद्योग, राहणीमान इत्यादींसारख्या विविध गोष्टींचा आढावा घेतला जातो. या प्रकाशनाच्या दुसऱ्या भागात (एक) महाराष्ट्रातील कामगारांचे आर्थिक वर्गीकरण, (दोन) मुख्य पिकांखालील क्षेत्रे, (तीन) पाटबंधाऱ्यांखालील क्षेत्रे व (चार) शेतीचे उत्पादन इत्यादींबाबतची आकडेवारी विविध आलेख/तक्त्यांद्वारे देण्यात येते.

**(७) वाणिज्यिक किंवा अर्धवाणिज्यिक स्वरुपाचा व्यवहार करणाऱ्या महत्त्वाच्या शासकीय योजनांचे आर्थिक अंदाज दर्शविणारे विवरणपत्र -** या प्रकाशनात शासनाच्या महत्त्वाच्या वाणिज्यिक किंवा अर्धवाणिज्यिक व्यापारी योजनांचे व्यापारविषयक लेखे देण्यात येतात. त्यामध्ये योजनांचा अपेक्षित तफा अथवा तोटा, प्रशासनिक खर्च इत्यादी बाबी येतात. निरनिराळया दूध योजना यासारख्या विविध वाणिज्यिक किंवा अर्धवाणिज्यिक योजनांचे व्यापारविषयक लेख यात समाविष्ट केले जातात.

**(८) संक्षिप्त अर्थसंकल्प -** या प्रकाशनात अर्थसंकल्पीय वर्षातील शासनाचा महसूल व खर्च यासंबंधीची स्थूल माहिती थोडक्यात दिलेली असते. महसुलात झालेली वाढ व विकासकार्यावरील खर्चातील वाढ दाखविण्यासाठी या प्रकाशनात निरनिराळे आलेख (Graphic Charts) समाविष्ट करण्यात येतात. ही माहिती अर्थसंकल्पाचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते.

**(९) कार्यक्रम अंदाजपत्रक (Performance Budget) .---** सध्या अर्थसंकल्पीय गरजा जरी वास्तव लक्ष्यांच्या आधारे ठरविण्यात येत असल्या तरी अर्थसंकल्प मात्र वित्तीय परिभाषेत सादर करण्यात येतो. एखाद्या विभागाकडून काय कार्य केले जात आहे, किती प्रमाणावर ते केले जात आहे व त्यासाठी किती खर्च केले जात आहेत ते शोधून काढण्याचे एक साधन उपलब्ध करून देणे हे कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्यामागील मुख्य प्रयोजन आहे. म्हणून कार्यक्रम अंदाजपत्रकात ज्यासाठी आर्थिक तरतुदीची आवश्यकता आहे अशी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करावयाचा खर्च आणि पूर्ण कामाचे मूल्यमापन करणारी परिमाणात्मक आधारसामग्री देण्यात येते.

शासनाच्या ज्या विभागाकरिता कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्यात येते, अशा शासनाच्या निरनिराळया कार्याखाली केलेल्या एकूण कामाची स्थूल प्रवर्गात विभागणी करण्यात येते. या स्थूल विभागणीला "कार्यक्रम" असे म्हणतात. प्रत्येक कार्यक्रमांचे उपविभागात विभाजन करण्यात येते आणि अशा प्रत्येक पोट-विभागाला "कार्य" असे संबोधण्यात येते. "कार्य" हे कामाचा एकजिनसीपणा दर्शवते आणि कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्याचा हा सर्वात लहान घटक आहे.

कार्यक्रम अंदाजपत्रकातील कार्यामध्ये कार्याची उद्दिष्टे, रचनात्मक प्रकार इत्यादींची माहिती आणि एखाद्या विशिष्ट कार्याखाली वर्गीकरण केलेल्या वेगवेगळया कार्यक्रमांसंबंधी कार्याची रुपरेषा दर्शविणारा संपूर्ण कार्यक्रम यांचा समावेश असतो.

उदाहरणार्थ, सहकार विभागाच्या एकंदर कामाची कार्यक्रमांमध्ये पुढीलप्रमाणे विभागणी करण्यात आली आहे :--- (१) संचालन व प्रशासन, (२) पत संस्था, (३) पणन (Marketing) इत्यादी. "पत संस्था" हया कार्यक्रमांची आणखी आठ कार्यात विभागणी करण्यात आली आहे, जसे -- (१) प्राथमिक कृषि पत संस्था, (२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इत्यादी.

प्रत्येक कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या, पहिल्या भागात प्रास्ताविक माहिती देण्यात येते, नंतरच्या दुसऱ्या भागात वित्तीय गरजासंबंधीचा तपशील देण्यात येतो. वित्तीय गरजांची विभागणी वेगवेगळया तीन प्रकारे करण्यात येते : (एक) त्या कार्यक्रमाचा भाग असलेल्या निरनिराळया कार्यानुसार, (दोन) आस्थापना (Establishment), प्रवास, साधनसामग्री, भू-विकास इत्यादींवरील खर्चाप्रमाणे खर्चाच्या उद्दिष्टांनुसार, (तीन) विद्यमान वेगवेगळया अर्थसंकल्पीय शीर्षानुसार तिसऱ्या भागात कार्यक्रमात अंतर्भूत

असलेल्या महत्त्वाच्या कार्याखालील विद्यमान कार्यभार (कार्यक्रम) आणि आगामी वित्तीय वर्षातील अपेक्षित कार्यक्रम यासंबंधी अधिक माहिती देण्यात येते. चौथ्या भागात कार्यक्रमासाठी असलेल्या विद्यमान कर्मचारीवर्गाचा तपशील वेतनमानाच्या तपशीलासह देण्यात येतो.

**(१०) मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व त्यासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी .---** या पुस्तिकेत मागासवर्गाच्या हिताच्या विविध योजना आणि त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित असलेली तरतूद यासंबंधीची माहिती देण्यात येते.

**७. पूरक मागण्या .---** एखाद्या वित्तीय वर्षात विधानमंडळाने विनियोजन अधिनियमाखाली मंजूर केलेली विनियोजने त्या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काही सेवांवरील व उद्दिष्टांवरील खर्च भागविण्याच्या दृष्टीने पुरेशी नसल्याचे आढळून आल्यास किंवा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना ज्या खर्चाची कल्पना करण्यात आली नसेल असा "नवीन बाबींवरील खर्च" त्या वित्तीय वर्षात करणे आवश्यक असेल त्यावेळी शासनाने असा खर्च करण्यासाठी विधानमंडळाची संमती घेणे आवश्यक ठरते.

संविधानाच्या अनुच्छेद २०५ अन्वये पुढीलपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात वित्तीय वर्षामध्ये विधानमंडळाला पूरक मागण्या सादर करण्यात येतात :-

(१) शासनाने आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची भरपाई करणे.

(२) वित्तीय वर्ष संपेपावेतो, एखाद्या विशिष्ट सेवेवरील खर्च भागवण्याच्या प्रयोजनार्थ वा मंजूर केलेली विनियोजने अपुरी आहेत असे आढळून आले तर, विनियोजन अधिनियमांमध्ये समाविष्ट केलेली विनियोजने वाढविणे, आणि

(३) ज्या नवीन बाबींवरील वार्षिक आवर्ती खर्च रु, १,००,००० किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा अनावर्ती खर्च रुपये १०,००,००० किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा नवीन बाबींवरील खर्च.

**८. अधिक खर्चाच्या मागण्या .---** अधिक अनुदानाकरिता केलेली मागणी ही पूरक अनुदानाकरिता केलेल्या मागणीपेक्षा भिन्न स्वरुपाची असते. पूरक अनुदानाची मागणी ही मूलतः ज्या अनुदानाच्या गरजेचा पूर्व अंदाज चालू वर्षीच करण्यात येतो, अशा अनुदानाकरिता केलेली असून, ती संबंधित वर्षातच सादर केली जाते, तर अधिक अनुदानाकरिता केलेली मागणी ही, कोणत्याही मागील वर्षातील मंजूर अनुदानापेक्षा झालेला अधिक खर्च नियमांत बसविण्यासाठी सादर केली जाते.

वर्षाच्या सर्व खर्चाची लेखा परीक्षा करण्यात येऊन आणि भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांनी त्या वर्षाचे विनियोजन लेखे संकलित केल्यानंतर आणि विधान मंडळाच्या लोक लेखा समितीने त्यावर विचार केल्यानंतरच अधिक अनुदानाच्या मागण्या विधानसभेपुढे मांडता येतात.

अपेक्षित खर्चाचा अंदाज शक्य तितका बिनचूक व्हावा यासाठी सर्वप्रकारे काळजी घेतली जात असली तरी वित्तीय वर्षाच्या अखेरच्या काही महिन्यांमध्ये काही अनपेक्षित खर्च संबंधित अर्थसंकल्पीय शीर्षामध्ये खर्चखाती घातला जातो. त्यामुळे मंजूर अनुदाने व विनियोजने यापेक्षा अधिक खर्च होतो. अशा प्रकारे निरनिराळया शीर्षाखाली झालेला जादा खर्च वित्तीय वर्ष संपल्यावर महालेखापालाकडून शोधून काढण्यात येतो व तो लेखापरीक्षा अहवालात दाखवण्यात येतो. हा लेखापरीक्षा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येतो. हा अधिक खर्च कोणत्या परिस्थितीत झाला याबाबत लोक लेखा समितीकडून त्याची तपशीलवार छाननी करण्यात येते आणि जर त्या समितीचे समाधान झाले असेल तर ती तो अधिक खर्च नियमानुकूल करण्याची शिफारस करते. त्यानंतर शासनाकडून या अधिक खर्चाचे विवरणपत्र खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या पद्धतीने तयार केले जाते. ते संविधानाच्या अनुच्छेद २०५ (१) (ब) अन्वये विधानमंडळाला सादर केले जाते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४९ व १५० अन्वये शासनाचे लेखे व त्याचे लेखा परिक्षण यासंबंधीचे अधिकार प्राप्त झाले आहेत ते लेख्यांचे व त्यांच्या परीक्षणाचे स्वरूप व व्याप्ती यासंबंधात एकमेव प्राधिकारी आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि महालेखापाल यांची भूमिका - काही अपवादात्मक बाबी वगळता राज्याचे लेखे ठेवण्याचे काम त्यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. संविधानाच्या अनुच्छेद १५० अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक ह्यांनी राष्ट्रपतींची मान्यता घेऊन विहित केलेल्या स्वरुपात राज्याचे लेखे ठेवणे आवश्यक आहे. हे लेखे ठेवण्याचे काम त्यांचा राज्यातील प्रतिनिधी म्हणून महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) यांच्याकडून करण्यात येते.

राज्यातील अधिकारी वित्तीय बाबतीत संविधानानुसार आणि अधिनियम व त्याखालील नियम व आदेश यांनुसार खर्च करीत आहेत किंवा नाहीत हे पाहणे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे काम आहे. त्यांच्या वतीने हे काम राज्याचे महालेखापाल (लेखापरीक्षा) पाहतात. राज्याच्या लेख्यासंबंधीचे अहवालही नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वतीने राज्याचे महालेखापाल (लेखापरीक्षा) (Accountant General) (Audit) तयार करतात. हे अहवाल नियंत्रक व महालेखापरीक्षक राज्यपालांना सादर करतात व राज्यपाल ते राज्याच्या विधानमंडळापुढे मांडण्याची तजवीज करतात.

**९. अर्थसंकल्पावरील चर्चा .---** विधानसभेत अर्थसंकल्पाचा विचार दोन टप्प्यात केला जातो. (एक) सर्वसाधारण चर्चा, आणि (दोन) अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान.

**(एक) अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा .---** अर्थसंकल्प विधानसभेस सादर झाल्यानंतर सात दिवस उलटून गेल्यावर, विधानसभेत अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या तत्वांच्या तसेच राज्याच्या कृषी, आर्थिक व करविषयक धोरणांच्या अनुषंगाने सर्वसाधारण चर्चा केली जाते. अशा चर्चेसाठी जास्तीत जास्त सहा दिवस नेमून देता येतात. या चर्चेच्या वेळी कोणताही प्रस्ताव मांडता येत नाही अथवा अर्थसंकल्पावर कोणत्याही प्रकारे मतदान घेतले जात नाही ( म.वि.स. नियम २४६), चर्चेच्या शेवटच्या दिवशी वित्त मंत्री चर्चेला उत्तर देतात व चर्चा समाप्त होते. (म.वि.स. नियम २५०) अर्थसंकल्पात समाविष्ट असणाऱ्या विविध बाबींवर तपशीलवार चर्चा मागण्यांवरील चर्चेच्या वेळी करता येते.

**(दोन) अर्थसंकल्पातील अनुदानांच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान .---** अर्थसंकल्प विधानसभेला सादर केल्यानंतर लवकरात लवकर दहा दिवसांनंतर, त्यात समाविष्ट करण्यात आलेल्या अनुदानाच्या मागण्यांवर सभागृहात चर्चा व मतदान केले जाते. अशा चर्चेसाठी जास्तीत जास्त अठरा दिवस नेमून देता येतात. [म.वि.स. नियम २५१(१)] ही चर्चा व मतदान विभागवार अनुदानाच्या मागण्यांच्या संबंधात असते.

अनुदानाच्या विभागीय मागण्यांच्या चर्चेसाठी नेमून देण्यात येणाऱ्या दिवसात सर्वच विभागाच्या मागण्यांवर चर्चा होणे अशक्यप्राय असल्यामुळे कोणत्या विभागांच्या मागण्यांवर व कोणत्या प्राथम्यक्रमाने चर्चा व मतदान घ्यावयाचे ते विधानसभेतील विरोधी पक्ष नेत्यांशी विचारविनिमय करून ठरविण्यात येते. अर्थसंकल्पातील मागण्यांवरील चर्चेसाठी विभागांचा प्राथम्यक्रम (Priority of Departments) सर्व सदस्यांना विधानसभा पत्रक भाग दोनद्वारे देण्यात येतो.

साधारणपणे कोणत्याही एका विभागाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान यासाठी दोन दिवसांपेक्षा अधिक वेळ दिला जात नाही व त्या मागण्यांसाठी त्या दिवशी ठरवून दिलेला वेळ संपताच त्या मतास टाकण्यात येतात (म.वि.स. नियम २५२).

अनुदानांच्या मागण्यांवरील चर्चेसाठी नेमून दिलेल्या दिवसांपैकी शेवटच्या दिवशी बैठकीचे कामकाज संपण्याची जी वेळ असेल (उदा. सायंकाळी ६-००) त्या वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर (म्हणजे दुपारी ५.३० वाजता) चर्चा थांबविण्यात येते आणि त्या वेळेपर्यंत अर्थसंकल्पातील ज्या विभागांच्या मागण्यांवर चर्चा किंवा मतदान झालेले नसेल त्या सर्व मागण्यांवर केवळ मतदान घेऊनच त्या मागण्या, एका मागून एक संमत करण्यांत येतात. या कार्यवाहीला "चर्चारोध" (Guillotine) म्हणतात [म.वि.स. नियम २५१ (२)].

चर्चारोध लावण्यात येणाऱ्या दिवशी कामकाजाच्या शेवटच्या अर्धा तासाच्या वेळेत स्थगन प्रस्तावाद्वारे किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दिरंगाईचा किंवा विलंबकारी प्रस्ताव (Dilatory Motion) मांडून कामकाजात अडथळा आणता येणार नाही [म.वि.स. नियम २५१ (२)].

**१०. कपात-सूचना (Cut Motion) .---** शासकीय खर्चाच्या (१) दत्तमत (Voted) आणि (२) भारित (Charged) या प्रकारांपैकी "दत्तमत" या शीर्षाखाली अर्थसंकल्पात ज्या रकमा दाखविल्या जातात त्यावरच सभागृहात मतदान केले जात असल्यामुळे "दत्तमत" रकमांच्या अनुदानांच्या संबंधात कोणतेही अनुदान (१) कमी करण्यासाठी किंवा (२) त्यातील कोणतीही बाब वगळण्यासाठी किंवा (३) एखादी बाब कमी करण्यासाठी सदस्य "कपात सूचना" देऊ शकतात. परंतु अनुदान वाढविण्यासाठी किंवा त्याचा मूळ उद्देश बदलण्यासाठी असे प्रस्ताव (कपात सूचना) देता येणार नाहीत (म.वि.स. नियम २५६).

कपात सूचना, ती ज्या मागणीशी संबंधित आहे ती मागणी सभागृहात चर्चेसाठी व मतदानासाठी ज्या दिवशी येणार असेल त्याच्या चार पूर्ण दिवस आधी द्यावयाची असते. (विधानसभा नियम समितीच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार एका सदस्याला प्रत्येक विभागासाठी कमाल १० सूचना देता येतात.) कपात-सूचना ज्या नमुन्यात द्यावयाच्या असतात त्याच्या छापील प्रती (फॉमर्स) विधानमंडळ सचिवालयाच्या "ड-३" शाखेतून मिळू शकतात.

कपात सूचनांचे पुढीलप्रमाणे तीन प्रकार आहेत :-

**(एक) एक रुपयाची कपात (धोरणविषयक कपात) (Disapproval of Policy Cut) .---** अत्यंत महत्त्वाचे धोरणविषयक प्रश्न त्यात शासनाला आलेले अपयश इ. विषय यात मांडता येतात ही कपात-सूचना अविश्वासचा प्रस्ताव निदर्शक म्हणून समजली जाते आणि म्हणून शासनावर अविश्वास व्यक्त करावयाचा असेल तरच अशी सूचना दिली पाहिजे. ही सूचना सभागृहात मांडण्यात येऊन मंजूर झाल्यास मान्य संसदीय प्रथेप्रमाणे मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

**(दोन) लाक्षणिक कपात (Token Cut) .---** शासनाच्या सर्वसाधारण कारभारावर किंवा संबंधित विभागाच्या सर्वसाधारण धोरणावर चर्चा उपस्थित करावयाची असेल, तर कोणत्याही मागणीला नाममात्र (लाक्षणिक) १०० रुपयांची कपात सूचना दिली पाहिजे. अशी कपात सूचना सभागृहाने मंजूर केल्यास त्याचा अर्थ सभागृहाने शासनाच्या धोरणावर असमाधान व्यक्त केले असा होतो.

**(तीन) विशिष्ट रकमेची कपात (Economy Cut) -** मागणीत किंवा त्यातील एखाद्या बाबीच्या संबंधात विशिष्ट रकमेची कपात जेव्हा सुचवावयाची असते त्यावेळी त्या विशिष्ट रकमेची कपात-सूचना दिली पाहिजे. अशी सूचना देतेवेळी सदरहू कपात कशी करता येईल हे त्या सदस्याने दाखवून दिले पाहिजे. अशी सूचना सभागृहाने मंजूर केल्यास फक्त कमी केलेल्या रकमेच्या अनुदानासाठीच्या मागणीवरच मतदान केले जाते.

जेव्हा एकाच मागणीसंबंधीने निरनिराळ्या (कपात-सूचना) देण्यात येतात तेव्हा अध्यक्ष निदेश देतील त्या अनुक्रमाने त्यावर चर्चा केली जाते [म.वि.स. नियम २५६ (५)].

**११. कपात सूचना देण्यासंबंधीचे काही संकेत ---**

(१) सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी कपात सूचना देऊ नयेत.

(२) "एक रुपयाची कपात सूचना" अविश्वासाचा प्रस्ताव निदर्शक म्हणून समजली जात असल्यामुळे ती देताना सदस्यांनी गांभीर्यपूर्वक विचार करून दिली पाहिजे.

(३) कपात सूचनेत चर्चेचा विषय स्पष्टपणे व थोडक्यात नमूद केला पाहिजे.

(४) निरनिराळया सूचना एकत्रित करण्यात येऊ नयेत. उदाहरणार्थ एकाच प्रस्तावाद्वारे अनेक बाबी कमी करण्यास सुचविण्यात येऊ नये. मागणीतील एखादी बाब वगळण्याचे सुचवून त्याद्वारे एकूण मागणीत त्या बाबी इतकी कपात सुचविणे योग्य ठरणार नाही. थोडक्यात म्हणजे प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र कपात सूचना देणे आवश्यक असते.

(५) मागणीत किंवा तिच्या एखाद्या विशिष्ट बाबीमध्ये कपात सुचवितेवेळी किती रकमेची कपात सुचवावयाची आहे ते स्पष्ट केले पाहिजे. केवळ एक-तृतीयांश किंवा "२५" टक्के किंवा गत वर्षीच्या अंदाजापेक्षा जेवढी वाढ अधिक दर्शविली आहे तेवढी रक्कम कमी करावी असे सुचवू नये.

(६) एका नमुन्यात (Form) एकापेक्षा अधिक कपात सूचना सुचवू नयेत.

**१२. पूरक मागण्या/लाक्षणिक अनुदानाच्या मागण्या/अतिरिक्त मागण्या**

**पूरक मागण्या (Supplementary Demands) .---** (म.वि.स. नियम २६०) राज्याचा अर्थसंकल्प हा भविष्यातील जमाखर्चाच्या अंदाजावर आधारित असून त्यातील तरतुदी प्रत्यक्षात पुरेशा राहतीलच असे म्हणता येत नाही. त्यामुळे एखाद्या वित्तीय वर्षात विधानमंडळाने मंजूर केलेली विनियोजने पुरेशी नसल्याचे आढळून आल्यास किंवा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना ज्या खर्चाची कल्पना करण्यात आली नसेल अशा नवीन बाबींवरील खर्च या वित्तीय वर्षात करणे आवश्यक असेल त्यावेळी शासनाने असा खर्च करण्यासाठी विधानमंडळाची संमती घेणे आवश्यक ठरते व त्यासाठी ज्या मागण्या केल्या जातात त्यांना "पूरक किंवा पुरवणी मागण्या" म्हणतात.

अर्थसंकल्पाप्रमाणेच पूरक मागण्याही राज्यपाल नेमून देतील अशा दिवशी विधानसभेला सादर केल्या जातात. पूरक मागण्या सभागृहाला सादर झाल्यानंतर तीन दिवस उलटून गेल्यावर, त्यावर सभागृहात चर्चा व मतदान केले जाते. अशा चर्चेसाठी एक किंवा अधिक दिवस नेमून देण्यात येतात.

पूरक मागण्यांवरील चर्चा ही ज्या विशिष्ट बाबी मिळून ती मागणी बनलेली असेल. त्या बाबीपुरतीच मर्यादित असते व त्यावेळी मूळ अनुदान किंवा त्या अनुदानामागील धोरण यावर चर्चा करता कामा नये [नियम २५८ (३)].

अर्थसंकल्पीय मागण्यांवरील चर्चेच्या संबंधात कपात सूचना, चर्चेसाठी विभागांचा प्राथम्यक्रम, चर्चारोध इत्यादी ज्या तरतुदी आहेत त्या सर्व पूरक मागण्यांवरील चर्चा व मतदान यासाठीही लागू आहेत.

**लाक्षणिक अनुदानाच्या मागण्या (Token Demands) .---** ज्या मागणीस ज्या कारणासाठी अगोदरच विधानसभेची मंजूरी मिळाली आहे, अशा मागणीतील काही शिल्लक रकमा नवीन कामासाठी किंवा पूर्वी ज्या कामासाठी तरतूद करण्यात आली होती, त्या कामाच्या स्वरुपात बदल करण्यात येऊन त्यावर खर्च करावयाची असेल तर त्यास विधानसभेची मंजूरी घेणे आवश्यक असते. तेव्हा हया कामासाठी जी मागणी करण्यात येते तिला लाक्षणिक अनुदान म्हणतात. याकरिता १० रुपये रकमेची नाममात्र मागणी करण्यात येते. या मागणीला विधानसभेने मंजूरी दिल्यास पुनर्विनियोजन (Re-appropriation) करून रक्कम उपलब्ध करून देता येते. (म.वि.स. नियम २६१)

**अतिरिक्त मागण्या (Excess Demand) .---** कोणत्याही आर्थिक वर्षात विधानसभेने मंजूर केलेल्या मागणीपेक्षा जादा रक्कम खर्च झाली असेल तर त्या खर्चाच्या जादा रकमेस या वर्षाकरिता विधानसभेची मंजूरी घेणे आवश्यक असते. अशा मागणीस अतिरिक्त मागणी म्हणतात. विधानमंडळाच्या लोकलेखा समितीने याबाबत आवश्यक छाननी करून केलेल्या शिफारशीनुसार या मागण्या असल्याने त्यावर सहसा चर्चा होत नाही. अशा मागण्या विधानसभेस सादर करण्याचा दिवस राज्यपाल नेमून देतात. अनुदानाच्या मागण्यांवर ज्याप्रमाणे कार्यवाही केली जाते त्याप्रकारे या मागण्यावरही कार्यवाही केली जाते (म.वि.स. नियम २५९).

**१३. लेखानुदान/विनियोग अधिनियम**

**लेखानुदान (Vote on Accounts) .---** एखाद्या वित्तीय वर्षाच्या काही भागाकरताच विधानमंडळात वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करण्यासंबंधात घालून दिलेली कार्यपद्धती न अनुसरता, राज्याच्या एकत्रित निधीतून काही रक्कम काढून घ्यावी लागते असे काही प्रसंग येतात. अशा प्रकरणांत आगामी वित्तीय वर्षाच्या एखाद्या भागातील अपेक्षित खर्चाकरिता "लेखानुदान" मंजूर करण्याची विधानमंडळात विनंती केली जाते. संविधानाच्या अनुच्छेद २०३ व २०४ यामध्ये विहित केलेली कार्यपद्धती पूर्ण केली जाईपर्यंत वित्तीय वर्षाच्या कोणत्याही भागाच्या अंदाजित खर्चाच्या बाबतीत आगाऊ अनुदान देण्याचे अधिकार राज्याच्या विधानसभेला संविधानाच्या अनुच्छेद २०६ अन्वये देण्यात आले आहेत.

**विनियोजन अधिनियम .---** वित्त मंत्र्यांनी सादर केलेल्या अंदाजात काही फेरबदल करून किंवा कोणतेही फेरबदल न करता, वार्षिक अर्थसंकल्पाला विधानमंडळाकडून अंतिमरित्या मान्यता मिळाल्यानंतर किंवा आगामी वित्तीय वर्षाच्या एखाद्या भागाकरिता असलेल्या अंदाजित खर्चाच्या बाबतीत आगाऊ अनुदाने देण्याबाबतचा लेखानुदान प्रस्ताव विधानमंडळाने मंजूर केल्यानंतर विनियोजन विधेयक किंवा विनियोजन (लेखानुदान) विधेयक विधानमंडळाला सादर करावे लागते. अशा विधेयकांमध्ये विशिष्ट उद्दिष्टे व सेवा आणि आगामी वित्तीय वर्षात किंवा यथास्थिती, वर्षाच्या

काही भागात या उद्दिष्टांवर व सेवांवर एकत्रित निधीतून ज्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यात येण्याची शक्यता असेल ती खर्चाची मर्यादा स्पष्ट करणाऱ्या अनुसूची असतात. विधेयके विधानमंडळाने संमत केल्यानंतर आणि राज्यपालांनी त्यास संमती दिल्यानंतर, ती विधेयके अनुक्रमे विनियोजन अधिनियम किंवा विनियोजन (लेखानुदान) अधिनियम बनतात.

**१४. स्थूल मागण्या .---** विधानमंडळाने संमत केलेल्या कायद्यानुसार केलेल्या विनियोजनाव्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम राज्याच्या एकत्रित निधीमधून काढणे संविधानाच्या अनुच्छेद २६६ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय नाही. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी घालून दिलेल्या एखाद्या विवक्षित प्रधान शीर्षाखालील खर्च कमी करून जमा रकमा किंवा वसूल केलेल्या रकमा लेखांकनाच्या तत्वांनुसार समायोजीत केलेल्या असल्या तरी राज्याच्या एकत्रित निधीमधून एखाद्या वित्तीय वर्षात प्रत्येक प्रधानलेखा शीर्षाखाली करण्यात यावयाच्या निश्चित खर्च किंवा मागणी विधानमंडळाने विनिर्देशपूर्वक प्राधिकृत केलेली असणे आवश्यक आहे. म्हणून विधानमंडळाला सादर करावयाच्या मागण्या, प्रस्तुत अर्थसंकल्पीय शीर्षकाखालील खर्चातून वजा दाखवलेल्या अंदाजित जमा रकमा व वसूलीच्या रकमा विचारात न घेता अंदाजित स्थूल खर्चाच्या स्वरुपात असल्या पाहिजेत.

**१५. खर्चाचे पूरक विवरणपत्र / अधिक खर्चाचे विवरणपत्र**

**खर्चाचे पूरक विवरणपत्र .---** विनियोजन अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या विनियोजनाप्रमाणे सर्व बाबतीत खर्च मर्यादित करणे शक्य होणार नाही. काही बाबींकरिता किंवा सेवाकरिता केलेली विनियोजने अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना कल्पना नसलेल्या कारणामुळे अपुरी असल्याचे आढळून येईल किंवा वार्षिक वित्तीय विवरणपत्र तयार करताना कल्पना नसलेल्या अशा एखाद्या नवीन सेवेवरील खर्चाकरिता तरतूद करण्याची आवश्यकता वित्तीय वर्षात निर्माण होऊ शकेल. तसेच एखाद्या तातडीचा व अकल्पित खर्च भागविण्याकरिता आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची आकस्मिकता निधीमध्ये भरपाई करणेही आवश्यक असते. अशा सर्व, प्रकरणांच्या बाबतीत एकत्रित निधीतून आवश्यक विनियोजने करण्यासाठी विधानमंडळाला खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करावे लागते. खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या संकलनाकरिता आवश्यक असलेली माहिती मंत्रालयाच्या संबंधित प्रशासनिक विभागाकडून वित्त विभागाला योग्य वेळी पुरविली गेली पाहिजे. पूरक विवरणपत्रात समाविष्ट केलेला खर्च प्राधिकृत करण्यासाठी अर्थसंकल्प मंजूर करण्यासाठी घालून दिलेली कार्यपद्धतीच अनुसरण्यात येते. विधानसभेने मागण्यांवर मतदान केल्यानंतर एकत्रित निधीतून रकमा काढण्याचा प्राधिकार देणारा पुरवणी विनियोजन अधिनियम विधानमंडळ संमत करते.

**अधिक खर्चाचे विवरणपत्र .---** कोणत्याही वर्षासंबंधीचे रोखीचे व्यवहार हे ३१ मार्च रोजी बंद करण्यात येतात. मात्र आंतरशासकीय समायोजनांचे व्यवहार याला अपवाद असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला हे व्यवहार २७ एप्रिलपर्यंत करण्याची परवानगी आहे. हया तारखेनंतर रोखीच्या व्यवहाराची नोंद घेतली जात नाही. त्या वर्षाचे लेखे बंद केले जातात. तथापि, लेखापरिक्षाविषयक तपासणी आणखी काही काळ चालू राहते आणि महालेखापाल यांच्याकडून लेखा अंतिमरित्या बंद करण्यात येण्यापूर्वी वर्गीकरणातील चुका काढून टाकण्याकरिता व अंतिम आकडेवारीच्या आधारे

रकमाचे लेखांतरण करण्याकरिता निरनिराळया शीर्षामध्ये अंतर्गत समायोजने केली जातात. नंतर अंतिमरित्या बंद केलेल्या व लेखा परीक्षा केलेल्या लेख्यांचे महालेखापाल, महाराष्ट्र यांच्याकडून संकलन केले जाते व ते भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेमार्फत व शासनाला (एक) वित्त लेखे व (दोन) विनियोजन लेखे या स्वरुपात सादर केले जातात. वित्तीय वर्ष चालू असताना काही बाबीवर व सेवांवर विधानमंडळाने मंजूर केलेल्या विनियोजनापेक्षा जास्त खर्च करण्यात आला असल्याचे विनियोजन लेख्यांवरील अहवालावरून दिसून येते. या जादा खर्चाबाबत विचार करतेवेळी मंत्रालयाच्या विभागांना नियंत्रक अधिकाऱ्यांकडून सविस्तर कारणे मिळवून ती लोकलेखा समितीपुढे ठेवावी लागतात. अधिक खर्चाच्या पुष्टयर्थ दिलेले समर्थन लोकलेखा समितीला समाधानकारक वाटले तर तो अधिक खर्च नियमानुकूल करावा अशी शिफारस ती समिती करते. चुकीच्या वर्गीकरणामुळे विशिष्ट अधिक खर्च किंवा बचत विनियोजन लेख्यांत बरोबर दाखविली गेली नाही असे सिद्ध झाल्यास, समिती या वस्तुस्थितीची नोंद घेते व त्यानुसार शिफारस करते. समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे, वित्त विभाग, विधानमंडळाच्या विचारार्थ ठेवण्यासाठी अधिक मागण्यांचे विवरणपत्र तयार करतो. विधानमंडळात अधिक मागण्यांवर मतदान झाल्यानंतर विधानमंडळापुढे अधिक विनियोजन विधेयक मांडण्यात येते व ते संमत झाल्यानंतर त्याचे अधिक विनियोजन अधिनियमात रुपांतर होते.

**१६. नवीन खर्च .---** पूर्वी ज्या बाबी रीतसर मान्य करण्यात आल्या असतील आणि दरवर्षी विशिष्ट नवीन मंजुरीशिवाय ज्यांचा वार्षिक अर्थसंकल्पात समावेश करणे आवश्यक असेल, अशा बाबींच्या संबंधातील करावयाच्या तरतुदीशिवाय अशा काही बाबी असू शकतील की, त्यासाठी मागील वर्षात तरतूद करण्यात आली नव्हती आणि आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी विनिर्देशपूर्वक तरतूद करून त्यांवर खर्च करणे आवश्यक असेल. अशा बाबींना खर्चाच्या "नवीन बाबी" म्हणतात. अंतर्भूत खर्चाचे स्वरूप व व्याप्ती यास अनुसरुन "नवीन बाबींवर" करावयाच्या खर्चास विधानमंडळाची किंवा शासनाची विशिष्ट मंजुरी घेणे आवश्यक असते.

अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याच्या दृष्टीने एखादी खर्चाची बाब "नवीन" आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी मागील वर्षामध्ये तशा स्वरुपाचा खर्च अर्थसंकल्पात समाविष्ट केला होता का? ही प्रमुख कसोटी आहे, दुसऱ्या शब्दात, नवीन धोरणाचा स्वीकार, होणारा खर्च, नवीन सवलतींची तरतूद किंवा विद्यमान सवलतीच्या स्वरुपात भरीव फेरबदल या बाबी सर्वसाधारणपणे नवीन म्हणून समजण्यात याव्या. तथापि, एखाद्या प्रकरणात मान्यता प्राप्त सेवेवरील खर्चातील वाढ ही तिच्या व्याप्तीमुळे नवीन बाब समजण्याइतकी महत्त्वाची समजली जाऊ शकते. उदाहरणार्थ पुरवठा सेवा, सहायक अनुदान इत्यादी यासाठी असलेल्या तरतुदीत भरीव वाढ.

## ७. विशेषाधिकारांचा उगम व इतिहास

भारताने स्वातंत्र्यानंतर ब्रिटीश संसदीय कार्यपद्धतीवर आधारित संसदीय लोकशाही प्रणालीचा स्वीकार केला. भारताची राज्यघटना ही दिनांक २६ जोनवारी,१९५० रोजी अंमलात आली. त्याप्रमाणे शासनाचे तीन विभाग म्हणजे विधिमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायपालिका अस्तित्वात आले. मात्र राज्यघटनेने अंगिकारलेले सत्ताविभाजनाच्या सिद्धांताप्रमाणे (Doctrine of Separation of Powers) प्रत्येक विभागाने राज्य घटनेने आखून दिलेल्या मर्यादेतच कार्य करणे आवश्यक आहे. कारण राज्यघटना ही सर्वोच्च असून घटनेपासूनच या तीनही शासनाच्या विभागांना अधिकार प्राप्ती झालेली आहे. देशातील सर्वोच्च कायदा म्हणजे राज्यघटना होय. (Three Institutional wings of the Govt. Legislature, Executive and Judiciary derive their powers from the Constitution, which is supreme law of the land). "भारतीय संसद व विधिमंडळे यांची रचना ब्रिटीश संसदेच्या (हाऊस ऑफ कॉमन्स व हॉऊस ऑफ लॉर्डस) दोन्ही सभागृहांशी साधर्म्य साधणारी असून घटनाकारांनी घटना समितीमध्ये सखोल विचार विनिमयाअंतर्गत भारतीय संसद व विधिमंडळांना ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्स या सभागृहाला उपलब्ध असलेले विशेषाधिकार प्राप्त करून दिले.

यासाठी ब्रिटीश संसदेचा उगम याचा थोडक्यात आढावा घेणे उचित ठरेल." ब्रिटीश पार्लमेंटचा उगम इंग्लंडमध्ये तेराव्या शतकात झाला. पार्लमेंट ही संकल्पना फ्रेंच शब्द **"Parlement"** या शब्दावर आधारित असून याचा अर्थ बोलणे असा होतो. ( To Talk ) सन १२३६ मध्ये पार्लमेंट या शब्दाचा वापर इंग्लंडमध्ये प्रथमतः करण्यात आला. पार्लमेंट (संसद) म्हणजे राजाला सल्ला देणारे सरदार, अल्स, बॅरन्स, बिशॉप्स व ॲबोट्स यांची बैठक असा होतो. किंग एडवर्ड १, हा इंग्लंडचा, सन १२७२ ते सन १३०७ या कालावधीत राजा होता व त्याच्या कार्यकाळात पार्लमेंट ही संकल्पना निश्चित स्वरुपात आकारास आली. या संकल्पनेमध्ये राजपरिषद (Kings Council) व न्यायालये यांचा समावेश होता. पार्लमेंटमध्ये राजाद्वारे कायद्यांची निर्मिती होत असे व राजपरिषदेद्वारे ( Kings Council ) अध्यादेश काढले जात असत. या प्रकारे एक संसद विकसित होत गेली. या संसदेमध्ये, संसदेकडे प्रार्थना व विनंती करणारे क्लर्जी, त्याचप्रमाणे संसदेमध्ये वादविवाद करणारे बॅरन्स व संसदेमध्ये कार्य करणारे कॉमन्स यांचा समावेश होता. याप्रमाणे संसद ही हाऊस ऑफ लॉर्डस अर्थातच क्लर्जी, नोबेल्स आणि हाऊस ऑफ कॉमन्सचा समावेश असलेली पार्लमेंट झाली.

तेराव्या शतकापर्यंत कॉमन्सचे प्रवक्ते असत. मात्र ते सभागृहाच्या बैठकांमध्ये अध्यक्ष म्हणून कार्य करीत होते की नाही याची निश्चित माहिती उपलब्ध नाही. मात्र कालौघात हेच प्रवक्ते हे हाऊस ऑफ कॉमन्सचे अध्यक्ष म्हणून कार्य पाहू लागले. या प्रकारे हाऊस ऑफ लॉर्डस व हाऊस ऑफ कॉमन्स यांची निर्मिती चौदाव्या शतकामध्ये झाली व सतराव्या शतकामध्ये सध्या आपणास माहित असलेली संसदीय कार्यपद्धती अस्तित्वात आली.

**इंग्लंडच्या इतिहासाबाबत थोडी माहिती घेणे उपयुक्त ठरेल.**

इंग्लंडमध्ये विविध राजघराण्यांनी राज्य केले, सॅक्सन राजघराण्याने ५ वे शतक ते ९ व्या शतकापर्यंत राज्य केले. त्यानंतर "नॉर्मन" या राजघराण्याची सत्ता सुरू झाली. इंग्लंडला "सॅक्सन" या राजघराण्याची महत्त्वाची देण म्हणजे "मोनार्की" पद्धती. इंग्लंडमधील सात राज्ये इस्ट ॲन्ग्लिया,

हेरिका, नार्थुंरूबर लॅड, केंट, ससेक्स, इलेक्स, वेसेक्स यांचे एकत्रिकरण होऊन ते "सॅक्सन" राजवटीखाली एकवटले आणि पर्यायाने इंग्लंडमध्ये एकछत्री अंमल सुरू झाला.

अँग्लो-सॅक्सन राजवटीत वायटन (Witan) किंवा (Witenagemot) म्हणजे council of wise man या संस्थेने महत्त्वाचे कार्य केले. मात्र यामध्ये फक्त "राजाने" बोलविलेले राजघराण्याचे मुख्य अधिकारी (Chief officers of Royal House holds) बिशप, चर्चमन, अलडरमन व इतर राज्यांच्या उच्च अधिकाऱ्यांचा समावेश होता. "राजाच्या" अध्यक्षतेखाली या संस्थेच्या (witan) राज्यभर बैठकी होत.

"वायटन" या संस्थेचे इंग्लंडच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे. कारण या संस्थेला राजाने बनविलेल्या कायद्यांना मंजूरी देणे, करार करणे, कराराला मंजुरी देणे, सैनिकी बळ उभारणे, बिशप, अलडरमन (alderman of shires) यांची नियुक्ती करणे, त्यांना काढून टाकणे, धार्मिक बाबींचे (ecclesiastical affairs) चे नियमन करणे, राजा समवेत "सुप्रिम कोर्ट ऑफ जस्टीस" म्हणून न्यायदानाचे कार्य करणे, इत्यादी अधिकार होते. जरी ही प्रतिनिधीक संस्था नसली तरी ती जनतेच्या आशा आकांक्षाचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राजाने अन्यायपूर्वक कारभार केल्यास वा राजा राजघराण्याशी संबंधित नसला तर त्याला काढून टाकण्याचे अधिकारसुद्धा होते.

एकंदरीत राजघराण्याचे अनिर्बंध अधिकार (Kingship) ही संकल्पना "अँग्लो-सॅक्सन" कालावधीमध्ये अंमलात आली नव्हती. या काळात राजाने "परिषदेच्या सहाय्याने" कामकाज करावे अशी प्रथा अस्तित्वात होती. स्थानिक प्रशासन (Local Government) ही या कालावधीतच अस्तित्वाला आले कारण बहुतांश जनता ही त्याकाळी खेड्यात रहात होती. अशा प्रशासनाला हंड्रेड (Hundred) व शायर (shire) म्हणत.

ब्रिटीश संसदेला लोकशाहीची जननी म्हटले जाते. ब्रिटीश संसद जगातील सर्वात जुनी मोठी सर्वाधिक अधिकार (most powerful) असलेली संसदीय संस्था आहे. या संसदेला, लोकांकडून प्रत्यक्षात निवडून येण्यासाठी ८ शतके राजसत्तेविरुद्ध संघर्ष करावा लागला.

हा संघर्ष किंग जॉन (१२१५) यांचे काळात सुरू झाला. त्याने "Magna Carta" -१२१५ स्वातंत्र्याचा जाहिरनामा (Charter of liberty) लोकांना दिला. त्यानंतर संसदेला दिर्घकाळ वित्तीय नियंत्रण, कायदे करण्याचे अधिकार व प्रशासनिक अधिकारांसाठी राजसत्तेविरुद्ध व हाऊस ऑफ लॉर्डस विरुद्ध झगडावे लागले. शेवटी १६८८ च्या क्रांतीनंतर ब्रिटीश पार्लमेंटचे सार्वभौमत्व प्रस्थापित झाले व राजघराणे हे अधिकाराच्या दृष्टीने नाममात्र उरले.

पार्लमेंटचे सार्वभौमत्व (Sovereignty) निर्मितीमध्ये तीन महत्त्वाच्या घटनांचा समावेश आहे. (Landmark Things) पहिली घटना म्हणजे १६४८ मध्ये पार्लमेंटने ठराव करून किंग चार्ल्स या राजावर खटला चालविला व त्याला १६४९ मध्ये फाशी देण्यात आली. या संसदेने कायद्याने राजेशाही नष्ट करून इंग्लंडला "कॉमनवेल्थ" घोषित केले व संसदेला सहकार्य करण्याच्या अटीवर चार्ल्स-II याला गादीवर बसविले.

दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे १६८८ ची ब्रिटीश राज्यक्रांती. त्यावेळी जेम्स-II या राजाला घालवून देण्यात आले कारण तो संसदेला सहकार्य करीत नव्हता. या संसदेने विल्यम व मॅरी यांना गादीवर बसण्यासाठी पाचारण केले आणि १७०१ मध्ये सेटलमेंटचा कायदा पारित करून

राजगादीवरील वारसाबाबत अटी घालून दिल्या व कोणत्या अटीच्या अधिन राहून राज्यावर राहायचे यांचे निर्बंध घालण्यात आले.

आणि शेवटची तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे १७८५ मध्ये "पीट" हा ब्रिटनचा पंतप्रधान झाला आणि राजाची मंत्रिमंडळ निवडण्याची व मंत्र्यांना काढून टाकण्याचे अधिकार काढून टाकण्यात आले. या काळात "ब्रिटीश कॅबिनेट" पद्धती मजबूत पायावर उभी राहिली; आणि मंत्रिमंडळ, संसदेद्वारे निवडले जाऊ लागले व बरखास्त केले जाऊ लागले.

संसदेची अधिकारिता सर्वोच्च होऊन कायदा, प्रशासन व वित्तीय नियंत्रण संसदेला प्राप्त झाले. एकप्रकारे संसद ही सार्वभौम संस्था म्हणून उदयास आली.

म्हणून असे म्हटले जाते ब्रिटीश संसद काहीही करु शकते, अपवाद फक्त पुरुषाचे रुपांतर स्त्रीमध्ये व स्त्रीचे रुपांतर पुरुषामध्ये करु शकत नाही.

(British Parliament can make or unmake anything except man into woman and woman into man)

ब्रिटनमध्ये न्यायालय संसदेचा कोणताही कायदा अवैध ठरवू शकत नाही. ब्रिटिश राज्यघटना ही अलिखित स्वरूपाची असून तेथे संसदेचे सार्वभौमत्व मान्य करण्यात आलेले आहे. Rule of Law किंवा कायद्याचे राज्य हे ब्रिटिश राज्यघटनेचे महत्त्वाचे तत्त्व आहे. प्राध्यापक डायसी यांनी या तत्त्वाचा हिरिरीने पुरस्कार केला. Rule of Law म्हणजे, कायद्यापुढे सर्व समान, कायद्याची सर्वोच्चता व ब्रिटिशांचे मूलभूत अधिकार हे न्यायालयाच्या माध्यमातून संरक्षित केले जाणे. या तत्त्वावरच ब्रिटिश संसद कार्यपद्धती आधारली असल्याचे दिसून येते.

प्राध्यापक मुनरो यांच्या मते गेल्या एक हजार वर्षांमध्ये इंग्लंडच्या नागरिकांनी त्यांचे प्रतिनिधी निवडणुकीद्वारे निवडलेले नाहीत अशी घटना घडलेली नाही. इंग्लंडचे नागरिक त्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी टाऊनशिप, शायर, बरोह, पेरीश इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी निवडणुकीने निवडत होते.

नॉर्मन राजवटीच्या काळात राजाची सत्ता मजबूत होत गेली. जमीनदारी पद्धत (Federals) सुद्धा वाढीस लागली किंबहूना त्याला एक मजबूत स्वरूप प्राप्त झाले. राजा हा चर्चचा प्रमुख झाला व त्यांना बिशप यांना नियुक्त करण्याचे अधिकार दिले गेले. अशा प्रकारे राजांनी धार्मिक बाबींमध्ये सर्वोच्च अधिकार प्राप्त करून घेतले. नॉर्मन राजवटीच्या काळात राजाची सर्वोच्चता न्यायालयाच्या, प्रशासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात वाढीला लागली.

राजाने निवडलेला न्यायाधीश हा राज्यभर जाऊन खटले ऐकू लागला व त्यावर निर्णय देऊ लागला. अशा प्रकारे अशा न्यायाधिशांनी दिलेले निर्णय हे कॉमन लॉ म्हणून उदयास आले. शेरिफ यांचे अधिकार वाढीला लागले. पर्यायाने राजाची इच्छा ही शेरिफ या संस्थेच्या माध्यमातून अंमलात येऊ लागली व त्यांच्याकडे कायदा व सुव्यवस्था राखणे, महसूल गोळा करणे इत्यादी कामे दिली गेली. अशा प्रकारे सॅक्सन राजवटीच्या काळानंतर नॉर्मन राजवटीच्या काळात राजघराणे मजबूत झाले.

प्राध्यापक मुनरो यांच्या मते राजघराण्याचे अधिकार नॉर्मन राजवटीच्या काळात व त्या पुढील राजांच्या काळात वाढीला लागून एक प्रकारे त्यातूनच इंग्लिश राजवटीचा उदय झाला. या

राजवटींच्या काळात राजाला मदत करण्यासाठी मॅग्नम कौन्सिलम किंवा ग्रेट कौन्सिल, क्युरिया रेजिस किंवा किंग्ज कोर्ट अशा दोन संस्था उदयास आल्या.

मॅग्नम कौन्सिलममध्ये रॉयल ऑफिसर्स, चर्चचे अधिकारी व राजवटीतील इतर सन्माननीय व्यक्ती यांचा समावेश होता. या कौन्सिलमचा राजाही सर्वसाधारणपणे बायरन या संस्थेशी निगडीत होता. या संस्थेकडे धोरण ठरविणे, प्रशासन चालविणे व न्यायदानाचे सर्वोच्च न्यायालय म्हणून काम करणे अशी कर्तव्ये होती. तथापि, बायरन या संस्थेच्या तुलनेत ही संस्था काहीशी कमजोर होती. कारण नॉर्मन राजवटीमध्ये राजाला सॅक्सन राजवटीपेक्षा भरपूर अधिकार मिळालेले होते.

मॅग्नम कौन्सिलम जेव्हा कार्यरत नसेल तेव्हा क्युरिया रेजिस हे या संस्थेचा कारभार पाहत असे. क्युरिया रेजिसमध्ये चेंबर्लिन, चान्सलर, कॉन्स्टेबल, स्टुअर्ड व राजकारणातील इतर अधिकाऱ्यांचा समावेश होता. राजा प्रशासनासंबंधी बाबी या संस्थेला सोपवित असत आणि ही संस्था राजाला सल्ले देत असे. अशा प्रकारे मॅग्नम कौन्सिलम या संस्थेमधूनच इंग्लंडच्या आधुनिक संसदेचा उगम झाला व क्युरिया रेजिसचे रुपांतर पुढे प्रिव्ही कौन्सिलमध्ये आणि कॅबिनेट, एक्सचेकर व उच्च न्यायालयात झाले. या सर्वांचे श्रेय विल्यम्स राजाच्या धोरणाला जाते.

प्राध्यापक ॲडम यांच्या मते इंग्लिश घटनेच्या इतिहासाला नॉर्मन या राजवटीपासून सुरुवात होते. स्टीफन या राजाने विल्यम राजवटीच्या काळातील बऱ्याचशा राजकीय संस्था मोडीत काढल्या होत्या. तथापि, हेन्री-II याच्या राजवटीमध्ये त्या परत स्थापित करण्यात आल्या. हेन्री-II या राजाने प्लांटागिनेट (Plantagenet) या राजघराण्याची स्थापना केली. हेन्री या राजाने क्युरिया रेजिस या संस्थेच्या प्रशासकीय व न्यायालयीन कार्यकक्षा ठरवून दिल्या. वस्तुतः ही दोन्ही कार्ये वेगवेगळया अधिकाऱ्यांमार्फत केली जाऊ लागली. त्यापैकी एक भाग रॉयल कौन्सिल तर दुसरा भाग न्यायालये म्हणून कार्यरत झाला.

हेन्री हा राजा मॅग्नम कौन्सिलम या संस्थेचे अधिवेशन वेळोवेळी बोलावू लागला आणि देशा पुढील सर्व समस्या येथे चर्चिल्या जाऊ लागल्या. कालौघात या संस्थेचे कार्य वाढून त्यांची सदस्यसंख्या सुद्धा वाढली. मात्र खऱ्या अर्थाने किंग जॉन या राजाच्या काळात ही संस्था वाढीला लागली. मात्र त्याच्या अनिर्बंध व हुकूमशाही प्रवृत्तीमुळे (high hand ness and despotic reign) लोकांनी त्याच्याविरुद्ध उठाव केला व त्याला राजीनामा देण्यास भाग पाडले. लोकांच्या उठावामुळे त्याने दिनांक १५ जून, १२१५ रोजी इंग्लिश जनतेला जगप्रसिद्ध मॅग्ना कार्टा म्हणजे स्वातंत्र्याचा जाहीरनामा सादर केला.

मॅग्ना कार्टामुळे इंग्लिश राजा हा नाममात्र राजा झाला व त्याच्या सर्व कृती या जनरल कौन्सिलच्या अधीन मानल्या जाऊ लागल्या. अशा प्रकारे मर्यादित राजेशाही ही मॅग्ना कार्टाची महत्त्वाची देणगी ब्रिटिश जनतेला होती. या चार्टरद्वारे राजाची सत्ता ही अनिर्बंध व अन्यायकारक नसल्याचे तत्त्व तसेच ग्रेट कौन्सिलच्या मान्यतेशिवाय त्याला काही कर लादता येणार नाही असे जाहीर करण्यात आले.

हेन्री-III याने १२५४ साली पार्लमेंटचे अधिवेशन बोलावले. सायमंड डीमॉटंफोर्ट हा बॅरनचा नेता राजाशी हातमिळवणी करून हुकूमशाहा बनला. त्यांनी १२६५ साली संसदेचे अधिवेशन भरविले. सदर अधिवेशनाला मोठया संख्येने बिशप्स, बॅरन्स, शायरचे नाईटस् व २१ बॅरनचे प्रत्येकी २ प्रतिनिधी उपस्थित होते. अशा प्रकारे स्थानिक प्रशासन, बॅरन, क्लर्जी, जेंटली यांचे सहकार्य

प्रस्थापित करणारा तो पहिला नेता ठरला व त्या योगे हॉऊस ऑफ कॉमन्स या सभागृहाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

अशा प्रकारे छोट्या गावातील प्रतिनिधी बोलावण्याची प्रथा हेन्री-III यांनी मोडीत काढली व त्यांनी मॉटफोर्ड याला सत्तेवरून दूर केले. जरी, त्यानंतर संसदेचे अधिवेशन ३० वर्षांनंतर बोलावले गेले तरी त्यामध्ये बरोह यांना प्रतिनिधीत्व दिले गेले नव्हते. असे जरी असले तरी या पद्धतीनेच सन १२९५ मध्ये एडवर्ड-I या राजाने ते पुनर्प्रस्थापित केले. त्याने अधिवेशनासाठी समाजातील सर्व घटक म्हणजे बॅरन्स, क्लर्जी, नाईटस्, बुर्गीज यांना पाचारण केले आणि त्यांचे प्रस्तावित करांसाठी मतदान घेतले. ही परिषद ५७२ प्रतिनिधींनी बनलेली होती. त्यापैकी १७२ प्रतिनिधी शायर व बरोहचे प्रतिनिधीत्व करीत होते. ४०० प्रतिनिधी बिशप्स, क्लर्जीमेन, बॅरन्स व इतर सन्माननीय व्यक्तींचे प्रतिनिधीत्व करीत होते. अशा प्रकारे बऱ्याचशा घटकांना या परिषदेमध्ये प्रतिनिधीत्व दिले गेल्यामुळे या परिषदेला ब्रिटनची आदर्श पार्लमेंट म्हणून संबोधले जाते. या व्यवस्थेचे थोडक्यात स्वरूप असे होते की, ही संसद एकच सभागृह म्हणून बोलावली गेल्यामुळे करावर मतदान ३ भागांत झाले. राजाने सर्वसाधारणपणे क्लर्जी, बॅरन्स आणि नाईटस् आणि टाऊनशिप अशा ३ गटांना बोलावले होते. कालांतराने त्रिस्तरीय संसद, हाऊस ऑफ लॉर्डस् वरिष्ठ सभागृह म्हणून हाऊस ऑफ कॉमन्स कनिष्ठ सभागृह म्हणून या ब्रिटिश व्यवस्थेच्या माध्यमातून उदयास आली.

संसदेचे अधिकार प्लांटागिनेट (Plantagenet) राजवटीत उत्तरोत्तर वाढीला लागले. त्यामुळे किंग एडवर्ड-I या राजाला खालील बाबी मान्य करणे भाग पडले :---

(१) संसदेच्या मान्यतेशिवाय राजा जनतेवर कोणतेही कर बसवू शकणार नाही.

(२) लेखा परीक्षण करण्यासाठी संसद एक कमिशनर नियुक्त करेल.

(३) मंत्रिमंडळाची नियुक्ती संसद करेल.

(४) मंत्रिमंडळ हे संसदेला उत्तरदायी असेल व संसदेचे अधिवेशन बोलावण्यापूर्वी मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागेल.

अशा प्रकारे संसदेला राजाला पदच्युत करण्याचे अधिकार प्राप्त झाले व या अधिकारांचा वापर करून संसदेने एडवर्ड-II या राजाला सन १३२७ मध्ये राजगादी सोडण्यास बाध्य केले.

ट्युडर राजवटीच्या काळात ( सन १४८५ ते १६०३ ) राजकीय संस्थांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. टयुडर राजवटीच्या कालावधीत राजघराण्याची एका मजबूत पायावर स्थापना झाली. कॉमन लॉ चांगल्याप्रकारे प्रस्थापित झाला, हाय कोर्ट ऑफ जस्टिस परिणामकारकरित्या न्यायदानाचे कामकाज करू लागले. स्थानिक शासन पद्धती मजबूत पायावर उभी राहिली व महत्त्वाचे म्हणजे संसदेची दोन्ही सभागृहे एका विशिष्ट कालावधीनंतर भरु लागली. हाऊस ऑफ कॉमन्सला मोठ्या प्रमाणात वैधानिक अधिकार प्राप्त झाले. मात्र ट्युडर राजाच्या (Monarch) हातात अधिकाधिक अधिकार एकवटले गेले. ते राजे कॉमन्सला धमक्या देत असत. त्यांची त्यांना भीती वाटत नसे. संसदेची एखादी बाब सदस्यांनी ऐकली नाही तर संसद त्यांना धमक्या देण्यासही मागेपुढे पाहत नसे. हेन्री-VIII या राजाने त्याचे न ऐकल्यास काही प्रसंगी सदस्यांना फाशी देण्याची धमकीही दिली होती.

या राजवटीत राणी एलिझाबेथने हाऊस ऑफ कॉमन्सच्या दोन सदस्यांना तिला मान्य नसलेला वैधानिक प्रस्ताव संसदेत मांडल्याबद्दल तुरुंगात पाठविले होते. अशा प्रकारे पार्लमेंट जरी अस्तित्वात असली तरी, राजाची हुकूमशाही व अन्यायकारक (despotic) राजवटीला ती प्रतिबंध करू शकत नव्हती. असे जरी असले तरी हाऊस ऑफ कॉमन्स या सभागृहाने डोळ्यात भरण्यासारखी प्रगती केली.

ट्युडर राजवटीच्या शेवटच्या काळात हाऊस ऑफ कॉमन्सच्या वारंवार व अधिक कालावधीच्या बैठका बोलावल्या जाऊ लागल्या. इंग्लिश इतिहासकार श्री. ओक यांच्या मते या कार्यपद्धतीमुळे हाऊस ऑफ कॉमन्सच्या सदस्यांना कॉमन लॉचा अभ्यास करून तो विकसित करून एकत्रित काम करण्याची सवय लागली. राणीनेसुद्धा पार्लमेंटशी सल्लामसलत करून बऱ्याच प्रसंगी पार्लमेंटचा सल्ला स्वीकारला.

सन १६०३ पासून इंग्लंडमध्ये स्टयुअर्ड राजाच्या राजवटीला सुरुवात झाली. स्कॉटलँड या संस्थानाचा जेम्स-VI हा इंग्लंडचा राजा बनला व जेम्स-I म्हणून त्याचा राज्याभिषेक झाला. राजा हा ईश्वरी अंश असतो असा त्याचा विश्वास होता. त्यामुळे त्याचा संसदेशी संघर्ष होऊ लागला. या संघर्षाची परिणती चार्ल्स-I याच्या राजवटीमध्ये सिव्हील वॉर होण्यात झाली व त्याला सन १६२८ मध्ये पिटीशन ऑफ राईट्सवर सही करावी लागली. संसदेने त्याच्यावर खटले चालवून, दोषी ठरवून शेवटी फाशी दिली.

चार्ल्स-I च्या वधानंतर इंग्लंडच्या प्रशासनामध्ये झपाट्याने बदल झाला. राजाची राजवट आणि हाऊस ऑफ लॉर्डस् बरखास्त करण्यात आले. सन १६४९ मध्ये इंग्लंडला कॉमनवेल्थ किंवा संसदेचे प्रजासत्ताक म्हणून जाहीर करण्यात आले. लिखित राज्यघटना नसली तरी Instrument of Government स्वीकारला गेला होता. त्या अंतर्गत क्रॉमवेल याचे लॉ प्रोटेक्टर म्हणून नामाभिधान करण्यात आले. तथापि, क्रॉमवेल याचे असे मत होते की, राजघराण्याशिवाय (Morarch) ब्रिटिश जनता राहू शकणार नाही. त्यामुळे राजेशाही पुन्हा प्रस्थापित करावी. त्यामुळे क्रॉमवेलच्या निधनानंतर राजेशाही पुन्हा प्रस्थापित झाली व चार्ल्स-III हा तिसरा स्टयुअर्ड राजा बनला.

चार्ल्स-II या राजाने पार्लमेंटचे सार्वभौमत्व काही प्रमाणात मान्य केले आणि त्याने राजांचे अधिकार व पार्लमेंटचे सार्वभौमत्व यामध्ये योग्य ती तडजोड केली. मात्र पुढे त्याचा उत्तराधिकारी जेम्स-II याने एककल्ली कारभार चालविला व लोकांवर अन्याय करण्यास सुरुवात केली. परिणामी पार्लमेंटच्या नेत्यांनी प्रिन्स ऑफ ऑरेंज विल्यम्स याला राजा म्हणून नेमले व त्याच्याकडे घटनात्मक स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी सोपविली. या सर्व गोष्टींची परिणती सन १६८८ च्या दैदिप्यमान क्रांती (Glorious Revolution) मध्ये झाली. जेम्स राजा फ्रान्समध्ये पळून गेला व अशा प्रकारे स्टयुअर्ड राजघराण्याची सत्ता संपुष्टात आली. मात्र स्टयुअर्ड या राजघराण्याचे घटनात्मक प्रगतीमधील योगदान वाखाणण्याजोगे होते. त्याने राजेशाही व पार्लमेंटचे सार्वभौमत्व यात योग्य ताळमेळ घातला आणि त्याच्या कारकिर्दीतच पार्लमेंटचे सार्वभौमत्व वाढीस लागले. तसेच प्रिव्ही कौन्सिलचे अधिकार व त्यांची सदस्य संख्या देखील वाढवण्यात आली. ती संस्था केवळ सल्लागार संस्था म्हणून न राहता या संस्थेकडे व्यापार नियमन, प्रशासनाचा आढावा, वित्तीय नियंत्रणाचे अधिकार इत्यादी महत्त्वपूर्ण कामे सोपविण्यात आली. मात्र या प्रिव्ही कौन्सिलच्या सदस्यांची संख्या बऱ्याच मोठ्या प्रमाणात असल्याने चार्ल्स-II या राजाने केबल (cabal) किंवा प्रिव्ही कौन्सिलच्या

अंतर्गत गट निर्माण केला. त्याचे प्रमुख काम राजाला महत्त्वपूर्ण बाबींमध्ये सल्ला देणे हे होते आणि यातूनच पुढे इंग्लंडमध्ये कॅबिनेट पद्धतीचा उगम झाला. त्या नंतरच्या हॅनोवर राजघराण्याच्या राजवटीच्या कालावधीत राजा आणि पार्लमेंट यांच्यामध्ये फार संघर्ष झाले नाहीत आणि संसदेने सन १६८९ मध्ये बिल ऑफ राईट हा कायदा केला. हा कायदा ब्रिटिश कार्यपद्धतीचे मूलभूत तत्त्व दर्शविणारा असून श्री. ॲडम यांच्या मते ब्रिटिनच्या इतिहासात त्याला लिखित घटनेचा दर्जा आहे. त्याद्वारे पार्लमेंटचे सार्वभौमत्व आणि पार्लमेंटच्या मंजुरीशिवाय राजाचे कर लावण्याचे अधिकार काढून टाकणे, पार्लमेंटचे नियमित अधिवेशन बोलावणे, वैयक्तिक स्वातंत्र्याचे उल्लंघन करु नये अशा अत्यंत महत्त्वपूर्ण बाबी जाहीर करण्यात आल्या.

सन १६८९ च्या बिल ऑफ राईटमुळे खालील महत्त्वाचे बदल घडून आले :---

(१) राजघराण्यांचे अधिकार कमी झाले.

(२) कॅबिनेट पद्धतीचा विकास झाला.

(३) हाऊस ऑफ कॉमन्समध्ये लोकशाही मार्गाने येणाऱ्या सदस्यांची संख्या वाढली.

(४) हाऊस ऑफ कॉमन्सला हाऊस ऑफ लॉर्डस्पेक्षा वरचढ करण्यात आले आणि पक्ष पद्धतीचा उगम झाला.

जॉर्ज-I व जॉर्ज-II यांच्या काळात राजा त्यांच्या अधिकाराबाबत उदासीन राहिले. त्यांना इंग्लिश प्रथा-परंपरा माहीत नव्हत्या आणि सरतेशेवटी व्हिक्टोरिया राणीच्या काळात राजांनी नामधारी अधिकार वापरावेत अशी प्रथा विकसित झाली.

जॉर्ज-I या राजाने व्हॅलपोल यांनी कॅबिनेटचे अध्यक्ष पद भुषवावे असे घोषित केले व त्यांनी कॅबिनेटच्या माध्यमातून राजाला माहिती द्यावी असेही ठरविण्यात आले. या प्रक्रियेमधून ब्रिटनमध्ये पंतप्रधान या संस्थेचा उगम झाला.

अठराव्या शतकाच्या अखेरीस ब्रिटनमध्ये कॅबिनेट शासन पद्धती स्थापन झाल्यानंतर सन १८३२ मध्ये रिफॉर्म कायदा, सन १९१८ मध्ये प्रतिनिधित्वाचा कायदा व सन १९२८ च्या कायद्याप्रमाणे हाऊस ऑफ कॉमन्सला प्रातिनिधीक स्वरूप प्राप्त होऊन हाऊस ऑफ लॉर्डस् पेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले.

सन १९११ च्या कायद्याप्रमाणे हाऊस ऑफ लॉर्डस्चे अर्धे अधिकार कमी करण्यात आले. अशा प्रकारे कॉमन्स ही सर्वोच्च वैधानिक संस्था म्हणून उदयास आली. या घटनात्मक विकासाच्या पद्धतीमुळे ब्रिटनमध्ये पक्ष पद्धतीचा उगम झाला. स्ट्युअर्ड राजवटीच्या काळात व्हिग्स व टोरी हे राजकीय पक्ष उदयास आले व ब्रिटनमध्ये द्विपक्ष पद्धती स्थापन झाली.

हॅनोवर राजाच्या काळात व्हॅलपोल हा इंग्लंडचा प्रथम पंतप्रधान बनला. सन १७१४ मध्ये आलेल्या जॉर्ज-I या राजाला इंग्रजी भाषा, प्रथा-परंपरा यांचे ज्ञान नव्हते व त्याचे वयही जास्त असल्याने तो कॅबिनेटच्या बैठकांना अनुपस्थित राहू लागला. त्यामुळे कॅबिनेटने त्यांचे नेतृत्व करण्यासाठी पंतप्रधानांची नियुक्ती करण्यास सुरुवात केली. पंतप्रधानांकडे शिस्त लावणे, धोरण ठरविणे इत्यादी जबाबदारी सोपविण्यात आली. अशा प्रकारे रॉबर्ट व्हॅलपोल हा इंग्लंडचा पहिला महान पंतप्रधान होऊन गेला. तो अत्यंत व्यवहारी होता. त्याने जबाबदार कॅबिनेट पद्धतीचा विकास केला. कॅबिनेट ही हाऊस ऑफ कॉमन्सला जबाबदार असल्याने त्याने कॅबिनेट मिटिंगचे अध्यक्ष पद

भुषविणे, स्वतः प्रती इतर मंत्र्यांची जबाबदारी असावी या दृष्टिने प्रयत्न करणे आणि शेवटी कॅबिनेटची जबाबदारी हाऊस ऑफ कॉमन्सच्या माध्यमातून व्यक्त झालेल्या लोक भावनांशी असावी याकरिता प्रयत्न केले. अशा प्रकारे जॉर्ज-I या राजाच्या काळात कॅबिनेट पद्धतीचा उगम व राजा नामधारी होणे तसेच पंतप्रधानांकडे ब्रिटनचे नेतृत्व जाणे ही तत्त्वे उदयास आली.

पुढे पिट या अत्यंत धडाडीच्या व्यक्तिला पंतप्रधान म्हणून नेमण्यात आले. त्याच्या काळात कॅबिनेट पद्धती मजबूत झाली. त्याने राजघराण्याच्या अधिकाऱ्यांना कॅबिनेटमधून हाकलून दिले. जॉर्ज-III या राजाला त्याला मान्यता द्यावीच लागली.

अमेरिकन स्वातंत्र्याचा लढा आणि फ्रेंच राज्यक्रांती यामुळे राजघराण्यांचे सत्तेचे वलय संपुष्टात येऊन कॅबिनेट पद्धती बळकट झाली.

अठराव्या शतकाच्या अखेरीस कोणत्याही राजाने कॅबिनेटला आव्हान देण्याचा प्रयत्न केला नाही. एकोणिसाव्या शतकात कॅबिनेट पद्धती उत्तम प्रकारे काम करु लागली. या काळात ब्रिटनमध्ये रॉबर्ट पिल, पामरस्टोन व ग्लॅडस्टोन असे तीन महान पंतप्रधान होऊन गेले. त्यांची दूरदृष्टी वाखाणण्यासारखी होती.

त्यापैकी रॉबर्ट पिल यांना त्यांच्या नेतृत्व गुणामुळे इंग्लंडचे पहिले आधुनिक पंतप्रधान म्हणून ओळखले जाते. (सन १८४१-१८४६) त्यांच्या कारकिर्दीमध्ये पंतप्रधानांचा राजीनामा म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा हे अत्यंत महत्त्वपूर्ण तत्त्व उदयास आले. शिवाय हाऊस ऑफ कॉमन्सला विसर्जित करण्याचा पंतप्रधानांचा अधिकार जे की आजच्या कॅबिनेट पद्धतीचे महत्त्वपूर्ण तत्त्व आहे ते सन १८४६ मध्ये उदयास आले.

तसेच ग्लॅडस्टोन यांच्या कारकिर्दीमध्ये कॅबिनेट व पंतप्रधानांचे स्थान अधिक बळकट झाले आणि परिणामस्वरूप राजा हा नामधारी राज्यकर्ता म्हणून, घटनात्मक प्रमुख म्हणून गणला जाऊ लागला. तसेच, त्यांच्या काळात कॅबिनेटचा मेंबर हा पार्लमेंटचा सदस्य असलाच पाहिजे असा नियम प्रस्थापित झाला आणि कॅबिनेटला पार्लमेंटचा पाठिंबा असला पाहिजे हेही तत्त्व प्रस्थापित झाले.

ग्लॅडस्टोनच्या काळात पार्लमेंटमध्ये बहुमत म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बहुमत हे महत्त्वपूर्ण तत्त्व उदयास आले. तसेच, मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी संसदेला राहील व पंतप्रधानांचा राजीनामा हा संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा असतो हे कॅबिनेट सिस्टम मधील मूलभूत तत्त्व विकसित झाले. कॅबिनेट या संस्थेने एक टिम म्हणून एकोप्याने काम करावे असे ठरले व पंतप्रधान हा नेता असेल हेही मान्य करण्यात आले. अशा प्रकारे कॅबिनेट ही एकसंघ संस्था म्हणून उदयास आली.

पुढे सन १९२३ मध्ये पंतप्रधान हे कनिष्ठ सभागृह म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्सचेच सदस्य असावेत अशी प्रथा विकसित झाली. लॉर्ड कर्झन हा हाऊस ऑफ लॉर्डस्‌चा मेंबर असल्याने त्यांना ब्रिटनचे पंतप्रधान पद नाकारण्यात आले.

सन १९३७ च्या क्राऊन कायद्याप्रमाणे पंतप्रधानांच्या पदाला कायदेशीर मान्यता मिळाली. ब्रिटिश पंतप्रधान हा खराखुरा कार्यकारी अधिकारी असतो हे तत्त्व पुढे आले व सर्व प्रशासनिक अधिकार त्याच्याकडे एकवटले गेले. अशा प्रकारे ब्रिटनमध्ये कॅबिनेट पद्धतीचा उगम झाला.

"ऑलिवर क्रॉमवेल" यांच्या नेतृत्वाखाली संसदीय कार्यपद्धतीसाठी राजाविरुद्ध सातत्याने चाललेल्या ब्रिटीश जनतेच्या लढ्याची परिणीती संसदीय लोकशाही प्रस्थापित होण्यामध्ये झाली. यामध्ये प्रचंड मोर्चे, लोकांचा प्रतिरोध, राजाविरुद्ध संघर्ष, राजाचा वध अशा विविध बाबींचा समावेश होता व अंतिमतः सन १६६० दरम्यान हाऊस ऑफ कॉमन्स हे लोकप्रतिनिधींचे सभागृह पुनर्स्थापित झाले. त्यावेळी मेंबर ऑफ पार्लमेंट ही सज्ञा दोन्ही सभागृहांच्या सदस्यांकरिता वापरली जात होती. मात्र त्यानंतर ती केवळ हाऊस ऑफ कॉमन्सच्या सदस्यांकरिता वापरली जाऊ लागली. या सभागृहांपैकी हाऊस ऑफ लॉर्डसचे सन १४६१ पासूनचे अभिलेख ज्ञात असून हाऊस ऑफ कॉमन्सचे प्रथमतः अभिलिखित कार्यवृत्तांत सन १५४७ पासूनचे आहेत.

**इंग्लंडच्या स्पीकरकडून विशेष हक्कांची मागणी**

इंग्लंडमधील काही विशेष हक्क संपूर्णपणे संसदेचे कायदे, प्रथा व परंपरा यांवर अवलंबून आहेत तर इतर काहींची परिनियमांद्वारा व्याख्या करण्यात आली आहे. पार्लमेंटच्या सुरुवातीस अध्यक्ष औपचारिकरित्या विशेष हक्कांची मागणी करतात. ती मागणी पुढील शब्दांत करण्यात येत असते. "कॉमन्सच्या नावाने व त्यांच्या वतीने पूर्वापार चालत आलेल्या संशयातीत हक्कांची व विशेषाधिकारांची, विशेष करून अटक आणि सर्व प्रकारचा उपद्रव होणार नाही, चर्चेच्या वेळी भाषण स्वातंत्र्य राहील, जरुर पडेल तेव्हा राणी सरकारांना भेटता येईल आणि कॉमन्समधील सर्व कार्यवाहींचा राणी सरकारकडून सहानुभूतीपर अर्थ लावण्यात येईल, अशी मी नम्र प्रार्थना करतो." सभापतीच्या या विनंतीस लॉर्ड चॅन्सेलर उत्तर देतात व राजा अगर राणीतर्फे मान्यता कळवितात. सभापतीकडून अशा तऱ्हेने चार विशेषाधिकाराची मागणी करण्यात येते ते विशेषाधिकार म्हणजे,

(१) कोणत्याही सदस्यांस अटक किंवा स्थानबद्ध करण्यात येऊ नये किंवा अन्य तऱ्हेने उपद्रव देण्यात येऊ नये.

(२) विधानमंडळाच्या सदनात प्रत्येक सदस्यास आपली मते निर्भीडपणे मांडण्याची मुभा असावी.

(३) विधानमंडळातील कार्यवाहीचा जास्तीत जास्त अनुकूल अर्थ लावण्यात यावा.

(४) कॉमन्सचा मनोदय राजास कळविण्यास परवानगी असली पाहिजे व त्यासाठी राजाकडे जाण्याची परवानगी असावी.

संसदीय विशेषाधिकारांचा विकास व इतिहास हेच दर्शवितो की, संसदीय विशेषाधिकार हे इंग्लंड मधील राजसत्तेविरुद्ध तेथील सभागृहातील सदस्यांच्या (Commons) अधिकारासाठी असलेला सातत्यपूर्ण लढा व त्यातून ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्सचे निर्माण झालेले अधिकार व उन्मुक्ती व त्यासाठी चाललेल्या अविरत व सातत्यपूर्ण संघर्षाचे फलित आहे. विशेषाधिकार हा अनिर्बंध राजसत्तेच्या अधिकारांपासून लोकशाही व्यवस्थेला संरक्षण मिळविण्याचा संसदीय सभागृहातील सदस्यांचा अधिकार आहे. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर इंग्लंडमध्ये विशेषाधिकाराना मान्यता मिळाली.

सभागृहाचे विशेषाधिकार हे सभागृहाचे सदस्य, सभागृहे ह्यांनी एकत्रितपणे व वैयक्तिकरित्या धारण केलेले विशिष्ट असे अधिकार आहेत. विशेषाधिकारांशिवाय सन्माननीय सदस्य

त्यांचे सभागृहांप्रती असलेले संसदीय कर्तव्य पार पाडूच शकत नाहीत. विशेषाधिकार हे जरी प्रस्थापित कायद्याचा भाग असले तरी एका विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रस्थापित सर्वसाधारण कायद्यांपासून त्यांना वगळलेले आहे. विशेषाधिकार हे सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे मुलभूत अधिकार असून त्यांना राजसत्तेच्या अनिर्बंध अधिकारांपासून संरक्षण देणारे, न्यायालयाच्या अधिकारीतेतून सभागृहात काम करण्यासाठी संरक्षण देणारे व त्यांची सभागृहाप्रती असलेली कर्तव्य पार पाडण्यासाठी अत्यावश्यक असलेले महत्वपूर्ण अधिकार आहेत.

सभागृहाचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी विशेषाधिकार निर्माण झाले असून सभागृहाला त्याची कार्ये पार पाडणे केवळ सदस्यांच्या माध्यमातून शक्य होते व सदस्यांचे अविरत सहकार्य सभागृहाला प्राप्त व्हावे व ते सहकार्य देताना सदस्यांना संरक्षण मिळावे तसेच सभागृहाचे हक्क सुद्धा अबाधित व संरक्षित रहावेत हेच विशेषाधिकारांच्या प्राप्तीचे मूळ कारण आहे.

सभागृहाचा हा विशेषाधिकार आहे की त्याला त्याची कर्तव्ये कोणत्याही अडथळ्याशिवाय मुक्तपणे पार पाडता यावीत व सभागृहासमोरील विषय संसदीय कार्यपद्धतीने सार्वभौमपणे हाताळता यावा व याप्रमाणे संविधानिक तत्वांची सातत्यपूर्ण जपणूक करून संविधानाचे संवर्धन करता यावे. सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा मुळ विशेषाधिकार हा आहे की, त्यांना त्यांचे विचार मुक्तपणे मांडता आले पाहिजे. ज्याला अभिव्यक्ती स्वातंत्र म्हणून नमूद केले आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांना अटकेपासून संरक्षण मिळावे जेणेकरून ते सभागृहाप्रती असलेले त्यांचे कर्तव्ये मुक्तपण पार पाडू शकतील व या दोन्ही बाबी त्यांच्या सभागृहांच्या कर्तव्यांशी निगडित आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थात भाषण स्वातंत्र्याचा अधिकार हा सन १५४१ पासून राबविण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे संसदीय सभागृहांना हायकोर्ट ऑफ पार्लमेंट असे सुद्धा संबोधले गेले आहे. जेणेकरून या सभागृहाला त्याच्या अवमानाबद्दल शिक्षा करण्याचा त्याचप्रमाणे न्यायीक कार्यवाही करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. सभागृह हे त्याच्या विशेषाधिकारांचे संरक्षणकर्ते असून त्याच्या विशेषाधिकाराचे उल्लंघनाबाबतचे एकमेव निर्णयकार आहे. त्याचप्रमाणे सभागृहाच्या आदेशाचे, नियमांचे व कार्यपद्धतीचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत शिक्षा करण्याचा अधिकारसुद्धा सभागृहास प्राप्त झालेला आहे.

भारतीय संसद व विधानमंडळांचा विचार करता सभागृह ही संविधानामधून निर्माण झाली असून सभागृहाच्या शक्तींचा स्त्रोत संविधानामधून सभागृहाला प्राप्त झालेला आहे. त्यामुळे भारतामध्ये संसद अथवा विधीमंडळे ही सार्वभौम किंवा सर्वोच्च असल्याचा दावा करु शकत नाही. कारण लिखित संविधान हेच सार्वभौम व सर्वोच्च आहे व संविधानाच्या मर्यादेमध्ये राहूनच विधानमंडळांना किंबहूना शासनाच्या तीनही अंगाना (विधीमंडळे, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ) कार्य करावे लागते. याच संविधानामधून सभागृहांना विशेषाधिकाराची प्राप्ती संविधानाच्या अनुच्छेद १०५ व १९४ मधील तरतुदींच्या अधिनतेने झालेली आहे. त्याचप्रमाणे सभागृहाच्या आवारात कोणत्याही सदस्याला अटक करण्यास तसेच न्यायालयाची कोणतीही वैध आदेशिका (समन्स) बजावण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सभागृहाला बैठकीच्या वेळी कोणत्याही व्यक्तीस सभागृहात दाखल करून घेण्यास, सभागृहातून निघून जाण्याचे सांगण्यास व सभागृहातून बाहेर काढण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. तसेच सभागृहाचे कार्यवृत्तावर सभागृहाचे नियंत्रण असून सभागृहाच्या अनुमतीशिवाय त्याची प्रसिद्धी करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. शिवाय संसदेला व

विधीमंडळाला हक्कभंग व अवमान झाल्यास कोणत्याही व्यक्तीला अटक करून तुरुंगात पाठविण्याचा हक्क आहे.

मात्र दावा केलेला विशेषाधिकार संविधानानुसार विधानमंडळाला प्राप्त झालेला आहे किंवा नाही याची तपासणी न्यायालये करु शकतात. संविधानाचा अर्थ लावण्याचे अधिकार हे न्यायालयांना प्राप्त झालेले आहेत. ( Power of Judicial review) त्याचप्रमाणे सभागृहांना सदस्यांचे सदस्यत्व रद्द करून सदस्यांना काढून टाकण्याचे विशेषाधिकार सुद्धा सभागृहाला संविधानाच्या अनुच्छेद १०५ व १९४ नुसार प्राप्त झालेले आहेत.

विशेषाधिकार हा सभागृहांचा आत्मा असून विशेषाधिकारांशिवाय सभागृहे त्यांची मूलभूत कर्तव्ये पार पाडूच शकणार नाहीत व सदस्य सुद्धा विशेषाधिकारांशिवाय त्यांची संसदीय कर्तव्ये पार पाडू शकणार नाहीत म्हणून विशेषाधिकारांना, संसदीय लोकशाहीचा मूळ पाया व लोकशाहीचा गाभा म्हटल्यास निश्चितपणे अतिशयोक्ती होणार नाही.

विशेषाधिकार हे सदस्यांचे मौलिक घटनात्मक अधिकार असून विशेषाधिकारांचे संवर्धन व संरक्षण करणे हे सदस्यांचे व सभागृहाचे आद्य कर्तव्य आहे तरच विशेषाधिकारांचा प्रभाव संसदीय लोकशाहीमध्ये सदैव टिकून राहण्यास मदत होईल.

## ब्रिटीश संसदेचे विशेषाधिकार

## List Of Parliamentary Privileges Exercised By The British House Of Commons

Though the Privileges are not codified we are expected to look to precedents involving the British House of Commons. The most elaborate list of Parliamentary Privileges exercised by the British House of Commons has been compiled by Pritiosh Roy in his work Parliamentary Privilege in India which has been quoted in Raja Ram Pal's case and has been reproduced below:

**(1) Privilege of freedom of speech, comprising the right of exclusive control by the House over its own proceedings. It is a composite privilege which includes:**

(i) The power to initiate and consider matters of legislation or discussion in such order as it pleases;

(ii) The privilege of freedom in debate proper- absolute immunity of members for statements made in debate, not actionable at law;

(iii) The power to discipline its own members;

(iv) The power to regulate its own procedure- the right of the House to be the sole judge of the lawfulness of its own proceedings;

(v) The right to exclude the jurisdiction of the Courts;

(vi) The right to exclude strangers;

(vii) The right to ensure privacy of debate;

(ix) The right to control or prohibit publication of its debates and proceedings;

**(2) Privilege of freedom from arrest or molestation, the claim of the Commons to freedom of members from arrest in civil action or suits during the time of the Parliament and during the period when a member journeys to or returns from the Parliament. This privilege includes:**

(i) Exemption of a member from attending Court as a witness- service of a civil or criminal process within the precincts of the House is a breach of privilege.

(ii) A member cannot be admitted as bail;

(iii) Exemption of a member from jury service

(iv) No such privilege claimed in respect of criminal offences or statutory detention;

(v) Right of the House to be informed of arrest of members on criminal charges;

(vi) Extension of the privilege to witnesses summoned to attend before the House or its committees, and to officers in immediate attendance upon the service of the House.

**(3) Privilege of freedom of access to the sovereign through the Speaker.**

**(4) Privilege of the House of receiving a favourable construction of the proceedings of the House from the sovereign.**

**(5) Power of the House to inflict punishment for contempt on members or strangers- a power akin to the powers possessed by the superior courts of justice to punish for contempt. It includes:**

(i) The power to commit a person to prison, to the custody of its own officers or to one of the State prisons, the keystone of Parliamentary privilege the commitment being for any period not beyond the date of the prorogation of the House;

(ii)The incompetence of the courts of justice to admit a person committed by the House to bail;

(iii)When the person is committed by the House upon a general or unspeaking warrant which does not state the particular facts constituting the contempt the incompetence of the courts of justice to inquire into the nature of contempt;

(iv)The power of the House to arrest an offender through its own officers or through the aid and power of the civil government;

(v) The power of the officers of the House to break open outer doors to effect the execution of the warrant of arrest;

(vi)The power of the House to administer reprimand or admonition to an offender;

(vii)The power of the House to secure the attendance, whether in custody or not, of persons whose conduct is impugned on a matter of privilege;

(viii)The power of the House to direct the Attorney General to prosecute an offender where the breach of privilege is also an offence at law and the extent of the power of the House to inflict punishment is not considered adequate to the offence;

(ix)The power of the House to punish a member by (a) suspension from the service of the House , or (b) expulsion, rendering his seat vacant.

**(6) Privilege of the House to provide for its own due constitution or composition. It includes:**

(i) The power of the House to order the issue of new writs to fill vacancies that arise in the Commons in the course of a Parliament;

(ii) The power of the House in respect of the trial of controverted elections of members of the Commons;

(iii) The power of the House to determine the qualifications of its members to sit and vote in the House in cases of doubt- it includes the power of expulsion of a member. A major portion of this ancient privilege of the House of Commons has been eroded by the statute.

(7) **The power of the House to compel the attendance of witnesses and the production of papers.**

However, we are only obliged to follow British precedents to the extent that they are compatible with our constitutional scheme. This is because the Legislatures in India do not have a wide power of self-composition in a manner akin to the British House of Commons.

(Ref:- (1) Raja Ram Pal Vs The Hon Speaker Lok Sabha & Others

(SCC (2007)3SCC184).

(2) Amrinder Singh vs Spl.Committee,Punjab Vidhan Sabha

(2010) 2 SCC(Cri) 1343]

## विशेषाधिकारांबाबत राज्यघटनेतील तरतुदी

## संसद व तिचे सदस्य यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती

**संसदेची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार, इत्यादी :---**

१०५. (१) या संविधानाच्या तरतुदी आणि संसदेच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांना अधीन राहून; संसदेत भाषणस्वातंत्र्य असेल.

(२) संसदेचा कोणताही सदस्य, संसदेत किंवा तिच्या कोणत्याही समितीत त्याने केलेल्या कोणत्याही वक्तव्याच्या किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही, आणि कोणतीही व्यक्ती संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकाराअन्वये किंवा त्याखाली कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे पात्र होणार नाही.

(३) अन्य बाबतींत, संसदेचे प्रत्येक सभागृह आणि प्रत्येक सभागृहाचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती या, संसद, कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील, आणि त्याप्रमाणे निश्चित होईपर्यंत (त्या, सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना आणि समित्यांना "संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८" याचे कलम १५ अंमलात येण्याच्या लगतपूर्वी जशा होत्या तशा असतील.)

(४) खंड (१), (२) व (३) यांच्या तरतुदी जशा संसदेच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तशा त्या, या संविधानाच्या आधारे संसदेच्या कोणत्याही सभागृहात किंवा तिच्या कोणत्याही समितीत भाषण करण्याचा व अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू असतील.

**१२१. संसदेतील चर्चेवर निर्बंध :-** सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाने आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत, यात यापुढे तरतुद केल्यानुसार, त्या न्यायाधीशास पदावरून दूर करण्याची विनंती करणारे समावेदन राष्ट्रपतीस सादर करण्याचा प्रस्ताव आल्याशिवाय संसदेत कोणतीही चर्चा करता येणार नाही.

**१२२. न्यायालयांनी संसदेच्या कामकाजाबाबत चौकशी करावयाची नाही :-**

(१) कार्यपद्धतीत एखादी तथाकथित नियमबाह्य गोष्ट घडली आहे, या कारणावरून संसदेतील कोणत्याही कामकाजाची विधीग्राह्यता प्रश्नास्पद करता येणार नाही.

(२) संसदेमधील कार्यपद्धतीचे किंवा कामकाज चालनाचे विनियमन करण्याचे अथवा संसदेत सुव्यवस्था राखण्याचे अधिकार या संविधानाद्वारे किंवा तदन्वये ज्याच्या ठायी निहित करण्यात आल्या आहेत अशा, संसदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने त्या अधिकारांच्या केलेल्या वापराबाबत तो कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणार नाही.

**राज्य विधानमंडळे व त्यांचे सदस्य यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती :-**

**१९४. विधानमंडळांची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार,विशेषाधिकार, इत्यादी:-**

(१) या संविधानाच्या तरतुदी आणि विधानमंडळाच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांना अधीन राहून, प्रत्येक राज्याच्या विधानमंडळात भाषणस्वातंत्र्य असेल.

(२) राज्य विधानमंडळाचा कोणताही सदस्य, विधानमंडळात किंवा त्याच्या कोणत्याही समितीत त्याने केलेल्या कोणत्याही वक्तव्याच्या किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही, आणि कोणतीही व्यक्ती अशा विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकारान्वये किंवा त्याखाली प्रकाशित झालेला कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे कार्यवाहीस पात्र होणार नाही.

(३) अन्य बाबतींत, राज्य विधानमंडळाचे सभागृह आणि अशा विधानमंडळाच्या सभागृहाचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती या, ते विधानमंडळ कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील, आणि याप्रमाणे निश्चित होईपर्यंत, (त्या सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना आणि समित्यांना "संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८" याचे कलम २६ अंमलात येण्याच्या लगतपूर्वी जशा होत्या तशा असतील).

(४) खंड (१), (२) व (३) यांच्या तरतुदी जशा राज्य विधानमंडळाच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तशा त्या, या संविधानाच्या आधारे त्या विधानमंडळाच्या सभागृहात किंवा तिच्या कोणत्याही समितीत भाषण करण्याचा व अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू असतील.

**२११. विधानमंडळातील चर्चेवर निर्बंध :-** सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाने आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत राज्याच्या विधानमंडळात कोणतीही चर्चा करता येणार नाही.

**२१२. न्यायालयांनी विधानमंडळाच्या कामकाजाबाबत चौकशी करावयाची नाही :-**

(१) कार्यपद्धतीत एखादी तथाकथित नियमबाह्य गोष्ट घडली आहे या कारणावरून राज्य विधानमंडळातील कोणत्याही कामकाजाच्या विधिग्राह्यतेस आक्षेप घेता येणार नाही.

(२) राज्य विधानमंडळामधील कार्यपद्धतीचे किंवा कामकाजचालनाचे विनियमन करण्याचे अथवा विधानमंडळात सुव्यवस्था राखण्याचे अधिकार या संविधानाद्वारे किंवा तदन्वये ज्याच्या ठायी निहित करण्यात आले आहेत अशा, विधानमंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने त्या अधिकारांच्या केलेल्या वापराबाबत तो कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणार नाही.

**भारतीय संविधानातील विशेषाधिकाराबाबत तरतुदीतील मूळ आशय, म्हणजेच, ब्रिटिश संसदेला जे विशेषाधिकार आहेत तेच भारतीय संसदेला व राज्य विधानमंडळांना आहेत.** ह्या विशेषाधिकारांपैकी सर्वाधिक महत्त्वाचा विशेषाधिकार म्हणजे, संसदेतील भाषण स्वातंत्र्य.

**सभागृहात भाषण स्वातंत्र्याचा विशेषाधिकार (Freedom of Speech in the House)**

संसदीय कर्तव्य पार पाडतानाचा सर्वात महत्त्वाचा विशेषाधिकार म्हणजे भाषण स्वातंत्र्याचा आहे. अनुच्छेद १९ मध्येही नागरिकांना भाषण स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु, अनुच्छेद १०५ आणि १९४ मध्ये संसद व विधानमंडळांच्या सदस्यांच्या भाषण स्वातंत्र्यावर अधिक भर दिला आहे. अनुच्छेद १९ खाली दिलेल्या भाषण स्वातंत्र्यावर रास्त बंधने आहेत. जसे, लाइबल (Libel) कायदा, निंदाजनक वक्तव्याबद्दल सामान्य व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कार्यवाही तात्काळ सुरू करता येणे. परंतु सभागृहामध्ये किंवा तिच्या एखाद्या समितीमध्ये संसद सदस्याचे वक्तव्य, निंदा करणारे किंवा बदनामी करणारे आहे, या कारणावरून त्याच्यावर कोणतीच कारवाई करता येत नाही. तो अशा कारवाईपासून उन्मुक्त असतो.

सन्माननीय सदस्यांच्या भाषण स्वातंत्र्याच्या अधिकाराबद्दल मा.सर्वोच्च न्यायालयाने पंडित एम.एस.एम.शर्मा याप्रकरणी असा निर्णय दिला की, संसदेचे/विधीमंडळाचे विशेषाधिकार (१०५/१९४) हे विशेष स्वरुपाचे असून नागरिकांना जे घटनेच्या अनुच्छेद १९(१) अन्वये प्राप्त झालेले मुलभूत अधिकार हे सर्वसाधारण आहेत. यात वाद निर्माण झाल्यास विशेषाधिकाराला प्राधान्य देणे आवश्यक आहे. (The Fundamental rights under Article १९(१) (a) has to yield to the privileges of Parliament and State Legislature under Article १९४(३)

भाषण स्वातंत्र्याच्या आधारे सदस्यांना सभागृहात लोकांची गाऱ्हाणी मांडावयाची असतात आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधावयाचे असते. असे करताना त्यांच्यावर कोणतेच दडपण नसले पाहिजे. आपले विचार आणि आपली मते त्यांना मोकळेपणाने मांडता आली पाहिजेत. सभागृहात किंवा संसदीय समित्यांमध्ये, सदस्याला हवे ते बोलण्याचे स्वातंत्र्य आहे. फक्त त्याने सभागृहातील वा संबंधित समितीतील अंतर्गत शिस्त पाळली पाहिजे. बाहेरच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याला त्यात हस्तक्षेप करता येत नाही. कोणाचीही भीडमुर्वत न बाळगता किंवा कोणाच्याही रागलोभाची फिकीर न करता समित्यांमध्ये किंवा सभागृहात बोलता येण्यासाठी भाषण स्वातंत्र्य ही एक नितांत गरज असते. कायदेशीर कार्यवाहीपासून संपूर्ण उन्मुक्ती असल्याशिवाय, सदस्य निर्भीडपणे आणि मोकळेपणाने बोलेल अशी अपेक्षा करता येत नाही. म्हणून संसदेव्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात वा कोणत्याही प्राधिकरणासमोर संसद सदस्याविरुद्ध संसदेच्या सभागृहात वा संसदेच्या समित्यांमध्ये त्याच्या कोणत्याही वक्तव्याबद्दल किंवा त्याने केलेल्या मतदानाबद्दल कोणतीही कारवाई करता येऊ नये अशी तरतूद संविधानात केलेली आहे. संसदेत किंवा संसदीय समितीत बोलल्याबद्दल सदस्याला धक्काबुक्की करणे किंवा त्याच्यावर कोणतीही कारवाई करणे वा कायदेशीर दावा करणे हा विशेषाधिकारभंगही आहे.

सुरूवातीला अधिनियमित करण्यात आलेल्या संविधानातील तरतुदींमध्ये अशी व्यवस्था होती की, संविधानाच्या सुरुवातीस ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्स, त्यांचे सदस्य आणि समित्या यांचे जे

विशेषाधिकार असतील तेच, आमची संसद कायद्याने अशा विशेषाधिकारांची पूर्णतः किंवा अंशतः व्याख्या करणार नाही तोपर्यंत चालू राहतील. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, संसदेने कधी कोणत्याही एखाद्या विशिष्ट विशेषाधिकाराची कायद्याने तरतूद केली, तर ब्रिटीशांची पूर्वोदाहरणे त्यां संबंधात आणि तेथवर आमच्या संसदेत लागू होणार नाहीत. परंतु १९७८ मध्ये खंड ३ मध्ये सुधारणा करून अशी तरतूद करण्यात आली की, संविधानातील विनिर्दिष्ट केलेल्या विशेषाधिकारांव्यतिरिक्त अन्य विशेषाधिकारांच्या बाबतीत, संसदेच्या प्रत्येक सभागृहाचे, त्यातील सदस्यांचे व समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि उन्मुक्ती, ह्या संविधान - चव्वेचाळिसावे विशोधन अधिनियम १९७८ (दिनांक २० जून १९७९ पासून अमलात) च्या अगोदर सभागृह, सदस्य आणि समित्या यांच्या बाबतीत होत्या, त्याच असतील. खरे तर ह्या सुधारणेने केवळ, ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्स संबंधातील शब्द गाळून, फक्त शाब्दिक बदल केला. मूळ बाब तशीच राहिली. वेगळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, संविधानात उल्लेखिलेले अधिकार, विशेषाधिकार यांव्यतिरिक्त, प्रत्येक सभागृहाला, त्यातील सदस्यांना आणि समित्यांना व्यवहारतः ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सला दिनांक २६ जानेवारी १९५० ला जे अधिकार व विशेषाधिकार होते, तेच आहेत.

## विशेषाधिकार

संसदीय विशेषाधिकारांची यादी करता येते, परंतु अशी कोणतीही यादी ही केव्हाच परिपूर्ण असणार नाही. सभागृहे, सदस्य आणि समित्या यांचे महत्त्वाचे विशेषाधिकार पुढील प्रमाणे आहेत.

- **भाषणस्वातंत्र्य व सभागृहाची कार्यवाही याबाबतचे विशेषाधिकार**

**[भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १०५ (२) व १९४ (२) मधील तरतुदींनुसार]**

१. संसदेत भाषण स्वातंत्र्य असेल. (संविधानाचा अनुच्छेद १०५ (१) व १९४) ;

२. संसदेत किंवा तिच्या एखाद्या समितीत एखाद्या सदस्याने केलेले वक्तव्य वा केलेले मतदान याबद्दल कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीपासून उन्मुक्ती. (संविधानाचा अनुच्छेद १०५ (२) व १९४);

३. संसदेच्या अधिकारात प्रकाशित करण्यात आलेला, अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांबद्दल कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीपासून त्या व्यक्तीला उन्मुक्ती (संविधानाचा अनुच्छेद १०५(२) व १९४);

४. संसदेतील कामकाजाबाबत न्यायालयाने चौकशी करण्यास प्रतिबंध (संविधानाचा अनुच्छेद १२२ व २१२);

- **इतर विशेषाधिकार**

**(भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १०५ (३) व १९४ (३) मधील तरतुदींनुसार)**

५. संसदेचे सत्र सुरू असताना किंवा सुरू होण्याच्या अगोदर ४० दिवस व संपल्यानंतर ४० दिवसांपर्यंत कोणत्याही दिवाणी प्रकरणी सदस्याला अटक न करता येणे (दिवाणी प्रक्रिया संहिता खंड १३५ अ)

६. सदस्यांना ज्युरी सदस्य म्हणून न राहण्याची मोकळीक;

७. सदस्याची अटक, स्थानबद्धता, अपराधसिद्धी, कारावास वा कारावासातून सुटका याबद्दल सभागृहाला तत्काळ माहिती मिळण्याचा हक्क.

८. अध्यक्षांच्या परवानगीशिवाय सभागृहाच्या परिसरात अटक करण्यावर किंवा वैध आदेशिका बजावण्यावर प्रतिबंध.

९. सभागृहाच्या गुप्त बैठकीतील निर्णय वा कार्यवाही उघड करण्यावर प्रतिबंध.

१०. सभागृहाच्या परवानगीशिवाय सभागृहातील सदस्य वा अधिकारी यांनी सभागृहातील कार्यवाहीसंबंधात न्यायालयात साक्ष न देणे किंवा त्यासंबंधीचे कागदपत्र न्यायालयात दाखल न करणे.

११. दुसऱ्या सभागृहासमोर वा त्याच्या समितीसमोर, किंवा राज्य विधानमंडळाच्या सभागृहासमोर वा त्याच्या समितीसमोर, सभागृहातील सदस्याने वा अधिकाऱ्याने

त्या त्या अध्यक्षांच्या परवानगीशिवाय साक्षीदार म्हणून हजर राहू नये, आणि त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध हजर राहण्यास भाग पाडण्यात येऊ नये.

१२. समितीने करावयाच्या चौकशीसाठी, सर्वच समित्यांना संबंधित व्यक्तीला बोलावण्याचे वा संबंधित कागदपत्र वा अभिलेख मागवण्याचे अधिकार दिलेले आहेत. संसदीय समिती साक्षीदाराला हजर राहण्यास आदेशित करु शकते आणि समितीला उपयोगी पडतील असे दस्तावेज सादर करावयास भाग पाडू शकते.

१३. तिच्यासमोर तपासणी करण्यात येत असलेल्या साक्षीदाराला शपथ देऊ शकते किंवा प्रतिज्ञा करावयास सांगू शकते.

१४. सभागृहाच्या पटलावर ठेवण्याअगोदर, संसदीय समितीसमोर दिलेला कोणताही साक्षीपुरावा आणि समितीचा अहवाल वा कार्यवाही, कोणालाही उघड करता येत नाही वा प्रकाशित करता येत नाही.

वर उध्दृत केलेले विशेषाधिकार आणि उन्मुक्ती यांच्याशिवाय प्रत्येक सभागृहाला आपले विशेषाधिकार आणि उन्मुक्ती यांचे संरक्षण करण्याचे आवश्यक असे आनुषंगिक अधिकार आहेत ते असे.

१. व्यक्ती संसद सदस्य असो वा नसो, तिने जर विशेषाधिकाराचा भंग केला असेल किंवा सभागृहाचा अवमान केला असेल तर तिला अटक करणे;
२. साक्षीदारांना हजर राहावयास सांगणे, आणि कागदपत्रे व अभिलेख मागवणे ;
३. आपली कार्यपद्धती आणि कामकाज चालन यांचे विनियमन करणे. (संविधानाचा अनुच्छेद ११८ व २०८)
४. आपले वादविवाद आणि कार्यवृत्ते यांचे प्रसिद्धीकरण रोखणे.
५. बाहेरील व्यक्तींना सभागृहात येण्याची बंदी करणे.

**सदस्यांना अटकेपासून संरक्षण**

**सदस्यांना सभागृहाची/समितीची बैठक सुरू असतांना अटक करता येत नाही :**

दिवाणी प्रकरणांमध्ये सत्र चालू असताना किंवा ज्या सभागृहाचा अथवा ज्या समितीचा जो सदस्य असेल त्या सभागृहाची वा समितीची बैठक चालू असताना त्या सदस्याला अटक तर करता येत नाहीच, परंतु संसदेच्या अधिवेशनाच्या ४० दिवसांपूर्वी किंवा नंतरही, किंवा तो सभागृहात जाताना वा तेथून येतानाही त्याला अटक करता येत नाही. नव्या दिल्लीबाहेरील एखाद्या ठिकाणाहून तो संसदेच्या वा तिच्या समितीच्या कामकाजासाठी येत असताना त्याच्याशी दंगामस्ती करण्यात आली किंवा त्याला कोणताही प्रतिबंध करण्यात आला तर तोही विशेषाधिकाराचा भंग होतो.

ह्या विशेषाधिकाराचा हेतू हा आहे की, संसद सदस्याला संसदेत सुरक्षितपणे येता यावे व कामकाजासाठी उपस्थित राहता यावे. फक्त दिवाणी प्रकरणांमध्येच संसद सदस्याला अटकेपासून उन्मुक्ती आहे. फौजदारी प्रकरणात किंवा प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याखाली ती लागू नाही. तशा

प्रकारची अटक झाल्याबरोबर तशा अटकेची, स्थानबद्धतेची, दोषसिद्धीची आणि कारावासात टाकल्याची वा तेथून मुक्त केल्याची माहिती सभागृहाला त्वरीत द्यायलाच हवी. सभागृहाचा तो हक्कच आहे. संबंधित प्राधिकाऱ्याने लोकसभेच्या सदस्याची अटक, स्थानबद्धता, कारावास इ. घटना अध्यक्षांना त्वरीत कळवल्याच पाहिजेत. तसे त्यांनी न केल्यास सभागृहाचा हक्कभंग होतो. ही माहिती होईल तितक्या लवकर कळवावयास हवी. अशा प्रकरणी सदस्य देशाच्या कोणत्याही भागात असो, त्याच्यासंबंधीच्या उपरोक्त बाबी तारेने आणि नंतर पत्राने कळवावयास हव्यात.

**सभागृहाच्या आवारात कोणतीही दिवाणी वा फौजदारी आदेशिका (समन्स) सदस्यावर बजावता येणार नाही..**

अध्यक्ष वा सभापती यांच्या परवानगीशिवाय कोणतीही दिवाणी वा फौजदारी आदेशिका (समन्स) संसदेच्या किंवा विधानमंडळाच्या आवारात सदस्यावर बजावता येत नाही आणि सदस्याला संसदेच्या/विधानमंडळाच्या आवारात अटक करता येत नाही, हा नियम लागू आहे. ही उन्मुक्ती संसदेच्या/विधानमंडळाच्या परिसीमेत खाजगी व्यक्तीलाही लागू आहे. संसदेच्या/विधानमंडळाच्या परिसरात, फक्त संसदेच्या सभागृहांचेच किंवा अध्यक्ष/सभापतींचेच आदेश लागू असावेत, विधानमंडळाच्या अन्य शासकीय प्राधिकाऱ्यांचे वा स्थानिक प्रशासनाचे आदेश लागू असू नयेत, यासाठी हा नियम आहे. संसदेच्या आवारात १४४ कलमदेखील जारी करता येत नाही. प्राधिकाऱ्यांनी तसे करण्याचा प्रयत्न केला तर तो विशेषाधिकाराचा भंग आणि सभागृहाचा अवमान ठरतो. संसद परिसरात कलम १४४ च्या सदृश असलेले अध्यक्षांचे आदेश जारी करता येणे, ही एक वेगळी गोष्ट आहे.

फौजदारी प्रकरणांमध्ये, ज्युरी म्हणून काम न करण्याची मोकळीक सदस्यांना असते. ज्या ठिकाणी ज्युरीची पद्धत असेल तेथे ज्युरर म्हणून बोलावल्यास जाणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असले तरी, संसद सदस्य आणि विधानमंडळ सदस्य यांना हा नियम लागू होत नाही.

**न्यायालयासमोर सभागृहाची कागदपत्रे सादर करणेबाबत..**

विधानमंडळ सचिवालयाचा अधिकारी वा अन्य व्यक्ती यांना सभागृहाच्या परवानगीशिवाय, सभागृहातील कार्यवाहीसंबंधातील कागदपत्रे सादर करण्यास किंवा, त्या संबंधात साक्ष देण्यास भाग पाडता येणार नाही. त्याचप्रमाणे तो ज्या सभागृहाशी संबंधित असेल, त्याव्यतिरिक्त अन्य सभागृहापुढे साक्षीदार म्हणून त्याने यावे यासाठी त्याच्यावर जबरदस्ती करता येणार नाही.

**व्यक्तींनी सभागृहासमोर/समितीसमोर साक्षीसाठी उपस्थित राहणेबाबत..**

व्यक्तींना आपल्यासमोर हजर राहण्यास सांगण्याचे किंवा कागदपत्रे वा अभिलेख सादर करण्यास सांगण्याचे अधिकार सर्वच संसदीय समित्यांना असतात. साक्षीदारांची पुढे नमूद करण्यात येणारी वर्तणूक ही विशेषाधिकारांचा भंग करणारी आणि समितीचा अवमान करणारी समजली जाते.

१. प्रश्नाची उत्तरे देण्यास नकार.

२. जाणीवपूर्वक खोटी साक्ष देणे, सत्य लपवणे किंवा समितीची दिशाभूल करणे.

३. समितीसमोर थिल्लरपणे वागणे आणि अवमानकारक उत्तरे देणे.

४. समिती करीत असलेल्या चौकशीसंबंधीची कागदपत्रे नष्ट करणे किंवा महत्त्वाची कागदपत्रे खराब करणे.

ससंदीय समितीचा संसदेइतकाच मान राखला पाहिजे. म्हणून जर कोणी संसदीय समितीच्या निर्णयावर टीकाटिप्पणी केली किंवा समितीच्या कार्यवाहीबद्दल अनुदगार काढले तर तो हक्कभंग होतो व सभागृहाचा अवमान ठरतो.

याशिवाय विशेषाधिकार कायद्याचा भाग म्हणून अभिरक्षेतील सदस्याला अध्यक्षांशी किंवा संसदीय समितीच्या अध्यक्षांबरोबर कोणत्याही आडकाठीशिवाय संपर्क साधण्याचा व विचारविमर्शाचा अधिकार असतो. स्थानबद्ध सदस्याने असे एखादे पत्र लिहिले असेल तर ते प्रशासनिक प्राधिकाऱ्यांना रोखून धरता येत नाही.

जेव्हा एखादी बाब संसदीय/विधानमंडळ समितीच्या विचाराधीन असेल आणि त्या संबंधात समिती दररोज आपल्या बैठकी घेत असेल तेव्हा, संसद सदस्यांसह/विधानमंडळ सदस्यांसह कोणतीही व्यक्ती त्या बाबतीत निवेदन करु शकत नाही वा ते प्रसिद्धीसही देऊ शकत नाही. संसदीय समितीचा ज्या प्रश्नावर विचार चालू असेल त्या प्रश्नावर जाहीर टीकाटिप्पणी करणे ही अत्यंत अयोग्य गोष्ट आहे, आणि तसे करण्याने सभागृहाचा अवमानही होऊ शकतो. समितीपुढे सादर केलेली कागदपत्रे वा लेख किंवा समितीच्या कार्याची वृत्ते प्रसिद्ध करण्यानेही सभागृहाचा हक्कभंग होऊ शकतो.

**सभागृह, समित्या व सदस्य यांचा विशेषाधिकार भंग**

सभागृह किंवा त्यांच्या समित्या यांच्यावरील कोणत्याही प्रकारचा हल्ला, किंवा त्यांच्या विशेषाधिकारावर, हक्कांवर वा उन्मुक्तींवर आघात किंवा व्यक्तिशः सदस्यांवरील किंवा समिती सदस्यांवरील अशा प्रकारचे आघात यांमुळेही हक्कभंग होतो. सभागृह या गुन्ह्याबद्दल शिक्षाही करू शकते. यातील मूलभूत तत्व हेच आहे की, सभागृह, त्याच्या समित्या वा त्यातील सदस्य यांना आपली कर्तव्ये दक्षतेने आणि परिणामकारकतेने पार पाडण्याच्या आड किंवा आपले काम निर्भयपणे वा निःपक्षपणे करण्याच्या आड ज्या कोणत्याही गोष्टी येत असतील, त्या संसदीय विशेषाधिकारांचा भंग करणाऱ्या ठरतात. एखाद्या सदस्याला, तो सभागृहाच्या बैठकीस जात असताना अडवण्यात आले तर तो विशेषाधिकारभंग होतो. संसद सदस्याला लाच देण्याचा प्रयत्न हाही विशेषाधिकाराचा भंग होतो. जाणीवपूर्वक सभागृहाची दिशाभूल करणे आणि माहिती खोटी आहे याची कल्पना असूनही, ती सभागृहाला पुरवणे हाही एक गंभीर गुन्हा आहे. विशिष्ट विशेषाधिकार भंगाशिवाय, सभागृहाचे प्राधिकार व प्रतिष्ठा यांविरुद्धचे, म्हणजे जसे त्यांचे आदेश न पाळणे, किंवा सभागृहांची, त्यांतील सदस्यांची, वा अधिकाऱ्यांची बदनामी करणे या सर्वांबद्दलही, सभागृहांच्या अवमानाबद्दल होते तशी शिक्षा होऊ शकते.

**सभागृहाचा अवमान :**

''सभागृहाचा अवमान'' याची सर्वसाधारण व्याख्या अशी करता येईल. संसदेची दोन्ही सभागृहे, त्यांचे सदस्य, वा त्यांच्या समित्या व त्यांचे अधिकारी यांना आपली कार्ये आणि कर्तव्ये

परिणामकारकपणे आणि दक्षतेने पार पाडण्यात प्रतिबंध करण्याची वा अडथळा आणण्याची कोणतीही कृती वा अकृती किंवा सभागृह, त्याचे सदस्य वा समित्या यांची प्रतिष्ठा व सन्मान यांना क्षती पोचणारी कृती वा अकृती सभागृहाचा अवमान म्हटली जाते. विशेषाधिकारभंग आणि सभागृहाचा अवमान यांतील फरक फार सूक्ष्म आहे. सर्वसाधारणपणे, विशेषाधिकाराचा भंग हा सभागृहाचा अवमान ठरू शकतो. त्याचप्रमाणे सभागृहाच्या अवमानात विशेषाधिकाराचा भंग असतोच. तरीही,''सभागृहाचा अवमान'' या संकल्पनेची व्याप्ती मोठी आहे. क्वचित, कोणत्याही विशेषाधिकाराचा भंग न करताही सभागृहाचा अवमान केला जाऊ शकतो. खरे पाहता अवमान ह्या शब्दाची नेमकी व्याख्या करता येत नाही वा त्या शब्दातील संकल्पनेच्या सीमा निश्चितपणे ठरविता येत नाहीत. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत केलेली एखादी कृती ही अवमाननिदर्शक नसेल वा अन्य परिस्थितीत ती तशी असेलही. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, अवमान झाला किंवा नाही याचा निर्णय देण्याचे काम संसदेच्या संबंधित सभागृहाकडेच सोपवणे इष्ट ठरते.

सर्वसाधारणपणे, संसदेच्या सभागृहांच्या किंवा तिच्या समित्यांच्या सर्वोच्चपणावर, प्राधिकारांवर किंवा प्रतिष्ठेवर करण्यात आलेल्या आघातांचा अंतर्भाव, ''अवमान'' या शब्दात होतो. सभागृहाचा अवमान झाल्याचे समजण्यात येते, अशा काही कृती पुढे दिल्या आहेत :

१. सभागृहे, त्यांच्या समित्या वा सदस्य यांची बदनामी होईल किंवा लोकांमधील त्यांचा आदर कमी होईल अशा प्रकारचे लिखाण वा भाषणे.

२. अध्यक्ष/सभापती त्यांची कर्तव्ये पार पाडत असताना, त्यांचे चारित्र्य वा त्यांचा निःपक्षपणा याबाबत शंका घेणे.

३. संसदीय समितीचा अहवाल हा पक्षपात करणारा आहे असा आरोप करणे.

४. कार्यवाहीचे खोटेच वा विकृत अहवाल प्रसिद्ध करणे.

५. सभागृहाच्या गुप्त बैठकीचे कार्यवृत्त वा अध्यक्षांनी कार्यवृत्तातून वगळण्यास सांगितलेले भाग प्रकाशित करणे.

६. सभागृहातील वर्तणुकीबद्दल सदस्यांवर हात टाकणे, किंवा सदस्य म्हणून ते आपले कर्तव्य पार पडीत असताना, किंवा सभागृहाच्या वा समितीच्या बैठकीस जात असताना, त्यांची वाट अडवणे.

७. संसदीय वर्तनावर प्रभाव पडेल अशा हेतूने सदस्यांना लाचलुचपत देऊ करणे.

८. संसदीय कार्यसंबंधात धाकदपटशा दाखवून त्यांना घाबरवणे.

९. सदस्याने किंवा साक्षीदाराने सभागृहाला वा त्या सभागृहाच्या समितीला जाणूनबुजून खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती वा पुरावा देणे.

१०. सभागृहापुढे किंवा त्यातील समितीपुढे येणाऱ्या साक्षीदाराला प्रतिबंध करणे वा त्याच्यावर हात टाकणे.

**विशेषाधिकार भंग, अवमान इ.बद्दल शिक्षा :**

संसदेचे प्रत्येक सभागृह आपला विशेषाधिकार सांभाळत असते. सभागृहाचा अवमान करणाऱ्या वा सभागृहाच्या विशेषाधिकाराचा भंग करणाऱ्या व्यक्तीला खडसावण्याची वा दटावण्याची किंवा विशिष्ट कालावधीकरता कारावासाची शिक्षा, सभागृह देऊ शकते. स्वतःच्या सदस्यांकरिता आणखी दोन शिक्षा उपलब्ध असतात. त्या म्हणजे सभागृहाच्या सेवेतून निलंबित करणे किंवा सभागृहातून निष्कासित करणे. सदस्याला विशिष्ट कालावधीकरीता किंवा उर्वरित सत्रकालावधीकरिता सभागृहाच्या सेवेतून निलंबित करता येते किंवा अत्यंत विपरीत परिस्थितीत त्याला सभागृहातून निष्कासित करता येते.

सभागृहाची शिक्षा देण्याची अधिकारिता ही त्या सभागृहातील सदस्यांपुरतीच किंवा सभागृहासमोर केलेल्या गुन्ह्यापुरतीच मर्यादित नसते, तर सभागृहाचे सर्वच अवमान या अधिकारितेच्या कक्षेत येतात, मग ते अवमान सदस्यांनी केलेले असोत वा इतरांनी केलेले असोत. असे अपराध सभागृहात केलेले असोत वा सभागृहाच्या परिसराबाहेर केलेले असोत, त्यामुळे काही विशेष फरक पडत नाही. आपल्या अवमानाबद्दल वा विशेषाधिकार भंगाबद्दल एखाद्या व्यक्तीला शिक्षा देण्याचा सभागृहाचा अधिकार, हा संसदीय विशेषाधिकारांची ''आधारशिला'' म्हटली पाहिजे. संसदेच्या विशेषाधिकारांना या अधिकारांमुळे खरा अर्थ प्राप्त होतो आणि संसदेचा सार्वभौम अधिकार सिद्ध होतो. त्यामुळे संसदेची प्रतिष्ठा आणि तिचे सर्व अधिकार सुरक्षित राहतात.

सभागृहाचा अवमान वा विशेषाधिकारांचा भंग याविरुद्ध सभागृहाने वापरावयाचे दंडात्मक अधिकार यांचा वापर हा क्वचितच अत्यंत कसोटीच्या वेळी करावयाचा असतो. म्हणजे जेथे लोकांचा संसदेवरील विश्वास जाणीवपूर्वक नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो, संसदेला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो अशाच वेळी, हे अस्त्र वापरावयाचे असते. अशा अपराधांबद्दल बिनशर्त माफी मागितल्यावर वा दिलगिरी व्यक्त केल्यावर ती सभागृहाने स्वीकारली असाही एक पायंडा पडला आहे. सभागृह अशा प्रकरणी आपला मान राखण्यासाठी, मग त्या प्रकरणी कोणतीच दखल घेत नाही.

**सभागृहे विशेषाधिकारांच्या बाबतीत एकमेव निर्णयकार.**

यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या केशवसिंग या प्रकरणातील निर्णयाकडे (ए आय आर १९६५ च्या स.न्या.७४५) पाहावयास सांगितले जाते, परंतु येथे हे सांगितले पाहिजे की हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय नव्हता. २६ मार्च १९६४ रोजी संविधानाच्या अनुच्छेद १४३ खाली भारताच्या राष्ट्रपतींनी विशेष रुपाने संदर्भीत केलेल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आपले मत यावेळी दिले होते. उत्तर प्रदेश विधान सभेने विशेषाधिकार भंगाबद्दल आणि सभागृहाचा अवमान केल्याबद्दल केशव सिंग या व्यक्तीला कारावासात टाकले होते. त्यावर त्याने आपल्याला मुक्त करण्याबद्दल अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे प्राधिलेख (Writ petition) पाठवला होता. यातून पुढे उच्च न्यायालयाची आणि त्यातील न्यायमूर्तींची अधिकार कक्षा कोणती आणि राज्यविधानमंडळ आणि त्याचे सदस्य यांची कोणती, याबद्दल कायद्याचे अनेक महत्त्वाचे व गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होत गेले.

भारतातील न्यायालयांनी हे मान्य केले आहे की, कोणत्याही एखाद्या प्रकरणी विशेषधिकाराचा भंग झाला किंवा कसे याबाबतीत निर्णय घेण्यासाठी संसद सभागृह किंवा राज्य विधान मंडळ स्वत:च एकमेव प्राधिकारी आहे. त्यावेळी असेही ठरवण्यात आले की अवमानाबद्दल एखाद्याला तुरुंगात टाकण्याचा सभागृहाचा अधिकार हा हाऊस ऑफ कॉमन्सच्या अधिकाराच्या समकक्ष आहे आणि त्या अधिकाराचा वापर योग्य प्रकारे झाल किंवा नाही हे ठरवण्यास न्यायालय सक्षम नाही. राजा राम पाल यांच्या प्रकरणात सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने संसदेच्या, सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचे घटनेच्या १०५ अन्वये दिलेले विशेषाधिकार मान्य केलेले असून या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने विशेषाधिकाराचा उगम, व्याप्ती याचा सर्वंकष आढावा घेतलेला आहे.

**संसदीय विशेषाधिकार आणि वृत्तपत्रे**

वृत्तपत्रसृष्टी म्हणजे संसदेचेच एक व्यापक स्वरुप. संसदीय विधिविधानांचे सार वृत्तपत्रे लोकांना सांगतात आणि संसदेत काय घडत आहे तेही वृत्तपत्रांव्दारेच लोकांना कळते. संविधानात वृत्तपत्रस्वातंत्र्य स्पष्टपणे नमूद केले नाही. परंतु संविधानाच्या अनुच्छेद १९(१) (अ) खाली नमूद केलेले ''भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य'' या मूलभूत हक्कामध्ये त्याचा समावेश गृहीत धरता येतो. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यात वृत्तपत्र स्वातंत्र्याचा अंतर्भाव होतो हे अनेक न्यायनिर्णयांव्दारे निश्चित झालेले आहे. सभागृहाने आपल्या कार्यवृत्तातून काढून टाकलेला मजकूर प्रकाशित करणे हा विशेषाधिकाराचा भंग व सभागृहाचा अवमान आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहांतील कार्यवृत्ते प्रकाशित करण्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, असे प्रकाशन जर सभागृहाने प्राधिकृत केले असेल तर, कोणत्याही न्यायालयीन कारवाईपासून संविधानाने उन्मुक्ती दिलेली आहे (अनुच्छेद १०५(२)). मात्र ही उन्मुक्ती संसदीय कार्यवाहीच्या वृत्तपत्रांतील प्रकाशनांबाबत, दोन्ही सभागृहांनी तसे स्पष्ट अधिकार दिलेले असल्याखेरीज, लागू होणार नाही. संसदेच्या कोणत्याही सभागृहातील कोणत्याही कार्यवाहीचे मूलत:सत्य अहवाल वृत्तपत्रांतून प्रकाशित करण्यास किंवा बिनतारी संदेशवहन व्यवस्थेव्दारे प्रक्षेपित करण्यास, कायदेशीर संरक्षण दिले गेले आहे. मात्र असे अहवाल हे लोकहितार्थ असावयास हवेत, त्यांचे प्रसारण वा प्रकाशन व्देषमूलक नसावे. (संविधानाचा अनुच्छेद ३६१ अ).

सभागृहाला, आपले वादविवाद किंवा अन्य कार्यवाही प्रकाशित करण्यावर स्वत:चे नियंत्रण ठेवण्याचा आणि तशीच गरज पडल्यास त्यांच्या प्रकाशनावर रोख लावण्याचा व त्यांसबंधातील आपल्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यास शिक्षा देण्याचा अधिकार आहे, या मर्यादांच्या अधीनच वर उल्लेखिलेले कायदेशीर संरक्षण आहे. साधारणत: सभागृहातील कार्यवाहीचे अहवाल प्रकाशित करण्यास कोणताही प्रतिबंध नसतो. परंतु असा अहवाल जर दुष्ट हेतूने दिला असेल किंवा त्यांच्या भाषणातील काही भाग मुद्दाम छापला नसेल, तर तो विशेषाधिकारभंग व सभागृहाचा अवमान ठरतो आणि असे करणारी व्यक्ती शिक्षेस पात्र होते. शिवाय, कोणतीही कार्यवाही किंवा संसदीय समितीसमोर सादर केलेला पुरावा वा दस्तऐवज, सभागृहाला सादर करण्यापूर्वी वृत्तपत्रांनी प्रकाशित करण्यावर प्रतिबंध आहे. गुप्त बैठकीतील निर्णय वा त्या बैठकीची कार्यवाही, सभागृहाने गुप्ततेची बंदी काढून टाकल्याशिवाय कोणत्याही वृत्तपत्राला प्रकाशित करता येत नाही. तशी जर ती केली तर

तो उघड उघड सभागृहाच्या विशेषाधिकाराचा भंग ठरतो. त्याचप्रमाणे, वादविवादाचे जे भाग अध्यक्षांच्या आदेशांनुसार, सभागृहाच्या कार्यवाहीतून काढून टाकलेले असतील, अशा भागाचे प्रकाशन हाही विशेषाधिकारभंग व सभागृहाचा अवमान ठरतो आणि दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरते.

विधान मंडळांच्या वैधानिक उणिवा दाखवणारे व त्यांवर रास्त टीका करणारे लेखक, वक्ते किंवा व्यंगचित्रकार हे विशेषाधिकाराच्या कक्षेत येतात का व त्यांच्याविरुद्ध कारवाई करता येते का, असा प्रश्न वारंवार विचारला जातो. संसद किंवा म्हटले तर कोणतेही विधानमंडळ त्यांच्याविरुद्ध केलेले व्देषमूलक लिखाण, भाषण इ.बद्दल आणि त्यांच्या किंवा त्यांच्या समित्यांच्या वा सदस्यांच्या कार्यपद्धतीवर शिंतोडे उडवणे वा हेत्वारोप करणे, याबद्दल अशी कृती करणाराविरुद्ध कारवाई करु शकतात याविषयी शंकाच नाही. परंतु जेव्हा टीका ही योग्य आणि सद्‌भावमूलक असते तेव्हा कोणत्याही प्रकारची कारवाई त्यांच्यावर सहसा करण्यात येत नाही.

याबाबतीत यू.के मधील हाऊस ऑफ कॉमन्सचा दृष्टिकोनच आपल्याकडील लोकसभेच्या विशेषाधिकारांबाबत सहसा स्वीकारला जातो, ही वस्तुस्थिती आहे.

हाऊस ऑफ कॉमन्सच्या (यू.के) पार्लमेंटरी विशेषाधिकार निवड समितीने (१९६७) पुढील शिफारस केली आहे.

**"सभागृहाला, त्यातील सदस्यांना आणि अधिकाऱ्यांना त्यांची यथोचित कार्ये करण्यात खराखुरा हस्तक्षेप ठरेल असे अयोग्य अडथळे निर्माण केले जातील वा तसे करण्याचे प्रयत्न वा धमक्या दिल्या जात असतील, तरच सभागृहाने आपले दंडात्मक शिक्षा करण्याचे अधिकार वापरावेत, पण तेही होताहोईस्तोवर अत्यंत अल्प प्रमाणात वापरावेत."**

त्यानंतर, हाऊस ऑफ कॉमन्सच्या विशेषाधिकार समितीने आपल्या तिसऱ्या अहवालात (१९७६-७७) ही शिफारस पुन्हा नोंदवली आणि हाऊस ऑफ कॉमन्स,(यू.के) नी ती दिनांक ६ फेब्रुवारी १९७८ ला स्वीकृत केली.

दुसऱ्या लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने आपल्या तेराव्या अहवालात अन्य बाबींबरोबरच असे नमूद केले की :

**"खरे तर, वृत्तपत्रांचा किंवा तसेच झाले तर, कोणत्याही नागरिकाचा, न्याय्य टीका करण्याचा अधिकार कोणीही अमान्य करणार नाही. परंतु अशी टीका ही सदस्याच्या संसदेतील वर्तनाबद्दल त्याच्यावर व्यक्तिगत हल्ला करणारी असेल किंवा टीकेची भाषा ही गांवढळ आणि शिवराळ असेल, तर अशी टीका रास्त व न्याय्य टीकेच्या अर्थकक्षेत येत नाही. वृत्तपत्र आयोगानेही (१९५४) असभ्य आणि शिवराळ भाषेतील टीका योग्य नव्हे असेच म्हटले आहे. "सनसनाटी माजवणारी बेजबाबदार टीका" हिलाही "न्याय्य टीका" असे म्हणता येणार नाही."**

सहाव्या लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने आपल्या चौथ्या अहवालात नमूद केले आहे:

**"संविधानाच्या अनुच्छेद १९(१) (अ) खाली सर्व नागरिकांना बहाल केलेल्या मूलभूत स्वातंत्र्यात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य अंतर्भूत असून वृत्तपत्र स्वातंत्र्य हा त्या मूलभूत स्वातंत्र्याचा एक अविभाज्य भाग आहे, याची या समितीला जाणीव आहे. संसदीय पद्धतीत, संसदेच्या**

**कार्यवाहीचा रास्त व यथातथ्य विश्वासार्ह अहवाल देण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य वृत्तपत्रांना असावे हे या समितीला महत्त्वाचे वाटते. परंतु ह्या स्वातंत्र्याचा दुष्ट हेतूने दुरुपयोग करण्यात आला, तर संसदेने अशा प्रकरणी हस्तक्षेप करणे हे संसदेचे कर्तव्य ठरते. परंतु त्याचबरोबर समितीला असेही वाटते की, संसदेच्या ह्या विशेषाधिकारामुळे कोणाच्या रास्त टीका करण्यावर व आपले मत मोकळेपणे मांडण्यावर बंधन येता कामा नये व अशी व्यक्ती हतोत्साह होता कामा नये."**

सातव्या लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने आपल्या पहिल्या अहवालात इतर अन्य बाबींबरोबर असे म्हटले आहे :

**"समितीला असे वाटते की लोकशाही पद्धतीमध्ये, सत्तेचा वापर संयमाने केला तर त्यामुळे सर्वांनाच प्रतिष्ठा मिळते. एखादी संस्था जितकी अधिक बलवान असेल, तितका तिने अधिक संयम बाळगला पाहिजे, विशेषकरून दंडात्मक अधिकारिता वापरताना."**

## ८. विशेषाधिकार भंगाची काही प्रकरणे (विधानसभा)

आजतागायत सभागृहाने विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणी शिक्षा सुनावलेली काही प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

**(१) "टाईम्स ऑफ इंडिया प्रकरण" (विधानसभा)**

विधानसभेत दिनांक २६ मार्च १९५३ रोजी श्री.एम.बी.शहा, वि.स.स. यांनी दंडाधिकारी व न्यायाधिश यांनी दारू परवाने बाळगणे यासंबंधी विचारलेल्या तारांकित प्रश्नाचे उत्तर वित्त, दारूबंदी व उद्योग मंत्री यांनी दिले होते. ज्या न्यायाधिशांना असे परवाने देण्यात आले होते त्यांची नावे सदस्यांनी पुरवणी प्रश्नाद्वारे विचारली असता या पुरवणी प्रश्नाचे उत्तर देखील सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सदस्यांना मिळणे आवश्यक आहे असे मा.अध्यक्षांनी सांगितल्यावरून त्याबाबतीची माहिती देण्यात आली.

सभागृहातील यासंबंधीच्या कार्यवाही वृत्तावर "टाईम्स ऑफ इंडिया" या दैनिकाच्या दिनांक २८ मार्च १९५३ रोजीच्या अंकातील "अवमानकारक" ह्या शीर्षकाखालील अग्रलेखात कडक टीका करण्यात आली होती. सदरहू अग्रलेखात "अवमानकारक", "योजनाबद्ध प्रयत्न", "हीन दर्जाचे कट कारस्थान", "जनतेच्याद्वारे निर्भत्सनेसाठी दंडाधिकारी व न्यायाधिश यांना अलग पाडणेची कृती ही जाणीपूर्वक प्रयत्नाचा भाग आहे. या पद्धतीत साहजिकच काही विशिष्ट हेतू दडलेला आहे." "क्षुद्र व दुय्यम दर्जाची कार्यपद्धती दुष्ट हेतूने व निंदा-नालस्ती करण्याच्या उद्दिष्टाने प्रेरित असलेली अशा प्रकारची ही संपूर्ण कार्यपद्धती" एकेकाळी आघाडीवर असलेल्या या राज्याच्या विधानमंडळाला शोभणारी नाही. परंतु, ज्यांना कोणतेही आदर्श व नियम माहिती नाहीत आणि त्यांचे ज्यांच्याकडून पालनही होत नाही अशा लोकांकडून मुलभूत शिष्टाचाराची व उत्तम अभिरूचीची अपेक्षा करणे कदाचित अतिशयोक्तीच ठरेल. असे शब्द वापरण्यात आले होते. शिवाय अशा प्रकारचा प्रश्न अमान्यच करावयास हवा होता असे देखील सदर अग्रलेखात सुचविण्यात आले होते.

सदरहू प्रकरण विशेषाधिकार समितीकडे सोपविण्यात आल्या नंतर समिती समोर महाअधिवक्ता व संपादकांचा सल्लागार या दोघांनी मांडलेला युक्तीवाद तसेच संपादकाने सादर केलेले बचावात्मक स्पष्टीकरण यांचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर समितीने बहुमताने असा निष्कर्ष काढला की, अग्रलेखात विशेषकरून सदस्यांवर आणि सर्वसाधारणपणे सभागृहावर हेत्वारोप केले असल्याने अग्रलेखातील टीकेने सभ्याचार, रास्त आणि संयुक्तिक भाष्य यांची मर्यादा ओलांडली गेली आहे, आणि अग्रलेखाचा संपूर्ण कल विधानमंडळाची प्रतिष्ठा जनमानसात कमी करण्याचा होता. समितीने संपादकास विशेषाधिकारभंगासाठी दोषी ठरविले व अशी शिफारस केली की, उक्त अग्रलेख

प्रसिद्ध करण्याच्या संपादकांच्या कृतिबद्दल सभागृहाने नापसंती व्यक्त करावी आणि जोपर्यंत "टाईम्स ऑफ इंडिया" बिनशर्त क्षमायाचना करीत नाही आणि ती प्रसिद्ध करीत नाही तोपर्यंत सदरहू वर्तमानपत्रास देण्यात येणाऱ्या सुविधा काढून घेण्यात याव्यात. सभागृहाने दिनांक १६ एप्रिल,१९५३ रोजी ठराव पारित करून त्याद्वारे सदरहू संपादकाने माफी न मागितल्यामुळे टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रासाठी देण्यात आलेल्या सुविधा काढून घेण्यात आल्या.

१७ वर्षाच्या कालावधीनंतर टाईम्स ऑफ इंडियाच्या संपादकांनी दिनांक ११ फेब्रुवारी १९७० रोजी एक पत्र पाठविले व त्यात असे नमूद केले की, या वृत्तपत्राने १७ वर्षे इतक्या प्रदीर्घ कालावधीची शिक्षा भोगली असून सदर कालावधीत त्याचे वर्तन देखील १९५३ साली विधानसभेने पारित केलेल्या ठरावाचा हेतू साध्य होईल असेच होते म्हणून टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रास वृत्तपत्रासाठीच्या सुविधा पूर्ववत सुरू करण्यात याव्यात अशी सदर पत्राद्वारे विनंती केली होती. फेरविचारानंतर आणि मुख्यमंत्र्यांनी दिनांक ८ मे १९७० रोजी प्रस्ताव मांडून तो सभागृहाने पारित केल्यावर टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रास वृत्तपत्रासाठीच्या सुविधा पूर्ववत सुरू करण्यात आल्या होत्या.

**(२) 'प्रभात' प्रकरण (विधानसभा)**

पुणे येथील 'प्रभात' दैनिकाच्या दिनांक १४ जून १९५७ च्या अंकात "मुंबई राज्याचे कायदेमंडळ व समितीचे आमदार" या मथळयाखाली एक अग्रलेख प्रसिद्ध करण्यात आला. तो अग्रलेख समग्र न देता त्यातील काही उतारे पुढीलप्रमाणे होते: " मुंबई राज्याच्या नव्या कायदेमंडळाची बैठक लवकरच येत्या १७ तारखेस सुरू होईल. प्रश्न असा उपस्थित होतो की, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभासदांचे धोरण काय असावे ?...महाराष्ट्रावर व मराठी जनतेवर नेहरु सरकारने व मोरारजींच्या सरकारने जबरदस्त अन्याय केला आहे. ही गोष्ट समितीच्या प्रतिनिधींनी सर्व काळ लक्षात ठेवली पाहिजे व या प्रश्नावर मराठी लोकमत किती जागृत, प्रक्षुब्ध आणि संतप्त आहे याची जाणीव अर्थात याचा चटका काँग्रेस मंत्रिमंडळाला हरघडी बसत राहील असेच वर्तन ठेवले पाहिजे. ज्याला पार्लमेंटरी रीतिरिवाज व शिष्टाचार म्हणतात त्याची सुद्धा तमा बाळगण्याचे कारण नाही .. संदर्भ असो नसो, प्रस्तुत विषयाचा संबंध असो नसो, गोळीबारांचा व स्थानबद्धतेचा उल्लेख हरघडी समितीच्या सभासदांनी करावा, मंत्री अथवा त्याचे पाठीराखे सभ्यतेचा व जबाबदारीचा आव आणून जेंव्हा जेंव्हा बोलू लागतात तेंव्हा तेंव्हा 'अहो शिष्टराज, त्या गोळीबाराच्या चौकशीचे काय करता?' असा गिल्ला आमच्या आमदारांनी केला पाहिजे, कायदेमंडळाला मंडईचे अथवा मच्छीबाजाराचे स्वरूप आणून दिले पाहिजे, अध्यक्षांनी अशा प्रसंगी

कसलेही रुलिंग दिले तरी ते धाब्यावर बसविले पाहिजे. सभागृह सोडून जाण्याचा हुकूम दिला तरी तो धुडकावून लावला पाहिजे, कायदेमंडळाची बैठक चालु असताना दररोज असले प्रसंग आमचे आमदार उपस्थित करतील तरच ते आपले कर्तव्य योग्य प्रकारे बजावीत आहेत असे मराठी जनता समजेल."

**हक्कभंग प्रस्ताव**

दिनांक २१ जून, १९५७ रोजी मुख्यमंत्री ना.यशवंतरराव चव्हाण यांनी या अग्रलेखामुळे निर्माण झालेल्या (विधानसभेच्या) विशेषाधिकारासंबंधी प्रश्न उपस्थित केला. सदरील अग्रलेखात सभागृहातील समितीच्या सभासदांना पुढील गोष्टी करण्यास प्रवृत्त करण्याचा अथवा त्या त्यांच्याकडून करविण्याचा प्रयत्न करण्यात आला असे त्यासंबंधीच्या प्रस्तावात म्हटले आहे :

(अ) सभागृहाबद्दल आणि विशेषतः सभागृहाच्या माननीय अध्यक्षांबद्दल अनादर व्यक्त करणारी कृत्ये करणे.

(ब) सभागृहाचे कामकाजात ज्यामुळे अडथळा येण्याचा संभव आहे अशी कृत्ये करणे.

(क) सभागृहाच्या आणि विशेषतः सभागृहाच्या माननीय अध्यक्षांच्या निदेशांचे उल्लंघन होईल अशी कृत्ये करणे.

(ड) विधानमंडळातील शिष्टाचाराची आणि रीतिरिवाजांची आणि माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयाची सर्वसाधारणपणे उपेक्षा करणे व ते धुडकावून लावणे, अशा तऱ्हेने सभागृहाच्या कामकाजात पूर्णपणे गोंधळ निर्माण करणे.

सदरहू प्रश्न सभागृहात उपस्थित करण्याची परवानगी मिळण्यासंबंधी मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव-सूचना दिली व त्या प्रस्तावावर सभागृहाचे मत अध्यक्षांनी विचारले. पंचवीसपेक्षा जास्त सदस्य मतदानाच्या वेळी उभे राहिल्याने प्रस्ताव मांडण्यास परवानगी दिली. ही सर्व बाब विशेषाधिकार समितीकडे सोपविण्यात आली. ही समिती दहा सदस्यांची नियुक्त करण्यात येऊन समितीला अहवाल सादर करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत देण्यात आली. दिनांक २४ जून १९५७ रोजी समितीने संबंधित दैनिकाचे संपादक, मुद्रक, प्रकाशक यांना त्यांनी विधानसभेच्या विशेषाधिकारांचा भंग केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध योग्य तो इलाज योजण्याची शिफारस का केली जाऊ नये याविषयी कारण दाखविण्यासाठी व दिनांक २९ जून, १९५७ रोजी समितीच्या बैठकीसमोर हजर राहण्यासाठी व पुरावा देण्यासाठी नोटीस दिली. प्रभात दैनिकाचे संपादक श्री.वा.रा.कोठारी व प्रकाशक आणि मुद्रक श्री. चंदुलाल गांधी यांनी आपली निवेदनपत्रे दिली ; परंतु समितीच्या कोणत्याही बैठकीस ते हजर राहिले नाहीत.

**'प्रभात' प्रकरणातील मुद्दे**

त्यांनी आपल्या निवेदनात प्रामुख्याने दोन प्रश्न उपस्थित केले :

(१) दिनांक १४ जून १९५७ रोजी योग्य रीतीने व कायदेशीरपणे स्थापन झालेली विधानसभा अस्तित्वात नव्हती.

(२) मुंबई विधानसभा नियमाप्रमाणे ही बाब म्हणजे नुकताच घडलेला प्रसंग नाही व त्यामुळे या बाबीची तपासणी करणे योग्य व कायदेशीर ठरणार नाही.

त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा समितीने सखोल विचार केला. समितीच्या मते पहिल्या प्रश्नाला फारसा आधार नाही. कारण सन १९५१ च्या लोकप्रतिनिधित्वाबाबत अधिनियम याच्या ७३ व्या कलमानुसार सार्वत्रिक निवडणुकीनंतर नियुक्त केलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत अधिसूचना काढण्यात येते व अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर त्या लोकसभेची किंवा विधानसभेची योग्य रीतीने रचना करण्यात आली असे समजण्यात येते. सार्वत्रिक निवडणुकीनंतर नियुक्त केलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात दिनांक ५ एप्रिल, १९५७ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती व त्या तारखेपासून विधानसभेची योग्य रीतीने रचना झालेली होती. पहिल्या प्रश्नाच्या निकालावरून दुसऱ्या प्रश्नातील समस्या शिल्लकच राहत नाही. समितीने निरनिराळ्या उताऱ्यांचा आधार घेऊन श्री.कोठारी व श्री.गांधी यांना दोषी ठरविले. मुद्रक व प्रकाशक यांना सभागृहाच्या न्यायासनापुढे बोंलावून त्यांची कडक कानउघडणी करण्याची समितीने शिफारस केली. संपादकांच्या बाबतीत समितीने वेगळा दृष्टीकोन घेऊन संपादकांना सभागृहाच्या न्यायासनापुढे बोलावून त्यांना त्यांच्या कृत्याबद्दल बिनशर्त माफी मागण्यास सांगावे अशी शिफारस केली. समितीने आपला अहवाल तयार केला व श्री. अहमदमिया शेख व आमदार साळोखे यांनी अहवालास भिन्न मतपत्रिका दिल्या.

**'प्रभात' प्रकरणी शिक्षा**

दिनांक २० जुलै, १९५७ रोजी संपादक व मुद्रक यांना विधानसभेत हजर राहण्यास कळविले. सुरुवातीस समितीचे अध्यक्ष आमदार भिरुड यांनी समितीचा अहवाल विचारात घ्यावा असा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर सभापती यांनी श्री.कोठारी यांना सभागृहात बोलावून आपले म्हणणे मांडण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणे श्री.कोठारी यांनी सभागृहास उद्देशून एक छोटेसे भाषण केले. या भाषणानंतर त्यांना सभागृहाबाहेर थांबण्यास सांगण्यात आले. मुख्यमंत्री

ना. यशवंतराव चव्हाण यांनी श्री.कोठारी व गांधी यांना सभागृहासमोर बोलावून त्यांच्या कृत्त्याबद्दल त्यांची 'कडक कानउघाडणी ' करण्याबाबत एक प्रस्ताव साभागृहासमोर मांडला. सभागृहाच्या प्रतिष्ठेचा हा प्रश्न असून त्याचा विचार पक्षातीत भुमिकेवरून व्हावा असे त्यानी आवाहन केले. विरोधी पक्षाने पक्षीय दृष्टिकोनातून या प्रस्तावाचा विचार करण्याचे ठरविल्याचे दिसले, पण विरोधी पक्षाचे नेते श्री. एस्.एम्. जोशी हे मात्र अपवाद ठरले. सभागृहाची प्रतिष्ठा टिकविण्याची आवश्यकता असल्याचे सांगून त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या ठरावाला पाठिंबा दिला. प्रस्तावात नमूद केलेली शिक्षा ही सौम्य करावी व कडक कानउघाडणी ऐवजी कानउघाडणीची शिक्षा करावी अशी सूचना केली. ती सूचना मान्य करण्यात येऊन प्रस्तावावर मतदान घेण्यात आले. प्रस्तावास २१० अनुकूल व ८६ प्रतिकूल मते पडून प्रस्ताव संमत झाला. त्यानंतर अध्यक्षांनी श्री.कोठारी व श्री.गांधी यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून सभागृहाच्या वतीने सभागृहाने सुचविलेली शिक्षा सुनाविली.

**(३) सभागृहाच्या कामकाजात अडथळा**

सभागृहाच्या कामाकाजात कित्येक वेळा तिऱ्हाईत इसमाकडून अडथळा आणला जातो. असे प्रकार सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने गुन्हे ठरविण्यात आले आहेत. मध्यप्रदेशात कूंदनमल नावाच्या इसमाने प्रेक्षकांच्या गॅलरीतून सभागृहात पत्रके टाकली. सदर इसमास पकडण्यात येऊन त्यास विधानसभेच्या अधिवेशनापर्यंत कारागृहाची शिक्षा देण्यात आली. राजस्थान विधिमंडळात १९५८ साली असे दोन प्रकार घडले. दिनांक १९ फेब्रुवारी १९५८ रोजी श्री.कल्याण सहाई नावाचा सरकारी कर्मचारी प्रेक्षकांच्या गॅलरीत बसला होता. सभागृहात चर्चा चालू असता तो आपल्या जागेवर उभा राहिला व मोठमोट्याने ओरडू लागला. दिनांक ११ एप्रिल १९५८ रोजी श्री.शर्मा नावाच्या इसमाने प्रेक्षकांच्या गॅलरीतून सभागृहाच्या कामाकाजात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. सभागृहाची चर्चा इंग्रजी भाषेतून का करता ? असा प्रश्न त्याने गॅलरीतून विचारला. या दोन्ही प्रसंगी संबंधित इसमांनी दिलगिरी प्रदर्शित केल्यामुळे विधानसभेने त्यांना सक्त ताकीद दिली.

**(४)** विधानसभेचे सदस्य श्री.आर.एस.पटेल यांना दिनांक १३ सप्टेंबर १९५३ रोजी अटक करण्यात आली. ही अटक वॉरंटशिवाय केलेली आहे व सन्माननीय सदस्यांना सभागृहात उपस्थित राहण्यास प्रतिबंध केला गेल्यामुळे ह्क्कभंग झाला आहे अशा अर्थाची नोटीस श्री.नौशेर भरूचा यांनी दिली विशेषाधिकार समितीने या प्रकरणाची चौकशी करून ह्क्कभंग नसल्याचे आपले मत जाहीर केले.

**(५)** विधानसभेचे सदस्य डॉ.आर.बी.चौधरी यांना दिनांक १३ फेब्रुवारी १९५८ रोजी अटक करण्यात आली. त्यांच्या अटकेची माहिती सभापतींना संबंधित अधिकाऱ्यांनी दिली नाही व त्यामुळे हक्कभंग

झाल्याची नोटीस देण्यात आली. समितीने अनेक साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या व समितीपुढे आलेल्या पुराव्यावरून डॉ.चौधरीना अटकच केलेली नव्हती असा निष्कर्ष विधानसभेस कळविला.

**(६) जुलै १९६३** च्या अधिवेशनास विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मंत्रिमंडळाविरूद्ध अविश्वासाच्या ठरावाची नोटीस दिली. तो ठराव सभापतींनी दाखल करून घेतला व ठरावाच्या चर्चेसाठी आठ दिवसांनंतरचा एक दिवस मुक्रर केला. दिनांक २ सप्टेंबर १९६३ रोजी प्रस्ताव मांडण्याची विधानसभेची रीतसर संमती देण्यात आली. दिनांक ३ सप्टेंबर १९६३ रोजी मुंबईच्या 'लोकसत्ता' दैनिकात निरर्थक व हास्यास्पद ठराव' या मथळ्याखाली एक अग्रलेख प्रसिद्ध करण्यात आला. दिनांक ६ सप्टेंबर १९६३ रोजी विरोधी पक्षाचे नेते श्री. कृष्णराव धुळूप यांनी हक्कभंगाची नोटीस दिली. दिनांक १८ एप्रिल १९६४ रोजी लोकसत्ताचे संपादक श्री. ह. रा. महाजनी यांनी दिलगिरी प्रदर्शित केली. त्यामुळे 'लोकसत्ता ' चे संपादक व प्रकाशक यांच्याविरुद्ध यापेक्षा जास्त कारवाई करण्याची आवश्यकता नाही असे समितीने सुचविले.

**(७) मुंबई महापालिकेकडून अवमान**

मुंबई महापालिकेने तहकुबीचा प्रस्ताव संमत केल्याने विधानसभेच्या हक्कभंगाचा प्रकार उद्‌भवला. दिनांक ३१ जुलै १९६४ रोजी महाराष्ट्र विधानसभेत वांद्रा येथील भाभा हॉस्पिटलच्या पडझडीच्या अनुषंगाने महापालिका व तिची शासनयंत्रणा यांच्यावर कडक टीका करण्यात आली. या चर्चेत श्री. पिंटो, डॉ. मंडलिक, डॉ. झकेरिया, श्री. खेर व श्रीमती कमर अहमद यांनी भाग घेतला, या चर्चेचा वृत्तान्त दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला. दिनांक ३ ऑगस्ट १९६४ रोजी महापालिकेची बैठक ठरलेली होती, विधानसभेतील सदस्यांच्या भाषणाच्या निषेधार्थ त्या बैठाकीत तहकुबीचा प्रस्ताव संमत करण्यात आला. महापालिकेची बैठक महापौर श्री. इसाकभाई बंदुकवाला यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. तहकुबीचा प्रस्ताव मांडला सभागृहाचे नेते श्री. एम. माधवन यांनी व त्यास श्री. वामन बापट यांनी अनूमोदन दिले. विधानसभेतील चर्चेने महापालिकेच्या प्रतिष्ठेला धक्का बसला, राज्य सरकारला महापालिकेच्या कारभारात हस्तक्षेप करता येत नाही इत्यादी मुद्दे मांडताना विधानसभेतील चर्चेत भाग घेणाऱ्या सदस्यांवर टीकाही करण्यात आली.

दिनांक ४ ऑगस्ट १९६४ रोजी डॉ. मंडलिक व श्री. खेर यांनी महापालिकेच्या ठरावाने विधानसभेचा हक्कभंग झाल्याची तक्रार मांडली. याबाबतची सूचना मांडण्यास परवानगी देताना उपाध्यक्ष म्हणाले की, "ही तक्रार गंभीर स्वरूपाची असून महापालिकेचा ठराव सभागृहाच्या अधिकाराला व इभ्रतीला आव्हान करणारा आहे. मद्रास पालिकेने विधानसभेतील कामकाजाबाबत

असाच ठराव केला असताना तो हक्कभंगाचा प्रकार मानण्यात आला होता", सदर प्रस्ताव मांडण्यास सभागृहाने परवानगी दिल्यावर तो विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात आला.

तहकुबीचा प्रस्ताव संमत करण्यामागे आपले संरक्षण समर्थन करण्याची इच्छा होती अशी महापालिकेतर्फे बाजू मांडण्यात आली समितीने त्यांचे म्हणणे ग्राह्य न धरता महापालिकेने विधानसभेचा व तिच्या सदस्यांचा हक्कभंग केला व विधानसभेचा अवमान केला असा अहवाल सादर केला. महापालिकेवर राज्य सरकारचे नियंत्रण आहे व तिच्या कोणत्याही बाबीची पाहणी करण्याचा विधिमंडळाला अधिकार आहे असे मत अहवालात नमुद करून महापालिका व तिच्या बैठकीतील चर्चेत भाग घेणाऱ्या सदस्यांना दोषी ठरविले.

विधिमंडळाला हा अहवाल सादर केल्यापासून सहा आठवड्यांच्या आत मुंबई महापालिकेने हा ठराव रद्द न केल्यास शासन म्हणून दहा हजार रूपये दंड करण्याची आणि याच मुदतीत बैठकीचे अध्यक्ष श्री.बन्दुकवाला व विधानसभेवर टीका करणारे सर्वश्री एम.माधवन, बी. एन. ढबूवाला, आर. बी. मोरे, ए. एस. जरीवाला, लिंगण्णा पुजारी, एच. पी. अडवाणी व बी. के बोमन बेहराम यांनी बिनशर्त माफी न मागितल्यास त्यांना सभागृहाच्या "बारपुढे" बोलावून ताकीद देण्याची सूचना समितीने केल्या. श्री. वामन बापट हे दोषी असले तरी ते महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आल्याने त्यांच्याबाबतची जी काही कारवाई करावयाची ती विधानपरिषदेने करावी असेही अहवालात सूचविण्यात आले.

**(८) सदस्यांचे खाजगी वर्तन व हक्कभंग**

विधानमंडळाच्या सदस्यांचे खाजगी वर्तन हा विशेष हक्कभंगाचा विषय होतो किंवा नाही यासंबधी महाराष्ट्र विधानसभेत प्रश्न उपस्थित झाला होता. आमदार निवासात दोन आमदारांनी दारु पिऊन गोंधळ केला ही बातमी वर्णनासह 'तरुण भारत' या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली. तोच मजकूर मुंबईच्या "संध्याकाळ" या पत्रात छापण्यात आली. ही बातमी प्रसिद्ध झाल्यावर आमदार निवासात व विधानसभेच्या आवारात खळबळ उडाली व ज्याच्या त्याच्या तोंडी तो चर्चेचा विषय बनला. 'तरुण भारत' मध्ये आलेल्या मजकुरासंबंधी 'तरुण भारत ' चे संपादक व प्रतिनिधी श्री.बा.न.मग्गीरवार यांच्याविरुद्ध डॉ. मंडलिक यांनी लागलीच विधानसभेत हक्कभंगाची नोटीस दिली. तशाच प्रकारची नोटीस विधानपरिषदेत आमदार राजहंस यांनी दिली.या सूचनेवर विधानसभेत दिनांक १ एप्रिल १९६६ रोजी श्री. बाळासाहेब भारदे व विधानपरिषदेत श्री.वि.स.पागे यांनी निर्णय देऊन त्या सूचना अस्वीकृत केल्या या अस्वीकृतीबाबत आपला निर्णय देताना श्री.भारदे म्हणाले, "प्रसिद्ध झालेल्या बातमीत आरोप गंभीर स्वरुपाचे असले तरी सभागृहाच्या हक्कभंगाचा विचार करताना हा सभागृहाच्या सन्माननीय सभासद या नात्याने कार्य करीत असताना त्यांच्या कार्यात

काही बाधा येत असेल तर तो हक्कभंगाचा विषय होऊ शकेल. पंरतू सभासदाच्या व्यक्तीगत स्वरूपाच्या बाबी या विशेष हक्कभंगाचा विषय होऊ शकत नाही. "सभापतींच्या या निर्णयावर विरोधी पक्षीय आणि कॉंग्रेस पक्षीय आमदारांनी या निर्णयाचा फेरविचार करावा अशी विनंती करणारी भाषणे केली. सभागृहात आमदारांनी व्यक्त केलेल्या मतांचा परामर्श घेताना श्री. भारदे म्हणाले आमदार हे एरव्ही समाजात वावरतात तसे ते आमदार निवासातही वावरतात. आमदार निवासात राहिल्यामुळे परिस्थिती बदलत नाही. हाच प्रकार जर आमदार निवासाबाहेर घडला असता तर तो हक्कभंगाचा विषय ठरला असता काय? अशा घटना बाहेर घडत असतात आणि त्याबद्दल वृत्तपत्रातूनही बातम्या प्रसिद्ध होतात. ही घटना दोन्ही अर्थाने गंभीर आहे. ती सत्य असेल तर गंभीर आहे आणि असत्य असेल तरी गंभीर आहे. यासंबधी माझ्याकडे एक लक्षवेधी सूचना आली आहे ती मी मंजूर केली आहे. शासन त्या सूचनेवर काय परिस्थिती आहे त्यासंबधी निवेदन करील."

**(९) "श्री.धोटे" प्रकरण (विधानसभा)**

दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीपुढे राज्यपालांचे अभिभाषण चालु असताना सदस्यांनी केलेल्या अशिष्ट व अशोभनीय वर्तनामुळे झालेला सभागृहाचा विशेष हक्कभंग व अवमान.

दिनांक ८ फेब्रुवारी १९६८ रोजी श्री. प्राणलाल व्होरा, वि.स.स. यांनी "दिनांक ७ फेब्रुवारी १९६८ रोजी श्री. जांबुवंतराव बा. धोटे, वि.स.स. यांनी माननीय राज्यपालांचे अभिभाषण चालू असताना सतत घोषणा देऊन, राज्यपालांचे आदेश धुडकावून लावून आणि सभागृहाचे आत व सभागृहाबाहेर लॉबीमध्ये बेशिस्त वर्तन करून जाणूनबुजून सभागृहाच्या कामकाजामध्ये व्यत्यय आणून सभागृहाचा केलेला तथाकथित विशेषहक्कभंग व अवमान याबाबत सूचना दिली.

दिनांक ८ फेब्रुवारी १९६८ रोजी अध्यक्षांनी विशेष हक्कभंगाचा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित करण्यास अनुमती दिली आणि सभागृहाने अनुमती दिल्यानंतर अध्यक्षांनी हा प्रश्न, त्याची तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी विशेष हक्क समितीकडे पाठविला, समितीचे कामकाज चालू असताना श्री.धोटे यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले (१) राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी सभागृह रीतसर घटीत झाल्याचे समजण्यात येते काय, (२) राज्यपालांचे अभिभाषण हे सभागृहासमोरील कार्यवाहीचा भाग होतो काय, (३) यावेळी सभागृहाचे कामकाज कोण चालवितो, आणि (४) एकाच प्रकारच्या गुन्ह्याबाबत न्यायालयात आणि समितीसमोर एकावेळी कामकाज चालणे योग्य व रीतसर आहे काय? मुद्दे क्रमांक (एक) ते (तीन) बाबत समितीने असा निष्कर्ष काढला की, हे मुद्दे अन्य संदर्भात महत्त्वाचे असले तरी सध्याच्या कार्यवाहीशी त्यांचा काहीच संबंध नाही कारण या प्रकरणातील गुन्ह्यांचे स्वरुप, अशोभनीय आणि अप्रतिष्ठित वर्तन करणे आणि राज्यपाल संविधानानुसार पार पाडीत असलेल्या कर्तव्याच्या वेळी त्यांचा अनादर करणे आणि राज्यपालांचे

अभिभाषण सदस्याने विनयाने आणि शिष्टाचाराला धरुन ऐकणे असा संविधानाने संकेत घालून दिलेला असला तरी त्याबद्दल अनादर दाखविणे आणि संविधानाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतलेली असतानाही तसे वर्तन न करणे असे गंभीर स्वरुपाचे आहे. मुद्दा क्र.(चार) म्हणजे न्यायालय आणि समिती ह्यांच्यासमोर एकाच वेळी कारवाई चालू राहाणे याबाबत समितीने असे नमूद केले की तसे करण्यास काहीही हरकत नव्हती तरी समितीपुढे सुरू असलेली चौकशी होईपर्यंत फौजदारी न्यायालयाने त्या प्रकरणी आपले कामकाज स्थगित केले होते.

श्री.धोटे यांनी सभागृहाचा विशेष हक्कभंग व अवमान केला आहे असा निष्कर्ष समितीने काढला. समितीने असाही निष्कर्ष काढला की, लोकसभेतील संसदीय समिती आणि विशेष हक्क समिती या दोन्ही समित्या संसदीय समित्या असून त्यांना अशा प्रकरणाची चौकशी करण्याचे योग्य ते अधिकार असल्यामुळे हा प्रश्न विशेष हक्क समितीकडे विचारार्थ न पाठविता लोकसभेतील संसदीय समिती सारख्या समितीकडे विचारार्थ पाठविणे उचित होईल अशा आशयाच्या युक्तिवादात (जो हे प्रकरण समितीकडे विचारार्थ पाठविण्याची कारवाई सभागृहामध्ये चालू असताना मांडण्यात आला होता) काहीही तथ्य नाही. त्यात काहीही असले तरी असे वर्तन केल्याने सभागृहाचा विशेष हक्कभंग होतो व अवमान होतो असा एकदा निष्कर्ष काढल्यावर हे प्रकरण विशेष हक्क समितीपुढे जाणेच योग्य होते.

म्हणून श्री. धोटे, वि.स.स. यांचे सभागृहाचे सदस्यत्व अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी स्थगित करावे अशी समितीने शिफारस केली. सभागृहाने हा अहवाल स्वीकारल्यानंतर एका आठवड्याच्या आत त्यांनी बिनशर्त माफी मागितल्यास त्यांना माफी देण्यात यावी अशी देखील समितीने शिफारस केली.

दिनांक ३० जुलै १९६९ रोजी मुख्यमंत्र्यांनी समितीच्या शिफारशी स्वीकारण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहात मांडला तथापि सदर प्रस्तावाला, राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळेस श्री.धोटे यांनी केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल त्यांना समज देण्यात यावी अशी सुधारणा मांडण्यात आली व ती सुधारणा सभागृहाने संमत केली आणि त्यानुसार त्याच दिवशी अध्यक्षांनी श्री.धोटे यांना समज दिली.

**(१०) "मराठा" प्रकरण (विधानसभा १९६४-६६)** - "दै. मराठा" या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वृत्तातून उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग प्रकरणी दै. मराठाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. प्र. के. अत्रे यांना समज देण्यात यावी अशी शिफारस समितीने केली. तथापि श्री. अत्रे यांनी सभागृहाची बिनशर्त माफी मागितल्यानंतर प्रकरण संपविण्यात आले.

**(११) <u>श्री. ढाकणे प्रकरण (विधानसभा १९६८)</u>** - श्री. बबनराव ढाकणे यांनी मा. अध्यक्षांच्या गॅलरीतून सभागृहामध्ये घोषणा देऊन व पत्रके फेकून सभागृहाच्या कामकाजात अडथळा व व्यत्यय आणल्याप्रकरणी श्री. ढाकणे यांना ७ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

**(१२) <u>"मुंबई सकाळ" प्रकरण (विधानसभा १९८१-८४)</u>** - दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्रात लिहिलेल्या लिखाणातून उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग प्रकरणी दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्राचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. माधव गडकरी यांना सभागृहाची तीव्र नापसंती कळविण्यात आली होती.

**(१३) <u>"आपलं महानगर" प्रकरण (विधानसभा १९९२-९४)</u>** - "आपलं महानगर" या सायंदैनिकात प्रसिद्ध केलेल्या लिखाणातून उद्‌भवलेल्या हक्कभंग प्रकरणी "आपलं महानगर" या सायंदैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. निखिल वागळे यांना ३ दिवसांची कारावासाची शिक्षा तसेच विशेष हक्क समितीच्या अधिकाराचा अधिक्षेप करणारे आव्हानात्मक पत्र लिहिल्याबद्दल अतिरिक्त एक दिवस अशी एकूण ४ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

**(१४) <u>"दै.देशोन्नती" प्रकरण (विधानसभा २००१-२००३ )</u>** - "दै. देशोन्नती" या अकोला येथून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रात पंचायती राज समिती संबंधातील आक्षेपार्ह मजकुरातून उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या प्रकरणी सदर दैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री.प्रकाश पोहरे यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलाविण्यात येऊन समज देण्यात आली.

**(१५) <u>"दै.मापदंड" प्रकरण (विधानसभा २००१-२००४)</u> -** "दै. मापदंड" या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या संपादकी यात विधीमंडळाच्या पंचायती राज समितीवर करण्यात आलेल्या टिकाटिप्पणीमुळे उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी सदर दैनिकाचे संपादक श्री. संजय जेवरीकर यांनी समितीसमोर व्यक्त केलेली माफी तसेच प्रसिध्द् केलेली जाहीर दिलगिरी विचारात घेऊन प्रकरण संपविण्यात आले.

**(१६) <u>"श्री. मनजितसिंग सेठी" प्रकरण (विधानसभा २००५)</u>** - राज्याचे उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी विधानसभेत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने श्री. मनजितसिंग सेठी, अध्यक्ष, बार मालक असोसिएशन यांनी धमकीवजा शब्दात त्याचा निषेध केल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. मनजितसिंग सेठी यांना ९० दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सभागृहाने अहवाल विचारात घेऊन शिफारस संमत केली व त्यानुसार श्री.मनजितसिंग सेठी यांना ९० दिवसांच्या कारावासात पाठविण्यात आले. परंतु श्री. मनजितसिंग सेठी यांनी ९० दिवसांपैकी २९ दिवसांची शिक्षा भोगली व त्या दरम्यान श्री.मनजितसिंग सेठी यांनी शिक्षेविरुद्ध मा. उच्च न्यायालयात दोन याचिका सादर केल्या त्या मा.उच्च न्यायालयाने फेटाळल्या असल्याने

श्री.मनजितसिंग सेठी यांनी त्याविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिलात मा.सर्वोच्च न्यायालयाने शिक्षेला अंतरीम स्थगिती दिली परीणामी त्यांना दिलेल्या शिक्षेची पूर्ण अंमलबजावणी होऊ शकली नाही व सद्यस्थितीत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात निर्णयार्थ प्रलंबित आहे. (हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे - मे, २०१३)

**(१७) "साप्ताहिक ससेमिरा" प्रकरण (विधानसभा २००६-२००७)** - मा. अध्यक्ष, विधानसभेचे अध्यक्ष या नात्याने आपले कर्तव्य बजावत असताना मा.अध्यक्षांविषयी टिकाटिप्पणी करणारी, त्यांची बेअदबी व अवमान करणारी तसेच त्यांची जनमानसातील प्रतिमा डागाळणारी वस्तुस्थितीशी विसंगत विधाने प्रसिद्ध केल्यामुळे उद्‌भवलेल्या मा.अध्यक्षांच्या व महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी साप्ताहिक ससेमिराचे संपादक व प्रकाशक श्री. मधुकर लोंढे यांना १० दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सभागृहाने अहवाल विचारात घेऊन शिफारस संमत केली व त्यानुसार श्री.मधुकर लोंढे यांनी १० दिवसांची कारावासाची शिक्षा भोगली.

**(१८) "श्री. नंद लाल" प्रकरण (विधानसभा २००६-२००८)** - विधानसभा विशेष हक्क समितीने मागविलेला खुलासा स्वतःचे स्वाक्षरीने पाठविण्यास टाळाटाळ करून तसेच सदरहू सूचनेच्या अनुषंगाने समितीसमोर साक्षीसाठी उपस्थित राहण्यास नकार दिल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. नंद लाल, तत्कालीन राज्य निवडणुक आयुक्त यांना २ दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सभागृहाने समितीचा अहवाल विचारात घेऊन शिफारशीत केलेल्या ७ दिवसांच्या कारावासाऐवजी २ दिवसांच्या कारावासाच्या शिक्षेची शिफारस संमत केली व त्यानुसार श्री. नंद लाल यांनी २ दिवसांची कारावासाची शिक्षा भोगली. या शिक्षेविरुद्ध श्री.नंद लाल यांनी मा.उच्च न्यायालयात आव्हान दिले. मा.उच्च न्यायालयाने विधानसभेचा निर्णय कायम ठेवत याचिका निकाली काढली. त्याविरुद्ध श्री.नंद लाल यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केले व सद्यःस्थितीत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. (हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे - मे २०१३)

**(१९) "श्री. जी.एन.वळवी " प्रकरण (पुर्नविलोकीत) (विधानसभा २०१०-२०१२)** - मा.विरोधी पक्ष नेत्यांविरुद्ध जिल्हा पोलीस प्रशासनाकडे अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची तक्रार करून तसेच ह्या विषयी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करून श्री.वळवी यांनी त्यांच्यावर असलेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांची चौकशी दडपण्यासाठी दबाव आणल्यामुळे उद्‌भवलेल्या विरोधी पक्ष नेते, विधानसभा

यांच्या व महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष हक्कभंगाचे व अवमानाचे प्रकरणी दिनांक १३ एप्रिल, २०१२ रोजी सभागृहाने श्री. जी. एन. वळवी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल,जि.जळगाव यांच्याविरुद्ध दिनांक १७ मार्च २०१० रोजी मा.अध्यक्षांकडे विशेषाधिकार भंगाची सूचना दिली होती.

दिनांक २३ एप्रिल,२०१० रोजी सभागृहाने अनुमती दिल्यानंतर ही बाब विशेष हक्क समितीकडे पाठविण्यात आली.

समितीचा अहवाल दिनांक ८ डिसेंबर, २०१० रोजी सभागृहास सादर करण्यात आला होता. विशेष हक्क समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्यात आल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांनी अहवालातील शिफारशी सभागृहाने स्वीकारण्या संदर्भात असा प्रस्ताव मांडला होता की, "श्री.जी.एन.वळवी, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प यावल, जिल्हा जळगाव यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलवून समज देण्यात यावी" मात्र या मांडलेल्या प्रस्तावास सभागृहात काही सन्माननीय सदस्यांनी असहमती दर्शवून सदरहू प्रकरण गंभीर असल्यामुळे अधिक कठोर कारवाईची आवश्यकता असल्याने सदरहू प्रकरण पुनश्चः विशेष हक्क समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे अशी विनंती केली. मा.अध्यक्षांनी सभागृहाची एकदंरीत भावना लक्षात घेऊन तसेच सर्व गटनेत्यांशी केलेल्या चर्चेनंतर सभागृहाच्या अनुमतीने सदरहू प्रकरण पुनःश्च विचार करण्याकरिता समितीकडे पाठविण्यात यावे असे निदेश दिले.

या प्रकरणी समितीने पुनर्विचारांती असा निर्णय घेतला की, यापुढे अशाप्रकारच्या प्रकरणामध्ये एक उदाहरण (Example) कायम व्हावे म्हणून श्री.जी.एन. वळवी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल,जि.जळगाव यांच्या संदर्भातील विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणात त्यांना ३ (तीन) दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस समितीने दिनांक १३ एप्रिल, २०१२ रोजी सभागृहास सादर केलेल्या पुनर्विलोकित अहवालात केली.

सदर अहवाल विचारात घेताना सभागृहाने सदर ३ (तीन) दिवसांच्या कारावासाच्या शिक्षेऐवजी २ (दोन) दिवसांच्या कारावासाची शिक्षा देण्यात यावी असा सुधारीत ठराव मंजूर केला व त्यानुसार श्री. जी. एन. वळवी, यांनी दोन दिवसांची कारावासाची शिक्षा भोगली.(दिनांक १४/४/२०१२ ते दिनांक १५/४/२०१२)

## ९. विधानमंडळाची समिती पद्धती

**समिती पद्धती :**

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार संसदीय शासनपद्धती आपण स्वीकारली आहे संसदीय शासन प्रणालीच तीन अंगे आहेत. (Institutional components)

(१) विधीमंडळ (Legislature)

(२) कार्यकारी मंडळ (Executive)

(३) न्यायमंडळ (Judiciary)

या मंडळाची कामे खालीलप्रमाणे आहेत :-

लोकशाही राज्य व्यवस्थेत जनता ही सार्वभौम असते. (Will of the People is Supreme) आणि जनतेच्या मताचे प्रतिबिंब लोकनियुक्त विधान मंडळात पडते. अतः सार्वभौम अशा जनतेच्या आशाआकांक्षा फलद्रूप करण्याच्या उद्देशाने व प्रशासन चालविण्यासाठी जनकल्याणार्थ असे कायदे करण्याचे काम विधीमंडळाकडे सोपविले आहे. कायद्याची म्हणजेच अधिनियमाची अंमलबजावणी कार्यकारी मंडळ करते व त्याचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायमंडळाकडे सोपविली आहे. शासनाच्या तीन अंगापैकी विधिमंडळाचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे.

संसदीय शासन प्रणालीमध्ये (Parliamentary form of Government) कार्यकारी प्रशासन म्हणजेच मंत्रिमंडळ (Council of Ministers) हे विधीमंडळास जबाबदार असते (Responsible to the Legislature) व ते संयुक्त जबाबदारीच्या तत्वाने कार्य करते (Principal of Collective responsibility). यासाठी विधीमंडळाला कार्यकारी मंडळाच्या कामावर नियंत्रण ठेवावे लागते. अशा प्रकारचे नियंत्रण वैधानिक (Legislative) आर्थिक (Financil) व टिकात्मक (Critical) या माध्यमातून ठेवले जाते, ही कार्ये पार पाडण्यासाठी विधानमंडळ सदस्यांना विविध संसदीय आयुधांचा वापर करावा लागतो.

भारताने आपल्या संविधानानुसार संसदीय लोकशाहीचा व शासनासाठी जबाबदार मंत्रिमंडळ पद्धतीचा अवलंब केला आहे (Responsible Cabinet System) प्रशासनातील सर्व महत्त्वाच्या बाबी विधानमंडळात चर्चेसाठी याव्यात यासाठी संविधानात तरतुदी केल्या आहेत. तसेच विधीमंडळाच्या सभागृहाच्या कार्यपद्धतीविषयक नियमानुसार सभागृहाचे कामकाज चालते. संविधानानुसार अर्थसंकल्प विधिमंडळाच्या सभागृहांना सादर करावा लागतो. विधीमंडळाच्या संमतीशिवाय शासनाला कोणताही कर बसविता येत नाही अगर कोणतीही रक्कम खर्च करता येत नाही. शासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर चर्चा करताना निरनिराळया विभागांच्या कारभारावर टिका करता येते. तसेच स्थगन प्रस्ताव, अविश्वास प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, प्रश्नोत्तरे इत्यादी संसदीय आयुधांद्वारे शासनावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी विधीमंडळ पार पाडीत असते. याशिवाय राज्य शासनाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळ समित्या नियुक्त करण्यात येतात. या समित्या म्हणजे विधीमंडळाचे दोन चक्षू व एक लगाम आहेत.

संसद ही जनतेच्या आशा-आकांक्षा साकार करीत असते. म्हणून सार्वजनिक धोरण जनतेच्या आशा-आकांक्षानुरुप राबविले जाते किंवा नाही यादृष्टीने त्यावर देखरेख ठेवण्यास संसद समर्थ असणे जरुरीचे आहे. तथापि, राज्याच्या सध्याच्या कामकाजाच्या विस्तारित आणि गुंतागुंतीच्या स्वरुपामुळे संसद किंवा विधानमंडळ प्रशासनाची छाननी परिणामकारकरितीने करु शकत नाही किंवा त्यांच्यापुढे येणाऱ्या, गुंतागुंतीच्या, प्रशासकीय, वैधानिक आणि शासकीय समस्यांसाठी पुरेसा वेळ व लक्ष देऊ शकत नाही सभागृहापुढे कामकाजासाठी उपलब्ध असलेला कालावधी मर्यादित असतो

आणि त्यातील बराचसा वेळ विधी विधानविषयक प्रस्ताव विचारात घेण्यात किंवा कार्यसूचीपत्रिकेवरील नेहमीच्या बाबी निकालात काढण्यात खर्च होतो. विधानमंडळासमोर येणारी शासनाची पुष्कळशी वित्तीय आणि अन्वेषक स्वरूपाची कामे तांत्रिक स्वरूपाची असल्याने त्यावर अर्थपूर्ण रीतीने व परिणामकारकपणे चर्चा आणि विचार करणे संपूर्ण सभागृहाला कठीण जाते. विधीविधान, अशासकीय सदस्यांची विधेयके यासह संसदीय कामकाजाचा बराचसा भाग तसेच शिक्षण, समाजकल्याण आणि आरोग्य इत्यादी बाबींवरील चर्चा देखिल व्यवस्थितरित्या पार पाडणे शक्य होत नाही त्यामुळे उपयुक्त पर्याय म्हणून समिती पद्धतीचा अंगीकार विधीमंडळात करण्यात येतो.

समिती पद्धतीचा हेतू हा आहे की, प्रशासनाच्या गुंतागुंतीच्या व तांत्रिक स्वरूपांच्या बाबींचा विचार करण्याची जबाबदारी सभागृहातील ठराविक सदस्यांवर (न्यूक्लिअस) सोपविण्यात यावी व त्यायोगे समितीचा संसदीय आयुध वा सभागृहाच्या हातचे साधन म्हणून वापर करावा. सर्व लोकशाही राज्यामध्ये समिती पद्धत सारखीच असली तरी वेगवेगळया देशात या पद्धतीची रचना वेगवेगळी असल्याचे दिसून येते. तथापि, त्यामध्ये एक समान वैशिष्ट असे आहे की, समित्या हया विधानमंडळाची निर्मिती असून त्या साहजिकच विधानमंडळास दुय्यम असतात. समित्यांना सर्व अधिकार विधान मंडळापासूनच प्राप्त होतात (They derive authority from the Legislature) या समित्यांनाच "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती असे संबोधले जाते. सदर समित्या विधानमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत काम करतात आणि आपले अहवाल विधानमंडळाला सादर करतात.

संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये समिती पद्धती निर्माण करण्यास जे घटक कारणीभूत ठरले त्यापैकी काही घटक खालीलप्रमाणे आहेत :-

(१) विधानमंडळ सभागृहाच्या सदस्यांची संख्या मोठी असल्यामुळे त्यांना कुठलेही प्रकरण मुद्देसूद आणि सखोल छाननी करून तपासणे कठीण असते.

(२) सभागृहातील चर्चेवर बहुधा पक्षीय राजकारणाचा प्रभाव असतो. याउलट समितीला, राजकारण आड येऊ न देता पक्षविरहित पद्धतीने आपले काम पार पाडणे शक्य होते.

(३) समितीमध्ये सर्वसाधारण गुणवत्तेच्या आधारावर निष्कर्ष काढले जातात त्यामुळे समिती स्थापन करण्याचा उद्देश अधिक चांगल्याप्रकारे साध्य होतो.

(४) समित्यांकडे सोपविलेल्या निरनिराळया विषयांचे परीक्षण करताना विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेणे शक्य होते. तथापि, सभागृहास तसे करणे शक्य नसते.

(५) समित्यांना प्राप्त झालेल्या विस्तृत माहितीचा अभ्यास करण्याची संधी याद्वारे प्राप्त होते आणि शासनाचा कारभार आणि समस्या यातील गुंतागुंतीची माहिती करून घेणे सदस्यांना शक्य होते. विविध विषयांवरील कागदपत्रांचा अभ्यास आणि शासनाच्या प्रतिनिधींची तपासणी केल्यानंतर सदस्यांना जनतेच्या गाऱ्हाण्यासंबंधात सुधारात्मक उपाययोजना शोधून काढणे आणि प्रशासनात सुधारणा घडविण्यासाठी मार्ग सुचविणे सुकर होते.

(६) सभागृहाच्या तुलनेत समितीला प्रशासनाच्या विविध विषयांचा अभ्यास करण्यासाठी आणि गुणदोषांचे सम्यदृष्टीने मूल्यमापन करण्यासाठी भरपूर वेळ असतो, आणि

(७) सदस्यांचा जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी सतत संपर्क येतो. परिणामी सदस्यांना लोकांच्या अडचणी आणि गाऱ्हाणी चांगल्या रीतीने माहिती असतात. त्यामुळे अशा अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने त्या शासनाच्या प्रतिनिधीकडे ते योग्य रीतीने मांडू शकतात.

समित्या पक्षविरहित पद्धतीने काम करतात. त्यामुळे त्यांच्याकडे आलेल्या बाबी पक्षीय अभिनिवेशरहित पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात. याच कारणांसाठी अहवालाला भिन्न मतपत्रिका जोडण्याची मुभा देण्यात येत नाही. समित्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली कामकाज करतात, साक्षीदारांना बोलाविण्याचा आणि त्यांची तपासणी करण्याचा समित्यांना हक्क आहे. समित्या शासनाकडून कोणतीही माहिती, दस्तऐवज, कागदपत्रे इत्यादी मागवू शकतात. समितीचे कामकाज गोपनीय असते. त्यामुळे कामकाजाचा तपशील प्रसिद्धीकरिता देता येत नाही. समिती किंवा समितीच्या उपसमित्यांसमोर सादर करण्यात आलेली कागदपत्रे, समितीपुढे देण्यात आलेला साक्षीपुरावा किंवा कामकाजाच्या वेळी त्यांच्या बैठकींमध्ये झालेली चर्चा प्रसिद्ध करता येत नाही. अशासकीय सदस्य हा नेहमी समिती प्रमुख असतो आणि तो अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित केला जातो. लोकलेखा समितीचा समिती प्रमुख हा संकेतानुसार विरोधी पक्षाचा असतो. सर्वसाधारणपणे मंत्री विधानमंडळ समित्यांचे सदस्य नसतात. समित्यांच्या रचनेचे घटक म्हणून अनेक प्रकारच्या समित्यांचे वर्गीकरण केले जाऊ शकते. पीठासीन अधिकाऱ्यांकडून स्थायी समित्या वैधानिक समित्या, प्रवर समित्या, संयुक्त समित्या आणि तदर्थ समित्या वेळोवेळी नामनिर्देशित केल्या जातात. वित्तीय समित्या (लोकलेखा समिती, अंदाज समिती व सार्वजनिक उपक्रम समिती) कार्यपद्धतीविषयक समित्या, (नियम व कामकाज सल्लागार समिती), विशेष हक्क समिती, सुखसोयी समिती, (आवास व सदस्यांचे वेतन व भत्ते) दक्षता समिती, (प्रत्यायोजित विधिविधान आश्वासन समिती), महिलांचे हक्क व कल्याण समिती (महिला व बालकल्याण विषयक समिती) इत्यादी वेगवेगळया विषयासंबंधीच्या समित्या देखील आहेत.

ह्या समित्यांना संसद/विधानमंडळ सचिवालयाकडून सचिवालयीन सहाय्य पुरविले जाते. संसदेच्या काही समित्यांची प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीनुसार निवड केली जाते. तर उर्वरित समित्या अध्यक्ष/सभापती यांच्याकडून नामनियुक्त केल्या जातात.

स्टॅफोर्ड क्रीप्स यांच्या मते, समिती पद्धतीची कार्यक्षमता खालील बाबींवर अवलंबून असते :-

(१) संबंधित विषयामध्ये खरी आस्था दाखवून काम करण्याची तयारी असणाऱ्या सर्व पक्षांच्या पुरेशा सदस्यांना समितीत एकत्र आणणे.

(२) विषयाचे गाढे आणि विस्तृत ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीकोनातून सदस्यांचे सदस्यत्व व त्यांची उपस्थिती याबाबतच्या सातत्याची खात्री करणे.

(३) उत्तम असे उत्कृष्ट प्रशासन निर्माण करण्याची अपेक्षा ठेवून समित्यांमध्ये सामुहिक प्रयत्नाचे वातावरण तयार करणे.

उपरोक्त पद्धतीनुसार समिती पद्धत अधिक परिणामकारक होण्यासाठी खालील उपाययोजना करणे आवश्यक आहे :-

(अ) समित्या गठीत करताना ज्या सदस्यांना कायद्याचे पुरेसे ज्ञान आहे अशा सदस्यांना उपविधान समितीवर नेमण्यात यावे आणि ज्या सदस्यांची स्वाभाविक प्रवृत्ती अर्थशास्त्राकडे असून त्यामध्ये त्यांना विशेष रस आहे अशा सदस्यांना वित्तीय समित्यांवर नेमण्यात यावे. ज्या सदस्यांना स्थानिक किंवा नगरपालिकेच्या ग्रामपंचायतीच्या कार्यामध्ये पुरेशी आस्था आहे अशा सदस्यांना पंचायती राज समितीसारख्या समितीवर नेमण्यात यावे. समाजशास्त्र, महिला आणि बालकल्याण या विषयात ज्यांना रस आहे. विशेषतः महिला सदस्यांना महिलांचे हक्क व कल्याण समितीवर नेमण्यात यावे. अशाप्रकारे विशिष्ट समितीवर योग्य सदस्य नेमणे ही त्या समितीचे कार्य परिणामकारकरितीने चालण्यासाठी अत्यावश्यक बाब आहे.

(ब) शासकीय विभागांनी आवश्यक ती कागदपत्रे योग्य त्या नमुन्यात आणि नियत वेळेत पाठविण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी अशी कागदपत्रे विषयसूची किंवा पृष्ठ क्रमांक देऊन योग्य त्या क्रमाने लावण्यात यावीत आणि ती वाचण्याजोगी असावीत.

(क) अनेकदा सदस्य समितीच्या बैठकीला तयारी न करताच उपस्थित राहतात आणि समितीचे काम घाईघाईने संपवून त्यांच्या मतदार संघातील कामासाठी मंत्रालयात जाण्यास उत्सुक असतात ही गोष्ट समिती पद्धतीच्या मूळ संकल्पनेच्या विरुद्ध आहे. म्हणून समिती पद्धतीच्या परिणामकारक कामकाजासाठी सदस्यांचा समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग असणे जरुरीचे आहे.

(ड) समितीने एक एक प्रश्न हाती घ्यावा जेणेकरून प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा करता येईल, तसेच सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन करावे. एका सदस्यांना त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची सवय जोपासली पाहिजे. समिती प्रमुखाने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालवावे.

(ई) समितीने त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करावेत आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करावे. विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणीवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक असला पाहिजे. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने सुधारणात्मक उपाय सुचवावेत, मागील चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समिती उपाययोजना सुचवू शकते. शासनाच्या प्रतिनिधी प्रति सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील असावे. तथापि, कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यास, समितीने त्यांचेविरुद्ध कारवाई सुचवावी. समितीची बैठक बोलाविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलाविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत असे आढळून आले आहे की, साक्षीदारांना अगदी अल्पावधीची नोटीस देऊन बोलाविण्यात येते आणि म्हणून त्यांना तपासणीसंबंधी तयारी करण्यास पुरेसा अवधी मिळत नाही म्हणून साक्षीदारांना पुरेशी आगाऊ नोटीस देणे आवश्यक आहे, जेणेकरून ते चांगली तयारी करून समितीपुढे येऊ शकतील.

विधानमंडळाच्या सदस्यांना जे विशेषाधिकार प्राप्त झाले आहेत तसे अधिकार विधानमंडळाचे अधिकारी यांनादेखिल आपले कर्तव्य बजावित असताना प्राप्त होतात. म्हणून समितीच्या सदस्यांनी समितीचे अधिकारी किंवा कर्मचारी त्यांचे कर्तव्य बजावित असतांना अडथळा आणू नये. अधिकारी व कर्मचारी यांचेबरोबर काम करतांना सदस्यांनी कोणत्याही प्रकारचे अप्रिय वातावरण निर्माण करु नये. कार्यपद्धतीविषयक नियमांनुसार समित्यांना राज्यात आणि कधी कधी राज्याबाहेर देखील अभ्यासदौरे करण्यासाठी परवानगी दिली जाते. संबंधित माहिती घेणे आवश्यक असेल तर माहितीसाठी सविस्तर अभ्यासदौरा नियोजित करावा आणि तीचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर साक्षीदाराच्या तपासणीसाठी मुद्दे तयार केले जावेत. समिती तिचे विचार व्यक्त करु शकते व अहवालाच्या स्वरुपात शिफारशी करु शकते. परंतु एखादी विशिष्ट कृती करावी किंवा करु नये किंवा विवक्षित कृती विशिष्ट पद्धतीने करावी असा आदेश शासनाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याला ती देऊ शकत नाही. समितीने दौऱ्याच्या काळात अशा प्रकारची काळजी घेणे आवश्यक असते.

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांची यादी

### (अ) दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समित्या

(१) अंदाज समिती.

(२) लोकलेखा समिती.

(३) सार्वजनिक उपक्रम समिती.

(४) पंचायती राज समिती.

(५) रोजगार हमी योजना समिती.

(६) उप विधान समिती.

(७) अनुसूचित जाती कल्याण समिती.

(८) अनुसूचित जमाती कल्याण समिती.

(९) विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती.

(१०) महिलांचे हक्क व कल्याण समिती.

(११) इतर मागासवर्ग कल्याण समिती.

(१२) अल्पसंख्याक कल्याण समिती

(१३) मराठी भाषा समिती

### (ब) विधानसभेच्या समित्या

(१४) कामकाज सल्लागार समिती.

(१५) विशेष हक्क समिती.

(१६) विनंती अर्ज समिती.

(१७) आश्वासन समिती.

(१८) नियम समिती.

(१९) सदस्य अनुपस्थिती समिती.

(२०) अशासकीय विधेयके व ठराव समिती.

(२१) सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समिती.

(२२) मजूर सहकारी संस्थांना सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे द्यावी किंवा कसे यासंदर्भातील तदर्थ समिती.

### (क) विधानपरिषदेच्या समित्या

(२३) कामकाज सल्लागार समिती.

(२४) विशेष हक्क समिती.

(२५) विनंती अर्ज समिती.

(२६) आश्वासन समिती.

(२७) नियम समिती.

(२८) सदस्य अनुपस्थिती समिती.

(२९) अशासकीय विधेयके व ठराव समिती.

(३०) सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समिती.

### (ड) अधिनियमानुसार संयुक्त समित्या

(३१) सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत संयुक्त समिती.

(३२) विधानमंडळाच्या माजी सदस्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत संयुक्त समिती.

### (ई) तदर्थ संयुक्त समित्या

(३३) ग्रंथालय समिती.

(३४) आमदार निवास व्यवस्था समिती.

(३५) आहार व्यवस्था समिती.

(३६) 'धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे' या संदर्भातील समिती.

(३७) विधानमंडळ सदस्यांचा समावेश असलेले एड्स चर्चापीठ (FORUM).

या सर्व समित्यांवरील सदस्य पीठासीन अधिकाऱ्यांकडून विविध पक्षांच्या सभागृहातील सदस्य-संख्येच्या प्रमाणात आणि सभागृहाचे नेते व विरोधी पक्ष/गट प्रमुख यांच्याशी विचाविनिमय करून नामनियुक्त करण्यात येतात. त्यांची मुदत सर्वसाधारणपणे एक वर्षाची किंवा नवीन समिती अस्तित्वात येईपर्यंत असते.

**महाराष्ट्र विधानमंडळाच्या तदर्थ समित्या.**

सभागृहात उपस्थित झालेल्या एखाद्या विषयाच्या संदर्भात विधीमंडळाच्या सदस्यांच्या समितीमार्फत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सभागृहास विहित कालावधीत सादर करण्याबाबतचा प्रस्ताव संमत करुन ज्या समित्या गठीत करण्यात येतात त्या समित्यांना **"तदर्थ समित्या (Adhoc Committees) "** असे म्हणतात. सदर प्रस्तावात तदर्थ समितीवर नियुक्त करावयाच्या सदस्यांची नावे, समितीची कार्यकक्षा व कार्यकाल इत्यादी बाबी अंतर्भूत करण्यात येतात. महाराष्ट्र विधानमंडळात दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या प्रस्तावानुसार खालील तदर्थ समित्या नियुक्त करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | तदर्थ समितीचे विषय |
|---|---|
| १. | ठाणे जिल्ह्यातील गवत एकाधिकार खरेदी चौकशी समिती |
| २. | डोर्ली (जि. नांदेड) येथील एस्.टी. अपघात चौकशी समिती. |
| ३. | जवाहर रोजगार योजना चौकशी समिती |
| ४. | भटक्या जमातीच्या मुलांच्या आश्रमशाळांची चौकशी समिती. |
| ५. | आदिवासी क्षेत्रातील तूरडाळ एकाधिकार खरेदी चौकशी समिती |
| ६. | मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना (ज्यात शुश्रूषालय, प्रसूतिगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो.) शासनातर्फे देण्यात आलेली मदत, सूट, माफी इत्यादी आणि या रुग्णालयामार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखून ठेवल्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादीसाठी करण्यात येणारा खर्च या संदर्भात सखोल तपासणी करून शासनास शिफारशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेली समिती. |

| | |
|---|---|
| ७. | सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षातील दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी व इतर विषयांच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका या संदर्भात गठीत केलेली समिती. |

सदर समित्यांनी विहित कालावधीत त्यांचेकडे सोपविलेल्या विषयांबाबतचे अहवाल दोन्ही सभागृहांत सादर केलेले आहेत.

बर्डी, ता.अक्कलकुंवा,जि.धुळे येथील शासकीय आश्रमशाळेमध्ये आदिवासी मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराची चौकशी करण्यासाठी मा. महिला व बालविकास राज्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहांच्या महिला सदस्यांच्या नियुक्त केलेल्या तदर्थ समितीने आपल्या दोन वर्षाच्या कालावधीत दोन्ही सभागृहांना दोन अहवाल सादर केले आहेत. सदर समितीची मुदत दहाव्या विधानसभेच्या मुदतीपर्यंत वाढविण्यात आली होती.

राज्यात कांद्याचे भाव घसरणे, रेल्वे वॅगन उपलब्ध न होणे, कांदा निर्यातबंदी उठविणे इत्यादी विषयाबाबत मा.पणन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विधानसभेच्या ९ सदस्यांची **"विधानसभा कांदा तदर्थ समिती"** नियुक्त केली होती. सदर तदर्थ समितीने राज्य शासनाच्या कक्षेतील मुद्दयांबाबत अंतरिम अहवाल (Interim Report) विधानसभा सभागृहाला दिनांक २५ जुलै २००३ रोजी सादर केला आणि केंद्र शासनाच्या कक्षेतील मुद्दयांबाबतचा अंतिम अहवाल (Final Report) विधानसभा सभागृहाला दिनांक ८ डिसेंबर, २००३ रोजी सादर केला.

माजी सैनिकांच्या विविध प्रश्नासंदर्भात विचारविनिमय करून शिफारशी करण्यासाठी फक्त महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांची **"माजी सैनिकांच्या कल्याणासाठी तदर्थ समिती"** विधानपरिषद सभागृहाने दिनांक १७ डिसेंबर, २००३ रोजी प्रस्ताव संमत करून नियुक्त केली आहे. सभागृहास अहवाल सादर करण्यासाठी सदर तदर्थ समितीने आपला कार्यकाल विधानपरिषद सभागृहाकडून वाढवून घेतला होता. सदर तदर्थ समितीने राज्यातील माजी सैनिकांच्या कल्याणार्थ उपाययोजना सुचविण्याच्या संदर्भात नेमलेल्या माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अंतिम अहवाल दिनांक १५ डिसेंबर, २००६ रोजी विधानपरिषद सभागृहास सादर करण्यात आला.

आरे दुग्ध वसाहतीमधील जागेचा भाडेपट्टा करार संपुष्टात येऊनही शासनाने जागा ताब्यात न घेणे या संदर्भात नेमलेल्या समितीने दिनांक १ ऑगस्ट २००७ रोजी विधानसभा सभागृहास सादर केला.

अध्यापक शिक्षण पदविकेतील आंतरवासिता अमलबजावणी संबंधात संभाव्य त्रुटी व त्या दूर करण्यासाठी उपाययोजना सूचविण्यासाठी नेमलेल्या तदर्थ समितीने दिनांक २६ जुलै २००८ रोजी विधानसभा सभागृहास अहवाल सादर केला.

चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या चार जिल्ह्यांसाठी स्वतंत्र गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्यात यावे या संदर्भात नेमलेल्या तदर्थ समितीने दिनांक १६ जून २००९ रोजी विधानसभा सभागृहास अहवाल सादर केला.

## १०. काही महत्त्वाच्या संसदीय आयुधांची उदाहरणे

### अ. महाराष्ट्र विधानपरिषद

### (१) प्रश्न - काही सार्वजनिक महत्त्वाचे विषय

### पहिले अधिवेशन २००८

| अनुक्रमांक | प्रश्न क्रमांक | सदस्य | विषय |
|---|---|---|---|
| | | **२४ मार्च २००८** | |
| १ | ३७४२१ | श्री. विनोद तावडे व इतर वि.प.स. | महिला व बालविकास विभागामार्फत राज्यातील दुर्लक्षित व बालगुन्हेगारांसाठी विविध व्यावसायिक प्रशिक्षण योजना राबविण्याबाबत |

### पहिले अधिवेशन, २०१०

| अनुक्रमांक | प्रश्न क्रमांक | सदस्य | विषय |
|---|---|---|---|
| | | **१९ मार्च २०१०** | |
| १ | ४२१५ | श्री.चंद्रकांत पाटील व इतर वि.प.स. | राज्यातील आदिवासी कुटुंबांना कर्जमाफी देण्याबाबत |
| २ | ४७७७ | श्रीमती मधु जैन व इतर वि.प.स. | राज्यातील आदिवासी विकासासाठी असलेला अनुशेष शिल्लक राहिल्यासंदर्भात |
| | | **२३ मार्च, २०१०** | |
| ३ | ४८६८ | श्री.दिपक साळुंखे व इतर वि.प.स. | कृषी औद्योगिक धोरण निश्चित करण्याबाबत |
| ४ | ३५०५ | श्री.भगवान साळुंखे व इतर वि.प.स. | राज्यातील कुपोषित बालकांना कमी रकमेत सकस आहार देण्याचे धोरण |

**पहिले अधिवेशन २०११**

| अनुक्रमांक | प्रश्न क्रमांक | सदस्य | विषय |
|---|---|---|---|
| | | **१७ मार्च, २०११** | |
| १ | १३२७५ | श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती उषाताई दराडे व इतर वि.प.स. | राज्यातील सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील मागासवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करणेबाबत |
| | | **१८ मार्च, २०११** | |
| २ | १३५१७ | श्री.केशवराव मानकर, श्री.पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. | गर्भलिंग निदान चाचणी आणि स्त्रीभ्रूण हत्या विरोधी कायद्याअंतर्गत राज्यात नवीन समितीची स्थापना करणेबाबत |
| ३ | १३९९६ | श्री.मोहन जोशी, श्री.हुसेन दलवाई व इतर वि.प.स. | राज्यात भ्रूणहत्या रोखण्याकरिता कायद्याची कडक अंमलबजावणी करणेबाबत |

**पहिले अधिवेशन २०१२**

| **अनुक्रमांक** | **प्रश्न क्रमांक** | **सदस्य** | **विषय** |
|---|---|---|---|
| | | **१६ मार्च २०१२** | |
| १ | २६१४५ | श्री.मोहन जोशी, श्री. राजन तेली व इतर वि.प.स. | मुंबईमध्ये सुरक्षेसाठी सी सी टिव्ही यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत |
| | | **१९ मार्च २०१२** | |
| २ | २५५२७ | श्री.जयप्रकाश छाजेड, श्री. मोहन जोशी | राज्यातील जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश योजनेबाबत |
| ३ | २६५८६ | श्री.रामदास कदम, श्री.परशुराम उपरकर व इतर वि.प.स. | राज्यात नववी, दहावीला आयटी विषय बंधनकारक करण्याचा निर्णय घेतल्याबाबत |
| ४ | २७७६८ | श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले व इतर वि.प.स. | राज्यातील ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा सुरू करण्याबाबत |

| | | | |
|---|---|---|---|
| **२७ मार्च २०१२** | | | |
| ५ | २५१०९ | डॉ. दिपक सावंत,<br>श्री. दिवाकर रावते | राज्यातील रिक्षांमध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याबाबत |
| ६ | २६५८० | श्री.रामदास कदम,<br>श्री.परशुराम उपरकर व<br>इतर वि.प.स. | मुंबईतील फेरीवाल्याचे नियमन करण्याबाबत |
| **१२ एप्रिल २०१२** | | | |
| ७ | २५९६६ | श्री.रमेश शेंडगे,<br>श्री. हेमंत टकले<br>इतर वि.प.स. | राज्यात चार वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत |
| **११ एप्रिल २०१२** | | | |
| ८ | २९४४१ | श्रीमती विद्या चव्हाण इतर वि.प.स. | राज्यातील कुष्ठरोग निर्मुलनाकरिता करावयाची उपाययोजना |
| **१८ एप्रिल २०१२** | | | |
| ९ | २७७०१ | श्री. विजय सावंत इतर वि.प.स. | मुंबईतील शिवडी न्हावा-शेवा प्रकल्पाबाबत |

**दुसरे अधिवेशन २०१२**

| | | | |
|---|---|---|---|
| **९/७/२०१२** | | | |
| १ | ३०९९९ | श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे | राज्यात गुटखा विक्रीस कायमस्वरुपी बंदी घालण्याबाबत. |
| २ | ३०९०५ | श्री.राजन तेली,<br>श्री.अमरनाथ राजूरकर | कोकणात आंबा व काजू बोर्ड स्थापन करण्याबाबत. |
| **११/७/२०१२** | | | |
| ३ | ३०१५० | श्रीमती विद्या चव्हाण,<br>श्री.किरण पावसकर | मुंबई भाडतेत्तवावर पाच लाख घरे बांधण्याचा प्रस्ताव |
| ४ | ३०७६४ | श्री.सुभाष चव्हाण,<br>श्री.एम.एम.शेख | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत राबवायची गृहनिर्माण योजना. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ३०६२६ | श्री. दिवाकर रावते | मुंबईतील झोपडपट्टयांबाबत घ्यावयाचा धोरणात्मक निर्णय |
| ६ | ३०२२२ | श्री. गोपिकिशन बाजोरिया | राज्यात एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार योजना राबविण्याबाबत. |
| ७ | ३०९७७ | श्री. विनायक मेटे, श्री. सतीश चव्हाण | म्हाडाच्या घरांमध्ये अपंगांना आरक्षण देण्याबाबत. |
| ८ | ३०८३५ | श्री. माणिकराव ठाकरे, श्री. अशोक उर्फ भाई जगताप | मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सरकारी गोदामातील अन्नधान्य गरिबांना वाटणे. |

## २. (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये प्रस्ताव
## (सन २००८ ते २०१३ या कालावधीत विधानपरिषदेत चर्चा झालेले )

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चेचा दिनांक |
|---|---|---|---|
| | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. | मुंबईत बुधवार दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी अतिरेक्यांनी मुंबई येथील छत्रपती शिवाजी टर्मिनस, ताज व ओबेरॉय-ट्रायडेंट ही पंचतारांकित हॉटेल्स, कुलाब्यातील नरीमन हाऊस व लिओपॉर्ड कॅफे तसेच माझगांव व विलेपार्ले येथील टॅक्सीमध्ये केलेल्या आत्मघातकी हल्ला. | १६ व १७ डिसेंबर २००८ |

*************

## २. (ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सुचनांवरील निवेदनांवर सभागृहात झालेली चर्चा (सन २००८ ते २०१३)

| अ.क्र | सदस्यांचे नाव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सर्वश्री जयंत पाटील व इतर वि.प.स. | अलिबाग जिल्हा रायगड येथील जिल्हा कारागृहात खून प्रकरणी अटकेत असलेल्या प्रभाकर नाईक या व्यक्तीचा दिनांक १६ मार्च २००८ रोजी गुढरित्या झालेला मृत्यू. | दि. २५ मार्च, २००८ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| २ | सर्वश्री जयंत पाटील व इतर वि.प.स. | दिनांक १७ मार्च २००८ रोजी भायखळा येथील रेतीवाला इंडस्ट्रीयल इस्टेटच्या तिसऱ्या मजल्याला आग लागून १० जणांचा मृत्यू, तसेच ५० कामगार गंभीर जखमी होणे. | दि. २५ मार्च, २००८ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| ३ | सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स. | भारताचे वाईन कॅपिटल म्हणून उदयास असलेल्या नाशिकमधील एका विनियांड मधील वाईन बारमध्ये दिनांक १५ मार्च, २००८ रोजी मध्यरात्रीपर्यंत फिल्मीस्टाईल पार्टीचे आयोजन करण्यात येणे, या पार्टीमध्ये बारबालांच्या नाचगाण्यांची दृश्य खाजगी दूरचित्रवाहिनीवरून प्रसारित करण्यात येणे. | दि. २३ एप्रिल, २००८ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| ४ | डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स. | तापी पतसंस्था ता.चोपडा,जि.जळगांव येथील शेतकरी कर्ज वाटपामध्ये संस्थेच्या १५ गावांतील शाखांमध्ये ७० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या कर्ज वाटपात झालेली अनियमितता. | दि.९ ऑगस्ट, २०११ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| ५ | श्रीमती शोभा फडणवीस व इतर वि.प.स. | चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी नक्षल भागातील ५ ते १२ वी च्या मुलींमध्ये रक्ताचे नमुने तपासले असता रक्ताक्षयाने बाधित असलेले आढळून आल्याने निर्माण झालेला आरोग्याचा प्रश्न. | दि. २३ डिसेंबर, २०११ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | श्री.जयंत पाटील, वि.प.स. | दिनांक १४ मार्च,२०१२ रोजी निलंबित उप जिल्हाधिकारी, श्री.नितीश ठाकूर यांच्या मुंबई व रायगडशी संबंधित ३७ मालमत्तांवर प्राप्तीकर खात्याने छापे टाकल्यानंतर सुमारे ११८ कोटी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता सापडल्यानंतर त्यांना कुटुंबियांसह अटक केल्याबाबत. | दि. २० एप्रिल, २०१२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| ७ | डॉ.दिपक सावंत,वि.प.स. | मुंबई विद्यापीठाच्या दिनांक २१ मार्च,२०१२ रोजी असलेली तृतीय वर्ष वाणीज्य शाखेच्या विद्यार्थ्यांची परिक्षा केंद्रे अचानक बदलल्यामुळे सुमारे १८०० विद्यार्थ्यांना परिक्षा देता न आल्याबाबत. | दि. ९ एप्रिल, २०१२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| ८ | डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. | मुंबई मरीन लाईन्स येथील रेल्वेच्या गेस्ट हाऊसमध्ये सेक्स रॅकेट चालवित असल्याची निदर्शनास आलेली बाब. | दि.१ एप्रिल, २०१३ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |

************

## ३. अल्पकालीन चर्चा - म.वि.प. नियम ९७ अन्वये
## (सभागृहात चर्चा झालेले - सन २००८ ते २०१३)

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, व इतर वि.प.स. | "राज्यात मान्सूनपूर्व पावसावर शेतकऱ्यांनी बियाणांचे लावणीसाठी केलेली पेरणी पावसाअभावी मोडीत निघणे, बियाणे व खते यांचे नियोजनबद्ध वाटप होत नसणे, त्यातच भेसळयुक्त खतांचा आणि किटकनाशकांचा शेतकऱ्यांना होत असलेला पुरवठा, शेतकऱ्यांना करावयाचे आर्थिक सहाय्य. | १७ जुलै, २००८ |
| २ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर | " यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथे दिनांक १८ जुलै, २००८ रोजी धार्मिक ग्रंथाची कथित विटंबना होणे, धार्मिक ग्रंथाची विटंबना झाल्यामुळे दोन गटात झालेली दंगल. | २५ जुलै, २००८ |
| ३ | डॉ. दिपक सावंत,वि.प.स. | "अमरावती जिल्ह्यातील मेळघाट, धारणी, चिखलदरा आदी भागात सुरू असलेले कुपोषण व बालमृत्यू, कुपोषणामुळे तेथील सुमारे २२० बालकांना आलेला मृत्यू, आरोग्य विभागाने कुपोषण व बालमृत्यूच्या गंभीर समस्या | ३० डिसेंबर, २००८ |
| ४ | सर्वश्री. जयंत पाटील, व इतर वि.प.स. | "रविवार, दिनांक २१ डिसेंबर, २००८ रोजी रोहे तालुक्यातील (जि.रायगड) मौजे देवकान्हे येथे विषारी दारु प्यायल्याने ६ जणांचा मृत्यू होणे व ४० हून अधिक जण अत्यवस्थेत असणे. | ३० डिसेंबर, २००८ |
| ५ | सर्वश्री दिपक सावंत, व इतर वि.प.स. | जून २००९ च्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता अकरावीचे प्रवेश त्या त्या महाविद्यालयांतून देण्याची असलेली प्रचलित पद्धत यावर्षी शासनाने रद्द करून त्याऐवजी आता ऑन लाईन प्रवेश सुरू केलेली असणे, परंतु सदर ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये अनेक त्रूटी असल्याने सारासार विचार न करता राबविलेल्या या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे. | ८ जून, २००९ |
| ६ | सर्वश्री. कपिल पाटील व इतर वि.प.स. | "मुंबई आणि राज्यातील १०० हून अधिक शाळकरी आणि तरुण विद्यार्थ्यांनी आत्महत्या करण्याच्या धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणाऱ्या घटना गेल्या दोन महिन्यात घडणे, मुलांचे हे बळी व्यवस्थेने आणि समाजात वेगाने घडणाऱ्या बदलांनी घेतले असले तरी ते रोखण्याबाबत तातडीने उपाययोजना न होणे. | ५ एप्रिल २०१० |
| ७ | सर्वश्री दिवाकर रावते, व इतर वि.प.स. | "महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणात वांरवार होणारे बदल, विशेषतः गेल्या तीन वर्षात अकरावी प्रवेशासाठी प्रत्येक वर्षी जाहिर करण्यात आलेली वेगवेगळी धोरणे. | १३ व १४ जुलै, २०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्री.दिवाकर रावते | "मराठी भाषेचा विकास व संवर्धनासाठी राज्य शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा नुकताच घेतलेला निर्णय, सदर विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करून या विभागासाठी स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय. | १४ जुलै, २०१० |
| ९ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. | "मुंबईत कुलाबा येथील नेव्हीच्या भूखंडावर कारगील युद्धातील शहीद जवानांच्या कुटुंबांसाठी राखून ठेवलेल्या आदर्श गृहनिर्माण सोसायटीमध्ये राजकीय नेते व सनदी अधिकाऱ्यांनी सदनिका घेणे. | ८ डिसेंबर, २०१० |
| १० | सर्वश्री जयंत पाटील, व इतर वि.प.स. | "रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन सह. बँक दिवाळखोरीत निघाल्यामुळे सुमारे १ लाख ८२ हजार ठेवीदारांची ५५३ कोटींची ठेवी बुडीत होणे, ठेवीदारावर आलेली उपासमारीची वेळ. | १४ डिसेंबर २०१० |
| ११ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. | "अनेक अनियमितता असलेल्या आदर्श गृहनिर्माण संस्थेची द्विसदस्यीय समितीद्वारा चौकशी करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्र्यांनी गत हिवाळी अधिवेशनात करणे, मा.मुख्यमंत्र्यांनी सभागृहात घोषणा करून देखील द्विसदस्यीय समितीची नेमणूक विलंबाने करणे, घोषणेला तीन महिने होऊन देखील चौकशी कासवगतीने सुरू असणे, केंद्रीय गुन्हे अन्वेषण संस्थेद्वारे होणारी चौकशी दीड महिन्यात पूर्ण करावी असे संकेत असताना या घोटाळयामध्ये सामिल असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची परवानगी मागण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे कोणताही पाठपुरावा न होणे. | २२ मार्च, २०११ |
| १२ | सर्वश्री विनायक मेटे व इतर वि.प.स. | "मुंबई येथील मरिन ड्राईव्हजवळ अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने सुमारे दोन वर्षांपूर्वी घेणे, या स्मारकाच्या कामास अद्यापही सुरुवात न करणे, या स्मारकाच्या उभारणीसाठी टिम वन आर्किटेक, मुंबई व मे.बेन्सले डिझाईन स्टडिओज, थायलंड यांनी सादर केलेल्या संकल्पनेची निवड करण्यात येणे. | २१ एप्रिल, २०११ |
| १३ | सर्वश्री.पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. | "दिनांक १३ जुलै, २०११ रोजी अतिरेक्यांनी ऑपेरा हाऊस, झवेरी बाजार व दादर येथे केलेल्या बॉम्बस्फोटात २३ नागरिक मृत्युमुखी पडून १५० व्यक्ती गंभीररित्या जखमी होणे, सन २००३ पासून होणाऱ्या बॉम्बस्फोट मालिकेमुळे शेकडो निरपराध नागरिक मृत्युमुखी पडणे, २६/११ च्या हल्ल्यानंतर नेमलेल्या रामप्रधान समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी न होणे, | २७ जुलै, २०११ |

## ४. लक्षवेधी सूचना - म.वि.प. नियम १०१ अन्वये
## (सन २००८ ते २०१३ या कालावधीत सभागृहात झालेली चर्चा)

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सर्वश्री. संजय दत्त व इतर वि.प.स. | मुंबईसह संपूर्ण कोकण किनारपट्टीवर निर्माण झालेला मत्स्य दुष्काळ, राज्यातील कोळी बांधवांकडे होत असलेले दुर्लक्ष, मच्छिमार बांधवाना दुष्काळग्रस्त घोषीत करण्याची आवश्यकता. | ११ मार्च, २००८ |
| २ | श्री.अरुण गुजराथी वि.प.स. | जळगाव जिल्ह्यात केळी पिकावर झालेला करपा रोगाचा प्रादुर्भाव, शेतकऱ्यांचे झालेले लाखो रुपयांचे नुकसान, शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्याची आवश्यकता. | १३ मार्च, २००८ |
| ३ | डॉ. वसंत पवार वि.प.स. | "नाशिक जिल्ह्यात निफाड व दिंडोरी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी ओपल फार्म ॲग्रो केमिकल्स या कंपनीकडून खरेदी करण्यात आलेल्या खतामुळे द्राक्षबागा मोठया प्रमाणात झालेले नुकसान, शेतकऱ्याचे नुकसान भरपाई मिळण्याबाबत. | २५ मार्च, २००८ |
| ४ | सर्वश्री. दिपक सावंत व इतर वि.प.स. | मोठ्या खाजगी रुग्णालयांमध्ये द्रारिद्र्य रेषेखालील रुग्णांना १० टक्के जागा राखून न ठेवणे. | ३१ मार्च, २००८ |
| ५ | सर्वश्री. सुधाकर गणगणे | "राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती मिळणे, शासकीय सेवेमध्ये पदोन्नतीसाठी निर्णय घेणे. | ८ एप्रिल, २००८ |
| ६ | सर्वश्री. जितेंद्र आव्हाड | "ठाणे येथील जुन्या जीर्ण अवस्थेत असलेल्या सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त चटईक्षेत्र (एफएसआय) देण. | ९ एप्रिल, २००८ |
| ७ | सर्वश्री. दिवाकर रावते | "मुंबई जलमय होऊ नये यासाठी हाती घेण्यात आलेल्या मिठी नदी व ब्रीमस्टोवॅड तसेच मुंबईच्या वाहतूक व्यवस्था विकासाबाबत मेट्रो रेल्वे प्रकल्प इत्यादी कामे प्रलंबित असणे. | १६ एप्रिल, २००८ |
| ८ | सर्वश्री. जयप्रकाश छाजेड, व इतर वि.प.स. | "पांढरकवडा (जि. यवतमाळ) तालुक्यातील अग्रवाल जिनिंग प्रेसिंगला दिनांक ४ डिसेंबर, २००९ रोजी वा त्यासुमारास आग लागून सुमारे अडीच कोटी रुपयांचा कापूस जळून खाक होणे आणि नांदगाव (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील श्रीनिवास कॉटन जिनिंग फॅक्टरीला दिनांक ९ नोव्हेंबर, २००९ रोजी वा त्यासुमारास आग लागून त्या आगीत दोन | १० डिसेंबर, २००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महिला मजूर जळून मृत्यूमुखी पडणे तर तीन महिला मजूर गंभीररित्या जखमी होऊन एक महिला मजूर बेपत्ता होण्याची घडलेली घटना. | |
| ९ | सर्वश्री. संजय केळकर | "नवी मुंबईतील खारघर स्थित युको बँकेवर दिनांक १३ एप्रिल, २००९ वा त्या सुमारास पडलेल्या सशस्त्र दरोडयात ७२ हजार रुपयांची लूट होणे, तसेच ठाणे जिल्हयातील सी.बी.डी.बेलापूर परिसरात दिनांक १८ एप्रिल, २००९ रोजी दरोडेखारांनी घातलेल्या सशस्त्र दरोडयात एका नागरिकाचा झालेला मृत्यू, तसेच ३ मे, २००९ रोजी मुंबईतील नायगाव येथील अपना सहकारी बँकेवर सशस्त्र दरोडेखोरांनी दरोडा घालून सुमारे ३० लाख रुपयांची चोरी करणे, | ११ डिसेंबर, २००९ |
| १० | सर्वश्री. संजय दत्त, व इतर वि.प.स. | "ठाणे जिल्ह्यातील वागळे इस्टेट येथील तारांगण कॉम्प्लेक्समध्ये दिनांक १९ नोव्हेंबर, २००९ रोजी भीषण आग लागून या दुर्घटनेत अग्निशमन दलातील ६ जवानांचा १४ व्या मजल्यावरील उद्‌वाहन बंद पडून गुदमरुन मृत्यू झाल्याची घडलेली घटना. | २२ डिसेंबर, २००९ |
| ११ | सर्वश्री. दिवाकर रावते, व इतर वि.प.स. | "नांदेड जिल्ह्यात दिनांक १६ ते ३१ ऑगस्ट, २००९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या हत्तीरोग रुग्ण शोध माहिमेत ३४ हजार ४९८ व्यक्तींना हत्ती रोगाची लागण होणे, ५ हजार ९३७ रुग्णांमध्ये हत्तीरोगाची लक्षणे आढळून येणे, क्यूलेक्स जातीच्या डासामार्फत हत्ती रोगाचा प्रसार होणे. | २२ मार्च, २०१० |
| १२ | सर्वश्री. गुरुनाथ कुलकर्णी, व इतर वि.प.स. | " पुणे येथील कोरेगाव पार्क येथील जमर्न बेकरीत दिनांक १३ फेब्रुवारी, २०१० रोजी झालेल्या भीषण बॉम्बस्फोटामध्ये १० व्यक्ती मृत्यूमुखी पडणे, व सुमारे ५० व्यक्ती गंभीर जखमी होणे, पुण्यातील गजबजलेल्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाल्यामुळे तेथील नागरीकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण. | २२ मार्च, २०१० |
| १३ | श्री. किरण पावसकर,व इतर वि.प.स. | "कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नगर अभियंता सुनील जोशी यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाने लाच घेताना रंगे हाथ पकडणे, त्यांच्या घराची झडती घेताना लाखो रुपये रोख रक्कम, लाखो रुपये किंमतीची विदेशी मद्य सापडणे, तसेच सांगली जिल्हयातील एका अभियंत्याला लाच घेताना पकडणे. | ३१ मार्च, २०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | सर्वश्री. जयप्रकाश छाजेड व इतर वि.प.स. | "जव्हार (जि.ठाणे) येथील १८ ते २५ वर्षे वयोगटातील १२ आदिवासी मुलींच्या अश्लील चित्रफीती तयार करून बाजारात विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक ८ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे. | १ एप्रिल २०१० |
| १५ | सर्वश्री. धनंजय मुंडे, व इतर वि.प.स. | "मालेगावचे अप्पर जिल्हाधिकारी यशवंत सोनावणे यांची नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथे रॉकेल भेसळमाफियांनी पेट्रोल व रॉकेल ओतून जाळून केलेली निर्घृण हत्या, सदर हत्या प्रकरणी संशयीत असलेला प्रमुख आरोपी या प्रकरणात ९० टक्के भाजल्याने घटनेनंतर चार-पाच दिवसांनी मृत्यू पावणे, धुळे, नाशिक, मनमाड या संपूर्ण भागात तसेच पुणे परिसरात रॉकेल, डिझेल, पेट्रोल भेसळमाफियांची कार्यवाही व भेसळीचे प्रकार गेल्या अनेक वर्षापासून सुरू असून हे भेसळ करणारे रॅकेट उच्च पदस्थांच्या आशिर्वादाने सुरू असल्याचे आतापर्यंत विविध घटनांमधून सिद्ध होणे. | २१ मार्च, २०११ |
| १६ | डॉ. निलम गोऱ्हे व इतर वि.प.स. | "पुणे जिल्ह्यातील भीमा नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर दूषित पाणी मिसळत असल्याने उजनी धरणाच्या खालील सुमारे ३०० गावांमधील लोकांना दूषित पाणी प्यावे लागत असणे, याबाबत अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या अहवालानुसार सांडपाणी प्रक्रिया केल्यानंतरही पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका, भोसरी औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी मोठ्या प्रमाणावर भीमा नदीच्या पात्रात मिसळत असणे. | ३१ मार्च, २०११ |
| १७ | सर्वश्री. दिपकराव साळुंखे, व इतर वि.प.स. | "राज्यातील महिला बचतगटांना दोन वर्षापूर्वी राज्य शासनाने मोठा गाजावाजा करून घोषित केलेल्या ४ टक्के व्याजदराने कर्ज योजनांचा संपूर्ण राज्यात उडालेला बोजवारा, ३ लाख बचतगटांपैकी फक्त दीड हजार गटांना या योजनेचा लाभ मिळाला असून हे प्रमाण १ टक्क्याएवढेच नसल्याचे दि.१९.७.२०१० रोजी उघडकीस येणे. | २९ मार्च, २०११ |
| १८ | सर्वश्री. हुसेन दलवाई, व इतर वि.प.स. | "मुंबईतील वांद्रे पूर्व स्थानकानजीक असलेल्या बेहरामपाडा येथील गरीबनगर झोपडपट्टीला दि.४ मार्च, २०११ रोजी रात्री लागलेली भीषण आग, या आगीत सुमारे १००० झोपड्या जळून खाक होणे, हजारो लोक बेघर होणे, त्यांचे संसार उघड्यावर येणे, यापुर्वीही गरीबनगर झोपडपट्टीला आग लागण्याचे प्रकार घडणे. | ३१ मार्च, २०११ |

*************

## ५. अंतिम आठवडा प्रस्ताव - म.वि.प. नियम २५९ अन्वये
## (सन २००८ ते २०१३ या कालावधीत सभागृहात चर्चा झालेले)

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, | राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न. | २५ एप्रिल, २००८ |
| २ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, | राज्यात सध्या निर्माण झालेला वीजेचा प्रचंड तुटवडा त्यातच दिनांक २४ जुलै, २००८ पासून वाढते भार नियमन. | २६ जुलै, २००८ |
| ३ | सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, व इतर वि.प.स. | दिनांक १२ जून, २००९ रोजी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २००७-२००८ या वर्षाचा (१) वित्तीय लेखे अहवाल (२) विनियोजन लेखे अहवाल (३) नागरी अहवाल (४) महसुली जमा अहवाल विधीमंडळांला सादर करण्यात येणे, या अहवालातील सन २००७-२००८ या वर्षात राज्याच्या २६ विभागांच्या बाबतीत ३ हजार ११३ कोटी ६५ लाख रुपयांचा खर्च एप्रिल, २००८ अखेरपर्यंत ताळमेळाविनाच राहिल्याचे नमूद करण्यात येणे. | १६ जून, २००९ |
| ४ | सर्वश्री पांडुरंग फुंडकर, व इतर वि.प.स. | "गेल्या २० वर्षापूर्वी कासवगतीने गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या नक्षलवाद्यांनी राज्यभर आपले जाळे पसरवणे, गेल्या वर्षभरात मरकेगांव, हत्तीटोला, लाहेरी याठिकाणी झालेल्या नक्षलवादी हल्ल्यात ४४ पोलीस/जवानांना प्राणास मुकावे लागणे, नक्षलवाद्यांनी पोलीस, आदिवासी बांधव यांच्याप्रमाणे राजकीय कार्यकर्त्यांची हत्या करणे, | १ व ६ एप्रिल २०१० |
| ५ | सर्वश्री पांडुरंग फुंडकर, | "आदिवासी विकास खात्याकडे करोडो रुपयांचा केंद्राचा निधी येऊनही जवळपास २५० कोटी रुपयांचा निधी पडून रहाणे, आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी वह्या पुस्तके, गणवेष, आहार इत्यादींसाठी निधी मिळत असतांनादेखील अनेक आश्रमशाळात या गोष्टींची वानवा असणे. | २६ व २७ जुलै, २०१० |
| ६ | सर्वश्री पांडुरंग फुंडकर, व इतर वि.प.स. | "राज्यातील अनेक लोकोपयोगी योजनांसाठी शासनाकडे निधीची चणचण असून राज्यावर दोन लाख तीस हजार कोटी रुपयांचे कर्ज असतांना शासनाच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनागोंदी कारभार असणे. | १५ डिसेंबर २०१० |
| ७ | सर्वश्री पांडुरंग फुंडकर, व इतर वि.प.स | "संपूर्ण भारतामध्ये महाराष्ट्राने सहकार चळवळीची मुहुर्तमेढ रोवून जन सामान्यांसाठी आशेचा किरण निर्माण करणे, परंतु मागील १०-१२ वर्षांपासून सहकाराचे स्वाहाकारामध्ये रुपांतर होणे, राज्यातील बहुतांशी सहकारी बँकांमध्ये भ्रष्टाचाराची | २१ एप्रिल, २०११ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विविध प्रकरणे उघडकीस येणे, कोल्हापूर, पुणे, नांदेड, उस्मानाबाद, जालना इत्यादी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या संचालकांनी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस येणे. | |
| ८ | सर्वश्री पांडुरंग फुंडकर, व इतर वि.प.स | "जैतापूर, ता.राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील नियोजित अणुऊर्जा प्रकल्पाला परिसरातील जनतेने सुरुवातीपासूनच विरोध करणे, जपान येथे झालेल्या भूकंपामुळे अणुभट्टयांमध्ये झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर जैतापूर येथील जनतेमध्ये सुद्धा असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, सिंधुदूर्ग येथील भूगर्भ शास्त्रज्ञ एम.के.प्रभु यांनी जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प अशास्त्रीय कसोट्यावर आधारीत असल्याचे वक्तव्य करणे. | १२ ऑगस्ट, २०११ |

**********

## ६. म.वि.प. नियम २६० प्रस्ताव
## (सन २००८ ते २०१३ या कालावधीत सभागृहात चर्चा झालेले)

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सर्वश्री. चंद्रकांत रघुवंशी व इतर वि.प.स. | राज्यात विविध ठिकाणी झालेल्या अवकाळी पावसाने शेतीचे झालेले नुकसान, शेतकऱ्याना भरपाई देण्याचे आर्थिक सहाय्य. | १ एप्रिल, २००८ |
| २ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, | बंद पडलेल्या गिरण्याच्या जमिनीचा विकास करण्यास शासनाने गिरणी मालकांना दिलेली परवानगी, विहित अटींची पुर्तता गिरणी मालकांनी न करणे, कामगाराच्या गंभीर समस्यांकडे झालेले दुर्लक्ष, गिरणी कामगाराना व मध्यम वर्गीयांना या जमीनीवर घरे न मिळणे. | ७, ८, ९ व १० एप्रिल, २००८ |
| ३ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, | केंद्रीय वित्त मंत्र्यांनी दिनांक २९ फेब्रुवारी २००८ रोजी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात यासाठी ६० हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा करणे, केंद्र शासनाने केलेली ही कर्जमाफीची घोषणा पाच एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांसाठीच असल्यामुळे विदर्भातील बहुसंख्य कोरडवाहू शेतकऱ्यांना त्याचा लाभ न मिळणे, त्यामुळे पाच एकर शेतीची ही अट शिथील करून १५ एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ देणे. | २४ एप्रिल, २००८ |
| ४ | सर्वश्री. जयप्रकाश छाजेड, व इतर वि.प.स. | "जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा परिणाम राज्यातील कामगार व उद्योग धंद्यावर होत असून, राज्यातील प्रामुख्याने असलेले वाहन उद्योग, बांधकाम व्यवसाय, कॉल सेंटर, (बी.पी.ओ.) माहिती तंत्रज्ञान (आय.टी.), सिमेंट उद्योग, मच्छिमार व्यवसाय, दुग्धव्यवसाय व किरकोळ व्यापार अशा विविध क्षेत्रातील लक्षावधी कामगार बेरोजगार होण्याची निर्माण झालेली भिती, | २३ व २४ डिसेंबर, २००८ |
| ५ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, व इतर वि.प.स. | "विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी राज्य शासनाने विदर्भातील ६ जिल्ह्यांसाठी डिसेंबर, २००५ मध्ये दिलेले १०७५ कोटी रुपयांचे पॅकेज, त्यांनतर जून, २००६ मध्ये देण्यात आलेले ३७५० कोटी रुपयांचे पंतप्रधान पॅकेज त्यानंतर केंद्र शासनाने जाहिर केलेली कर्जमाफी योजना, या सर्व उपाययोजनेनंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्या सतत वाढत जाणे. | २४ व २६ डिसेंबर, २००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, व इतर वि.प.स. | "राज्यात विशेषतः कोकणात दिनांक ११ ते १३ नोव्हेंबर, २००९ मध्ये फयान वादळामुळे सुमारे ७२ हजार हेक्टर वरील पिकांचे झालेले नुकसान, ५ ट्रॉलर्स, ३५ हून अधिक बोटी व ६५ होड्या समुद्रात भटकत असून त्यांचा शोध न लागणे, त्यावरील ७८ खलाशी बेपत्ता असणे. | ८ डिसेंबर, २००९ |
| ७ | सर्वश्री.पांडुरंग फुडंकर, व इतर वि.प.स. | "राज्यात गेल्या काही महिन्यांपासून जीवनावश्यक वस्तू विशेषतः तूरडाळ, साखर, तांदूळ, गहू, कडधान्य, खाद्यतेल, भाजीपाला तसेच फळे इत्यादींच्या किंमतीत झालेली बेसुमार वाढ, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या काही वस्तू विशेषतः तूरडाळ, साखर, तांदूळ, इत्यादी रेशन दुकानातून वितरणासाठी निश्चित केल्या असूनही त्यांचा वेळेवर पुरवठा न होणे. | १४ व १५ डिसेंबर, २००९ |
| ८ | श्री. माणिकराव ठाकरे, व इतर वि.प.स. | "विदर्भ, मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये विकास होण्याकरिता धोरणात्मक निर्णय दरवर्षी अद्ययावत सरासरीवर करून सर्वच क्षेत्रातील विकास कामांना आवश्यक तो निधी मिळण्याकरिता जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी आर्थिक अनुशेष भरुन काढण्याची पद्धत सक्षम न ठरल्याने त्याज्य ठरविण्याची आवश्यकता. | २३ डिसेंबर, २००९ |
| ९ | सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. | राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला खर्चावर आधारित भाव न मिळणे, शासनाने कर्जमाफी वा अल्प दराने कर्जवाटपाच्या घोषणा केल्या तरी बँकाच्या अडवणूकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्ज घेणे भाग पडणे. | १९ एप्रिल, २०१० |
| १० | श्री. जयंत पाटील वि.प.स. | "महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सोडविण्याच्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करणे, त्या दाव्यामध्ये केंद्र शासनाने गेल्या आठवड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करणे. | १३ जुलै, २०१० |
| ११ | सर्वश्री.एस. क्यू. जमा, व इतर वि.प.स. | "राज्यात रोजगार हमी योजना कायदा १९७७ साली अंमलात आणून रोजगाराचा अधिकार देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात महत्त्वाची कामे ज्यामध्ये बंधारे, रस्ते, महामार्ग, विहीरी, इत्यादीसारखी विकासाची कामे केली जाऊन यातून ग्रामीण भागातील बेरोजगार, बेघर व्यक्तींनाही रोजगार उपलब्ध झालेला असणे. | २९ मार्च, २०११ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | सर्वश्री. पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. | "महाराष्ट्रामध्ये चोऱ्या, दरोडे इत्यादीचे प्रमाण वाढलेले असणे, एकूण गुन्हेगारीत तसेच महिला व बालकांवरील अत्याचारात पुरोगामी महाराष्ट्राने बिहारलाही मागे टाकल्याचे नुकत्याच प्रकाशित झालेल्या महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणी अहवालात उघडकीस येणे, सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्याच्या घटनेत वाढ झालेली असणे. | ६ एप्रिल, २०११ |

**********

## अशासकीय ठराव

## (सन २००८ ते २०१३ या कालावधीत सभागृहात झालेली चर्चा)

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिवाकर रावते, वि.प.स. | मुंबई शहरात रोज हजारोंच्या संख्येने येणारे परप्रांतीयांचे लोंढे, परिणामी मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडून मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या विविध समस्या, हे लोंढे रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना. | १८ जुलै, २००८ |
| २ | श्री. कपिल पाटील, वि.प.स. | "महाराष्ट्राच्या मराठी राज्य व्यवहार कोषाचे क्लिष्ट स्वरूप बदलून लोकभाषेवर आधारित राज्य व्यवहार कोष तयार करण्यात यावा. | १८ जुलै, २००८ |
| ३ | श्री.दिवाकर रावते, वि.प.स. | मुंबई व महाराष्ट्रामधील केंद्र शासनाच्या कार्यालयांतून केंद्र शासनाच्या त्रिभाषा सुत्रानुसार मराठी भाषेचा वापर पुरेशा प्रमाणात होत नाही हे लक्षात घेता, राज्यातील केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांमधून मराठी भाषेचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यासाठी विशेष उपाययोजना करावी. | १९ मार्च, २०१० |
| ४ | श्री. विक्रम काळे, वि.प.स. | शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यायांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी. | १२ जून, २००९ |
| ५ | श्री. परशुराम उपरकर, व इतर वि.प.स. | शेतीपासून व शेतजमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर शेतकऱ्यांना आयकर (इन्कम टॅक्स) लागू होत नाही, परंतु राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्रासाठी घर व शेतघरांचे संपादन केल्यावर संबंधित शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईच्या रकमेवर आयकर (इन्कम टॅक्स) आकारण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. | २ डिसेंबर २०१० |
| ६ | श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. | राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई. | २ डिसेंबर २०१० |
| ७ | श्री. दिवाकर रावते, वि.प.स. | राज्यातील मराठी शाळांच्या बाबतीत शासनाची असलेली उदासिन भूमिका, त्यामुळे मराठी भाषेचे भवितव्य धोक्यात आले आहे. शासनाने मराठी शाळांच्याबाबतीत स्वीकारलेल्या उदासिनतेच्या धोरणामुळे राज्याची राज्य भाषा मराठी असूनही ती निराधार झाली आहे. शासनाचे सदर धोरण निंदाजनक आहे. | २ डिसेंबर २०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | डॉ.सुधीर तांबे वि.प.स. | राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी. | १८ मार्च, २०११ |
| ९ | डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. | राज्यात स्टोव्हच्या भडक्याने वा दिव्याने पेट घेणे या कारणाने होणारे स्त्रियांचे मृत्यू अपघाती म्हणून नोंदविले जातात. हे मृत्यू अनेकदा मोठ्या प्रमाणात तणाव व घातपातातून घडलेले असतात. अशा प्रकरणातील पिडीत, जळीत स्त्रियांच्या न्यायासाठी अत्याचार विरोधी समिती शासनाने स्थापन करून अपघात प्रतिबंधक योजना राबविण्यात यावी. | २९ जुलै, २०११ |
| १० | डॉ.दिपक सावंत, वि.प.स. | कॅन्सर रुग्णांचे दिवसेंदिवस वाढत चाललेले प्रमाण, कॅन्सर या दुर्धर व असाध्य रोगावर उपचार करण्याकरिता मोठ्या प्रमाणावर रुग्ण मुंबईतील टाटा मेमोरियल रुग्णालयांत येत असणे, परिणामी या रुग्णालयावरील वाढत असलेला ताण विचारात घेता मुंबईतील सर जे.जे.रुग्णालयातील अतिरिक्त मोकळ्या जागी कर्करोग निदान व उपचार केंद्र स्थापन करण्यांत यावे. | २९ जुलै, २०११ |
| ११ | श्री.दिवाकर रावते, वि.प.स. | औरंगाबाद महानगरपालिकेने ४ जानेवारी, २०११ रोजी औरंगाबाद शहराचे नाव बदलून संभाजीनगर करण्याबाबत बहुमताने संमत केलेल्या ठरावानुसार "औरंगाबाद शहराचे व जिल्ह्याचे" नाव "संभाजीनगर" करण्यात यावे. | १७ डिसेंबर, २०११ |
| १२ | प्रा.सुरेश नवले, वि.प.स. | राज्यातील ग्रामीण भागातील राहणीमानाचा दर्जा उंचविण्यासाठी राजीव गांधी घरकुल योजना राबविण्यात येत असून या योजनेला बँकाँमार्फत चांगला प्रतिसाद मिळत नसणे. | १७ डिसेंबर, २०११ |

*********

## ब. महाराष्ट्र विधानसभा

### १. प्रश्न - काही सार्वजनिक महत्त्वाचे विषय ( सन १९९५ ते २०१३)

| अ.क्र. | तारांकित प्रश्न क्रमांक | दिनांक | प्रश्न उपस्थित करणाऱ्या मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचा विषय |
|---|---|---|---|---|
| १ | ११२९४ | ११ डिसेंबर १९९५ | श्री. मधुकर सरपोतदार व इतर वि.स.स. | झोपडपट्टी सुधार योजनेबाबत नियोजन विभागाचा प्रस्ताव |
| २ | ९०९३ | ११ डिसेंबर १९९५ | श्री. अर्जुन खोतकर व इतर वि.स.स. | राज्यात सिंचन आयोग नेमण्याबाबत |
| ३ | ७०९० | १४ डिसेंबर १९९५ | श्री. आर.आर. पाटील व इतर वि.स.स. | राज्यातील प्रत्येक गावात घ्यावयाच्या कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजनेच्या आराखड्याबाबत. |
| ४ | ७७१७ | १९ डिसेंबर १९९५ | श्री.बाळासाहेब थोरात व इतर वि.स.स. | राज्यातील पिकांच्या नजर पैसेवारी पद्धतीत बदल करण्याबाबत. |
| ५ | १५९५५ | २२ मार्च १९९६ | माणिकराव ठाकरे व इतर वि.स.स. | रस्ते आणि पुलाची कामे खाजगी क्षेत्राद्वारे करण्यासाठी महामंडळ स्थापण्याबाबत. |
| ६ | २२१४४ | ८ जुलै १९९६ | श्री. बाबुराव माने व इतर वि.स.स. | खोल समुद्रात जाऊन मच्छिमारी करण्यासाठी मोठे ट्रॉलर्स खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याबाबत. |
| ७ | २२५२३ | ९ जुलै १९९६ | श्री. राजेंद्र देशमुख व इतर वि.स.स. | राज्यातील तांत्रिक वैद्यकीय प्रवेशासाठी स्वतंत्र बुद्धीमत्ता चाचणी घेण्याबाबत. |
| ८ | २१२३३ | १० जुलै १९९६ | श्री.मंगलप्रभात लोढा व इतर वि.स.स. | मुंबईतील ४० लाख झोपडपट्टी रहिवाशांना मोफत घरे देण्याची योजना. |
| ९ | ४३८ | २० डिसेंबर १९९९ | श्री.बशीर पटेल, वि.स.स. | ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या विकासाचा कालबद्ध कार्यक्रमाबाबत. |
| १० | ७७१३ | ७ एप्रिल, २००० | श्री.दिपक पायगुडे, वि.स.स. | राज्यातील १९९५ पूर्वीच्या झोपडपट्टया कायम करण्याचा व त्यांना संरक्षण देण्याबाबत. |
| ११ | ४७५९५ | ७ डिसेंबर २००१ | श्री.रविंद्र माने, वि.स.स. | खत्री आयोगाने सादर केलेल्या अहवालावर निर्णय |
| १२ | ३१३७३ | २० मार्च २००६ | श्री. प्रकाश मेहता व इतर वि.स.स. | राज्यात बार बंदी लागू केली असल्याबाबत |
| १३ | ८२३५ | २८ मार्च २००५ | श्री.गणपत कदम, वि.स.स. | कोकणातील आंबा व काजू उत्पादकांची बेमोसमी पावसामुळे झालेली हानी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | ३२६१ | २६ मार्च २००५ | श्री. नारायण राणे, वि.स.स. | शासनाच्या टाऊनशिप धोरणामुळे निवासी बांधकामांना मिळणाऱ्या मजुरीपेक्षा आठपट अधिक निवासीबांधकाम करण्याच्या परवानगीबाबत. |
| १५ | ३२६३ | २९ मार्च २००५ | श्री.नारायण राणे, वि.स.स. | मुंबईतील उपकर प्राप्त इमारतीतील पुनर्रचित तसेच म्हाडाच्या निवासी सदनिकांना मालमत्ता करात सवलत देण्याबाबत. |
| १६ | ११३२६ | ७ एप्रिल २००५ | श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स | सोलापूर जिल्ह्यातील सांगोले विधानसभा मतदार संघात रोहयोच्या कामावरील मजुरांना कुपन्सवर धान्य मिळण्याबाबत |
| १७ | १३३७८ | १३ जुलै २००५ | श्री. रामदास कदम, वि.स.स. | कोकणातील आंबा पिकाचे नुकसानीचे नव्याने सर्व्हेक्षण करण्याबाबत. |
| १८ | ३३४३९ | २१ मार्च २००६ | श्री. विष्णु सवरा व इतर वि.स.स. | मुंबईच्या परिवतर्नाबाबत मॅकेजीन कंपनीचा अहवाल |
| १९ | ३३३६२ | २२ मार्च २००६ | श्रीमती वर्षा गायकवाड व इतर वि.स.स. | महाराष्ट्र राज्यातील नदीजोड प्रकल्पाबाबत |
| २० | ३१०६० | २२ मार्च २००६ | श्रीमती शोभा फडणवीस व इतर वि.स.स. | राज्यातील जलसाठ्याचा विनियोग करण्याबाबत |
| २१ | ३१८८४ | २३ मार्च २००६ | श्री. सचिन अहिर व इतर वि.स.स. | कोकणातील बेदखल कुळांच्या प्रश्नांबाबत |
| २२ | ३४४०४ | ५ डिसेंबर २००६ | श्री.विवेक पाटील व इतर वि.स.स. | भूकंप पुनर्वसीत (ता.औसा जि.लातूर) बहुउद्देशिय महिला केंद्राचे महिला मंडळांना वाटप करण्याबाबत. |
| २३ | ४३४४४ | ५ डिसेंबर २००६ | श्री. गिरीष बापट व इतर वि.स.स. | अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची खुल्या प्रवर्गातील बेरोजगारांसाठी कर्ज वितरणाची योजना. |
| २४ | ४३२३१ | ५ डिसेंबर २००६ | श्री.बाळा नांदगांवकर व इतर वि.स.स. | मूल्यवर्धित कर प्रणाली (व्हॅट) राबविण्यात आल्यापासून जमा झालेल्या महसूल विक्रीबाबत. |
| २५ | ४१६२४ | १३ डिसेंबर २००६ | श्री.वामनराव चटप व इतर वि.स.स. | महाराष्ट्रातील बेलदार समाजाच्या तत्सम जातींना भटक्या विमुक्त जातीमध्ये समाविष्ट करणेबाबत. |
| २६ | ४०५२५ | १७ जुलै २००६ | श्री.अमरसिंह पंडीत, वि.स.स. | महाराष्ट्रातील नाशिक, औरंगाबाद येथील उद्योजकांचे हिमाचल प्रदेशाकडे होत असलेल्या स्थलांतराबाबत. |
| २७ | ४१९५६ | ११ जुलै २००७ | श्री. नरसय्या आडम, वि.स.स. | पुणे शहरातील येरवडा व खरांडी येथे कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या विडी घरकुलधारकांना व्याज माफी करण्याबाबत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | ७४००६ | २६ नोव्हेंबर २००७ | श्री. संपतराव अवघडे व इतर वि.स.स. | सौर ऊर्जेव्दारे विद्युत निर्मिती करून (Solar Photroltaic Cell) उपाययोजना निधीतून विद्युतीकरणाची सोय होण्याबाबत. |
| २९ | ८०६१६ | २६ मार्च २००८ | श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | ग्रामीण विद्युतीकरणांच्या प्रस्तावाच्या मान्यतेसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली मागणी. |
| ३० | ८३५२१ | ३१ मार्च २००८ | श्री. दगडू सकपाळ, वि.स.स. | ऊसाच्या हमी भावाप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना भाव मिळण्याबाबत. |
| ३१ | ८०९४१ | ४ एप्रिल २००८ | श्री. चंद्रकांत छाजेड, वि.स.स. | राज्यातील दगड खाणीत काम करणाऱ्या कामगारांची सुमारे ८ लाख मुले शिक्षणापासून वंचित असल्याबाबत. |
| ३२ | ८४४५८ | ८ एप्रिल २००८ | श्री.सुभाष देसाई व इतर वि.स.स. | मुंबई उपनगरातील म्हाडाने बांधलेल्या घरांना रेडी रेकनर प्रमाणे दर न आकारण्याचा शासनाने घेतलेला निर्णय. |
| ३३ | ८४०२६ | ८ एप्रिल २००८ | श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स. | राज्यातील शासकीय शाळेतील शिक्षकांना शाळा सोडून निवडणूकीसारखी शिक्षण बाहय कामे सांगता येणार नाहीत असा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आदेश. |
| ३४ | ८८०१० | ८ एप्रिल २००८ | श्री.दत्ताजी नलावडे व इतर वि.स.स. | मुंबईतील शासकीय, महापालिका व खाजगी हॉस्पिटलमध्ये जमा होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करण्याबाबत. |
| ३५ | ८२६५० | २२ एप्रिल २००८ | श्री.एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील | राज्यात शिधावाटप योजनेद्वारे गरीबांना देण्यात येणारे धान्य परस्पर खुल्या बाजारात विकण्यात येत असल्याबाबत. |
| ३६ | ९०६९२ | २३ एप्रिल, २००८ | श्री. दत्ताजी नलावडे, वि.स.स. | मुंबईला अखंड वीजपुरवठा करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत. |
| ३७ | ९१६४४ | २१ जुलै २००८ | श्री.सुरेश गंभीर, वि.स.स. | राज्यातील मच्छीमारांना विमा संरक्षण देण्याबाबत. |
| ३८ | १००९५० | २३ डिसेंबर २००८ | श्री. राज पुरोहित, वि.स.स. | अनुसूचित जमिनी बनावट प्रमाणपत्रे देऊन म्हाडाची घरे मिळविल्याबाबत. |
| ३९ | १३९५ | १० डिसेंबर २००९ | श्री.किसन कथोरे, वि.स.स. | अंबरनाथ तालुक्यामध्ये (जि.ठाणे) संजय गांधी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना पेन्शन मिळाली नसल्याबाबत. |
| ४० | १९०४ | १० डिसेंबर २००९ | श्री.आर.एम.वाणी, वि.स.स. | राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था आर्थिक अडचणीत सापडल्याने गुतवणूकदारांचे सुमारे ९१७.१५ कोटी रुपये गुंतून पडल्याबाबत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४१ | २१७२ | १४ डिसेंबर २००९ | श्री.दादाजी भुसे, वि.स.स. | दलित व्यक्तींना घरकुलासाठी अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत. |
| ४२ | १०७६६२ | ४ जून २००९ | श्री. सेवकभाऊ वाघाये-पाटील व इतर वि.स.स. | विदर्भातील ग्रामीण भागातील वाढत्या भारनियमनामुळे शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना सौर कंदीलाचे वाटप करण्याबाबत. |
| ४३ | ४९७९८ | १ ऑगस्ट २०११ | श्री.सुभाष देसाई, वि.स.स. | शासनाने इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया बेस्ट फाइव्ह सूत्रानुसार घेण्याबाबत. |
| ४४ | ५०७४५ | ४ ऑगस्ट २०११ | श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. | विदर्भातील गोसेखुर्द प्रकल्प निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत. |
| ४५ | ५४४६४ | ४ ऑगस्ट २०११ | श्री.विलास तरे, वि.स.स. | पालघर तालुक्यातील (जि.ठाणे) जायशेत, बैरीफोंडा व सोमटा या आदिवासी गावांना विजपुरवठा करण्याबाबत |
| ४६ | ४९५०९ | १ ऑगस्ट २०११ | डॉ.बालाजी किणीकर, वि.स.स. | शासनाने कागदाच्या वाढत्या किंमतीत व व्हॅटचे कारण पुढे करून दहावीच्या पाठ्यपुस्तकांच्या किंमतीत तिप्पट वाढ केल्याबाबत. |
| ४७ | ५६१३५ | ८ ऑगस्ट २०११ | श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. | अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांनी ३० ते ३५ वर्षे शासनाची सेवा करूनही त्यांना सेवानिवृत्ती वेतन तसेच अनुषंगिक लाभ देण्यात येत नसल्याबाबत. |
| ४८ | ५२०६३ | ९ ऑगस्ट २०११ | श्री.वसंतराव गिते, वि.स.स. | नाशिक शहरातील चेहेडी पुरग्रस्त बाधितांना महानगरपालिकेत सामावून घेणेबाबत. |
| ४९ | ५९००८ | १६ डिसेंबर २०११ | श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स. | शासनाने राज्यातील शासकीय रुग्णालयांतील रोगनिदान सेवांचे खाजगी करण्याचा घेतलेला निर्णय. |
| ५० | ५८४९४ | १६ डिसेंबर २०११ | श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स. | शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या कायद्यात समानता आणण्यासाठी नविन नियमावली करण्याबाबत. |
| ५१ | ७२०८९ | १९ मार्च २०१२ | श्री.अनिल गोटे, वि.स.स. | राज्य वीज मंडळातील दक्षता पथके बंद करण्यात आल्याबाबत. |
| ५२ | ६७४४६ | १९ मार्च २०१२ | श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स. | अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयांतील खाटांची संख्या वाढविण्याबाबत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५३ | ७१३०० | २१ मार्च २०१२ | श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स. | मुंबई शहरातील झटपट लॉटरी, मटका, जुगांराचे अड्डे यावर डांसबार प्रमाणे कारवाई करण्याबाबत. |
| ५४ | ७०७७६ | २ एप्रिल २०१२ | श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स. | गोसेखुर्द या प्रकल्पाच्या गावाचे पुनर्वसन करण्यासह प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याबाबत. |
| ५५ | ७४९१८ | ९ एप्रिल २०१२ | श्री.कृषीभूषण पाटील, वि.स.स. | नाशिक येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात रेडिओ थेरेपी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत. |
| ५६ | ७७७४६ | ९ एप्रिल २०१२ | श्री.उत्तमराव ढिकले, वि.स.स. | पवन ऊर्जा कंपन्यांना व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना "मुक्त प्रवेश" अंतर्गत वीज पुरविण्याची परवानगी देताना नियमानुसार निर्बंध घालण्याबाबत. |

| अ.क्र | प्रश्न क्रमांक | सदस्य | विषय |
|---|---|---|---|
| **दिनांक १२ मार्च २०१३** | | | |
| १. | ९९६१२ | श्रीमती पंकजा मुंडे-पालवे व इतर वि.स.स. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सुतिकागृहात गेली २ वर्षांपासून प्रसूतीतज्ञ, भूलतज्ञ, बालरोगतज्ञ व स्त्रीरोगतज्ञ नसल्याबाबत |
| २. | १००२७५ | श्री. चंद्रशेखर बावनकुळे व इतर वि.स.स. | नागपूर शहराच्या पेरीअर्बन परिसरातील पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत |
| ३. | ९७७५९ | श्री. मधुकर पिचड व इतर वि.स.स. | एमएमआरडीएने योजिलेल्या शिवडी न्हावा-शेवा सागरी सेतू मार्ग प्रकल्पाच्या कामाबाबत |
| ४. | ९९४८७ | श्री. प्रकाश भोईर व इतर वि.स.स. | जुहू (मुंबई) येथील व्यापारी भूखंडांना २.५ चटईक्षत्र लागू करून करण्यात आलेला गैरप्रकार |
| ५. | १०२०२६ | श्री. नरेंद्र भोंडेकर व इतर वि.स.स. | सावरी, जवाहरनगर (जि.भंडारा) येथील पाणीपुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार |
| ६. | ९८९९० | श्री. विजयराव औटी व इतर वि.स.स. | राज्यातील ग्राहक तक्रार मंचाचे अध्यक्ष व सदस्यांची पदे भरण्याबाबत |
| ७. | ९७५१२ | श्री. अमीन पटेल व इतर वि.स.स. | मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत (एसआरए) मोठ्या प्रमाणात झालेले गैरव्यवहार |
| ८. | १०१३०७ | श्री. सुधाकर देशमुख व इतर वि.स.स. | अमरावती शहरातील आधारकार्ड कचऱ्याच्या ढिगाऱ्यात आढळल्याबाबत |
| ९. | ९९००२ | श्री. सुर्यकांत दळवी व इतर वि.स.स. | ठाणे येथील वेग नियंत्रक न बसविलेल्या स्कूल बसेसवर कारवाई करण्याबाबत |
| १०. | १०३९७९ | श्रीमती प्रणिती शिंदे व इतर वि.स.स. | सोलापूर शहराची पाणीपुरवठा समस्या सोडविण्याबाबत |
| ११. | १०३९२६ | कॅप्टन अभिजीत अडसुळ व इतर वि.स.स. | अमरावती महानगरपालिका कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या भूखंडातील घोटाळ्याबाबत |
| १२. | ९८१०८ | श्री. कृषिभूषण साहेबराव पाटील व इतर वि.स.स. | राज्यात महिलांवरील अत्याचाराचे प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी जलद न्यायालये सुरू करणेबाबत |
| **दिनांक १३ मार्च २०१३** | | | |
| १३. | १०२००१ | श्री. चंद्रदीप नरके व इतर वि.स.स. | कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या गणवेश साड्या खरेदीमध्ये केलेला गैरव्यवहार |
| १४. | १०१८६३ | श्री. अबु असिम आझमी व इतर वि.स.स. | राज्यातील वस्त्रोद्योग धोरणाची फेरमांडणी करणेबाबत |
| १५. | ९८०८० | श्री. विलास लांडे व इतर वि.स.स. | पुणे कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची बनावट संख्या दाखवून शासनाचे अनुदान घेतल्याबाबत |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | १०१३०५ | श्री. सुधाकर देशमुख व इतर वि.स.स. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिक्षा भवनाचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत |
| १७. | ९७६३९ | श्री. विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. | बालगृहातील मतीमंद मुलांना जेवण व इतर सुविधा योग्यप्रकारे मिळत नसल्याबाबत |
| १८. | १००२६१ | श्री. चंद्रशेखर बावनकुळे व इतर वि.स.स. | नागपूर जिल्ह्यातील शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालय नसल्याबाबत |
| १९. | ९६८१७ | श्री. जितेंद्र आव्हाड व इतर वि.स.स. | राज्यातील दगडखाण कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत |
| **दिनांक २९ जुलै २००११** | | | |
| १. | ५२८२८ | श्री. नितीन भोसले व इतर वि.स.स. | मालेगांव सार्वजनिक बांधकाम विभागाने (जि.नाशिक) आणि जळगांव सा.बां. विभागाने केलेल्या कामात नियमांची पायमल्ली करून केलेला गैरप्रकार |
| **दिनांक २ ऑगस्ट २०११** | | | |
| २. | ४७६२९ | श्री. एकनाथराव खडसे (पाटील) व इतर वि.स.स. | अंधेरी (मुंबई) प्रादेशिक परिवहन विभागातील २० मोटार ट्रेनिंग स्कूलची मान्यता रद्द करण्यात आल्याबाबत |
| ३. | ५१०८१ | श्री. प्रकाश भोईर व इतर वि.स.स. | नवी मुंबईचा क्वीन्स नेकलेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाम बीच ा मार्गावरील टोलेजंग टॉवरमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकाम झाल्याबाबत |
| ४. | ४७२५४ | श्री. सरदार तारासिंह व इतर वि.स.स. | कोपरखैरणे (नवी मुंबई) सेक्टर ५ प्लॉट क्रमांक २० हा शाळेकरिता घेतलेला भूखंड दुसऱ्या संस्थेला भाडेतत्वावर देऊन केलेला गैरव्यवहार |
| **दिनांक ३ ऑगस्ट २०११** | | | |
| ५. | ५०५८४ | श्री. आर. एम. वाणी व इतर वि.स.स. | तुळजापूर (जि.उस्मानाबाद) पंचायत समितीने विविध योजनांसाठी केलेल्या खरेदीमध्ये केलेला गैरव्यवहार |
| ६. | ४७९१३ | श्री. विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. | नांदेड जिल्ह्यात होत असलेले अवैध रेती उत्खनन |
| ७. | ५१६३८ | श्री. गणपत गायकवाड व इतर वि.स.स. | राज्यात जातपडताळणी करण्यासाठी समित्यांमध्ये वाढ करण्याबाबत |
| ८. | ४७१२८ | श्रीमती माधुरी मिसाळ व इतर वि.स.स. | ठाणे व रायगड जिल्ह्यात होत असलेले रेतीचे अवैध उत्खनन |
| **दिनांक ५ ऑगस्ट २०११** | | | |
| ९. | ५०५६० | श्री. आर. एम. वाणी व इतर वि.स.स. | सांगली शहर पोलीस स्थानकामध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे वरिष्ठ अधिकारी शोषण करीत असल्याबाबत |
| **दिनांक १९ डिसेंबर २०११** | | | |
| १. | ६२८९१ | श्री. प्रकाश भोईर व इतर वि.स.स. | मुंबई, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यातील पथकर नाक्यांवर आजमितीस वसूल करण्यात आलेल्या पथकराबाबत |

| | | | |
|---|---|---|---|
| **दिनांक २० डिसेंबर २०११** | | | |
| २. | ६२५९३ | श्री. जयकुमार गोरे व इतर वि.स.स. | अंधेरी (पश्चिम) चारबंगला येथ्ील पाटलीपुत्र सोसायटीने अनधिकृतपणे उभारलेल्या शॉपींग मॉलबाबत |
| **दिनांक ८ डिसेंबर २००९** | | | |
| १. | १७३८ | श्री. सुधाकर देशमुख व इतर वि.स.स. | राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील जकात रद्द करण्याबाबत |
| २. | १०७१ | श्री. देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स. | नागपूर सुधार प्रन्यास अंतर्गत येणाऱ्या ५७२ व १९०० लेआऊट मधील विविध समस्यांबाबत |

## २. लक्षवेधी सूचना(म.वि.स. नियम १०५ अन्वये) (सन २००५ ते २०१३)

### सन २००५ चे पहिले अधिवेशन

| अ.क्र. | दिनांक | सदस्यांचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| (१) | ३० मार्च २००५ | सर्वश्री. विवेक पाटील, वि.स.स. | "रायगड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यात पनवेल, खांदा कॉलनी, कोन, भिंगारी, नवीन पनवेल, खालापूर, पेण इत्यादी ठिकाणी जवळपास सुरू करण्यात आलेल्या ४२ बारमुळे उध्वस्त झालेले अनेकांचे संसार, बार संस्कृतीमुळे भारतीय संस्कृतीचीच होत असलेली विटंबना, |
| **सन २००५ चे तिसरे अधिवेशन** | | | |
| (२) | ८ डिसेंबर २००५ | सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, गोपीनाथ मुंडे, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. | "राज्यात सर्वत्र एड्स सारख्या दुर्धर रोगाचे वाढत असलेले प्रमाण, राज्य शासनाने एड्स निर्मूलनासाठी जनजागृती करून कडक कृती कार्यक्रम आखून उपाययोजना करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." |
| (३) | १४ डिसेंबर २००५ | सर्वश्री. शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.स.स. | "मुंबईत ४० हजार विडी कामगार गेली अनेक वर्षे आपला पारंपारिक विडया वळण्याचा व्यवसाय करीत असून आजपर्यंत त्यांना सरकारने कामगाराचा दर्जा न देणे, त्यामुळे सोयीसुविधांपासून ते पिढयानपिढया उपेक्षित असणे, विडी कामगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना." |
| **सन २००६ चे पहिले अधिवेशन** | | | |
| (४) | १० एप्रिल २००६ | श्रीमती शोभा फडणवीस, श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. | "केबल नेटवर्कवर, संगीत व्हिडीयो, अश्लिल चित्रपट, जाहिराती, अश्लिल गाणी हे सर्रासपणे प्रसारीत केले जाणे,त्यामुळे लैंगिक गुन्ह्यात होणारी वाढ, टी.व्ही.चॅनेल्सद्वारे "समाचार" ह्या सदराखाली ॲडल्ट फिल्ममधील सेन्सरने कापलेली दृष्ये दाखविणे व स्त्री देहाची बिभत्स व अभद्र छायाचित्रे छापणे व दाखविणे व सेक्स एज्युकेशनच्या नावाखाली अश्लिलतेचे प्रदर्शन करणे, त्यामुळे समाजातील लहान मुले, तरुण व एकंदरीत सर्व परिवारांवर विपरीत परिणाम होणे व तरुण पिढी बिघडविण्याचा प्रयत्न होणे, परिणामी छेडछाड, लैंगिक छळ व स्त्रियांवरील बलात्कार होण्याचे वाढत असलेले प्रमाण, तसेच किशोरवयीन तरुणांमध्ये लैंगिक गुन्हे करण्याची प्रवृत्ती वाढीस लागणे व परिणामी समाजावर होणारे त्याचे घातक दुष्परिणाम,अशा जाहिराती प्रसारीत करण्यास बंदी घालण्याची आवश्यकता तसेच बिभत्स अश्लिल व अर्धनग्न व पूर्णनग्न छायाचित्रे छापण्यास बंदी करण्याबाबत कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, |

| सन २००७ चे पहिले अधिवेशन | | | |
|---|---|---|---|
| (५) | १७ मार्च २००७ | डॉ. रामचंद्र साळे, श्री. संजय चव्हाण, प्रा. तुकाराम बिरकड, श्री. आर.एम.वाणी,वि.स.स. | "राज्यात सर्वत्र अनेक ग्रामीण रुग्णालयांमध्ये ॲन्टीरॅबीज, सर्पदंशावरील तसेच विंचूदंशावरील प्रतिबंधात्मक लसीचा असलेला तुटवडा, खुल्याबाजारातून या प्रतिबंधात्मक लसी अत्यंत महाग मिळत असल्यामुळे सामान्य जनतेला त्या खरेदी करणे परवडत नसणे, या तीनही प्रतिबंधात्मक लसी सर्व रुग्णालयांमध्ये मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, |

| सन २००९ चे चौथे अधिवेशन | | | |
|---|---|---|---|
| (६) | १४ डिसेंबर २००९ | सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), गिरीष बापट, सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, संभाजी पवार, खुशाल बोपचे, गोपाळ शेट्टी, वि.स.स. | "राज्यातील आदिवासी समाजाला इतर समाजाबरोबर आणण्याकरता केंद्र व राज्य शासनाने विविध योजना जाहीर करणे, आदिवासी विकास योजनेंतर्गत आदिवासींना मोफत धान्यांचे वाटप करण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्य शासनाला दरवर्षी मिळणारा कोट्यवधी रुपयांचा निधी, सदर अन्न धान्य आदिवासींना पुरविण्याकरता केंद्र शासनाने घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे, सदर धान्यांची खरेदी राज्य नॅशनल को.ऑप. कन्झ्युमर फेडरेशनमार्फत होण्याची अपेक्षा." |

| सन २०१० चे पहिले अधिवेशन | | | |
|---|---|---|---|
| (७) | २३ मार्च २०१० | सर्वश्री.सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, अतुल देशकर, नाना पटोले, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. | "राज्यातील ३६ हजार ३३६ गावांपैकी २० हजार २४० गावातील खरीप पिकांची आणेवारी ५० पैश्यांपेक्षा कमी असल्याने तेथे राज्य सरकारने माहे फेब्रुवारी, २०१० मध्ये टंचाईची स्थिती जाहीर करणे, या गावांमध्ये विदर्भातील १४ हजार गावांचा समावेश असणे, मोठ्या प्रमाणावर गावांमध्ये टंचाईची स्थिती जाहीर झाली असतानाही टंचाई निवारणासाठी उपाययोजना न करणे. " |

| | | | |
|---|---|---|---|
| (८) | २२ एप्रिल २०१० | सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, अतुल देशकर, नाना पटोले, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. | "राज्यातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये एकूण अस्तित्वात असणाऱ्या खाटांच्या संख्येपैकी निर्धन तसेच दुर्बल घटकातील रुग्णांकरिता अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दराने १० टक्के + १० टक्के या प्रमाणात वैद्यकिय उपचाराच्या सोयीसुविधा देणेबाबतची तरतूद मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये असतांना मुंबई व अन्य जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन रुग्णांसाठी १० टक्के व दुर्बल घटकातील रुग्णासाठी १० टक्के आंतररुग्ण सेवा आरक्षित न ठेवणे,." |
| **सन २०१२ चे दुसरे अधिवेशन** | | | |
| (९) | १० जुलै २०१२ | **ॲड.उत्तमराव ढिकले,** सर्वश्री नितीन भोसले, नाना पटोले, एकनाथराव खडसे (पाटील) वि.स.स. | "राज्यात सर्वत्र विशेषतः कोल्हापूर, सातारा, सांगली व कोकण येथे काविळीची पसरलेली साथ, इचलकरंजी, (जि.कोल्हापूर) येथे दिनांक १९ जून २०१२ पर्यंत ३८३३ जणांना काविळीची लागण झाली असून त्यामध्ये आतापर्यंत सुमारे ४ गर्भवती महिलांसह १६ जणांचा झालेला मृत्यू. " |

लक्षवेधी सूचना

**सन २०१२ चे प्रथम अधिवेशन**

| अ.क्र | दिनांक | सदस्याचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| (१०) | दिनांक १९ मार्च २०१२ | **सर्वश्री. देवेंद्र फडणवीस,** सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, विजय घोडमारे, सुधीर पारवे, चंद्रशेखर बावनकुळे वि.स.स. | "नागपूर शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मिहान प्रकल्पाअंतर्गत इन्फोसिस व राज्यशासन यांच्यात दिनांक ४ मार्च २०१२ रोजी करार करण्यात येणे, मिहान प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला किंवा १२.५% विकसित जमीन देण्याकरिता दिनांक ८ ऑक्टोबर २०११ रोजी शासनाने अध्यादेश काढणे, परंतु अद्यापपावेतो एकही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याला अध्यादेशाप्रमाणे मोबदला देण्यात आलेला नसणे, अध्यादेशावर कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, मिहान प्रकल्पग्रस्तांनी वाढीव मोबदल्यासाठी दाखल केलेल्या केसेसचा निपटारा करण्याकरिता शासनाने फास्ट ट्रॅक कोर्टची स्थापना करणे, या जलदगती न्यायालयाकडे दाखल झालेल्या केसेस वर्ग करण्यात आलेल्या असणे, परंतु जलदगती न्यायालयात त्याची सुनावणी सुरू झालेली |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नसल्याने शासनाद्वारे काही ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, जलदगती न्यायालयाचे कामकाज शीघ्र गतीने चालावे या करिता मिहान इमारतीतच जागा देऊन नेमून दिलेल्या न्यायाधिशामार्फत जलदगतीने सुनावणी करण्यासाठी राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची गरज, मौजा शिवणगांव येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १२.५% विकसीत जमीन देताना भरमसाठ विकास शुल्क आकारण्यात येण्याची शक्यता याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपापयोजना. " |

लक्षवेधी सूचना

**सन २०१२ चे द्वितीय अधिवेशन**

| अ.क्र | दिनांक | सदस्याचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| (११) | दिनांक १२ जुलै,२०१२ | **श्री.सुधीर मुनगंटीवार,** वि.स.स. | "कृषी विभागाचा परवाना आणि कायदेशीर मान्यता नसलेले ३७ लाख ५० हजार रुपयांचे बनावट रासायनिक खत कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण पथकाने दिनांक ३० जून २०१२ रोजी यवतमाळ येथील बोसा रोडवरील गोदामातून जप्त करणे, या घटनेमुळे बनावट खतांची विक्री करणारे मोठे रॅकेट विदर्भासह राज्यात सक्रीय असल्याचे उघडकीस येणे, गोदाम उघडून पंचनामा केला असता विविध ९ प्रकारची खते नवभारत फर्टीलाईजर्स लिमिटेड या नावाने आढळून येणे, या खतांना पुण्याच्या कृषी आयुक्तालयाची मान्यता नसणे, याच दरम्यान कृषी विभागाने राळेगाव येथील एका खत विक्रेत्याकडील सुमारे १ हजार पोती खत साठा जप्त करणे, बनावट खतांसह बनावट बियाण्यांची सुद्धा राजरोसपणे सर्वत्र विक्री सुरू असणे, बनावट खत व बियाणे विक्रीवर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने विशेष मोहीम राबविण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." |

लक्षवेधी सूचना

**सन २०१३ चे प्रथम अधिवेशन**

| अ.क्र | दिनांक | सदस्याचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| (१२) | दिनांक १७ एप्रिल २०१३ | **सर्वश्री.देवेंद्र फडणवीस,** सुधाकर देशमुख, **वि.स.स.** | "राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या प्रवेश नियंत्रण समितीने दिनांक ११ जानेवारी २०१३ रोजीच्या सभेमध्ये १७ खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी ३५० जागा भरताना अनियमितता करून गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी डावलून कमी गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, प्रवेशाच्या वेळी आरक्षणाच्या तरतुदीचा अवलंब न करणे, त्यामुळे सदर प्रवेश रद्द करण्याची समितीने शिफारस करणे, शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर २०१२ च्या निर्णयान्वये स्थापन केलेल्या समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर करणे, याबाबत सर्व महाविद्यालयांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यावरच उपरोक्त कार्यवाहीची शिफारस होणे, मात्र संस्था चालकांच्या दबावाखाली शासन कार्यवाही करण्याबाबत टाळाटाळ करीत असल्याने गुणवत्ता प्राप्त व पात्र विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." |
| (१३) | दिनांक १८ एप्रिल २०१३ | **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** देवेंद्र फडणवीस, सुधीर पारवे, विजय घोडमारे, **वि.स.स.** | "विदर्भातील अनेक गावठाणांना लागून झुडपी जंगल क्षेत्र असणे, या जागांवर झुडपी जंगल अस्तित्त्वात राहिले नसल्याने त्या जागांवर सन १९९५ च्या पूर्वीपासून अतिक्रमण करून नागरिकांनी बांधकाम करून वसाहती तयार केलेल्या असणे, परंतु शासनाकडे या जागांची नोंद झुडपी जंगल असल्याने ही अतिक्रमणे नियमित करून तेथे कुठलीही विकास कामे करण्याकरिता अडचणी येत असणे, अनेक गावठाणांचा विस्तार यामुळे खुंटला असणे, अनेक ग्रामपंचायतींनी या झुडपी जंगल जमिनी गावठाण विस्ताराकरिता मागणी केलेले प्रस्ताव झुडपी जंगल कायद्यामुळे प्रलंबित असणे, सन १९९५ पूर्वीची अतिक्रमणे नियमित करण्याच्या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाने केंद्र शासनाच्या वन विभागाकडे पाठपुरावा करून या झुडपी जंगल जमिनी शासनाच्या नावे करून गावठाण विस्ताराकरिता संबंधित ग्रामपंचायतींना हस्तांतरित करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |

लक्षवेधी सूचना

**सन २०१३ चे द्वितीय अधिवेशन**

| अ.क्र | दिनांक | सदस्याचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| (१४) | दिनांक १ ऑगस्ट २०१३ | **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** | "सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे येथे बिझनेस बायोटेक्नॉलॉजी इन्यूबेटर उभारण्यात येणे, इंडस्ट्री रिसर्च अस्टीस्टड कौन्सिल, डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१३ पर्यंत प्रकल्प उभारणीसाठी दिलेला निधी न वापरल्यास सदर निधी परत घेण्याची नोटीस नुकतीच बजावणे, पुणे विद्यापीठाच्या हलगर्जीपणामुळेच या अतिशय महत्त्वाच्या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने दिलेला निधी परत जाण्याच्या मार्गावर असणे, गतवर्षी पुणे विद्यापीठातील एस.टी.पी.ला बिझनेस बायोटेक्नॉलॉजी इन्यूबेटर उभारण्यासाठी केंद्राने ३४ कोटी रु.निधी देणे, मात्र पुणे विद्यापीठातील वादामुळे परत जाणे, सदर प्रकल्प सुरू करण्यास मान्यता देताना व प्रकल्पाकरिता जागा देताना सदरहू प्रकल्पाची जागा फक्त प्रकल्पाच्या वापरासाठी असावी व त्याची मालकी विद्यापीठाकडे असावी, यासाठी संयुक्त व्यवस्थापन समिती गठन करण्यात यावी, प्रकल्पाचे संचालक म्हणून विद्यापीठाची व्यक्ती असावी, सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्कचे नियामक मंडळाचे सदस्य पदसिद्ध असणेबाबत घटनेत बदल करण्यात यावा अशा केंद्र शासनाला न पटणाऱ्या जाचक अटी लादल्याने सदर प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता धूसर होणे, राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला हा प्रकल्प गुंडाळला जाण्याची व इतर राज्यात जाण्याची निर्माण झालेली भीती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." |

लक्षवेधी सूचना

**सन २०१३ चे तृतीय अधिवेशन**

| अ.क्र | दिनांक | सदस्याचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| (१५) | दिनांक ११ डिसेंबर २०१३ | **सर्वश्री देवेंद्र फडणवीस,** सुधाकर देशमुख, विजय वडेट्टीवार, रामरतन राऊत, दिपक आत्राम, डॉ.नामदेव ऊसेंडी, सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, विजय घोडमारे, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री बळीराम सिरस्कार, संभाजी पवार, डॉ.सुधाकर भालेराव, **वि.स.स.** | "राज्यातील इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे सुमारे ११०० कोटी रुपये शासनाने वितरीत न करून विद्यार्थ्यांवर अन्याय केल्याचे नुकतीच उघडकीस येणे, त्यातच राज्यातील इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) विद्यार्थ्यांना केंद्र शासनाने लागू केलेली शिष्यवृत्ती राज्य शासन बंद करण्याच्या प्रयत्नात असल्याने इतर मागासवर्गीय संघटनांनी सुरू केलेले आंदोलन, व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नाकारण्यात येणे, नॉन क्रिमीलेयरसाठी ६ लाखांची मर्यादा असताना सामाजिक न्याय विभागाने दि. ३१ ऑगस्ट, २०१३ रोजी परिपत्रक काढून सदर मर्यादा साडे चार लाख केल्याचे महाविद्यालयांना कळविणे, शिष्यवृत्तीवर होणाऱ्या खर्चासंदर्भात शासनावरील आर्थिक भार कमी करण्याच्या अनुषंगाने शासनाने समिती गठीत करणे, दि.३१ ऑगस्ट २०१३ रोजीचे परिपत्रक रद्द करण्याची आवश्यकता, इतर मागासवर्गीयांना नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा ७ लाख रुपये करण्याबाबत तसेच ई.बी.सी. सवलतीकरिता उत्पन्न मर्यादा ४.५० लाख इतकी करण्याकरिता वारंवार मागणी होत असणे,याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." |
| (१६) | दिनांक १९ डिसेंबर २०१३ | **श्री देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** | "नागपूर जिल्ह्यातील हिंगणा व बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना स्वतःचे उद्योग सुरू ठेवण्यास तसेच नव्याने उद्योग उभारण्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, माहे डिसेंबर, २०१३ मध्ये पाण्याचे दर ५०% वाढविण्यात येणे, जमिनीचा दर भुखंड वाटपाकरिता जवळपास दुप्पट करणे, कंपाऊंडींग दराचे परिपत्रक पुर्णपणे विसंगत असणे, ॲसीड रिकव्हरी प्लँटच्या नावाखाली महाराष्ट्र प्रदुषण नियामक मंडळाने अनेक उद्योगांना उद्योग बंद करण्याच्या नोटीसा देणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पायाभुत सुविधेअंतर्गत सीईटीपी प्लांट उभारुन उद्योगांना सुविधा देण्याची आवश्यकता, मा.उच्च न्यायालयाच्या, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | औरंगाबाद खंडपीठाने नाशिक एम.आय.डी.सी.ला सीईटीपी प्लांट पायाभुत सुविधा अंतर्गत उभारण्याचे निर्देश देणे, व्हॅटच्या परताव्यास विलंबामुळेही उद्योजक त्रस्त असणे, विजेच्या बाबतीतही प्रति युनिट १२ रुपये आकारण्यात येणे, विजेच्या दरवाढीमुळे उद्योजकांची होणारी लुट, अन्य राज्यात विजेचे दर अर्धे असणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सध्या विकासशुल्क रेडीरेकनरचा संदर्भ देऊन अवास्तविक दराने वसुल करणे, बुटीबोरी एम.आय.डी.सी. ही डी प्लस मागासलेल्या वर्गीकरणात मोडणे, शासनाने एकीकडे ॲडव्हांटेज विदर्भ म्हणून औद्योगिक सुधारणा करण्याची केलेली घोषणा, विदर्भ ॲडव्हांटेज उपक्रमात विजेमुळे उद्योग स्थापन करण्यास उद्योजक उत्सुक नसणे, शासनाचे उदासीन धोरण कारणीभुत ठरल्याने या उपक्रमाला फारसा प्रतिसाद न मिळणे, या दोन्ही औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांच्या समस्या तातडीने सोडवुन उद्योगांना नवसंजीवनी देण्याची गरज, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना." |
| (१७) | दिनांक २० डिसेंबर २०१३ | **श्री देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** | "वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य या आरोग्य सेवा देणाऱ्या, समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असणाऱ्या विभागांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक तसेच M.B.B.S. झालेले वैद्यकीय अधिकारी B.A.M.S., दंत चिकित्सा व आयुर्वेदिक या संवर्गातील राज्य कामगार योजनेतील अनेक पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याने आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा देण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात अनेक पदे भरणे, अशी तात्पुरत्या स्वरुपातील पदे वर्षानुवर्षे कार्यरत राहिल्याने त्यांच्या सेवा विषयक गंभीर बाबी निर्माण होणे, या सेवाविषयक बाबी सोडविण्यासाठी वारंवार शिष्टमंडळे संबंधित विभागाचे मंत्री, सचिव व अन्य निम्न स्तरावरील अधिकारी यांना भेटणे, प्रसंगी नुकतेच दिनांक १६ ऑक्टोबर, २०१३ पासून सुरू केलेली आंदोलने व यामुळे रुग्ण सेवा व शिक्षणावर होत असलेले विपरीत परिणाम, वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या डॉक्टरांची तात्पुरत्या सेवेतील पदे नियमित करण्यासाठी तातडीने येत्या २ महिन्यात उपाययोजना करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना." |

लक्षवेधी सूचना

**सन २०१४ चे व्दितीय अधिवेशन**

| अ.क्र | दिनांक | सदस्याचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| (१८) | दिनांक ९ जून २०१४ | **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** देवेंद्र फडणवीस, सुधीर पारवे, विजय घोडमारे, विकास कुंभारे, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, शिशिर शिंदे, नितीन भोसले, बाळा नांदगांवकर, प्रविण दरेकर, ॲड.उत्तमराव ढिकले, प्रकाश भोईर, विजय वडेट्टीवार, अमित झनक, वैजनाथ शिंदे, सुरेश जेथलिया, एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, सुधीर मुनगंटीवार, संजय राठोड, डॉ.संजय कुटे, श्री.विजयराज शिंदे, ॲड.आशिष जयस्वाल, कॅ.अभिजीत अडसूळ, डॉ.संजय रायमुलकर, **वि.स.स.** | "राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत नागपूर विभागतील मान्यता प्राप्त रुग्णालयातून रुग्णांची मोठया प्रमाणात लुट होत असल्याचे नुकतेच आढळुन येणे, जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत मंजूर निधी मध्ये उपचारासाठी खर्चावरील साधनसामग्री (डिस्पोजेबल्स्) आणि आवश्यक तेथे जिवनावश्यक किमती औषधे (लाईफ सेव्हिंग्ज ड्रग्ज) व आवश्यक चाचण्या यावरील खर्च भागविण्यासाठी निधी मंजूर करण्यात येणे, परंतु जीवनदायी आरोग्य योजनेशी संलग्नीत असलेले नागपूर विभागातील रुग्णालय व्यवस्थापन रुग्णांकडून औषधांसाठी अतिरिक्त निधीची मागणी करुन रुग्णांची लुट करणे, सुपर स्पेशालिस्टचे डॉ. दास हे जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत असलेल्या रुग्णांना संजीवनी मेडीकल स्टोअर्स येथून पुन्हा औषधी घेण्यास भाग पाडत असणे, मेडीकल येथील अधिष्ठाता हे २०-२० दिवस रुग्णालयात उपस्थित नसणे, माहे फेब्रुवारी, २०१४ अखेरपर्यंत शासकीय रुग्णालये व इतर काही खाजगी रुग्णालये वगळता बाकी रुग्णालयांमध्ये या योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या रुग्णांची संख्या अत्यल्प असणे, या पैकी शुअरटेक हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, म्युर मेमोरिअल हॉस्पिटल, केअर हॉस्पिटल युनिट ऑफ तन्ना हॉस्पिटल या रुग्णालयात लाभार्थ्यांची संख्या निरंक असणे, तर राधाकृष्ण हॉस्पिटल-एक, अर्नेजा हॉस्पिटल, सुश्रुत हॉस्पिटल, इव्हीस्टा आय केअर सेंटर प्रत्येकी दोन महात्मे आय बॅक ॲन्ड हॉस्पिटल, सेंटर पॉईंट हॉस्पिटल, लता मंगेशकर हॉस्पिटल, प्रत्येकी तीन एवढी नग्न संख्या असणे, या सर्व खाजगी रुग्णालयाकडून हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याने गरीब रुग्णांना या योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी येत असणे, परिणामी रुग्णांना अनेक गैरसोयीचा व आर्थिक भुर्दंड सहन रावा लागणे, शासनाकडून अंदाजपत्रकाप्रमाणे जिवनदायी योजनेअंतर्गत निधी प्राप्त होवून सुद्धा रुग्णांना कडून लाखो रुपयांची लुट करण्यात येणे, यामुळे रुग्णांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." |

| | | | |
|---|---|---|---|
| (१९) | दिनांक १२ जून २०१४ | **सर्वश्री सुधीर मुनगंटीवार,** डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री गोपालदास अग्रवाल, रामरतनबापू राऊत, राजकुमार बडोले, देवेंद्र फडणवीस, नरेंद्र भोंडेकर, **वि.स.स.** | "पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यातील शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र शासनाने दिनांक ८ मे २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक १५ मे २०१४ रोजी पासून बंद केल्यामुळे या भागातील धान व्यापाऱ्यांनी किमतीपेक्षा कमी दराने धान खरेदी केल्यामुळे शेतकऱ्यांना दर हेक्टरी अंदाजे रुपये २०,०००/- या प्रमाणे झालेले नुकसान, गोंदिया जिल्ह्यात गत ३ वर्षांच्या तुलनेत सन २०१२-१३ मध्ये जी खरेदी करण्यात आली ती खरीप हंगामाच्या तुलनेत १० ते १५ टक्केच्या वर झाली नसणे, दरवर्षी ३० जून पर्यंत आधारभूत धान खरेदी केंद्र सुरू असतानाही धान आधारभूत केंद्र बंद केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, सदर शासन निर्णय मागे घेण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊनही शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता शासनाच्या अभिकर्ता आदिवासी विकास महामंडळ आणि मार्केटींग फेडरेशन या दोन्ही अभिकर्ता संस्था तातडीने सुरू करण्याची आवश्यकता, उपरोक्त प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." |

## म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (सन २००८ ते २०१३)

सन २००८ चे पहिले अधिवेशन

| अ.क्र. | दिनांक | सदस्यांचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| १. | २ एप्रिल २००८ | सर्वश्री रामदास कदम, एकनाथराव खडसे (पाटील), वि.स.स. | "राज्यात शिधापत्रिकेवरील धान्य व रॉकेलचा होत असलेला अपुरा व अनियमित पुरवठा, साठेबाजांकडून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेला काळाबाजार, दारिद्र्य रेषेखालील गरीब व आदिवासी जनतेची अधिकारी व दुकानदारांच्या संगनमताने होत असलेली लूट." |
| | | **सन २०११ चे प्रथम अधिवेशन** | |
| १. | ७ एप्रिल २०११ | सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, बाळा नांदगावकर, गणपतराव देशमुख, देवेंद्र फडणवीस, प्रकाश शेंडगे, रविंद्र वायकर, वि.स.स. | "राज्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या वर्गातील व्यक्तिसाठी शासनाच्या विविध योजना राबविताना होत असलेला अन्याय, त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र मिळताना व त्यांची पडताळणी करतांना त्यांना संबंधित विभागाकडून होत असलेला त्रास व विलंब, नॉन क्रिमिलियरची आर्थिक मर्यादा वाढविण्याची तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाची आर्थिक मर्यादासुद्धा वाढविण्याची त्या समाजातील जनतेकडून होत असलेली मागणी व इतर मागासवर्गीयांना पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यात आरक्षण देण्याच्या मागणीकडे सामान्य प्रशासन विभागाचे झालेले दुर्लक्ष,." |

## शासकीय ठराव (सन २०१० ते २०१३)
## सन २०१० चे पहिले अधिवेशन

| अ.क्र. | दिनांक | सदस्यांचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| ४. | २९ मार्च २०१० | मा. अध्यक्षांचा ठराव | "महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून, महाराष्ट्र राज्यात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर होणे नितांत गरजेचे आहे. केंद्र शासनाच्या त्रिभाषा सुत्रानुसार केंद्र शासनाने वेळोवेळी याबाबत प्रादेशिक भाषेचा (राज्य भाषा) वापर करण्याबाबत दिलेल्या सूचना, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, राज्यातील केंद्र शासनाची कार्यालये, महामंडळे व इतर तत्सम संस्थांमध्ये वरील सुचनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." |
| | | **सन २०१० चे द्वितीय अधिवेशन** | |
| ५. | २९ मार्च २०१० | उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचा शासकीय ठराव | **ज्याअर्थी**, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) याच्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये अधिसूचना काढून चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी गडचिरोली येथे "गोंडवाना विद्यापीठ" या नावाचे एक नवीन विद्यापीठ स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे;<br>**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी ठराव संमत केल्याखेरीज अशी कोणतीही अधिसूचना काढली जाणार नाही, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३ चे पोट-कलम (२) याच्या परंतुकामध्ये तरतूद आहे;<br>**त्याअर्थी,** आता, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) च्या परंतुकानुसार, राज्य शासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी गडचिरोली येथे "गोंडवाना विद्यापीठ" या नावाचे एक नवीन विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, असा महाराष्ट्र विधानसभा याद्वारे ठराव करीत आहे. |
| | | **सन २०१० चे तृतीय अधिवेशन** | |
| ६. | १३ डिसेंबर २०१० | वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचा शासकीय ठराव | **ज्याअर्थी,** संसदेने रोगनिवारणाच्या प्रयोजनासाठी, मानवी अवयव काढून टाकणे, त्यांची साठवण करणे व त्यांचे प्रतिरोपण करणे आणि |

| | | | |
|---|---|---|---|
